# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभ दीपावली



॥ग्रंथाली॥

सप्रेम नमस्कार,
आपली प्रतिक्रिया जाणण्यास
उत्सुक आहोत.
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह!
आपले स्नेहांकित
सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त
आल्हाद गोडबोले, अतिथी संपादक
योगिता मोरे, धनश्री धारप
अनिरुद्ध गद्रे आणि
ग्रंथाली परिवार
granthali02@gmail.com







# शब्द रुची

दिवाळी विशेषांक
नोव्हेंबर २०१५
मूल्य १२० रु.
पृष्ठ १५२




शुभ दीपावली !
दीपमाळेच्या कळ्या-कळ्यांतुन
तेजःपुंज प्रकाश...
अर्थपूर्ण सेवेतून गवसे
समृद्धीचे अवकाश
आमचे सर्व सभासद, ग्राहक व सर्व हितचिंतकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
सारस्वत बँक
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
मिले यहाँ, दोनो जहाँ
प्रशासकीय कार्यालय: एकनाथ ठाकूर भवन, ९५३, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई -४०० ०२५. दुरध्वनी - (०२२) ६६०० ५५५५

आपणा सर्वांना दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

Supreme©

People who know plastics best

पाईपिंगचे संपूर्ण समाधान



पाईपिंगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीमची' दर्जेदार, पर्यावरण पूरक उत्पादने...

aqua Gold® उच्च दाबाची प्लंबिंग प्रणाली

Lifeline® गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली

indo green™ गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली

AQUAKRAFT™ बाथ फिटिंग्स्

SILBOND™ FOR EVERLASTING BOND सॉलव्हंट सिमेंट uPVC आणि C-PVC

SILTANK ओव्हरहेड वॉटर टँक्स्

S.W.R. ड्रेनेज प्रणाली

SKYRISE™ हाय-टेक, लो नॉईज, एस.डब्ल्यू.आर. ड्रेनेज प्रणाली

Nu-Drain™ भूमिगत ड्रेनेज प्रणाली

SAFEGARD सेप्टीक टँक्स्

आयुष्यभराची साथ...

दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव फोन : 0257- 3050541,42,43,44,49 • www.supreme.co.in




**मोठ्या आवाजाच्या फटाक्यांनी वायू आणि ध्वनी प्रदूषण होते.**

**ध्वनीप्रदूषण करणारे फटाके लावू नका.**

**अतिआवाजाच्या फटाक्यांनी बहिरेपणा येऊ शकतो.**

**शाळा, महाविद्यालय, रुग्णालय, न्यायालय व धार्मिक स्थळे हे शांतता क्षेत्र आहेत.**

मा. ना. श्री. रामदास कदम
मंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र राज्य

मा. ना. श्री. प्रवीण पोटे पाटील
राज्यमंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

**पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन**
http://envis.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
www.mpcb.gov.in


टीजेएस्बी बँक
टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड
(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)
विश्वास जिंदगी भर का
घेऊनी दिव्यांचा प्रकाश सोनेरी, माळोनी गंध मधूर उटण्याचा...
करा संकल्प सुंदर जगण्याचा, गाठूनी मुहुर्त दिवाळीच्या सणाचा...
टी जे एस् बी सहकारी बँक परिवारातर्फे सर्वांना
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
/tjsbonline /tjsbbank /tjsb-sahakari-bank-ltd
प्रशासकीय आणि नोंदणीकृत कार्यालय : टी जे एस् बी हाऊस, प्लॉट क्र. बी ५, रोड क्र.२, वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४.
टोल फ्री क्र.: १८०० २२३ ४६६ | www.tjsb.co.in


शुभ दिपावली
येणाऱ्या दिवाळीच्या पवित्र
प्रकाशामध्ये आपले जीवन आनंद,
शांती व समृद्धीने उजळून जावो.
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
Union Bank
of India
Good people to bank with
www.unionbankofindia.co.in | टोल फ्री नं. 1800 22 22 44, 1800 208 2244
यांच्याबरोबर अभिमानाने सहभागी
Digital India


New India Assurance
wishes you a
Happy Diwali
Leadership and beyond
न्यू इन्डिया एश्योरन्स
NEW INDIA ASSURANCE
India's Premier General Insurance Company
CIN : U 99999 MH 1919 GOI 000 526
IRDA REGN. No. 190
Insurance is a subject matter of solicitation
Personal | Commercial | Industrial | Liability | Social | Rural | Micro | Credit Insurance
24x7 - Toll free number 1800-209-1415 | online.newindia.co.in | www.newindia.co.in

# शब्द रुची

दिवाळी विशेषांक : नोव्हेंबर २०१५
अंक सातवा, मूल्य १२० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
अतिथी संपादक : आल्हाद गोडबोले

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthali02@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthali02@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग,
माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५० ● वेळ : ११ ते ६
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


१२
खुल्या विचारांचे व्यासपीठ! बहुमुखी 'ग्रंथाली'
**दिनकर गांगल**





२९
'आणीबाणी'चं सुलभीकरण
**सतीश कामत**


४६
दुसरे महायुद्ध तिसऱ्या नजरेतून
**आल्हाद गोडबोले**






५४
स्थलांतर थांबले; माणूस संपला!
**शेखर देशमुख**

६४
अमेरिकन वैपुल्याची अडगळ
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**






७०
स्मार्ट सिटी : स्वप्न की सत्य?
**प्रभाकर भिडे**

७८
पुरस्कार, तिरस्कार, सोपस्कार इत्यादी
**व्यंगचित्रे – प्रदीप म्हापसेकर**



८२
रमेत रमले, रमणी मी...
**सोनाली कुलकर्णी**



९६
प्रिय अण्णा
**वर्षा ढेरे-गजेंद्रगडकर**



१०४
**देवतरु पारिजात**
**प्रा. नीला कोर्डे**



११४
वाडीचं कूळ आणि
वस्तीचं मूळ
**मुकुंद कुळे**



१२०
लायसन्स
(मूळ कथा : सआदत हसन मंटो)
**अनुवाद : किरण येले**

प्रेमा तुझा रंग कसा? / १२४
**स्मिता भागवत**
अघटित / १३०
**प्रा. प्रतिभा सराफ**



**मुखपृष्ठास कारण की... / १३४**

**कवितेचं व्यासपीठ / १३७**
किरण येले, यशवंत मनोहर, सदानंद डबीर,
श्रीपाद भालचंद्र जोशी, उषा मेहता, अशोक कोतवाल

**ग्रंथपाने / १४२**
लोकवाङ्मय प्रकाशन, मैत्रेय प्रकाशन, मौज प्रकाशन,
रोहन प्रकाशन
**ग्रंथाली ग्रथपाने / १४७**


## संपादकीय...

### चाळिशी ओलांडताना

मराठी माणसाचे, मराठी माणसासाठी महाराष्ट्र राज्य पंचावन्न वर्षांपूर्वी अस्तित्वात आले, त्यावेळी मराठी भाषा, मराठी साहित्य, त्यातील ज्ञान ही अभिजन वर्गाची मिरास म्हणावी, अशीच स्थिती होती. पुढील दशकात शिक्षणाचा प्रसार झाला, तरी स्थिती फारशी बदलली नाही. राज्य रयतेचे, पण साहित्य अभिजनांचे ही अवस्था पुढील दशकाच्या मध्यापर्यंत कायम होती. बहुजन आणि दलित वर्गाचा हुंकार अस्फुट का होईना, उमटू लागला होता. पण त्याला आवाज दिला तो मुख्यतः 'ग्रंथाली'ने. साहित्य सामान्य माणसांपर्यंत पोचवण्याच्या तळमळीतून दिनकर गांगल, अरुण साधू, कुमार केतकर, शेखर साठे यांनी सुरु केलेली ही वाचक चळवळ आता चाळिशी ओलांडून पाचव्या दशकात पाऊल ठेवते आहे. या टप्प्यावर 'ग्रंथाली'च्या संस्थापकांना काय वाटते, ते गांगल यांनी या अंकात वाचकांपुढे ठेवले आहे.

योगायोग असा की, देशात पहिले सत्तांतर घडवून आणण्यास कारणीभूत ठरलेल्या आणीबाणीचीही यंदा चाळिशी झाली. आणीबाणीनंतर जन्माला आलेल्या पिढीने गेल्या चाळीस वर्षांत जनता पक्षाप्रमाणे जनता दल, डावी आघाडी, राष्ट्रीय आघाडी, एनडीए म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडी असे इतर काँग्रेसेतर पर्यायही अनुभवून अखेर नरेंद्र मोदींच्या भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत देऊन पाहिले. पण त्यांच्याच पक्षाचे विदुर लालकृष्ण अडवाणी यांना आणीबाणीचे सावट ४० वर्षांनंतरही अजून असल्याचे का जाणवावे? या प्रश्नाचे उत्तर सतीश कामत यांनी दिले आहे. पण हाच प्रश्न तरुण मतदारांनीही स्वतःला विचारून पाहायला हवा आहे.

दुसऱ्या महायुद्धातील सत्तर वर्षांपूर्वीचा पराभव पचवून पुन्हा समर्थ बनलेल्या आणि युरोपचे नेतृत्त्व करू लागलेल्या जर्मनीपुढे निर्वासितांच्या प्रश्नाने, या शतकातील मोठे म्हणावे असे, संकट उभे केले आहे. या विषयाच्या मुळाशी जाणारा लेख शेखर देशमुख यांनी लिहिला आहे.

रमाबाई आंबेडकरांची भूमिका साकारलेल्या सोनाली कुलकर्णीने उलगडलेले रमेचे अंतरंग आणि डॉ. रा. चिं. ढेरे यांच्याशी त्यांची कन्या वर्षा हिने साधलेला पत्ररूप संवाद हे या अंकाचे आणखी एक आगळे वैशिष्ट्य ठरावे.

शिवाय मंटोची कथा, प्रदीप म्हापसेकरांचे फटकारे, कविता, अमेरिकेतील 'वैपुल्याची अडगळ', स्मार्ट शहरांचे स्वप्न आदी साहित्यही वाचकांना आवडेल, असा विश्वास आहे.

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.


BOI
0
आनंदाची बातमी!
मिळवा घरासाठी आणि
कारसाठी कर्ज
%
कार्यवाही शुल्कावर
खास ऑफर
31 डिसेंबर 15
पर्यंत
निवासी कर्ज
ईएमआय ₹855/-*
व्याजदर 9.70% पर्यंत कमी झाला
कारसाठी कर्ज
ईएमआय ₹1668/-*
व्याजदर 10.15% पर्यंत कमी झाला
*दर लाखांसाठी
टोल फ्री 1800 103 1906
1800 220 229
बँक ऑफ इंडिया
नातं बँकिंग पलिकडचं
www.bankofindia.co.in
वर आम्हाला फॉलो करा

# राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : (०२२) २२६३ १३ २५ / फॅक्स : २२६५ ३९ ६६/

http://rmvs.maharashttra.gov.in

## राज्य मराठी विकास संस्था

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

- **स्थापना** - १ मे १९९२
- **प्रमुख उद्दिष्टे** - १. मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करणे.
  २. विविध क्षेत्रात होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.
- **प्रकाशने** - विद्यार्थी, शिक्षक, पालक, संशोधक, प्राध्यापक, शासकीय कर्मचारी, पत्रकार, अधिकारी, व सर्वसामान्य वाचक यांनी नावाजलेली व महाराष्ट्र शासन तसेच विविध मान्यवरांनी गौरविलेली ७१ पुस्तके प्रकाशित


### निवडक प्रकाशने

- **कोश / सूची**

१. मराठी ग्रंथसूची (भाग १ ते ६)
२. मराठी कोश व संदर्भ साधने यांची समग्र सूची
३. मराठी वैद्यक ग्रंथसूची
४. मराठी विज्ञानवाङ्मय सूची
५. वस्त्रनिर्मिती माहितीकोश (खंड १ ते ४)
६. यंत्रालयाचा ज्ञानकोश
७. फार्सी-मराठी व्युत्पत्तिकोश
८. दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश (खंड १ ते ३)
९. विज्ञान संकल्पना कोश (इयत्ता ५ वी ते १० वी)
१०. शालेय मराठी शब्दकोश (इयत्ता ५ वी ते १२ वी)

- **भाषाविषयक**

१. मराठी भाषा : वाढ आणि बिघाड
२. बेलभाषा
३. भाषा - आपली सर्वांचीच
४. वृद्धिः भाषेचे व भाषाभ्यासाचे विकसन
५. शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम
६. पालघर तालुका - बोली, समाज व संस्कृती

- **चरित्रमाला**

१. बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य
२. डॉ. अ. का. प्रियोळकर : व्यक्ती आणि कार्य
३. शंतनुराव किर्लोस्कर : व्यक्ती आणि कार्य
४. गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य
५. व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य
६. काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य

- **शालेय गट**

१. वाचू आनंदे (बाल गट व कुमार गट)
२. शिक्षणाचे अंतरंग
३. मराठी लेखन मार्गदर्शिका
४. का आणि कसे ?
५. तारकांशी मैत्री

- **श्राव्य पुस्तके**

१. दासबोध (५ सीडीजचा संच)
२. कृष्णाकाठ

## दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !!



**सर्व प्रकाशनांवर ४० टक्के सूट**
**अधिक माहितीसाठी संस्थेच्या संकेतस्थळाला भेट द्या.**

### प्रशिक्षण योजना

- अमराठी भाषकांसाठी मराठीचे अध्यापन
- संगणकावरील मराठी भाषा
- मराठी व्याकरण - शिक्षक व MPSC स्पर्धा परीक्षार्थींसाठी
- अनुवाद प्रशिक्षण
- मोडी लिपी प्रशिक्षण

### महत्त्वाचे प्रकल्प

- दृक्श्राव्य मालिका :आकाशदीप व पिंपळपान
- दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास
- आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
- महाराष्ट्राचा भाषिक नकाशा
- मोडी हस्तलिखितांचे देवनागरीकरण
- युनिकोडाधारित मराठी टंकांची निर्मिती
- मराठी संकेतस्थळांची स्पर्धा
- इ-पुस्तके (इ-बुक) निर्मिती
- दुर्मिळ मराठी ग्रंथांचे संगणकीकरण
- एन.सी.इ.आर.टी. तसेच विज्ञान प्रसार या संस्थांच्या पुस्तकांचे भाषांतर
- मराठीचे भाषिक टप्पे: दृक्श्राव्य मालिका
- भाषाविषयक चर्चासत्रे, सर्वेक्षणे, स्पर्धा, पुस्तक प्रदर्शने इत्यादी प्रासंगिक उपक्रम


# खुल्या विचारांचे व्यासपीठ! बहुमुखी 'ग्रंथाली'



दिनकर गांगल

'ग्रंथाली' हे काळाचे अपत्य आहे. तशी प्रत्येक घटना, चळवळ, अगदी व्यक्तीचा जन्ममृत्यूदेखील काळानुसार घडत असतात, परंतु तशी लक्षणे 'ग्रंथाली'च्या जन्मात, तिच्या विकास-विस्तारात व नंतर 'ग्रंथाली'च्या संस्थारूपात स्पष्ट, नि:संदिग्ध स्वरूपात दिसतात. मी यापुढे कथन केलेल्या काही गोष्टी विखुरल्या स्वरूपात पूर्वी सांगितल्या-लिहिल्या असतील, पण सलग मांडणी बहुधा प्रथम करत आहे.

मी 'ग्रंथाली'चा उल्लेख अनेक वेळा बहुमुखी संस्था असा केला आहे. ती तशीच आहे, कारण तसा प्रत्यय मला व सुदेशला, महाराष्ट्रात फिरत असताना वारंवार येतो. 'ग्रंथाली'च्या घटनेत जीव असलेले, 'ग्रंथाली'च्या गोष्टींत कोणत्या तरी टप्प्यावर सहभागी झालेले व म्हणून 'ग्रंथाली' आपलीच समजणारे शेकडो लोक महाराष्ट्राच्या भंडारा ते सावंतवाडी आणि जळगाव ते सोलापूर येथपर्यंत पसरलेल्या छत्तीस जिल्ह्यांत भेटतात, आत्मीयतेने बोलतात, पुन्हा विरून जातात. त्यांना कार्यकर्तेच म्हणायचे, कारण ते ग्रंथप्रसाराच्या आम्ही सुरू केलेल्या कार्यात गुंतले गेले. ते त्या काळात अतीव गरजेचे समाजोपयोगी काम आहे असा आमच्या प्रमाणेच त्यांचाही भरवसा होता. आम्ही तो मुखर केला होता, इतकेच. लेखक 'ग्रंथाली'कडे येत किंवा येतात, त्यात त्यांचा मतलब असे/असतो. त्यांना त्यांचे पुस्तक प्रकाशित करायचे असते. त्यांनी बऱ्याच वेळा 'ग्रंथाली'कडे येण्याआधी एक-दोन अधिक कर्तबगार प्रकाशकांशी संपर्क साधलेला असतो. तेथे प्रकाशनाचे जमले नाही, की त्यांना ग्रंथाली' हक्काची वाटते. कारण ती वाचक-






लेखक चळवळ आहे असे त्यांनी ऐकलेले असते. आमचा प्रकाशनहेतूही त्याच प्रकारचा, सामाजिक महत्त्वाचा असत आलेला आहे. लेखकांचा मतलब असतो, त्यामध्येही सामाजिक-सांस्कृतिक भाव असतो. म्हणून लेखक व त्यांचे लेखन आम्हाला जवळचे वाटते, आमचे वाटते. तो त्यांचा केवळ आविष्कार नसतो, त्या पाठीमागे त्यांची विशाल भावना छुपलेली असते. त्यांना त्यांचे लेखन समाजाच्या उपयोगाचे आहे असा विश्वास असतो. लेखक निव्वळ कलात्मक भाव ठेवून स्वप्रसिद्धीसाठी 'ग्रंथाली'कडे आले नाहीत. 'ग्रंथाली'च्या कार्यात गुंतलेल्या लेखकांनीदेखील आरंभीच्या काळात तो संकेत पाळला आणि त्यांचे दुसरे पुस्तक ग्रंथाली'कडे प्रकाशनार्थ आणले नाही.

'ग्रंथाली' त्यांच्या पुस्तकांची व त्यांच्या लेखकांची टामटुम करते, म्हणजे अवाजवी प्रसिद्धी करते असा प्रवाद आरंभकाळात होता. त्याचे कारणही तशी वदंता पसरवणारे देत. त्यांचे म्हणणे 'ग्रंथाली'च्या 'कोअर टीम'मध्ये पत्रकार अधिक आहेत. मी, कुमार केतकर व अरुण साधू, आम्ही तिघांनी त्या कार्यात झोकून दिले होते. पण आमच्या बैठकांना विविध व्यवसायांतील लोक निमित्ता निमित्ताने येत, त्यामध्ये पत्रकारांपैकी अरुण टिकेकर (त्यावेळी प्राध्यापक-स्तंभलेखक), भारतकुमार राऊत, विजय कुवळेकर, दिलीप चावरे, निखिल वागळे, सुधाकर वेलणकर येत, आणखीही काही नावे असतील पण ते नियमित नसत. (कै.) अशोक जैन हा तर कोअर टीमचाच भाग, पण त्याचे वास्तव्य दिल्लीत अधिक आणि त्याहूनही त्याचा तत्त्वाग्रह अधिक ठाम असे.

'ग्रंथाली'च्या यशाचे खरे कारण हे होते, की त्या कारणाने समाजाच्या नाडीवर बोट अचूक ठेवले गेले! आमचा शेखर साठे (बँकर) म्हणे, '' 'ग्रंथाली' हवेतील बाष्पासारखी सर्वत्र आहे!'' आम्हाला 'ग्रंथाली' या 'ब्रँडनेम'चे अप्रूप नव्हते. (ते नाव ठेवण्यातील कल्पकतेचे श्रेय अशोक जैनला वेळोवेळी दिले आहेच) आम्हाला 'कंटेंट'ची अपूर्वाई होती; आणि ती त्या काळातील प्रत्येक जागृत नागरिकाला, तरुणाला होती - पत्रकाराला होती, लेखकाला होती, व्यावसायिकाला होती, समाजकार्य करणाऱ्याला होती. शिक्षण सर्व समाजात पसरू लागल्यावर समाजपरिवर्तनाबद्दल औत्सुक्य, कुतूहल सर्वत्र निर्माण झाले होते, त्यासाठी वेगवेगळे विचारवाद व आंदोलनादी कृती समाजात घडत होत्या. त्यांस ग्रंथाली'ने व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्यात विधायकता होती, उपक्रमशीलता होती; समाज बदलत होता, त्याचे स्वरूप जाणून घेण्याची, जमेल तेथे हस्तक्षेप करण्याची ती इच्छा होती.

**'ग्रंथाली'ला 'कंटेंट'ची अपूर्वाई होती; आणि ती त्या काळातील प्रत्येक जागृत नागरिकाला, तरुणाला होती - पत्रकाराला होती, लेखकाला होती, व्यावसायिकाला होती, समाजकार्य करणाऱ्याला होती. शिक्षण सर्व समाजात पसरू लागल्यावर समाजपरिवर्तनाबद्दल औत्सुक्य, कुतूहल सर्वत्र निर्माण झाले होते, त्यासाठी वेगवेगळे विचारवाद व आंदोलनादी कृती समाजात घडत होत्या. त्यांस ग्रंथाली'ने व्यासपीठ उपलब्ध करून दिले.**



ती सर्व जाणीवजागृत लोकांना होती. ते सारे लोक ती तथाकथित 'टामटुम' करत होते. ते किंबहुना त्या काळचे नवशिक्षित, सुशिक्षित लोक यांना तो 'कंटेंट' आपोआप, समाजधारणेतून कळला होता. पुस्तक हे आमच्याप्रमाणेच त्यांच्यासाठी साधन होते - काहीतरी अमूर्त प्राप्त करण्याचे. त्या आधीची पंचवीस-तीस वर्षे १९४०-४५ पासून कलाजगतात डुबलेले लोक या नव्या 'फिनॉमिनन'कडे अचंब्याने पाहत होते. कलावाद व जीवनवाद हे त्या सुमारास प्रकटले. पाश्चात्य, मुख्यत: युरोपीयन देशांतून तत्त्वसिद्धांत व कलाविचार, दोन्ही आयात झाले, परंतु येथे त्यांची विभागणी झाली. कलावादी कलानंदात डुंबून गेले. तेच त्यांना त्यांचे सामाजिक जीवन वाटू लागले. उलट, डावे-उजवे सिद्धांतवाले त्यांच्या चळवळी-आंदोलनांत दंग होते. त्यांना सत्तेतून, राजकारणातून समाजपरिवर्तन हवे होते. 'ग्रंथाली'ने त्या दोन्हीतील सीमारेषा पुसली. 'ग्रंथाली' त्यांना एकत्र आणणारा मंच ठरत गेला. शरद जोशी व कॉ. यशवंत चव्हाण यांना एकत्र आणून त्यांची मुलाखत 'कलासक्त' परिवारातील प्रभुराम जोशी यांनी घेतली. हा केवळ एक नमुना. असे शेकडो कार्यक्रम, तशा चर्चा, तशी काही पुस्तकेदेखील 'ग्रंथाली'ने घडवून आणली. 'ग्रंथाली'ने साडेपाचशे पुस्तके प्रकाशित केली. त्यांच्या छपाईत 'कल्पना मुद्रणालया'चे चिं.स. ऊर्फ अण्णा लाटकर, 'जयमल्हार'चे मोहन खैरे यांचे स्थान अनन्य आहे. ते दोघे 'ग्रंथाली'चा भाग होते. मोहन खैरे याने छापखाना बंद केला असला तरी तो ग्रंथाली'च्या मित्रवर्तुळाचा भागच आहे. आता 'इंडिया प्रिंटिंग प्रेस'चे लिमये आणि 'मौज'चे भागवत यांच्याकडून 'ग्रंथाली' तिची पुस्तके मुद्रण करून घेत असते. 'ग्रंथाली'चे स्वत:चे डीटीपी युनिट आहे.

●

'ग्रंथाली'ने तिच्या वतीने पहिले पुस्तक प्रसिद्ध होण्याआधी साहित्य व समाजविषयक चर्चा मुंबईत योजण्यास सुरुवात केली. त्या कार्यक्रममालिकेचे संयोजक होते प्र.ना. परांजपे - 'रुईया'तील प्राध्यापक. पहिलीच चर्चा सरोजिनी वैद्य यांच्या 'पहाटपाणी' या नव्या पुस्तकानिमित्ताने होती. वक्त्या पुष्पा भावे, अध्यक्ष वा. ल. कुळकर्णी. पण कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असे, की त्या वेळी एम.ए.ला असलेल्या मीना गोखलेने चर्चेआधी निबंध वाचला होता. आता त्या मराठी साहित्यात विदुषी आहेत. वैद्य-भावे त्यावेळी सिद्ध झाल्या होत्या, पण त्यांना वलय लाभायचे होते. तशी दर महिन्याला एक चर्चा - वादग्रस्त, वादळी, समकालीन महत्त्वाचा विषय घेऊन.
वक्ते व.दि. कुळकर्णी, य.दि. फडके, स.गं. मालशे, रा.भा. पाटणकर यांच्यासारखे मान्यवर. त्यात एक वक्ता तरुण असेच असे. श्रोत्यांमध्ये अनंत काणेकर, माधव मनोहर अशी मंडळी असत. दीडशे श्रोत्यांच्या क्षमतेच्या सभागृहात दोनशेपर्यंत लोक गर्दी करून बसत. तेव्हापासून 'ग्रंथाली'चे चर्चा-कार्यक्रम हे मराठी रसिक श्रोत्यांना बौद्धिक आकर्षण वाटू लागले.
लोक बोरिवली-कल्याणहून दादरला येत.

गुलजार यांच्या नऊ पुस्तकांचा अनुवादित संच ठाण्याला गडकरी रंगायतनमध्ये अलिकडे, सप्टेंबर महिन्यात प्रसिद्ध झाला तेव्हा तसे जुने दिवस आठवले. मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने 'माय मराठी' पहिला खंड अमीर खानच्या हस्ते गतवर्षी प्रकाशित झाला तेव्हा मॅक्सिम बर्मसन यांनी मराठी अभ्यास परिषदेसाठी तयार केलेले मराठीचे 'स्ट्रक्चरल पॅटर्न' वगैरेसारखे पाच खंड 'ग्रंथाली'ने वितरीत केले होते, त्याची आठवण झाली. 'ग्रंथाली'ने सामाजिक महत्त्वाची पुस्तके प्रसिद्ध करत असताना तसे अभ्यासपूर्ण प्रकल्प हाताळले... वेगवेगळे छोटेमोठे कोश, संपादने वगैरे. 'कविता दशकाची' या प्रकल्पाचा उल्लेख करायला हवा. मंगेश पाडगावकर, शिरीष पै, विजया राजाध्यक्ष, रमेश तेंडुलकर, दया पवार या पाच संपादकांनी त्या दशकावर प्रभाव टाकणारे पण भविष्यात महत्त्वाचे ठरतील असे दहा कवी निवडले. त्या कवितासंग्रहाच्या तीन हजार प्रती त्यावेळी विकल्या गेल्या. तो संग्रह 'मौजे'तच छापला होता. त्या पुस्तकात पुढील काळात आलेल्या कवितेच्या वातावरणाची चाहूल लागते, बघा. त्याच बेताला 'ग्रंथाली'ची कवी सदानंद रेगे यांच्याबरोबर चर्चा चालली होती, 'कविताकल्लोळ' नावाचे वादळ महाराष्ट्रभर निर्माण करण्याची. त्यामागे भावना

**युरोपीयन देशांतून तत्त्वसिद्धांत व कलाविचार, दोन्ही आयात झाले, परंतु येथे त्यांची विभागणी झाली. कलावादी कलानंदात डुंबून गेले. तेच त्यांना त्यांचे सामाजिक जीवन वाटू लागले. उलट, डावे-उजवे सिद्धांतवाले त्यांच्या चळवळी-आंदोलनांत दंग होते. त्यांना सत्तेतून, राजकारणातून समाजपरिवर्तन हवे होते. 'ग्रंथाली'ने त्या दोन्हीतील सीमारेषा पुसली. 'ग्रंथाली' त्यांना एकत्र आणणारा मंच ठरत गेला.**

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने




'मौनराग'नंतरचा आणि सर्वार्थाने त्यापलीकडे जाणारा ललित लेखसंग्रह. ललितकला आणि ज्ञानशाखांच्या संयोगभूमीतून असे स्वायत्तविश्व इथे साकारते की स्वप्न, कल्पित आणि वास्तवाच्या सीमारेषा परस्परात विरून जातात. आपले विश्वाचे आकलन त्रि-मितीय जाणीव ओलांडून अपाराकडे झेपावते. आपल्या जगण्यातील अनेक बंद खिडक्या उघडणारे हे लेखन आपल्या प्रातिभ बळाने मौलिक क्षणात कोंडलेले शाश्वत प्रकाशमान करते.

## त्रिबंध

### महेश एलकुंचवार

किंमत १६० रुपये



संगीतासारख्या कलेच्या चिरंतनत्वाचा अर्थ मानवी जीवनाबद्दलच्या मूलभूत प्रश्नांच्या तळापर्यंत कसा झिरपत गेला आहे हे मांडत, नव्या परिमाणांसह मुद्रा कादंबरी प्रकटत जाते आणि उत्कट अशी सर्जनशील अभिजात कलाकृती वाचल्याचा सात्विक आनंद वाचकांना बहाल करत राहते.

## मुद्रा

### आशा बगे

किंमत २७५ रुपये




रण-दुर्ग या मिलिंद बोकिलांच्या कादंबरिकांतून स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे वेगवेगळे कोन तपासत, माणूस आणि निसर्ग यांच्यातील अनाम पण सूक्ष्म नातं शोधण्याचा प्रयत्न राहिला आहे. या वाटेवरचीच ही नवी कादंबरिका... निसर्गाचं एक उत्कट, सजीव लँडस्केप जणू शब्दांतून चितारत जाणारी, वाचकांना गुंतवून ठेवत अंतर्मुखतेचा प्रत्यय देणारी

## मार्ग

### मिलिंद बोकील

किंमत १२० रुपये




भूतकाळातल्या आठवणी आणि संवेदना (नॉस्टॅल्जिया) जाग्या करणारा एक खजिना. नर्मविनोदाची झालर असलेले हे लेखन, वाचायला हलकेफुलके पण अतिशय प्रामाणिक आणि परखड आहे. यात विचारलेले गहन प्रश्न कुठल्याही वयाच्या वाचकाला विचार करायला लावतील.

## पन्नाशीचा भोज्या

### रवी अभ्यंकर

किंमत ३०० रुपये

दुसरी आवृत्ती

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ ☎ २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

**चाळीस–पंचेचाळीशीच्या तरुणांना त्यांचे संघर्षमय सामाजिक जीवन चितारण्याची सूचना 'हिट' ठरली. दया पवार जी कादंबरी लिहिणार होता, ते 'बलुतं' हे आत्मकथन म्हणून प्रसिद्ध झाले. वाचकांचे जग हादरले. तो नव्या दलित चळवळींचा जाहीरनामा ठरला.**

इतकीच की कविता व एकांकिका हे लेखकांना भावणारे आविष्काराचे तत्कालीन प्रभावी प्रकार आहेत, त्या माध्यमातूनदेखील लोकांपर्यंत पोचायचे! आत्मकथन हा वाङ्मयप्रकार तर आम्ही घुसळून टाकलाच होता. तोपर्यंत मराठी साहित्यात फक्त कृतार्थ जीवन जगलेले, प्रौढावस्थेस पोचलेले लोक त्यांची जीवनकहाणी आत्मरूपात लिहीत. आम्ही चाळीस-पंचेचाळीशीच्या तरुणांना त्यांचे संघर्षमय सामाजिक जीवन चितारण्याची सूचना दिली व ती 'हिट' ठरली. दया पवार जी कादंबरी लिहिणार होता, ते 'बलुतं' हे आत्मकथन म्हणून प्रसिद्ध झाले. वाचकांचे जग हादरले. तो नव्या दलित चळवळींचा जाहीरनामा ठरला. खुद्द पु. ल. देशपांडे यांनी गदगदून जाऊन 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये त्या निमित्ताने लिहिले.

आम्हाला लोकसंपर्काचे नवनवे फॉर्म, नवनवे विषय सुचत गेले हे सत्यच, त्याचे कारण आमच्या – जाणीवजागृत तरुणांच्या– संवेदना तीव्र, प्रखर होत्या. त्यांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातील संघर्ष व विधायकताही खुणावत होती. त्या आधीच्या चारशे वर्षांतील युरोप-अमेरिकेतील आधुनिक इतिहास मार्गदर्शनाचे संकेत सुचवत होता. वेगवेगळी कौशल्ये व जाण असलेले आम्ही बुद्धिमान तरुण 'ग्रंथाली'त एकत्र आलो होतो. मी, कुमार केतकर, अरुण साधू, संजीव खांडेकर, के.डी. नाईक... आम्ही जवळजवळ चोवीस तास एकत्र असू. मोबाईल वगळाच, सगळ्यांकडे फोनदेखील नव्हते, तरी तसा चोवीस तासांचा जैव संपर्क अशोक दातार, शेखर साठे, उषा मेहता, वासंती-अरुण मुजुमदार यांच्याशी असे. त्या पलीकडे समानधर्मा लोक अगणित होते. त्या प्रत्येकाची आवडीची व आस्थेची क्षेत्रे वेगवेगळी असत. आम्हाला आठ-दहा जणांना मात्र जगातील प्रत्येक विषय – त्यातील घटना आणि व्यक्ती – तिचे अभ्यासाचे, छंदाचे क्षेत्र यामध्ये रस असे, उत्सुकता असे. मी व कुमार यांना तर ती ओढच. त्यामुळे लोक त्यांची सुखदुःखे सांगण्यास दूरदूरून येत. त्यात व्यक्तिगत गॉसिपचा भाग कमी असे. त्यांचे आकर्षण-विषय आम्हास लुभावून घेत. कुमार त्याचे यथार्थ वर्णन करतो – खगोलातील तारे प्रत्यक्ष पाहण्यात वा गडकिल्ले चढून प्रत्यक्ष अनुभण्यात आम्हाला तेवढा इंटरेस्ट नाही. जेवढा ती वेडे करणाऱ्या व्यक्तींमध्ये आम्हाला इंटरेस्ट असतो'. कारण तशा 'वेड्या' व्यक्ती समाज घडवत असतात! आम्ही माणसांत-माणसांच्या जगण्यात' रमत होतो. त्यामुळे पुस्तकांचे विषय पुढे येत-सुचत. सुरेश लोटलीकरच्या घरच्या आरंभीच्या चौदा-पंधरा



ग्रंथदिडी हे 'ग्रंथाली'चे एक वैशिष्ट्य ठरले.

जणांच्या एका बैठकीत पुस्तकांचे ऐंशी विषय नोंदले गेले. त्यामध्ये दोन होते – 'मौजे'ची साहित्यसत्ता व मंगेशकर माफिया. ते १९७४ साली! इतकी विचारांची स्पष्टता व परखडपणा हे गुण 'ग्रंथाली' टीमच्या अंगांगात बाणले गेले होते. पुढे, 'सत्यकथे'च्या समाप्तीनंतर आम्ही राम पटवर्धन यांच्याशी प्रकट संवाद साधला, पटवर्धन ऐंशी वर्षांचे झाले तेव्हा त्यांचे अभीष्टचिंतन केले आणि लता मंगशेकर यांचे 'फुले वेचिता' हे संपादित पुस्तक प्रकाशित केले. तो त्यांच्या गुणांविषयीचा आदरभाव होय. परंतु त्यांनी साहित्यकलेची मिरास केली हे सत्य काळाने वेगवेगळ्या प्रकारे सिद्ध केले. साहित्यकलेची देखील दहशत असू शकते असा तो प्रकार!

'ग्रंथाली'तर्फे प्रसिद्ध होणारे लेखन बहुविध असे – नवीन विषय, नवीन शैली, नवीन फॉर्म – कधी अनुवादित कधी आधारित. 'ग्रंथाली'ची पुस्तक प्रकाशनासाठी स्वीकारण्याची पद्धत आरंभापासून तीच राहिली आहे. 'ग्रंथाली'चे नवे, तरुण ट्रस्टी बोर्ड त्यांच्या धारणेनुसार हस्तलिखिताचा स्वीकार–अस्वीकार ठरवते. आम्हा ज्येष्ठ मंडळींचा ग्रंथाली विश्वस्त संस्थेत औपचारिक भाग काही राहिलेला नाही. जवळजवळ सर्व वेळा, 'ग्रंथाली'चे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आम्हाला पाहण्यास मिळते. त्याची काही वेळा हुरहुर वाटते, पण आनंद अधिक होतो – नवनवीन उर्मी प्रकट होत आहेत आणि 'ग्रंथाली' चाळीस वर्षे झाली तरी निर्वेध चालू आहे; नव्हे, कालानुरूप नवीन झेप घेत आहे, त्याचा!

●

सुदेश 'ग्रंथाली'च्या नव्या पिढीच्या केंद्रवर्ती आहे. त्याचा संपर्क के. ज. पुरोहित, विजया राजाध्यक्ष, शरद पवार, अमृता सुभाष यांच्यापासून सॉफ्टवेअर इंजिनीयर प्रशांत कऱ्हाडे, समीर कदम यांच्यापर्यंत सर्वांशी असतो. त्याच्याभोवती तरुण विश्वस्तांचे मंडळ आहे. त्यामध्ये नीरजा आहे, धनंजय आहे, पद्मभूषण आहे, मूक आधार अनिल शिदोरेचा आहे. जुन्यांपैकी उषा मेहता, शिरीष वीरकर, दीपक घारे आणि प्रभाकर भिडे आहेतच. पण 'ग्रंथाली'ने प्रत्यक्षात ट्रस्टी बोर्ड कधी सार्वभौम मानले नाही. ती औपचारिकता विधिवत पाळली गेली, परंतु कारभार ग्रामसभेसारखा राहिला – साहित्यसंस्कृतीची गावसभा. ज्या कोणाकडे काही नवीन प्रस्ताव असेल, त्याने तो मांडायचा, हजर आहेत त्यांनी त्यावर खल करायचा, होय–नाही ठरवायचे आणि मग अर्थातच ट्रस्टींचे मत घ्यायचे. त्यामुळे त्या गावसभेत कधी अरुण शेवते असतो, कधी संजय बडुरकर असतो, कधी सुहास बहुळकर–दीपक घारे असतात, कधी अविनाश बर्वे–श्रीधर गांगल असतात. कधी श्रीधर पाटील असतो, कधी आल्हाद गोडबोले असतो तर कधी अरुण जोशी... असे अनेक! त्या त्या वेळी जो जी/जे ज्या हजर असेल/असतील त्यांना घेऊन, त्यांच्याबरोबरच्या सल्लामसलतीने 'ग्रंथाली' पुढे जात आलेली आहे.

ग्रंथाली'चा आरंभ तसाच झाला होता. मुंबईमध्ये शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशनसमोर एंपायर नावाचे इराणी रेस्टॉरंट असे. तेथे सामाजिक–सांस्कृतिक क्षेत्रांतील मंडळी संध्याकाळी ऑफिसे सुटल्यावर चहा पिण्यास वेगवेगळ्या अड्ड्यांमध्ये जमत. तेथे ग्रंथाली'साठी पहिली मीटिंग घेण्याचे शिजले. ती एका शनिवारी माझ्या घरी झाली. तिला मुद्दाम बोलावलेले प्रकाशक 'अभिनव'चे वा.वि. भट होते. बाकी आम्ही तेरा–चौदा मंडळी होतो. त्यामध्ये 'प्रिमियर'मध्ये नोकरी करणारा व ती सांभाळून पुस्तक प्रकाशन/वितरण करणारा ज्ञानेश्वर मुळेदेखील होता. त्यानेच 'ग्रंथाली'च्या पहिल्या पुस्तकांचा एकमेव वितरक म्हणून काम पाहिले. त्याचा



'बलुतं'ने दयार पवार यांना नाव आणि मानसन्मान मिळवून दिला.

**'ग्रंथाली'ने प्रत्यक्षात ट्रस्टी बोर्ड कधी सार्वभौम मानले नाही. ती औपचारिकता विधिवत पाळली गेली, परंतु कारभार ग्रामसभेसारखा राहिला – साहित्यसंस्कृतीची गावसभा. ज्या कोणाकडे काही नवीन प्रस्ताव असेल, त्याने तो मांडायचा, हजर आहेत त्यांनी त्यावर खल करायचा, होय–नाही ठरवायचे आणि मग अर्थातच ट्रस्टींचे मत घ्यायचे.**




**डॉ. नरेंद्र जाधव आणि पु. ल. देशपांडे**

त्यावेळी आधार वाटे. त्याचे उद्दिष्ट मोठा खाजगी प्रकाशक-वितरक बनण्याचे होते, तरी आमच्यासारख्या हौशी मंडळींबरोबरच्या कामांत, व्यवसायाची पर्वा न करता बिनदिक्कत सहभागी होत असे. 'ग्रंथाली'ने गावोगावी जाऊन पुस्तक प्रदर्शने मांडण्याचे ठरवले तेव्हा ज्ञानेश्वर मुळेचा अनुभव कामी आला.

त्या मीटिंगमध्ये ग्रंथाली'च्या संकल्पनेची प्रातिनिधिकता अजमावण्याचे ठरले. आम्ही उपस्थित चौदा जणांनी त्यांच्या त्यांच्या परिचयाच्या प्रत्येकी दहा व्यक्तींना पोस्टकार्ड टाकून एका मोठ्या सभेसाठी बोलवावे असे योजण्यात आले. तशी मीटिंग पत्रकार संघात झाली. तिला पंच्याहत्तराहून अधिक लोक आले. त्यामध्ये प्र. श्री. नेरुरकरांसारखे मान्यवरदेखील होते. तेथे तीन पुस्तके निर्माण करून ती पंचवीस रुपयांत व्यक्तिगत ग्राहकाला देण्याचे ठरले. पुस्तकांचे तीन विषयदेखील सुचवले गेले. ती जबाबदारी तिघांवर सोपवली गेली.

त्या मीटिंगआधी, आम्ही चौकश्यांचे काम बरेच केले होते. श्रीपु भागवत, केशवराव कोठावळे अशा प्रकाशकांशी बोललो होतो. छपाईचा माझा अनुभव पुण्यातील 'केसरी' दैनिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले तेव्हापासूनचा होता. कुमार व केडी 'सत्यचित्र' नावाचे साप्ताहिक वसईहून प्रसिद्ध करत होते. त्यामुळे तेही छपाईच्या क्षेत्रातील माहितगार होते. शिवाय, 'माणूस'चे श्रीग व दिलीप माजगावकर यांच्याकडे आमचे जाणेयेणे होते. त्यामुळे 'क्रेडिट'वर पुस्तके निर्माण होऊ शकतील असा अंदाज घेतला होता. कोणाचे क्रेडिट? पण मला वारंवार सांगितले पाहिजे, की आम्हाला आम्हा सर्वांच्या आयुष्यात आपपर भाव कधी शिवलाच नाही! पैशांचे महत्त्व कधी कळलेच नाही. पहिले पुस्तक तयार होऊन छपाईची वेळ आली तेव्हा दिलीप माजगावकरने कागदाचे पैसे द्यावे लागतील हे सुचवले तर आमचा मित्र मधुसूदन अदवानीकर याने त्याच्या खात्यातून पाच हजार रुपयांचा चेक दिला. त्यावेळी आमचे पगार दोनशे ते चारशेच्या दरम्यान होते. त्या पाच हजारांची आजची किंमत पाच लाखांहून अधिक रकमेची आहे. पण 'ग्रंथाली'त हे असेच घडत गेले आहे – प्रथम जाणिवेने आणि आता सद्भावाने. 'ग्रंथाली'चे गेल्या चार दशकांत जमा झालेले 'गुडविल' जबरदस्त आहे. सुदेशची व नव्या टीमची थोरवी अशी, की त्यांना गुडविल जमा कसे होत गेले याची जाणीव आहे आणि त्यामुळे ती मंडळी मुख्य दिशेपासून – उद्दिष्टांपासून – विचलित होत नाहीत. उलट, त्यांनीदेखील माध्यमबदलाची चाहूल घेतली आहे आणि ते ग्रंथाली 'टॅब', 'ॲप' अशी नवी तंत्रसाधने निर्माण करण्याच्या नादात आहेत.

'ग्रंथाली'चा धडाका १९७४ ते १९९० या काळात जोरकस होता. 'ग्रंथाली' सुजाण, रसिक जनतेतील इच्छा-आकांक्षा-संवेदना व्यक्त होण्याचे साधन बनून गेले होते. 'ग्रंथाली'च्या विकास-विस्तारातील पहिला टप्पा घटनेचा. लोकांमधून उत्स्फूर्तपणे निर्माण झालेल्या संस्थांचे जसे होते तसेच घडले. 'ग्रंथाली' पहिली काही वर्षे रजिस्टर केलेली नव्हती. परंतु आमचे खजिनदार नरेंद्र आपटे व मी, आमच्या प्रत्येकी पंचवीस रुपयांच्या पावत्या एप्रिल १९७४ मध्ये 'रुईया'च्या कट्ट्यावर फाडल्या गेल्या. तेथे का? तर त्या आधी कित्येक महिने, महिन्याच्या ठराविक दिवशी 'रुईया'मध्ये उत्सुक तरुणांच्या आम मीटिंगा होत असत (सौजन्य – पुष्पा भावे. त्या

**'ग्रंथाली'चा धडाका १९७४ ते १९९० या काळात जोरकस होता. 'ग्रंथाली' सुजाण, रसिक जनतेतील इच्छा-आकांक्षा-संवेदना व्यक्त होण्याचे साधन बनून गेले होते. 'ग्रंथाली'च्या विकास-विस्तारातील पहिला टप्पा घटनेचा. लोकांमधून उत्स्फूर्तपणे निर्माण झालेल्या संस्थांचे जसे होते तसेच घडले.**

तेथे प्राध्यापक होत्या.) त्या मीटिंग्जना पुष्पा त्रिलोकेकर, ह.शि. खरात अशी मंडळी नियमित आलेली आठवतात.

प्रत्येकी पंचवीस रुपये जमा करायचे व त्या बदल्यात प्रातिनिधिक बैठकीत योजलेली तीन पुस्तके द्यायची असे ठरले होते. दरम्यान, ध्यानी असे आले, की पंचवीस रुपयांत तीन नव्हे चार पुस्तके देता येतील; मग चौथे पुस्तक कोणते? मी व अशोक जैन, आम्ही त्याकाळी दुर्गा भागवत यांना भेटण्यास एशियाटिक लायब्ररी या त्यांच्या अड्ड्यामध्ये जात असू. दुर्गा भागवत यांना 'दुपानी' नावाचे ललित निबंधांचे पुस्तक लिहायचे आहे हे आम्हाला माहीत होते. दुर्गा भागवत यांची कराड साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून निवड झाली, त्यास आणीबाणीची पार्श्वभूमी होती. आम्ही 'ग्रंथाली'चे पहिले पुस्तक – तेही दुर्गा भागवत यांचे व ज्यांनी तीन पुस्तकांसाठी पंचवीस रुपये भरले होते त्यांना भेटपुस्तक म्हणून जाहीर केलेले, ते कराड संमेलनात प्रकाशित करण्याचे ठरवले. दुर्गा भागवत गडबडीत होत्या, तरी त्यांच्याकडून ललित लेख लिहून घेतले. काही लेख दोन पानांत मावेनात, म्हणून शीर्षक 'दुपानी'ऐवजी 'डूब' ठेवले. दुर्गा भागवत यांच्यासारखाच विविध गुणसंपन्न पण हटवादी देवीदास बागूल. त्याने काढलेल्या निसर्गरम्य 'ब्लॅक ॲण्ड व्हाइट' फोटोचे मुखपृष्ठ केले. बागूलचे फोटो हीदेखील क्रेझ होती; तो महातऱ्हेवाइक, पण आमच्या कंपूत प्रेमाने नांदे. ती 'ग्रंथाली'मधील वातावरणाची जादू होती. आम्ही सगळे उदारमनस्क, दुसऱ्याचे स्वातंत्र्य पुरेपूर जपणारे – तेवढीच त्याच्या साहित्यकलागुणांची, स्वभाववैशिष्ट्यांची कदर करणारे. 'ग्रंथाली' म्हटले तर 'कम्युन' होते, त्यामध्ये आम्ही सर्व मनमोकळेपणाने समूहजीवन जगत होतो! खूप विनोदाने, हसतखेळत आणि बुद्धिविचाराने. आयुष्यात अर्थाच्या शोधात असलेला, झगडणारा कोणीही तेथे जणू 'मेंबर' असे. कराड संमेलनात 'ग्रंथाली'शी जवळीक असणाऱ्या मंडळींची बसच तयार झाली! तो वैचारिक व साहित्यिक रसिकत्व यांचा बाणा पाहून नरहर कुरुंदकर, विद्याधर पुंडलिक, ग.वा. बेहरे असे मोठमोठे साहित्यिक 'ग्रंथाली'शी जोडले गेले.



कुसुमाग्रजांचाही 'हातभार'

'डूब'चे प्रकाशन डिसेंबर १९७५ मध्ये झाले, त्या पाठोपाठ 'उध्वस्त क्षितिज' (संपादन – अशोक जैन, प्रस्तावना – ना.ग. गोरे), 'रोबो'(कादंबरी – दीनानाथ मनोहर) ही पुस्तके आली. चौथे 'राजकपूर आणि त्याचे चित्रपट' (लेखक – भाऊ पाध्ये) हे पुस्तक मात्र रेंगाळले. ते काही लवकर तयार होईना व प्रसिद्ध होईना. भाऊ वेगवेगळ्या कारणांत अडकत होता, त्याला ते लिहीणे झेपेना, मग आम्ही ते वसंत साठे यांच्याकडून लिहवून घेतले. पण ते नियत वेळेपेक्षा दीड–दोन वर्षे उशिरा प्रसिद्ध झाले. दरम्यानच्या दोन–तीन वर्षांत 'सत्तेचे मोहरे' (जगन फडणीस), 'क्लोरोफॉर्म' (डॉ. अरुण लिमये), 'बलुतं' (दया पवार) व 'सिंहासन' (अरुण साधू) ही चार पुस्तके प्रसिद्ध झाली. अरुण साधूचे 'मुंबई दिनांक' आधी प्रसिद्ध झाले होते व सर्वत्र गाजत होते. बाकी लेखक नवीन होते. दयाच्या कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. गद्य मोठे लेखन त्याच्याकडून प्रथमच घडत होते. या सात पुस्तकांनी ग्रंथाली'चा ट्रेंड सेट झाला – समाजस्पर्शी पुस्तके! ....'ग्रंथाली'बद्दल समाजातील कुतूहल वाढले. 'ग्रंथाली'बद्दल आस्था बाळगणारी माणसे ठिकठिकाणी निर्माण झाली. साहित्य संमेलने, ग्रंथव्यवहार परिषदा यांमध्ये 'ग्रंथाली'चा कौतुकास्पद उल्लेख होऊ

**'ग्रंथाली' म्हटले तर 'कम्युन' होते, त्यामध्ये आम्ही सर्व मनमोकळेपणाने समूहजीवन जगत होतो! खूप विनोदाने, हसतखेळत आणि बुद्धिविचाराने. आयुष्यात अर्थाच्या शोधात असलेला, झगडणारा कोणीही तेथे जणू 'मेंबर' असे.**

लागला – अध्यक्षीय भाषणांमधूनही भलावण व्यक्त होई. त्यामधूनच ‘फोर्ड फाउंडेशन’चे लोक ‘ग्रंथाली’पर्यंत पोचले.

‘फोर्ड फाउंडेशन’ची ‘ग्रंथाली’ला सात लाख रुपयांची मदत हे त्या वेळचे विवादास्पद ठरलेले एक प्रकरण. ‘फोर्ड फाउंडेशन’च्या पुष्पा सुंदर या विदुषी–कार्यकर्त्या कुमुद मेहता यांच्यामार्फत आम्हास भेटल्या. फाउंडेशनला लेखकांसाठी मोठे ‘सेंटर’ उभे करायचे होते – लोणावळे वगैरेसारख्या ठिकाणी. त्यासाठी तीस लाख रुपयांपुढे मदत देण्यास फाउंडेशन तयार होते. आम्ही ते शक्य नाही असे सांगितले व काही विषयांवर पुस्तके लिहवून घेणे, पुस्तकप्रसार अशा वेगवेगळ्या हेतूंसाठी सात लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करून दिला. पैसे जास्त का घ्यायचे नाहीत तर त्यामुळे आपल्या जीवनात ऐषाराम येईल ही भावना! मी व कुमार पुणे ते धुळे अशा रातराणीच्या प्रवासात रात्रभर ती चर्चा करत बसलो होतो! त्या मदतीस दुसरा पदर होता तात्त्विक – अमेरिकन पैसा घ्यायचा की नाही? त्यावर वीस जण असेच खल करत शेखर साठेच्या घरी रात्रभर जागलो होतो. विरोधाची खिंड ज.शं. आपटे व उषा मेहता यांनी उभी केली होती. ती पार करण्यास तेवढा वेळ लागणारच होता. तो काळ तसा तत्त्वाग्रहांचा होता.

‘फोर्ड फाउंडेशन’च्या देणगीची बातमी प्रसिद्ध झाली व प्रकाशन–साहित्य जगात उलटसुलट, छोट्यामोठ्या गोष्टी बोलल्या–लिहिल्या जाऊ लागल्या, पण त्यावर आम्ही फार प्रतिक्रिया देत नसू. आमचे अध्यक्ष विजय तेंडुलकर होते. त्यांचा ‘मन शुद्ध तुझं तुला रे गड्या भीती कशाची?’ यावर व तसा आमच्यावर विश्वास होता. त्या देणगीतून काही विषय लिहिले गेले – प्रदर्शने झाली – राज्यभर पुस्तकविक्री केंद्रे काही काळ चालली. ही गोष्ट १९८१ ते १९८४ या काळातील. त्यातून उद्भवलेली एक गंभीर व गंमतीदार हकिगत आता, गेल्या वर्षी पूर्ण झाली. अनिल अवचटचा फोन आला, ‘‘त्यावेळी ‘ग्रंथाली’ने लेखनवृत्ती म्हणून मला दहा हजार रुपये दिले होते. मी ते काम पूर्ण करू शकलो नाही. ते दहा हजार रुपये मी परत करू इच्छितो.’’ तो हिशोब ‘ग्रंथाली’त केव्हाच संपला होता! पण त्या पठ्ठ्याने ‘ग्रंथाली’ला दहा हजार रुपयांची देणगी पाठवली! ‘ग्रंथाली’च्या प्रत्येक प्रकरणावर पुस्तक होईल एवढी खळबळ त्या काळात वेळोवेळी होत गेली. पण आता ती सर्व प्रकरणे जगण्यातील त्या त्या वेळचे चहाचे ‘कप’ वाटतात. ते काळाच्या पोटात रिचून गेले.

●

‘ग्रंथाली’ने पहिल्या पंचवीस रुपयांत तीन पुस्तके अधिक एक भेट पुस्तक द्यायचे हा व्यवहार पूर्ण झाला. नवीन पुस्तके काय भावात वितरीत करायची हा मुद्दा होता. त्यातून व्यक्तिगत ग्राहक व ग्रंथालयीन ग्राहक अशी विभागणी करावी लागली. रूढ ग्रंथव्यवहारात ग्रंथालयांना पुस्तकांच्या किंमतीवर घसघशीत सूट मिळे. व्यक्तींना मात्र पुस्तकाला पूर्ण किंमत, विक्रेत्यांशी ओळख काढली तर जास्तीत जास्त दहा टक्के सूट! ‘ग्रंथाली’चे म्हणणे होते, की व्यक्तिगत वाचक अगणित वाढू शकतो, परंतु ग्रंथालयांच्या संख्येतील वाढ मर्यादित राहणार. तेव्हा प्रकाशकांनी, विक्रेत्यांनी व्यक्तिगत ग्राहक वाढवावा. त्यांना सवलती द्याव्या. पुस्तकांच्या किंमती व त्यांचे दुष्टचक्र महाबळेश्वर साहित्य संमेलनापासून जोरदार चर्चिले जात होते. ते भेदण्याचा प्रयत्न कोणी करत नव्हते. मोठमोठ्या माणसांची फक्त लंबीचवडी भाषणे! ‘ग्रंथाली’ने ते भेदण्याचा एक मार्ग सुचवला होता. वाचक वाढवूनच पुस्तकांच्या किंमती खाली येऊ शकल्या असत्या. ‘ग्रंथाली’चा प्रयास तो होता.

‘ग्रंथाली’चे उद्दिष्ट अर्थात त्यापेक्षाही मोठे होते. ‘ग्रंथाली’ प्रत्येक पावलाने त्यापर्यंत पोचत होती. आम्ही ते उद्दिष्ट १९८२च्या ‘ग्रंथप्रसार यात्रे’च्या निमित्ताने शब्दबद्ध केले – शोध, संवाद आणि संस्कृतिकारण! ‘ग्रंथाली’च्या त्या झंझावाती यात्रेआधी या घोषणा प्रसृत केल्या. षांताराम पवारने आकर्षक व अर्थपूर्ण अशी पोस्टर्स, पताका, बिल्ले करून दिले. यात्रेनिमित्त ‘रुची’चा विशेषांक (संपादक – संजीव खांडेकर) प्रसिद्ध केला. त्याचा विषय उद्दिष्टाला अनुरूप होता – खेडी आणि शहरे. नंतर तसाच विशेषांक काढला – मध्यमवर्गीय जाणिवा. पुढे अशा अनेक प्रसंगोचित विशेषांकांची मालिका बनली. यात्रा म्हणजे एकोणीस दिवसांत छत्तीस ठिकाणी पुस्तक प्रदर्शने–सांस्कृतिक कार्यक्रम,

**‘फोर्ड फाउंडेशन’ची ‘ग्रंथाली’ला सात लाख रुपयांची मदत हे त्या वेळचे विवादास्पद ठरलेले एक प्रकरण. फाउंडेशनला लेखकांसाठी मोठे ‘सेंटर’ उभे करायचे होते – लोणावळे वगैरेसारख्या ठिकाणी. त्यासाठी तीस लाख रुपयांपुढे मदत देण्यास फाउंडेशन तयार होते. आम्ही ते शक्य नाही असे सांगितले व काही विषयांवर पुस्तके लिहवून घेणे, पुस्तकप्रसार अशा वेगवेगळ्या हेतूंसाठी सात लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करून दिला. पैसे जास्त का घ्यायचे नाहीत तर त्यामुळे आपल्या जीवनात ऐषाराम येईल ही भावना!**




श्रीनिवास खळे, अशोक हांडे असे कलावंतही वाचकदिन कार्यक्रमात सहभागी होतात.

त्यामध्ये पन्नास लेखक-कलावंतांचा सहभाग, दोनशे कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उभी राहिलेली फौज... त्या यात्रेचा समारोप पुण्यात ग्रंथमोर्चाने झाला. त्या फेरीच्या अग्रभागी बाबासाहेब पुरंदरे घोड्यावर बसून सामील झाले होते. कवी ना.धों. महानोर- त्यांचे सहकारी, गो.नी. दांडेकर, त्या वेळचा मध्यमवर्गीय चित्रपटतारा अमोल पालेकर चौकाचौकात फेर धरून नाचत होते. मोर्चेकऱ्यांच्या तोंडी घोषणा होत्या - वाचा रे वाचा पुस्तके वाचा! मी जितके तपशील देईन तेवढे कमी आहेत आणि कितीही नावांचे उल्लेख केले तरी काही नावे राहून जातीलच. 'ग्रंथप्रसार यात्रे'च्या निमित्ताने 'ग्रंथाली'ला अपार प्रसिद्धी मिळाली. 'टाइम्स ऑफ इंडिया'ने अग्रलेख लिहिला - 'बुक्स ऑन व्हील्स!' 'ग्रंथाली' या नावाने समाजात काही अद्भुत घडले होते. प्रत्येक सुजाण, संवेदनाशील, सुशिक्षित माणसाला त्याच्या भावनेचे प्रतिबिंब 'ग्रंथाली' या नावात सापडले होते. तो सांस्कृतिक भाव होता.

आता हेच पाहा ना, 'ग्रंथाली' वाचकदिन २५ डिसेंबरला साजरा करत असे. त्या दिवसाची नोंद ठेवण्याचीही आवश्यकता नसे. कारण तो येशू ख्रिस्ताचा जन्म दिवस, त्या दिवशी सांस्कृतिक मेजवानीप्रमाणेच खाद्यमेजवानीही विशेष असे. म्हणजे झुणकाभाकर! तो मेन्यू म्हणून 'ग्रंथाली'ने इंट्रोड्युस केला. त्याचीही वर्णने चर्चिली जात.

प्र.ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' औरंगाबादला आधी प्रकाशित झाले होते. त्यातून दलित व्यथेला तोंड फुटले होते, त्याचे लेखन किस्सेवजा होते. परंतु 'ग्रंथाली'च्या वतीने 'बलुतं' प्रसिद्ध झाले, त्याची बांधणी कलात्मकतेने घडवली गेली होती. ते टिकाकारांच्या व सर्वसामान्य वाचकांच्या पसंतीस उतरले आणि दलित आत्मकथनांची लाट आली. त्यातून सामाजिक दस्तावेज ललित रूपात असा नवा वाङ्मयप्रकार मराठीत आला. दया पवार व लक्ष्मण माने (उपरा) यांना अमेरिका भेटीची निमंत्रणे आली, तर लक्ष्मण गायकवाडला (उचल्या) साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. खरे तर, 'उचल्या' 'ग्रंथाली'च्या वतीने प्रकाशित झाले नव्हते. 'ग्रंथाली'ने अंगीकारलेला मंत्र पुस्तकनिवडीपुरता चतुर प्रकाशकांनी लगेच उचलला होता. त्यांनी नव्या क्षेत्रांतील, नव्या लेखकांची पुस्तके प्रकाशित करणे आरंभले. आमच्याकडे आपपर भाव नव्हताच. पुस्तक महत्त्वाचे. ती आमच्या प्रदर्शनांत विक्रीस असत. लोकांच्या मनात पक्का समज तयार झाला, की तशी सारी पुस्तके 'ग्रंथाली'ची! सामाजिक महत्त्वाचे साहित्य सर्वोत्तम वाङ्मयीन पुरस्कारांना पात्र ठरते हा नवा संकेत प्रस्थापित झाला होता. ती कामगिरी 'ग्रंथाली'च्या नावावर नोंदली गेली.

वाचनवेधकता हे आणखी एक मूल्य

**'ग्रंथप्रसार यात्रे'च्या निमित्ताने 'ग्रंथाली'ला अपार प्रसिद्धी मिळाली. 'टाइम्स ऑफ इंडिया'ने अग्रलेख लिहिला - 'बुक्स ऑन व्हील्स!' 'ग्रंथाली' या नावाने समाजात काही अद्भुत घडले होते. प्रत्येक सुजाण, संवेदनाशील, सुशिक्षित माणसाला त्याच्या भावनेचे प्रतिबिंब 'ग्रंथाली' या नावात सापडले होते.**




'ग्रंथाली' लेखकांसमोर आग्रहाने मांडत गेली. वाचकांना न कळणारे दुर्बोध साहित्य लिहिण्याची एक फॅशन मराठी साहित्यात बोकाळली होती. उलट, ग्रंथाली'तर्फे आग्रहाने सांगितले जाई, की वाचकांना आवडीने वाचता येईल असे सुगम साहित्य निर्माण करा. लेखक लिहितो ते वाचकांनी वाचावे म्हणून. मग त्यांना वाचन सुकर व्हावे म्हणून छपाई, मांडणी ही तंत्रे जशी काळजी घेऊन जपली जातात तशी मजकुराची रचनादेखील कौशल्याने व्हायला हवी. त्यामधील लालित्य स्वाभाविकतेने येते. प्रसिद्ध लेखक रंगनाथ पठारे यांची आरंभीची एक-दोन पुस्तके 'ग्रंथाली'ने प्रकाशित केली. त्यांच्या 'चक्रव्यूह' कादंबरीच्या मनोगतात त्यांनी वाचनवेधकतेबद्दलचा 'ग्रंथाली'चा आग्रह नमूद केला आहे. त्यांनी त्याचा पुनरुच्चार अलिकडील एका लेखातदेखील केला आहे. लेखक-वाचक संवाद हाच 'ग्रंथाली'चा पाठपुराव्याचा मुद्दा सतत राहिला आहे.

दलित साहित्य/सामाजिक महत्त्वाचे साहित्य यांची लाट एवढी मोठी आली, त्यातील बरेच श्रेय 'ग्रंथाली'कडे येई. तरी तेव्हा, १९९० च्या आसपास 'ग्रंथाली'ने आणखीही काही गोष्टी आग्रहपूर्वक मांडल्या. पैकी 'विज्ञान ग्रंथाली'ची गुढी आधीच उभारली गेली. प्रा. चिंतामणी देशमुख व दिलीप महाजन हे त्या उपक्रमाचे प्रवर्तक होते. त्यातून काही विज्ञानलेखक लिहिते झाले वा प्रकट झाले. त्या संदर्भात चिंतामणी देशमुख व नंदा खरे यांचा उल्लेख मुद्दाम करता येईल. लक्ष्मण लोंढे लिहिते होते, तथापी लौकिकास त्यांच्या संगतीत आले. विज्ञान 'ग्रंथाली'च्या शनिवार संध्याकाळच्या गच्चीवरच्या गप्पा हे मोठेच आकर्षण ठरले. कोणत्याही विषयावर तेथे मनमोकळी, खुलेआम चर्चा होई. आयआयटीतील प्रा. आगाशे व गोरेगावचे शिक्षक सामंत हे त्या बैठकांचे कित्येक वर्षे 'परमनंट मेंबर' होते. पण विज्ञान 'ग्रंथाली'च्या ऐन काळात 'आयईएस' ॲश लेन शाळेच्या गच्चीवर दर शनिवारी सायंकाळी ऐंशी ते शंभर माणसे गप्पांसाठी जमत. नाना विषय चर्चिले जात. अच्युत गोडबोले, अनिल काकोडकर, सुलक्षणा महाजन, वीरेंद्र सुळे, अनिलकुमार भाटे असे 'विज्ञान ग्रंथाली'शी जोडले गेलेले कितीतरी महावीर आज वेगवेगळ्या पदांवर आरूढ आहेत वा विशेषज्ञ म्हणून नाव कमावून आहेत. यशवंत साने हे अतिशय तल्लख बुद्धीचे माणूस. ते बीपीटीमधून इस्टेट मॅनेजर म्हणून निवृत्त झाले. ते 'ग्रंथाली'च्या खूप जवळ असत. ते मार्क्सवादी प्रभावात वाढले आणि पुढे अध्यात्ममार्गी झाले. त्यांना विज्ञान ग्रंथाली' हा काउंटर पॉइंट वाटे व त्यावरून ग्रंथाली'त सतत बुद्धिचर्चा झडत. देशमुख-महाजन-लक्ष्मण लोंढे-वीरेंद्र सुळे अशा मोठ्या फळीसमोर साने खंबीर उभे राहत व वाद घालत. ते बरीच वर्षे 'ग्रंथाली'चे ट्रस्टीदेखील होते. 'ग्रंथाली' ट्रस्ट म्हणून प्रथम १९८१ साली नोंदला गेला. त्याची पुनर्रचना 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था म्हणून १९९१ साली झाली आणि ज्येष्ठ विश्वस्त निवृत्त झाल्यावर ग्रंथाली'ची सहा-सात वर्षांपूर्वी फेररचना घडून आली.

र.गो. लागू हे तसेच. ते विज्ञानलेखक. ते त्यांच्या पुस्तकांचा एकांडेपणाने प्रचार करत. ते 'ग्रंथाली' टीममध्ये सामील झाले. मात्र ते वावरत तरुण मंडळींत. त्यांना आमचा एकत्र गप्पागोष्टींतील 'काथ्याकूट' आवडत नसे, बहुधा.

●

'ग्रंथाली'च्या वाचनप्रसार प्रयत्नांमधील 'ग्रंथएल्गार', शिवाजी पार्कवरील 'बालझुंबड', 'ग्रंथमोहोळ', विजय तेंडुलकर यांची 'संवादयात्रा' आणि 'इंडियन एज्युकेशन

**वाचनवेधकता हे आणखी एक मूल्य 'ग्रंथाली' लेखकांसमोर आग्रहाने मांडत गेली. वाचकांना न कळणारे दुर्बोध साहित्य लिहिण्याची एक फॅशन मराठी साहित्यात बोकाळली होती. उलट, ग्रंथाली'तर्फे आग्रहाने सांगितले जाई, की वाचकांना आवडीने वाचता येईल असे सुगम साहित्य निर्माण करा.**

सोसायटी'च्या सहकार्याने झालेली तीन दिवसांची जंगी 'वाचन परिषद' यांचा उल्लेख करायला हवा.

'ग्रंथएल्गार'मध्ये मुंबईच्या उपनगरांत सोसायट्यांमध्ये 'ग्रंथाली'ची पुस्तक प्रदर्शने घेऊन गेलो – बोरिवली ते मुलुंड व्हाया दादर! 'साहित्य सहवास'मधील साहित्यिकांनी खाली उतरावे म्हणून र.कृ.जोशी व अशोक रानडे यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथदिंडी काढली, तेथेच 'सापशिडी' हा खेळ 'पार्किंग लॉट'मध्ये केला. तेव्हा पार्किंगसाठी तेवढ्या गाड्या कोठे होत्या? वांद्र्याच्या गांधीनगरमधील प्रदर्शनात विंदा करंदीकर येऊन बसले. त्यांनी तेथेच बसून राजेंद्र बनहट्टी यांचे 'अखेरचे आत्मचरित्र' हे 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेले पुस्तक वाचले व त्याच ठिकाणी सहा प्रती विकत घेऊन इष्टमित्रांना वाटल्या!

'बालझुंबड'मुळे जे शिवाजी पार्क राजकीय सभांनी दणदणून येई ते मुलांच्या हसण्याखेळण्याने तीन दिवस बहरून गेले. मुला–शिक्षक–पालकांनी रांगा लावून पुस्तके खरेदी केली.

'ग्रंथमोहोळ'मध्ये ६–७–८ डिसेंबर १९८६ या तीन दिवसांत महाराष्ट्रभर पन्नास ठिकाणी पुस्तक प्रदर्शने व कार्यक्रम झाले. एसटीच्या आठ बस भरून माणसे (साहित्यिक–कलावंत– कार्यकर्ते) ५ डिसेंबरच्या रात्री विविध दिशांना मोहिमेवर गेली. त्यांना निरोप देण्याचा समारंभ आय.इ.एस.च्या गच्चीवर माधव गडकरींच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यावेळी समोर भारतीय बैठकीत बसलेले होते विंदा करंदीकर, मधु मंगेश कर्णिक यांच्यापासूनचे तमाम साहित्यिक. ते सर्व एकेका प्रदेशात पुस्तके घेऊन जाणार होते! 'ग्रंथमोहोळ'मुळे महाराष्ट्रातील वातावरण पुस्तकमहात्म्याने दुमदुमून गेले.

विजय तेंडुलकरांची 'संवादयात्रा' हा 'ग्रंथाली'च्या उद्दिष्टपूर्तीमधील महत्त्वाचा टप्पा आहे. विजय तेंडुलकरांना एका मोठ्या, आठ 'आसनी' वाहनातून निवडणूक प्रचार करतात तसे साहित्य–संस्कृती प्रचार करत फिरवले! खानदेश – मराठवाडा पार करत यात्रेचा संगमनेरला समारोप झाला. विविध अनुभवांतून पार झालेले तेंडुलकर ठिकठिकाणी लेखकांशी, कार्यकर्त्यांशी इतके छान बोलले! त्यांचा स्वत:चा शोध चालूच होता. संजीव खांडेकर, अरुण साधू व मी यांच्यासाठी तेंडुलकरांचे ते आठ दिवसांतील दर्शन वेगळे व वेगवेगळेही होते. यात्रेचा सूत्रधार होता– अजय झणकर. तेंडुलकर प्रदीर्घ काळ 'ग्रंथाली'चे अध्यक्ष असणे ही आमच्या दृष्टीने कालसुसंगत गोष्ट होती. तेंडुलकरांचे जेवढे चाहते होते तेवढेच शत्रू होते; किंबहुना तेंडुलकर अध्यक्ष असल्यामुळे काही लोक 'ग्रंथाली'च्या जवळपास फिरकत नसत. ते लोक नाहीसे झाले–होतील, तेंडुलकरांची नाटके व जीवनदृष्टी यावर अजूनही लेखन–चर्चा होत आहेत.

'ग्रंथाली'ने वाचन परिषदेत 'वाचनाचा जाहीरनामा' प्रकाशित केला. त्यातील प्रमुख नोंद नमूद केली पाहिजे. वाचन ही वेगळी काही पवित्र गोष्ट नसून ते जिज्ञासेचे रूप आहे. त्यामुळे जिज्ञासा महत्त्वाची. ती ज्या बहुविध माध्यमांनी पूर्ण होईल त्या माध्यमांची कास धरली पाहिजे. कॉंप्युटर रूळण्याआधी आणि मोबाईल येण्याआधी 'ग्रंथाली'ने हे लिहून ठेवले. 'ग्रंथाली'ने ते प्रकटन केले ते वाचनाचे माध्यम चरणरेषेवर असताना आणि वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाचे सर्वाधिक साधन समजले जात असताना. त्यामुळे सांस्कृतिक समाजाचे त्या आशयाकडे हवे तेवढे लक्ष वेधले गेले नाही. अजूनही सांस्कृतिक जग वाचन एके वाचन असा पाढा उगाळत बसलेले आहे. वास्तविक, जग चहुअंगांनी खूप पुढे गेले आहे आणि वाचन या एका माध्यमातून ते पुरेसे आकळले जाणार नाही. परिपूर्णता तर मानवी आकलनास पलिकडचीच राहणार!

●

वाचन परिषदेतील त्या प्रकटनानंतर (त्यामुळे नव्हे, तर त्यातील शहाणपणामुळे) 'ग्रंथाली'च्या 'कोअर' परिवारामध्ये पांगापांग सुरू झाली. सर्वत्रच माणसे स्वान्त होऊ लागली होती. त्याचा परिणाम 'ग्रंथाली'त जाणवत गेला. कोअर' टीममधील भिडू त्यांच्या त्याच्या जागी उच्चपदस्थ झाले. त्यांना ग्रंथाली'त देण्यासाठी पुरेसा वेळ नव्हता. त्याहूनही सूक्ष्म पातळीवर मला व सुदेशला जाणवे, की 'ग्रंथाली'तील नव्या घडामोडींमध्ये

**'ग्रंथाली'ने वाचन परिषदेत 'वाचनाचा जाहीरनामा' प्रकाशित केला. त्यातील प्रमुख नोंद नमूद केली पाहिजे. वाचन ही वेगळी काही पवित्र गोष्ट नसून ते जिज्ञासेचे रूप आहे. त्यामुळे जिज्ञासा महत्त्वाची. ती ज्या बहुविध माध्यमांनी पूर्ण होईल त्या माध्यमांची कास धरली पाहिजे. कॉंप्युटर रूळण्याआधी आणि मोबाईल येण्याआधी 'ग्रंथाली'ने हे लिहून ठेवले.**

वाचन माध्यमात वाढलेल्या आम्हा लोकांना वाचनाची महती समाजात बिंबवत राहिले पाहिजे, तरुणांना वाचनाभिमुख केले पाहिजे यासाठी खटाटोप करणे महत्त्वाचे वाटत होते. तो प्रयास, ती नवी कार्यक्रमपत्रिका 'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'च्या रूपाने साकारली. एका पातळीवर हे स्वप्नच म्हणायचे. परंतु त्यास वास्तवाचा पक्का आधार होता, म्हणून तर त्या प्रकल्पात शे-सव्वाशे पुस्तके तयार झालीदेखील!

त्यांना आस्था राहिलेली नाही. ते स्वाभाविकही होते. समाजपरिवर्तन व त्यासाठी वाचन/जिज्ञासाजागृती या ज्या मूळ मुद्यावर ग्रंथाली' एकवटली होती, महाराष्ट्रभरचे इतके सारे लोक एकात्म झाले होते, तो मुद्दाच चोरला गेल्यासारखा झाला ना! प्रत्येकजण तो पुन्हा ज्याच्या त्याच्या परीने शोधू लागला. जग इतक्या झपाट्याने पालटत होते, की त्याचा आवाका समजून घेण्यातच बुद्धिचातुर्य खर्ची पडत होते. शिवाय, त्यांना ते ज्या स्थानी होते त्या ठिकाणची त्यांच्यासमोरची आव्हाने अधिक भेडसावत असावी.

माझ्याबरोबर गावसभेच्या नियमाने नवीन चमू तयार झाला होता. अनिल शिदोरे, शिरीष वीरकर, नीरजा, मेधा कुळकर्णी, अंजली किर्तने, दीपक घारे, माधव जोशी, दीपक पवार, सुनील रेगे, सुधीर/नंदिनी थत्ते अशी नवी टीम जमत गेली. हक्काचा सुदेश होताच होता. पुन्हा एकदा मोठी सभा झाली. स्थळ - मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील शॉर्टहँड क्लास. पंचवीस-तीसजण तरी हजर असतील. तेथे नवी कार्यक्रमपत्रिका होती. त्या कार्यक्रमपत्रिकेसाठी आधी दोन-तीन वर्षे भरपूर खल होऊन गेला होता आणि त्यातून नवा प्रकल्प साकारला तो 'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'चा!

त्यावेळपर्यंत सर्व सुज्ञ लोकांना समजून चुकले होते, की वाचनाचे माध्यम आम पातळीवर प्रभावी राहणार नाही. तरीसुद्धा अन्य माध्यमांचे स्वरूप कसे असेल याचा अंदाज आला नव्हता. इंटरनेटची तर नुसती चाहुल लागली होती. परंतु सुशिक्षित तरुण त्या नव्या माध्यमांसाठी व पुढे y2k साठी महाराष्ट्रातून अमेरिकेकडे थव्याथव्याने जाऊ लागले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात नवे पर्व सुरू झाले होते, तरी वाचन माध्यमात वाढलेल्या आम्हा लोकांना वाचनाची महती समाजात बिंबवत राहिले पाहिजे, तरुणांना वाचनाभिमुख केले पाहिजे यासाठी खटाटोप करणे महत्त्वाचे वाटत होते. तो प्रयास, ती नवी कार्यक्रमपत्रिका 'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'च्या रूपाने साकारली. त्यामध्ये व्यावसायिकता अभिप्रेत होती. त्यामुळे प्रकल्पाचा आराखडा व्यवस्थापनतज्ज्ञाने तयार केला. कार्य पार पाडण्यासाठी दोन पूर्ण वेळ पगारी कर्मचारी नेमले गेले. त्यांना 'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'चे मर्म पढवले होते (प्रशिक्षित केले गेले). मुंबईचे मलबार हिलवरील जन ते गडचिरोलीचे आदिवासी ही महाराष्ट्राची संस्कृती गेल्या दोन-अडीच हजार वर्षांत घडली आहे. तिचा उच्चार केवळ ज्ञानेश्वर ते शिवाजी ते प्रबोधन चळवळ (१८३० ते १९५०) या महत्त्वाच्या टप्प्यांचा उल्लेख करून पुरेसा होणार नाही. त्यासाठी सबंध प्रदेशाचा भूगोल, इतिहास, विविध ज्ञानशाखा - त्यांचा विकासविस्तार अशा सगळ्या अंगांनी पाहणे महत्त्वाचे आहे. हे जाणून महाराष्ट्र जीवनाचे छोटे छोटे पैलू पाडून त्यावर छोटी छोटी पुस्तके तयार केली, ती घरोघरी पोचवण्याची व्यवस्था केली तर प्रत्येक घरात टीपॉयवर शंभर ते हजार पुस्तकांचा सडा पडलेला असेल. घरातील व्यक्तीने त्याकडे सहज जरी पाहिले तरी तिचे त्यांपैकी कुठच्या ना कुठच्या पुस्तकाकडे लक्ष वेधले जाईल व ती व्यक्ती पुस्तकात रमण्याची शक्यता तयार होईल. त्यातूनच ती व्यक्ती पुस्तकातील काही भाग वाचूही लागेल अशी कल्पना. एका पातळीवर हे स्वप्नच म्हणायचे. परंतु त्यास वास्तवाचा पक्का आधार होता, म्हणून तर त्या प्रकल्पात शे-सव्वाशे पुस्तके तयार झालीदेखील! एकदा दाजी पणशीकर 'आयडियल'मध्ये भेटले. म्हणाले, गांगल, काय अद्‌भुत घडते आहे हे! त्यांनी पाच-सात पुस्तकांचा उल्लेख केला. खरोखरीच, 'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'त स्थानिक इतिहासाच्या आठ-दहा पुस्तकांपासून 'तेर'सारख्या उस्मानाबाद जिल्ह्यातील गावाच्या संस्कृतिसंचिताचा सत्याधारित निर्देश झाला आहे. त्याचबरोबर गेल्या दीडशे वर्षांत आपल्यात येऊन लोकप्रिय झालेले आणि शेतकऱ्यांच्या सधनतेचा आधार ठरलेले सोयाबिन या कडधान्यावरदेखील त्यात एक पुस्तक झाले आहे. त्यातच शुभदा पटवर्धनने 'ब्रँडवॉर' या आजच्या जगातील लढाईचा आढावादेखील घेतला आहे. असे हजारो विषय डोक्यात होते. यज्ञच तो! तो अखंड चालला असता. रघुवीर कुलने त्याचा सिम्बॉलदेखील धगधगत्या यज्ञाचाच रेखाटला होता. परंतु त्यात समिधा अर्पण होण्याऐवजी 'ग्रंथाली ज्ञानयज्ञ' प्रकल्पाचीच आहुती पडली. कारण 'ग्रंथाली'मधील आमच्याकडून त्या

पुस्तकांचे मार्केटिंग अपेक्षेप्रमाणे झाले नाही. त्याचबरोबर 'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'साठी जमा झालेला कार्यकर्त्यांचा नवा चमू अल्पजिवी ठरला. तो पहिल्या उत्साही कार्यानंतर थंड झाला! आता, 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'त तयार झालेली शे-सव्वाशे पुस्तके पाहिली, कोणी त्यांची आठवण काढली तर मी आणि दुसरे संपादक दीपक घारे हळहळतो. पुस्तकांना काळ प्रतिकूल आहे तरीदेखील आम्हाला खात्री वाटते, की 'ग्रंथाली ज्ञानयज्ञ' पुनरुज्जीवित झाला तर त्याचे यश लिहिलेले आहे. तो निष्ठेने व नेकीने चालवला मात्र पाहिजे. मी आणि घारे यांच्याइतकाच त्या प्रकल्पावरील ठाम विश्वास एकनाथ ठाकूर यांचा होता. ते प्रकल्पाचे कार्याध्यक्ष होते. तर अ.पां. देशपांडे, अरविंद टिकेकर, सुभाष भेंडे, डॉ. सुरेश नाडकर्णी, उषा तांबे हे 'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'चे सल्लागार मंडळ! पण फक्त ठाकूर प्रकल्पातील पुस्तकांची आठवण काढून चुकचुकत. ठाकूर ग्रंथाली'शी जोडले गेले ते १९८६च्या 'ग्रंथमोहोळ'पासून. त्या जगावेगळ्या पुस्तक प्रदर्शन प्रकल्पाची जाहिरात ठाकूर यांच्या 'एनएसबी'ने कल्पकतेने सर्व वर्तमानपत्रांत केली. तेव्हापासून ते ग्रंथाली'चे प्रथम अनभिषिक्त सभासद आणि नंतर तसेच अध्यक्ष होते. त्यांनी तितकी आपुलकी आम्ही व आमचे कार्य याबद्दल सतत बाळगली. माझे तर ते जिवलग मित्र होते. त्यांना बँकिंगबद्दल जेवढा विश्वास वाटे तेवढीच आस्था ते महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाबद्दल दाखवत. त्यांनाही परंपरेची जाण होती आणि आधुनिकतेची ओढ होती. कृतज्ञता भाव तर त्यांच्या रोमरोमात भिनला होता. त्यांच्या शेवटच्या काही वर्षांत त्यांनी महाराष्ट्राचे सांस्कृतिक नेतृत्व करावे असे मी त्यांना सुचवत असे. ते प्रत्यक्षात मात्र घडू शकले नाही.

●

'ग्रंथाली ज्ञानयज्ञा'चा समारोप विशेष गाजावाजा न होता झाला. त्याच वेळी आम्ही ज्येष्ठ विश्वस्त मंडळींनी 'ग्रंथाली'मधून निवृत्त होण्याचे योजले. तशी प्रक्रिया सुरू झाली. मी व्यक्तिश: सत्तर-पंच्याहत्तर तरुण व्यक्तींशी, त्यांनी 'ग्रंथाली'च्या विश्वस्त मंडळात यावे यासाठी बोलणे केले. त्यांपैकी ज्या अठरा-



वीसजणांनी रूकार दर्शवला त्यांचे दोन दिवसांचे एक शिबिर पुण्याला घेतले. त्या सर्वांपुढे आम्हा जुन्या व्यक्तींच्या निष्ठा, आवडीचे विषय, मावळते वय आणि थोडा भविष्यवेध असे सर्व मांडले. ते त्यांच्या विचारांना स्फुरणच होते. त्यांनी आपापसांत चर्चा केली. त्यामधून नवीन विश्वस्त मंडळ तयार झाले. सुदेश 'ग्रंथाली'चा ट्रस्टी १९९०पासून होताच. आता तो मॅनेजिंग ट्रस्टी, जरी तसे पद 'ग्रंथाली'च्या घटनेत नसले तरी प्रत्यक्षात झाला. 'ग्रंथाली' गेल्या आठ-दहा वर्षांत धडाक्याने चालली आहे. 'ग्रंथाली'ला जागेचा प्रश्न सतत भेडसावतो. परंतु सुदेश व त्याचे साथी त्या प्रश्नावर मात करून एका अर्थाने आमचे जुने उद्गार सार्थ करतात. 'ग्रंथमोहोळ'नंतर 'सोबत' साप्ताहिकाच्या ग.वा. बेहेरे यांनी आम्हा कार्यकर्त्यांना एक झकास पार्टी दिली. तेथे साहित्य-संस्कृती क्षेत्रातील मान्यवर अशी काही मंडळी होती. ग्रंथाली'च्या यशाचे तेथे कौतुक झाले व बेहेरे यांच्यासह सर्व प्रतिष्ठितांनी असे सुचवले, की 'ग्रंथाली'ने

**'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'त तयार झालेली शे-सव्वाशे पुस्तके पाहिली, कोणी त्यांची आठवण काढली तर मी आणि दुसरे संपादक दीपक घारे हळहळतो. 'ग्रंथाली ज्ञानयज्ञ' पुनरुज्जीवित झाला तर त्याचे यश लिहिलेले आहे. तो निष्ठेने व नेकीने चालवला मात्र पाहिजे.**

> **'ग्रंथाली' विश्वस्त संस्थे'ची १९९१ साली पुनर्रचना झाल्यावर 'ग्रंथाली'मध्ये चळवळीचे स्पिरिट राहिले नाही. त्या टप्प्यावर 'ग्रंथाली'ला स्वत:ची जागा घ्यायला आमच्या तत्त्वांची, स्वभावातील कंगोऱ्यांची अडचण आली नसती. परंतु ते राहून गेले.**

यशाच्या शिखरावर असताना स्वत:ची जागा घ्यावी. आम्ही त्यावर तात्काळ उद्गारलो, 'छे! छे! 'ग्रंथाली'चे बिहाऱ्ड विंचवासारखे, सदा पाठीवर. ज्या क्षणी जागा किंवा 'अॅसेट तयार होईल त्या क्षणी 'इंटरेस्ट' तयार होतील. आम्हाला हे कार्य असेच निरपेक्ष चालत राहवे असे वाटते!' त्यानंतर साहित्यसंस्कृती गंगेच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. 'ग्रंथाली'ने तऱ्हेतऱ्हेचे प्रकल्प राबवले आहेत. खरे तर, 'ग्रंथाली' विश्वस्त संस्थे'ची १९९१ साली पुनर्रचना झाल्यावर 'ग्रंथाली'मध्ये चळवळीचे स्पिरिट राहिले नाही. ती प्रकाशन संस्था बनून गेली होती – लोकही 'ग्रंथाली'चा तसा उल्लेख करू लागले होते. त्या टप्प्यावर 'ग्रंथाली'ला स्वत:ची जागा घ्यायला आमच्या तत्त्वांची, स्वभावातील कंगोऱ्यांची अडचण आली नसती. परंतु ते राहून गेले. त्याचा मनस्ताप सुदेश व त्याचे विश्वस्त साथी भोगत आहेत. त्याची चुटपूट कधी वाटते. पण ती तेवढ्यापुरतीच. कारण 'ग्रंथाली'ने चाळीस वर्षांत दोन-तीन पिढ्यांना केवढा मोठा सांस्कृतिक आधार दिला आहे! बडोद्याचे आर्किटेक्ट लेखक प्रकाश पेठे एकदा 'ग्रंथाली'च्या जुन्या जागेत चार जिने चढून आले. ते त्यावेळी नुकतेच अभय बंगच्या गडचिरोलीच्या संस्थेत दोन दिवस राहून आले होते. पेठे यांचे भारतभ्रमण सतत चालू असते. ते अशा वेगवेगळ्या प्रकल्पांच्या ठिकाणी राहतातदेखील. त्यांना सामाजिक आस्था भरपूर आहे. मी त्यांना विचारले, नुसता विचार करा, समजा, तुमच्या बडोद्याच्या घरात तुम्हा दोघांना काही कारणाने तेथे राहता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली तर तुम्ही अशा कोणत्या प्रकल्पाच्या ठिकाणी विसावाल – तेथे दीर्घकाळ वास्तव्य करणे तुम्हाला आवडेल? पेठे काही वेळ विचार करत असल्यासारखे गप्प राहिले. नंतर म्हणाले, मी 'ग्रंथाली'त येऊन राहीन. कारण 'ग्रंथाली'त जसे विचारांचे खुले वातावरण आहे, तसे मला अन्यत्र कुठेही आढळले नाही. हा त्यांचा तोंडदेखलेपणा नव्हता ना 'ग्रंथाली'ची खुशामत! तर ते होते सर्वांना जाणवणारे सत्य!


खुल्या विचारांचे हे व्यासपीठ अखंड राहो!

. . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com




आमच्या सर्व सभासदांना, ग्राहकांना व हितचिंतकांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
Mobile Banking
Savings
कोअर बँकिंग
एन.एफ.एस.
फॉरिन एक्स्चेंज रेमिटंस
फ्रँकिंग
एन.ई.एफ.टी.
ए.टी.एम.
आर.टी.जी.एस.
IMPS
ठाणे भारत सहकारी बँक लि.
NPCI
भारतीय राष्ट्रीय भुगतान निगम
NATIONAL PAYMENTS CORPORATION OF INDIA
केंद्रीय कार्यालय : सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२



# भ्रम, संभ्रम आणि भ्रमनिरासाची चाळिशी

स्वातंत्र्योत्तर भारताच्या गेल्या ६८ वर्षांतील सर्वात वादळी कालखंड असा ज्याचा उल्लेख केला जातो, त्या आणीबाणीपर्वास चाळीस वर्षे होत आहेत. जयप्रकाश नारायण यांच्या नवनिर्माण तसेच संपूर्ण क्रांती आंदोलनाने देशभर अस्वस्थ वातावरण निर्माण झालेले असतानाच पंतप्रधान इंदिरा गांधी यांची लोकसभेवरील निवड अलाहाबाद उच्च न्यायालयाने १२ जून १९७५ रोजी रद्दबातल ठरविली. शिवाय सहा वर्षे निवडणूक लढविण्यास मनाई केली. त्यानंतर २५ जून १९७५ च्या मध्यरात्री देशांतर्गत आणीबाणी लागू करण्यात आली, जयप्रकाश नारायण यांच्यासह फक्त विरोधी नेतेच नव्हेत, तर सारा देश विजेचा धक्का बसल्याप्रमाणे या घटनेने थिजून गेला. लोकसभेच्या निवडणुका दोनदा पुढे ढकलण्यात आल्यावर तर, जगातील सर्वात मोठ्या आणि पंचवीस वर्षे स्थिरावलेल्या लोकशाहीची ही अखेर असल्याच्या प्रतिक्रिया देश-विदेशांत व्यक्त झाल्या. पण आणीबाणी लागू करण्याचा धक्कादायक निर्णय घेणाऱ्या इंदिरा गांधी यांनीच १८ जानेवारी १९७७ रोजी अचानक निवडणुका जाहीर करून आणखी एक हादरा दिला. ही हूल असेल, असे वाटत असलेल्या सर्व विरोधकांनी एकत्र येऊन जनता पक्षाच्या झेंड्याखाली या निवडणुका लढवल्या. त्यात इंदिरा आणि संजय गांधी यांच्यासह काँग्रेसचा पराभव झाला. मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली २४ मार्च १९७७ रोजी पहिले काँग्रेसेतर केंद्र सरकार सत्तारूढ झाले. मात्र ज्येष्ठ नेत्यांमधील सत्तालालसेने अवघ्या अडीच वर्षांत जनता पक्षाच्या चिरफळ्या उडाल्या आणि जानेवारी १९८० मध्ये मुदतपूर्व निवडणुका घेण्याची नामुष्की ओढवली. त्यात ४९२ पैकी ३५३ जागा जिंकून दोनतृतीयांश बहुमताने इंदिरा गांधी यांचा काँग्रेस (आय) पक्ष सत्तेवर आला. भारतीय लोकशाही जिवंत असल्याची आणि येथील मतदार सूज्ञ असल्याची ही ग्वाही होती. ज्या मतदारांनी इंदिरा गांधी यांना झिडकारले होते, त्यांनीच अडीच वर्षांत मतपेटीच्या माध्यमातून पूर्वीपेक्षा अधिक विश्वास त्यांच्यावर व्यक्त केला. आठव्या दशकाच्या उत्तरार्धातील या वादळी पर्वाचे वर्णन-जयप्रकाशांच्या आंदोलनाने निर्माण केलेला भ्रम, आणीबाणीमुळे पसरलेला संभ्रम आणि जनता पक्षाच्या प्रयोगाने केलेला भ्रमनिरास अशा- तीन टप्प्यांत करावे लागेल. आज चाळीस वर्षांनंतर त्या कालखंडाकडे वळून पाहताना- तो प्रत्यक्ष अनुभवलेल्यांना-काय वाटत असेल, याचे हे प्रातिनिधिक रेखाटन.

ज्येष्ठ पत्रकार सतीश कामत यांचा लेख, तसेच सोबत- इंदिरा गांधी यांचे दीर्घकाळ सहकारी, तत्कालीन पंतप्रधान सचिवालयातील प्रमुख पी.एन. धर यांच्या आत्मकथनातील आणि पुपुल जयकरलिखित चरित्रग्रंथातील अंश-

# ‘आणीबाणी’चं सुलभीकरण


**सतीश कामत**

**आज नव्यानं तीच उठाठेव करताना लक्षात येतंय की या साजरीकरणातून आताच्या सत्ताधारी भाजप परिवाराकडून ठसवला जात असलेला विस्तारित संदेश चलाख जाहिरातवजा झाला आहे.**

इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५च्या मध्यरात्री देशावर आणीबाणी लादली, त्याला या वर्षी चार दशकं उलटून गेली आहेत. धार्मिक – सांस्कृतिक बहुविधतेतील देशाची एकता धर्माच्या नावे तोडू पाहणाऱ्या दहशतवादी शक्तींनी इंदिरा गांधींची हत्या केली, त्यालाही तीन दशकं उलटली आहेत. तरीही ‘आणीबाणी’ नावाचं घटित माध्यमांतून दरवर्षी ‘साजरं’ केलं जात असतं.

या साजरीकरणाला या लेखकाचाही अल्पसा हातभार लागलेला आहे. मात्र त्यात मुख्य भर हा, खासदार म्हणून इंदिराजींची





झालेली निवड हायकोर्टानं रद्द केल्यानंतर, पंतप्रधानपदी चिकटून राहण्यामागे कायदेशीर अधिष्ठान उभे करण्यासाठी घटनेची कोणत्या टोकापर्यंत मोडतोड केली गेली आणि ती किती सहजपणे करणं शक्य झालं याची आठवण करून देणं यावर होता.


आज नव्यानं तीच उठाठेव करताना लक्षात येतंय की या साजरीकरणातून आताच्या सत्ताधारी भाजप परिवाराकडून ठसवला जात असलेला विस्तारित संदेश चलाख जाहिरातवजा झाला आहे.

'इंदिरा गांधी हुकूमशाही प्रवृत्तीच्या होत्या म्हणूनच केवळ आणीबाणी लादून सर्व घटनात्मक यंत्रणा वेठीला धरल्या गेल्या. इंदिरा गांधी हुकूमशाही प्रवृत्तीच्या होत्या; कारण तो नेहरूंच्या काँग्रेसचा वारसा आहे.'

याचा दुसरा प्रचारकी अर्थ, काँग्रेसमुक्त भारत हीच हुकूमशाहीच्या आणीबाणीसदृश आविष्कारांपासून मुक्ती.

आणीबाणीच्या अनुभवाचं इतकं मतलबी सुलभीकरण दुसरं नाही.

ते धोक्याचंही आहे; कारण इंदिरा गांधींनी शासनसंस्थेच्या दहशतीखाली आणीबाणीत घटनात्मक लोकशाही संस्था गुंडाळून ठेवल्या. मात्र लोकशाही मूल्यांना नख लावण्यासाठी देशात 'आणीबाणी'च असणं अनिवार्य नाही. शासनसंस्थेचं सक्रिय वा निष्क्रिय पाठबळ असलेल्या व देशभक्ती वा धर्मरक्षणाच्या बुरख्याखाली वावरणाऱ्या झुंडींच्या दहशतीत, देशातली घटनात्मक लोकशाही आणि तिच्यासोबत येणारी मूलभूत स्वातंत्र्यांची हमी वेठीला धरण्याची तितकीच वा अधिक क्षमता आहे.



THE HINDU

India's National Newspaper

President Proclaims National Emergency

"Security of India Threatened by Internal Disturbances"

Preventive Arrests: Press Censorship Imposed

PM Explains Action

विशेष म्हणजे भारतीय जनता पक्षाचे एक पितामह लालकृष्ण अडवाणी यांनाही त्यांच्याच परिवाराच्या या संदेशापासून देशाला सावध करावंसं वाटलं! अर्थात त्यासाठी त्यांच्याइतका अधिकारी राजकारणी दुसरा कोण?

***

इंदिरा गांधींची नेतृत्वशैली अधिकारकेंद्री, घटनेला अभिप्रेत तोलाचा– मग तो केंद्र –राज्य संबंधांतला असो वा घटनात्मक संस्थांमधला– आदर करणाऱ्या राजकीय नैतिकतेच्या अपेक्षा अनेकदा पायदळी तुडवणारी अशी होती, हे खरंच आहे. जनतेत पाठबळ असलेल्या राज्यातील नेतृत्वाचं खच्चीकरण करण्याची त्यांची कार्यशैली हे काँग्रेसच्या ऱ्हासाचं महत्त्वाचं कारण ठरलं आहे. सन १९६५ ते १९७७ या काळात इंदिराजींवर लादल्या गेलेल्या आणि त्यांनीही ओढवून घेतलेल्या सत्तासंघर्षातल्या त्यांच्या वर्तनाचं राजकीय नैतिकतेच्या एकतर्फी अपेक्षांच्या आधारे मूल्यमापन करण्यात अर्थ नाही. मात्र देशातल्या घटनात्मक लोकशाहीपुढच्या आगामी संकटांच्या खुणा ओळखण्यासाठी अशा धावत्या आढाव्याचा उपयोग कदाचित होऊ शकतो.

'गूंगी गुडिया' म्हणून हेटाळणीला सामोऱ्या जात पंतप्रधानपदी आलेल्या इंदिराजींना पदार्पणालाच पक्षांतर्गत कारस्थानांशी संघर्ष करावा लागला. त्यांनीही तो तितक्याच कुटिलतेनं केला. विरोधकांनी बिगरकाँग्रेसवादाच्या नावाखाली बड्या आघाडीचा प्रयोग करून उत्तरेकडच्या महत्त्वाच्या राज्यांत काँग्रेसप्रभुत्वाला तडे देण्यास प्रारंभ केला, तोही याच काळात. मात्र अंतर्गत आणि बाह्य विरोधकांनी केलेल्या राजकीय कोंडीचा सामना करताना, त्यांनी बळ थेट लोकांकडे जाऊनच घेतलं, ही वस्तुस्थिती आहे. अपवाद फक्त १९७५च्या आणीबाणीचा!

सन १९७१च्या सुरुवातीला मुदतपूर्व निवडणुका घेत, त्यांनी आपलं नेतृत्व डावावर लावलं. 'गरिबी हटाव' ही त्यांची घोषणा आणि त्यासाठी १९६९पासून उचललेली बँक राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे यासारखी पाऊलं यांच्या आधारे त्यांनी

**लोकशाही मूल्यांना नख लावण्यासाठी देशात 'आणीबाणी'च असणं अनिवार्य नाही. शासनसंस्थेचं सक्रिय वा निष्क्रिय पाठबळ असलेल्या व देशभक्ती वा धर्मरक्षणाच्या बुरख्याखाली वावरणाऱ्या झुंडींच्या दहशतीत, देशातली घटनात्मक लोकशाही आणि तिच्यासोबत येणारी मूलभूत स्वातंत्र्यांची हमी वेठीला धरण्याची तितकीच वा अधिक क्षमता आहे. अडवाणी यांनाही त्यांच्याच परिवाराच्या या संदेशापासून देशाला सावध करावंसं वाटलं!**

स्वतःची जी प्रतिमा जनतेपुढे नेली, तिला मतदारांनी भरभरून कौल दिला. या काळात त्या लोकांपर्यंत गेल्या, त्या प्रस्थापित शक्तींच्या कारस्थानांच्या 'बळी' याच रूपात. त्यांना अभिप्रेत असलेल्या प्रस्थापित शक्तींत सर्वोच्च न्यायव्यवस्थाही होती.

याला निमित्त पुरवलं ते गोलकनाथ प्रकरणी १९६७ साली आलेल्या निर्णयानं. न्या. सुब्बाराव यांच्या नेतृत्वाखालील सुप्रीम कोर्टानं ६ विरुध्द ५ अशा बहुमतानं यापूर्वीची सुप्रीम कोर्टाची भूमिका बदलली आणि मूलभूत अधिकारांचा संकोच करण्याचा अधिकार संसदेला नाही असा निर्णय दिला. पुढं याच आधारे बँक राष्ट्रीयीकरण, तनखे रद्द करणे हे कायदे रद्दबातल ठरवण्यात आले. या विभागणीत न्यायमूर्तींची व्यक्तिगत विचारप्रणाली, दृष्टिकोनातील फरकाचं प्रतिबिंब उमटलेलं असलं तरी हा थेट राजकीय संघर्ष नव्हता. मात्र स्वतंत्र पक्ष, काँग्रेसमधील सिंडिकेट आणि जनसंघ यांची 'भांडवलवादी' आर्थिक नीती विरुध्द इंदिरा गांधींचं 'समाजवादी' धोरण यांच्यातील राजकीय संघर्षात सुप्रीम कोर्ट ओढलं गेलं. गरीबधार्जिण्या, आर्थिक समतावादी धोरणांच्या आड सुप्रीम कोर्टातील न्यायाधीशांचा प्रस्थापितवादी एक गट सातत्यानं येतो आहे, असा प्रचार काँग्रेसमध्ये शिरलेल्या कम्युनिस्ट सहप्रवाशांना पुढे करून त्यांनी सुरू केला. पण कोर्टापुढचा मूळ मुद्दा हा घटनादुरुस्तीचा संसदेचा अधिकार अमर्याद आहे की मूलभूत अधिकारांचा संकोच संसदेला असलेल्या घटनादुरुस्तीच्या अधिकारकक्षेबाहेर आहे, असा होता. या घटनात्मक वादाला, लोकांनी निवडून दिलेली संसद श्रेष्ठ की वरिष्ठ कोर्टातील न्यायाधीश, असा राजकीय रंग चढवण्यात आला. पुढे न्या. सुब्बाराव यांनी राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत उडी घेऊन, या राजकीय रंगाला बळच दिलं. सरकारच्या 'गरीबधार्जिण्या' धोरणाला अनुकूल अशी विचारसरणी असलेल्या न्यायमूर्तींची नेमणूक करून सुप्रीम कोर्टाचा कौल बदलण्याची चर्चा सुरू करण्यात आली. त्या दिशेनं पाऊलही कसं उचलल गेलं होतं याची नोंद तत्कालीन न्या. जगनमोहन रेड्डी यांच्या पुस्तकात आढळते. सरन्यायाधीशपदी ज्येष्ठतेनुसार जे. सी. शहा पात्र असताना, त्यांना डावलण्याच्या हालचाली सरकार दरबारी चालू आहेत, अशी माहिती १९७०च्या नोव्हेंबरमध्ये तत्कालीन सरन्यायाधीश हिदायतुल्ला यांनी न्यायमूर्तींच्या बैठकीत दिली होती. न्या. शहा हे बँक राष्ट्रीयीकरण रद्दबातल ठरविणाऱ्या पीठाचं नेतृत्व करत होते. मात्र एक वगळता उर्वरित सर्व न्यायमूर्तींनी राजीनामा देण्याचा इशारा दिल्यानंतर सरकारनं माघार घेतली, असं त्यात नोंदवलं आहे. पुढे आणीबाणीतील अधिकारांच्या दुरुपयोगाची शहानिहा करण्यासाठी जनता पक्षाच्या सरकारनं याच न्या. शहा यांचा आयोग नेमला होता.

१९७०मध्ये गमावलेली संधी, १९७३मध्ये इंदिरा गांधींनी साधली!

१९७१मध्ये 'गरिबी हटाव'च्या घोषणेनं समाजातल्या दुर्बळ घटकांच्या मनात त्यांनी आपुलकीचं स्थान निर्माण केलं होतंच. पुढं १९७१च्या डिसेंबरमध्ये बांगलादेशाच्या निर्मितीत बजावलेल्या भूमिकेमुळे, 'कणखर प्रशासक' आणि अमेरिका-चीनला मात देण्याचं धाडस दाखवणारी 'परिपक्व मुत्सद्दी' म्हणून समाजाच्या सर्वच स्तरांत त्यांनी मान्यता मिळवली. इंदिरा गांधींचा वाढलेला करिष्मा आणि गोलकनाथ प्रकरणीचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय निष्प्रभ ठरवण्यासाठी संसदेनं नव्यानं घटनादुरुस्ती करून आणलेलं दडपण यातूनही अपेक्षित असा निकाल केशवानंद भारतीप्रकरणी सरकार मिळवू शकलं नाही. या निकालात गोलकनाथ प्रकरणीचा निकाल फिरवण्यात आला, मात्र घटनेची 'पायाभूत ओळख' असलेली तत्त्वं बदलण्याचा अधिकार संसदेला



**'गूंगी गुडिया' म्हणून हेटाळणीला सामोऱ्या जात पंतप्रधानपदी आलेल्या इंदिराजींना पदार्पणालाच पक्षांतर्गत कारस्थानांशी संघर्ष करावा लागला. विरोधकांनी बिगरकाँग्रेसवादाच्या नावाखाली बड्या आघाडीचा प्रयोग करून उत्तरेकडच्या महत्त्वाच्या राज्यांत काँग्रेसप्रभुत्वाला तडे देण्यास प्रारंभ केला, तोही याच काळात. मात्र अंतर्गत आणि बाह्य विरोधकांनी केलेल्या राजकीय कोंडीचा सामना करताना, त्यांनी बळ थेट लोकांकडे जाऊनच घेतलं, ही वस्तुस्थिती आहे. अपवाद फक्त आणीबाणीचा!**





नाही, अशी नवी मांडणी बहुमताच्या निर्णयानं केली. संसद हे घटनेचंच एक अपत्य आहे आणि घटनेत काळानुरूप बदल करण्याचा अधिकार घटनेनंच संसदेला दिला असला, तरी घटनेची मूळ ओळखच नष्ट करण्याचा अधिकार त्यात अनुस्युत नाही, हे या मांडणीचं गाभ्याचं सूत्र होतं. ही मूळ ओळख सांगणारी तत्त्वं कोणती याची उदाहरणादाखल यादी न्यायमूर्तींनी दिली; पण त्याचवेळी मालमत्तेचा हक्क हा मूलभूत हक्क नाही, असा निर्वाळा दिला आणि मार्गदर्शक तत्त्वांतील आर्थिक समतावादी उपाययोजनांच्या आड सुप्रीम कोर्ट येऊ पाहत आहे, या प्रचारातली हवाही काढून घेतली.

मात्र या मर्यादित यशानं इंदिरा गांधी आणि त्यांच्या सल्लागारांचं समाधान झालं नाही. १९७३च्या एप्रिलमध्ये ज्या दिवशी हा निकाल कोर्टानं दिला, त्याच्या दुसऱ्याच दिवशी सेवाज्येष्ठतेत चौथ्या क्रमांकावर असलेल्या ए. एन. रे यांना सरन्यायाधीशपदी नेमून इंदिरा गांधींनी सुप्रीम कोर्टाच्या 'शुध्दिकरणा'ला सुरुवात केली. ते शक्य झालं; कारण १९७०सालचा एकोपा सुप्रीम कोर्टात उरला नव्हता. यावेळी राजीनामे केवळ डावलल्या गेलेल्या तीन न्यायमूर्तींनीच तेवढे दिले. या राजीनाम्यांनंतर कोर्टातील बदललेल्या समीकरणाच्या आधारे रे यांनी केशवानंद भारती प्रकरणाच्या फेरविचाराची प्रक्रिया पुढे ऐन आणीबाणीत सुरू कशी केली आणि अचानक हे पीठ बरखास्त का करण्यात आलं, हे आजही गूढ आहे. एक मात्र खरं की मागे वळून पाहताना कोर्टाविरुध्दच्या संघर्षात इंदिरा गांधींची बाजू आज जितकी निर्विवादपणे कांगावखोर वाटते, तेवढी त्या काळी वाटली नव्हती. लोकशाही मूल्यं पातळ होत जाणं अंगवळणी पाडून घेतलं की हुकूमशाहीच्या पाऊलखुणांची बहुधा नोंदच होत नाही.

या संघर्षाचा काहीसा विस्तृत आढावा घेतला; कारण आणीबाणीपूर्व राजकीय कोंडीच्या इंदिरा गांधींच्या आकलनात केवळ विरोधी पक्ष आणि जयप्रकाश नारायण यांच्यासारखं लोकमानसात नैतिक स्थान असलेलं व्यक्तिमत्त्व एवढेच शत्रुस्थानी नव्हते, तर वरिष्ठ न्यायसंस्थाही होती आणि याचा प्रभाव आणीबाणीत इंदिरा सरकारनं संसदेकडून करून घेतलेल्या घटनादुरुस्त्यांत दिसतो. आणीबाणीनंतर सुप्रीम कोर्टानं घटनेचं पुनर्लेखन करत स्वतःला कार्यकारी सत्तेच्या हस्तक्षेपापासून संरक्षण देण्याचा उपद्व्याप केला, तो आणीबाणीपूर्व व आणीबाणीकालीन अनुभवातून. आणीबाणी या घटितातल्या वरिष्ठ न्यायसंस्था या घटकाची पुरेशी दखल इतिहासानं घेतलेली नाही. न्यायमूर्तींच्या नेमणुकीच्या कार्यपध्दतीवरून मोदी सरकारशी सुरू झालेल्या संघर्षातले युक्तिवाद आणीबाणीपूर्व काळाची आठवण करून देणारे आहेत, याची जाता जाता नोंद.

***

सन १९७५च्या जूनमध्ये आणीबाणीचा आश्रय घेण्यापूर्वी देशातील सर्व स्तरांत अस्वस्थता होती, ही वस्तुस्थिती आहे. त्याला केवळ इंदिरा सरकार जबाबदार नव्हतं. १९७२ पासूनचा दुष्काळ, बांगलादेशातून आलेल्या सुमारे एक कोटी निर्वासितांचा बोजा, पाकिस्तानशी युध्दामुळं झालेल्या खर्चाचा भार यामुळे जनतेला महागाई आणि टंचाईचा सामना करावा लागत होता. गुजरातमध्ये 'नवनिर्माणा'च्या नावानं आरक्षणविरोधी वर्णवर्चस्ववादी शक्तींनी युवकांना भडकावलं होतं. बिहारमध्येही युवकांनी आंदोलन सुरू केलं होतं, मात्र त्यामागची प्रेरणा भ्रष्टाचारविरोधाची होती. पुढे जयप्रकाश नारायण यांनी या आंदोलनाला समग्र परिवर्तनाच्या मूल्यांची दिशा देण्याचा प्रयत्न केला. 'संपूर्ण क्रांती'च्या आवाहनानं भारावलेल्या बिहारमधील युवकांना जेपींच्या नेतृत्वामुळे नैतिक बळ मिळालं आणि देशभरातला युवावर्गच नव्हे, तर सामान्य जनताही त्यांच्याकडे आशेनं पाहू लागली. त्रयस्थ विचारवंत, सर्वोदयी गांधीवादी चळवळीतले कार्यकर्ते बिहार आंदोलनाशी जोडून घेऊन प्रस्थापित व्यवस्थेला पर्याय उभा करू पाहत होते.

जेपींचं त्यावेळचं लिखाण आणि भाषणं संपूर्ण क्रांतीची मांडणी करू पाहत होती. आपापली विचारसरणी व पूर्वग्रह यानुसार त्यांच्यावर शिक्के मारले जात होते, पण तरुणांना आणि सामान्यांना त्यामागील सत्तानिरपेक्ष कळकळ समजत होती. इंदिरा

**आणीबाणीनंतर सुप्रीम कोर्टानं घटनेचं पुनर्लेखन करत स्वतःला कार्यकारी सत्तेच्या हस्तक्षेपापासून संरक्षण देण्याचा उपद्व्याप केला, तो आणीबाणीपूर्व व आणीबाणीकालीन अनुभवातून. आणीबाणी या घटितातल्या वरिष्ठ न्यायसंस्था या घटकाची पुरेशी दखल इतिहासानं घेतलेली नाही. न्यायमूर्तींच्या नेमणुकीच्या कार्यपध्दतीवरून मोदी सरकारशी सुरू झालेल्या संघर्षातले युक्तिवाद आणीबाणीपूर्व काळाची आठवण करून देणारे आहेत, याची जाता जाता नोंद.**

गांधी आणि त्यांच्या भणंगांना मात्र ती कधीच समजली नाही. जेपींच्या पत्रातील आपुलकीला, सद्‌भावाला त्यांनी कधीच प्रतिसाद दिला नाही. स्वतःला कायम कारस्थानांच्या बळीच्या रूपात पाहण्याच्या मनोभूमिकेमुळं, जेपी आणि स्वतःसारखेच इतर सत्ताकांक्षी विरोधी पक्षांचे नेते यांतला फरक समजून घेण्याची क्षमता त्यांनी बहुधा गमावली होती. विरोधी पक्षांनी या आंदोलनात इंदिरा गांधींची कोंडी करण्याची संधी शोधणं स्वाभाविक होतं. मात्र जेपींना या नेत्यांच्या हवाली करून इंदिरा गांधी यांनीच विरोधी पक्षांना त्यांच्याकडे नसलेला नैतिक आधार मिळवून दिला.


प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि सर्व स्तरांतील असंतोष यांवर जेपींच्या नैतिक प्रतिमेच्या आधारे स्वार होऊ पाहणाऱ्या विरोधी पक्षांशी दोन हात करण्याचा आत्मविश्वास इंदिरा गांधींनी गमावला आहे, याचं कोणतंही चिन्ह त्यांच्या देहबोलीत त्यावेळी दिसल्याचं आठवत नाही. हे आंदोलनही राजकीय डावपेच आणि हाताशी असलेली शासनाची दमनयंत्रणा यांच्या बळावर त्यांनी शिंगावर घेतलं असतं, याविषयी शंका नाही. वर्षापूर्वी देशव्यापी रेल्वे संप त्यांनी असाच मोडून काढला होता. पण अलाहाबाद हायकोर्टाचे न्या. जगमोहनलाल सिन्हा यांनी १२ जून १९७५ला दिलेल्या निर्णयानं सर्वच बदललं.

इंदिरा गांधींची रायबरेली मतदारसंघातून लोकसभेवर १९७१ साली झालेली निवड त्यांनी रद्द ठरवली. शिवाय निवडणूक लढवण्यास सहा वर्ष अपात्र ठरवण्याचा आदेशही दिला. लोकप्रतिनिधित्व कायद्याखाली गुन्हे ठरवलेले दोन आक्षेप सिध्द झाल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला. एक, यशपाल कपूर या पंतप्रधानांच्या सचिवालयातल्या राजपत्रित अधिकाऱ्याचा वापर निवडणूक कामासाठी करणं. दोन, प्रचारसभेकरिता व्यासपीठ उभारणं आणि लाऊडस्पीकर्ससाठी वीज पुरवणं याकरिता उत्तर प्रदेश सरकारच्या राजपत्रित अधिकाऱ्यांची मदत घेणं. दुरुपयोगाचे अन्य आक्षेप त्यांनी फेटाळून लावले होते.

इंदिरा गांधी राजनारायण यांच्या दुप्पट मतांनी विजयी झाल्या होत्या. या अधिकाऱ्यांच्या मदतीमुळंच त्यांचा विजय शक्य झाला असं कोणाचंच म्हणणं नव्हतं. पण निवडणूक विषयक या गुन्ह्यांच्या तरतुदीमागील उद्देश, मतदान प्रक्रियेत कोणा उमेदवाराच्या बाजूनं किंवा विरोधात शासकीय यंत्रणेच्या वापरामुळे इतरांना सोसाव्या लागणाऱ्या असमान संधीपासून संरक्षण देणं हा आहे. निवडणुकीच्या निकालावर अशा वापराचा प्रत्यक्षात किती परिणाम झाला, हे त्यात अप्रस्तुत मानलं गेलं आहे. तरीही सिन्हा यांनी 'क्षुल्लक' कारणावरून इंदिराजींची निवड रद्द केल्याचा प्रचार केला गेला. (त्याचं पितळ घटनातज्ज्ञ ए. जी. नूराणी यांनी उघडं पाडलं आहे.)

हा निवडणूक भ्रष्टाचार गंभीरच होता, मात्र तो सिध्द झाला आहे या निष्कर्षाबाबत मतभेद शक्य होते. त्याची सोडवणूक करण्यासाठी सुप्रीम कोर्टात अपीलाची तरतूद होती. प्रारंभी इंदिराजींनी तोच मार्ग अवलंबला होता. नानी पालखीवाला यांनी इंदिराजींचं वकीलपत्र घेतलं होतं. ते अपीलयोग्य आहे अशी खात्री असल्याखेरीज त्यांनी ते घेतलं नसणार; कारण घटनादुरुस्तीच्या अधिकारकक्षेवरून झालेला संघर्ष आणि रे यांच्या सरन्यायाधीशपदी नियुक्तीचा वाद यात ते इंदिरा सरकारचे कट्टर विरोधक होते. यावेळी राजकीय दृष्ट्या कळीचा प्रश्न ठरला होता, तो अपीलाचा निकाल लागेपर्यंत सिन्हा यांच्या निर्णयाला सुटीकालीन कोर्ट पूर्ण स्थगिती देणार की अंशतः हा. कारण हायकोर्टाच्या निकालानंतर विरोधी आंदोलनाला नवा मुद्दा मिळाला होता. इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदाचा तात्काळ राजीनामा द्यावा, या मागणीसाठी संसदेला घेराव घालण्याचा इशारा त्यांनी दिला होता.

न्या. कृष्णा अय्यर यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता, उच्च न्यायालयीन परंपरेचं पालन करत केवळ अंशतः स्थगिती दिली. त्यामुळे पंतप्रधान म्हणून त्या काम पाहू शकत होत्या, पण खासदार म्हणून नाही. लोकसभेतील मतदानातही त्या सहभागी होऊ शकत नव्हत्या. हा निर्णय २४ जूनला देण्यात आला आणि २५ जूनच्या मध्यरात्री 'अंतर्गत अशांतते'चं कारण देत आणीबाणी लागू करण्यात आली. जेपींसह बहुसंख्य विरोधी



**प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि सर्व स्तरांतील असंतोष यांवर जेपींच्या नैतिक प्रतिमेच्या आधारे स्वार होऊ पाहणाऱ्या विरोधी पक्षांशी दोन हात करण्याचा आत्मविश्वास इंदिरा गांधींनी गमावला आहे, याचं कोणतंही चिन्ह त्यांच्या देहबोलीत त्यावेळी दिसल्याचं आठवत नाही. हे आंदोलनही राजकीय डावपेच आणि हाताशी असलेली शासनाची दमनयंत्रणा यांच्या बळावर त्यांनी शिंगावर घेतलं असतं, याविषयी शंका नाही. वर्षापूर्वी देशव्यापी रेल्वे संप त्यांनी असाच मोडून काढला होता. पण अलाहाबाद हायकोर्टाचे न्या. जगमोहनलाल सिन्हा यांनी १२ जून १९७५ला दिलेल्या निर्णयानं सर्वच बदललं.**



**न्या. सिन्हा यांचा निर्णय सुप्रीम कोर्टातल्या अपीलाच्या मार्गानं नव्हे, तर संसदेमार्फत रद्दबातल ठरवण्यासाठीच आणीबाणीचा आश्रय घेतला गेला. कोर्टाचा अंतिम निकाल येईपर्यंत पक्षातल्या अन्य नेत्यावर पंतप्रधानपदासाठी विश्वास दाखविण्यास त्या तयार नव्हत्या. यामागे असुरक्षिततेची भावना असो वा देशाला 'अराजका'पासून वाचवण्याची क्षमता केवळ आपल्याच नेतृत्वात आहे, हा त्यांचा समज वा दोन्ही.**

नेत्यांना स्थानबध्द करण्यात आलं आणि प्रसार माध्यमांवर कडक सेन्सॉरशिप लादण्यात आली. संसदेला बेमुदत घेराव घालण्याचा इशारा, लष्कर आणि सुरक्षा दलांना बेकायदा आदेश न पाळण्याचं जेपीकृत कथित आवाहन, यापासून देशाला वाचवण्यासाठी केलेली ही तात्कालीक उपाययोजना आहे, असं भासवलं गेलं आणि २० कलमी कार्यक्रमाची लालूच दाखवून सर्वसामान्य जनतेच्या सामीलीकरणाचा प्रयत्न करण्यात आला. मात्र आणीबाणी लागू झाल्या झाल्या तातडीनं ज्या घटनादुरुस्त्या करण्याची मोहीम राबवली गेली, त्यावरून न्या. सिन्हा यांचा निर्णय सुप्रीम कोर्टातल्या अपीलाच्या मार्गानं नव्हे, तर संसदेमार्फत रद्दबातल ठरवण्यासाठीच आणीबाणीचा आश्रय घेतला गेल्याचं स्पष्ट होतं.

कोर्टाचा अंतिम निकाल येईपर्यंत पक्षातल्या अन्य नेत्यावर पंतप्रधानपदासाठी विश्वास दाखविण्यास त्या तयार नव्हत्या. यामागे असुरक्षितता व अविश्वासाची भावना असो वा देशात विरोधी पक्षांनी पसरवलेल्या 'अराजका'पासून (या आंदोलनामागे बांगलादेश मुक्तीमुळे दुखावलेल्या परकीय शक्तींची चिथावणी होती, असाही त्यांचा दावा होता.) देशाला वाचवण्याची क्षमता केवळ आपल्याच नेतृत्वात आहे, हा त्यांचा समज वा दोन्ही.

***

आणीबाणी लागू झाल्यानंतर दीड–पावणेदोन महिन्यांत घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेतून न्या. सिन्हा यांचा निकाल रद्दबातल कसा ठरवला गेला आणि पुढे सुप्रीम कोर्टाकडूनही त्यावर शिक्कामोर्तब कसं झालं, हे सुध्दा आणीबाणीतल्या मानवी हक्कांच्या पायमल्लीच्या कहाण्यांइतकंच धक्कादायक आहे. संसदेतल्या चर्चा आणि सुप्रीम कोर्टातलं कामकाज यांचीही गाळीव माहितीच लोकांपर्यंत पोचू दिली जात असल्यानं, त्या काळात याचं गांभीर्य सामान्यांपर्यंत पोचलं नाही याचं नवल नाही.

मुळात आणीबाणी लागू करण्याच्या निर्णयाची प्रक्रियाच सदोष होती. हा निर्णय मंत्रिमंडळाचा नव्हे, तर पंतप्रधानांचा होता आणि तरीही राष्ट्रपतींनी निमूटपणे त्यावर स्वाक्षरी केली.

मतदान करणाऱ्या खासदारांपैकी दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा घटनादुरुस्तीला लागतो. विरोधी पक्षांच्या बहुसंख्य नेत्यांना गजाआड करून या बहुमताची निश्चिती करण्यात आली! त्यानंतर घटनादुरुस्त्यांचा धडाका सुरू झाला. आणीबाणी लागू करणारी अधिसूचना, या काळात राष्ट्रपती आणि राज्यपालांनी काढलेले वटहुकूम आणि मूलभूत हक्कांचा संकोच करणारे कायदे यांची कायदेशीर योग्यायोग्यता ठरवण्याचा सुप्रीम कोर्टाचा अधिकार काढून घेण्यात आला. घटनादुरुस्तीचा उद्देश आणीबाणीत कार्यकारी सत्तेला निरंकुश करणं हा होता. आणीबाणीचा परिणाम म्हणून मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी कोर्टाकडे दाद मागण्याचा नागरिकाचा अधिकार स्थगित होतो. पण त्या मर्यादित अधिकारकक्षेतही सरकारी मनमानीच्या शहानिशेला कोर्टांनी वाव शोधला होता. अनेक हायकोर्टांनी आणीबाणीतील दहशतीच्या सावटाचा प्रभाव पडू न देता स्थानबध्दतेचे मनमानी आदेश रद्द ठरवले होते. या न्यायमूर्तींच्या बदल्या करून तसंच बढत्या नाकारून इतरांना धडा घालून देण्याचा प्रयत्न इंदिरा गांधींनी केला. पुढं सुप्रीम कोर्टात हायकोर्टांच्या निर्णयांना आव्हान देण्यात आलं, तेव्हा आणीबाणीत एखाद्याला गोळी घातली तरी जीवितस्वातंत्र्याच्या हक्काच्या

अंमलबजावणीसाठी कोर्टाकडे दाद मागण्याचा हक्क उपलब्ध नाही, हा या घटनादुरुस्तीचा परिणाम असल्याचा विकृत युक्तिवाद या दुरुस्त्यांच्या समर्थनासाठी ॲटर्नी जनरलनी केला होता. धक्कादायक म्हणजे न्या. खन्ना वगळता सुप्रीम कोर्टाच्या घटनापीठावरच्या चार न्यायमूर्तींनी त्यावर शिक्कामोर्तबही केलं होतं.

दुसऱ्या घटनादुरुस्तीनं पंतप्रधानपदावरील व्यक्तीच्या संदर्भातले निवडणूक अर्ज कोर्टाच्या कक्षेतून काढून घेतले आणि त्यांची सुनावणी संसदेनं स्थापन केलेल्या यंत्रणेपुढे होईल अशी तरतूद केली. सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्ट यांच्यापुढं प्रलंबित असलेले खटले रद्द होतील, अशीही तरतूद त्यात केली. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष अशा पदांचाही त्यात समावेश केला असला, तरी तो केवळ देखावा होता. कोर्टात या दुरुस्तीला आव्हान देता येऊ नये, म्हणून तिचा समावेश घटनेच्या नवव्या परिशिष्टात करण्यात आला. यामुळंही सुरक्षित वाटलं नाही म्हणून की काय, लोकप्रतिनिधित्व कायद्यात दुरुस्त्या करण्यात आल्या. न्या. सिन्हा यांनी आधीच्या कायद्यातल्या ज्या तरतुदींच्या आधारे इंदिरा गांधींची निवड रद्द केली होती, त्यात अशाप्रकारे बदल आणि तेही पूर्वलक्ष्यी प्रभावानं केले गेले की या सुधारित तरतुदीच्या आधारे यशपाल कपूर वा उत्तर प्रदेशातल्या सनदी अधिकाऱ्यांचं वर्तन निवडणूक विषयक गुन्ह्याच्या व्याख्येत बसू नये! शिवाय निवडणूक रद्द झालेल्या व्यक्तीला नव्यानं निवडणुकीसाठी अपात्र ठरवायचं काय आणि किती काळासाठी हे ठरवण्याचा अधिकार राष्ट्रपतींकडे सोपवण्याची काळजीही या दुरुस्तीनं घेतली.

घटनादुरुस्तीच्या इतिहासातली ही सर्वात वेगानं झालेली दुरुस्ती. संसदेत विधयक मांडणं, ते दोन्ही सभागृहांत चर्चेअंती पास होणं, राज्यांच्या निम्म्याहून अधिक विधानसभांनी एका दिवसात विशेष अधिवेशन बोलावून ते मंजूर करणं आणि राष्ट्रपतींची मंजुरी मिळून ते लागू होणं, हे चार दिवसांत झालं. पाचव्या दिवशी सुप्रीम कोर्टात इंदिरा गांधींच्या निवडणूक अपीलाची सुनावणी सुरू झाली, तेव्हा अपीलाचा चेहरामोहराच बदलला होता! न्या. सिन्हा यांचा निर्णय योग्य होता काय हे गुणवत्तेवर तपासण्याची वेळच कोर्टावर आली नाही. घटनादुरुस्ती वैध आहे काय, हाच मुख्य प्रश्न उरला होता. कोर्टाच्या अधिकारकक्षेतून निवडणूक अर्जाची सुनावणी काढून घेणारी तरतूद कोर्टानं घटनाबाह्य ठरवली, पण निवडणूक कायद्यात पूर्वलक्ष्यी प्रभावानं केलेले बदल वैध ठरवले. होत्याचं नव्हतं करणं कायदेशीर ठरल्यावर, इंदिरा गांधींचं अपील मान्य करण्यावाचून कोर्टापुढं पर्यायच नव्हता. इंदिरा गांधीवरचं निवडणूक गुन्हेगारीचं किटाळ अशाप्रकारे दूर झालं आणि त्या आधीइतक्या अधिकारानं पंतप्रधानपदावर बसण्यास पात्र ठरल्या! गुन्ह्याची व्याख्याच मागील तारखेपासून बदलून संतपदाचा टिळा लावण्याइतकी कायद्याची चेष्टा लोकशाही समाजानं क्वचित कुठे स्वीकारली असेल.

याच लोकशाहीची आणखी एक गंमत म्हणजे पुढे इंदिरा गांधींच्या हुकूमशाहीचा पाडाव करून १९७७ साली निवडून आलेल्यांनी घटनेचा चेहराच बदलू पाहणारे आणीबाणीतले अनेक कायदे रद्द केले, पण सरकारी अधिकाऱ्यांचा निवडणूक कामासाठी दुरुपयोग करण्यास वाव देणारे निवडणूक कायद्यातले इंदिराकृत दोन बदल कायम ठेवले! आजतागायत त्यात बदल झालेला नाही, याचा अर्थ या सुधारित तरतुदीच योग्य आहेत आणि आधीच्या तरतुदी अन्यायकारक होत्या यावर सर्वपक्षीय एकमत १९७७सालीच झालं आहे असा होतो! इंदिरा गांधींची निवड रद्द होणं हा कायद्यातल्या 'अन्यायकारक' तरतुदींचा परिणाम असेल, तर अन्यायाची इंदिराजींची भावनाही रास्तच होती, यावरही सर्वपक्षीय सहमती असायला हवी!

आणीबाणीतल्या दुरुपयोगापासून भविष्यात संरक्षण मिळावं म्हणून असो वा निवडणूक गुन्ह्यांतून सुटकेसाठी असो, आणखी एक घटनादुरुस्ती विधेयक राज्यसभेत संमत करून घेण्यात आलं. पुढं ते लोकसभेत मांडलं गेलं नाही, पण त्याचा परिणाम म्हणून पंतप्रधानपद भूषवलेल्या व्यक्तीला सर्व प्रकारच्या फौजदारी आणि दिवाणी कारवायांपासून तहहयात संरक्षण मिळणार होतं. अगदी खून केला तरी! आणीबाणीत इंदिरा गांधींच्या सल्लागारांचा, त्यात एच. आर. गोखले यांच्यासारखे माजी न्यायाधीश



**लोकशाहीची आणखी एक गंमत म्हणजे पुढे इंदिरा गांधींच्या हुकूमशाहीचा पाडाव करून १९७७ साली निवडून आलेल्यांनी घटनेचा चेहराच बदलू पाहणारे आणीबाणीतले अनेक कायदे रद्द केले, पण सरकारी अधिकाऱ्यांचा निवडणूक कामासाठी दुरुपयोग करण्यास वाव देणारे निवडणूक कायद्यातले इंदिराकृत दोन बदल कायम ठेवले! आजतागायत त्यात बदल झालेला नाही, याचा अर्थ या सुधारित तरतुदीच योग्य आहेत आणि इंदिरा गांधींची निवड रद्द होणं हा कायद्यातल्या 'अन्यायकारक' तरतुदींचा परिणाम असेल, तर अन्यायाची इंदिराजींची भावनाही रास्तच होती, यावरही सर्वपक्षीय सहमती असायला हवी!**



**लोकशाहीच्या सुदैवानं १९७७च्या मार्चमध्ये निवडणुकांची घोषणा इंदिरा गांधींना करावीशी वाटली. निवडणुका मोकळ्या वातावरणात झाल्या. इंदिरा आणि त्यांचे पुत्र संजय यांचा दारूण पराभव मतदारांनी केला. आणीबाणीत ढळलेला लोकशाहीच्या तीन स्तंभांतला तोल पुन्हा सावरला गेला. त्यात नव्यानं उलथापालथ करण्याचं धाडस ना इंदिरा गांधींनी १९८० साली सत्तेवर पुनरागमन करताना दाखवलं, ना घटनेच्या फेरविचाराची उठाठेव करणाऱ्या वाजपेयी सरकारनं. पण म्हणून यापुढंही घटनेची 'पायाभूत ओळख' सुरक्षित राहील असं नव्हे.**

कायदामंत्री होते, तोल किती गेला होता, हेच यावरून दिसतं. आणीबाणीतला कायद्याचा दुरुपयोग, हा फौजदारी तसंच दिवाणी कारवायांना पात्र आहे, याची जाणीव असल्याचाही हा पुरावा!

यानंतरच्या ४२व्या घटनादुरुस्तीनं तर मूळ घटनेचा सांगडाही शिल्लक राहणार नाही याची काळजी घेतली होती. न्यायसंस्थेला त्यात लक्ष्य करण्यात आलं होतं. संसदेनं केलेल्या कोणत्याही घटनादुरुस्तीला– मग ती मूलभूत हक्कांचा संकोच करणारी का असेना, कोणत्याही कोर्टात कोणत्याही मुद्द्यावर आव्हान देता येणार नाही, अशी तरतूद करून, घटनेच्या पायाभूत तत्त्वांना बाधा आणणारी घटनादुरुस्ती संसदेला करता येणार नाही, असा सुप्रीम कोर्टानं दिलेला निर्णय निष्प्रभ ठरवणं हे त्यामागचं उद्दिष्ट. संसद वा विधिमंडळानं केलेला कायदा घटनाबाह्य ठरवायचा असेल, तर त्यामागे घटनापीठातील दोन तृतीयांश न्यायमूर्तींचं बहुमत असणं बंधनकारक करण्यात आलं. केंद्रीय कायद्याची वैधता तपासणं हायकोर्टाच्या कक्षेतून काढून घेण्यात आलं.राष्ट्रविरोधी कारवायांना प्रतिबंध करणारी नवी तरतूद करण्यात आली. 'अंतर्गत अशांतता' माजवणं, याचा समावेश 'राष्ट्रविरोधी कारवायां'च्या व्याख्येत करून, विरोधी आंदोलनं दडपण्यास घटनात्मक संरक्षण देऊ करण्यात आलं. ही तरतूद जीवितस्वातंत्र्याच्या, कायद्यापुढं समानतेच्या तसंच कलम १९मधील व्यक्तिस्वातंत्र्यांच्या आड येते, या कारणानं घटनाबाह्य ठरवता येणार नाही, अशीही जोड देण्यात आली. लोकप्रतिनिधित्व कायद्याखाली भ्रष्ट व्यवहाराच्या गुन्ह्यासाठी कोर्टानं दोषी ठरवलेल्या खासदारांच्या अपात्रतेचा निर्णय कोर्टाच्या कक्षेतून काढून घेत राष्ट्रपतींकडे सोपविण्यात आला. ४२व्या घटनादुरुस्तीतली धक्कादायक तरतूद म्हणजे कायदा मंजूर करण्यासाठी संसद वा विधिमंडळात किमान गणसंख्येची अट रद्द करण्यात आली. याचा अर्थ, एखादा खासदारही देशभर लागू होणारा कायदा करण्यास सक्षम ठरणार होता!

लोकशाहीच्या सुदैवानं १९७७च्या मार्चमध्ये निवडणुकांची घोषणा इंदिरा गांधींना करावीशी वाटली. विरोधी नेत्यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आलं. आणीबाणी लागूच होती, मात्र निवडणुका मोकळ्या वातावरणात झाल्या. 'अनुशासनपर्व' म्हणून आणीबाणी लोकांच्या गळी उतरवण्यात आपल्याला यश आलं आहे, या इंदिरा गांधींच्या भ्रमाचा भोपळा मतदारांनी फोडला. खुद्द इंदिरा आणि त्यांचे पुत्र संजय यांचा दारूण पराभव मतदारांनी केला. दक्षिणेकडच्या राज्यांचा अपवाद वगळता काँग्रेसचं पानिपत झालं. घटनेचं विकृतीकरण करणाऱ्या बहुतेक घटनादुरुस्त्या १९७७मध्ये सत्तेवर आलेल्या जनता सरकारनं रद्द केल्या. शिवाय अंतर्गत आणीबाणी लादण्याचा अधिकार देणारी घटनेतील तरतूदही काढून टाकली. आणीबाणीतला जीवितस्वातंत्र्याविषयीचा निर्णय सुप्रीम कोर्टानं फिरवलाच, उलट मूलभूत हक्कांची व्याप्ती वाढवणारे आणि ते अधिक सुरक्षित करणारे निर्णय पुढच्या काळात दिले. आणीबाणीत ढळलेला लोकशाहीच्या तीन स्तंभांतला तोल पुन्हा सावरला गेला. त्यात नव्यानं उलथापालथ करण्याचं धाडस ना इंदिरा गांधींनी १९८० साली सत्तेवर पुनरागमन करताना दाखवलं, ना घटनेच्या फेरविचाराची उठाठेव करणाऱ्या वाजपेयी सरकारनं. पण म्हणून यापुढंही घटनेची 'पायाभूत ओळख' सुरक्षित राहील असं नव्हे.

देशातल्या लोकशाही मूल्यांना भविष्यातही असलेल्या आणीबाणीसदृश हुकूमशाहीच्या धोक्याकडं अडवाणींनी रास्तपणे लक्ष वेधलं, म्हणून हे उदाहरण. अयोध्येतली वादग्रस्त वास्तू पाडण्यात जिची परिणती झाली, त्या आंदोलनाचा राजकीय चेहरा अडवाणीच होते आणि उत्तर प्रदेशातल्या त्यांच्या पक्षाच्या सरकारनं घटनात्मक मूल्यंच नव्हेत, तर शपथेवर स्वीकारलेली घटनात्मक कर्तव्यं कारस्थान रचून कशी पायदळी तुडवली, याचा तपशील तत्कालीन केंद्रीय गृहसचिव माधव गोडबोले यांनीच लिहून ठेवला आहे. बहुसंख्याकांची धार्मिक अस्मिता जपणं घटनात्मक कर्तव्यांपेक्षा मोलाचं आहे, तेच खरं राष्ट्रीय कर्तव्य आहे आणि असलं पाहिजे, हा आंदोलनात सहभागी संघटनांचा संदेश होता. त्याच्या प्रभावापासून राज्यातली सुरक्षा दलंही अलिप्त राहू शकली नव्हती. आता दोन दशकांनंतर मागे वळून पाहताना वाटतं, घटनेतल्या पायाभूत मूल्यांसाठी

'आणीबाणी'च्या खुणांच्या निसटलेल्या नोंदीपैकीच ही एक.

घटनात्मक मूल्यं ही भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील फेरोजशहा मेहता ते महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील मुख्य प्रवाहानं स्वीकारलेली आणि घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेकांच्या योगदानामुळं समृध्द झालेली 'भारतीयत्वा'ची मूल्यं आहेत. सेक्युलर, उदारमतवादी, आधुनिक, बहुसांस्कृतिक समाज त्यात गृहीत आहे. सुसंस्कृत, आधुनिक, प्रगतिशील व विवेकी देशाच्या भवितव्याची हमी त्यातच आहे, याची जाणीव आपण क्षीण होऊ देतो आहोत का, असा संभ्रम वाटण्याजोगी परिस्थिती गेल्या चाळीस वर्षांत हळूहळू निर्माण झाली आहे. त्यात अर्थात सर्वच पक्षांच्या राज्यकर्त्यांचा वाटा मोठा आहे. पोलिसी बळाचा मनमानी वापर करून विरोधकांना स्थानबध्द केलं वा कायद्यानं सेन्सॉरशिप लादली, तरच घटनात्मक हक्कांची पायमल्ली होते असं नव्हे. काय खावं, काय वाचावं, काय शिकावं, इतिहास -भूगोलाकडेच नव्हे, तर वैज्ञानिक तथ्यांकडेही कसं बघावं, मुलींनी कसा पेहराव करावा, विवाह कोणाशी करावा वा करू नये, कोणता व्यवसाय करावा वा करू नये यासारख्या बाबींतल्या निवडस्वातंत्र्याच्या निर्भय आविष्कारावर सरकारी धोरणांतून वा सरकारी पक्षाशी वैचारिक जवळीक असलेल्या कोणत्याही धार्मिक-जातीय संघटनांच्या झुंडशाहीतून बंधनं येणं या घटनात्मक मूल्यांसाठी आणीबाणीच्याच खुणा आहेत. आज या खुणा अधिक ठळकपणे उमटू लागल्या आहेत.

आणीबाणीचं मतलबी सुलभीकरण या खुणा पुसू पाहतं.

***

आणीबाणीपूर्व दहा वर्षं, आणीबाणीचं दीड वर्ष, आणीबाणीत निवडणुका जाहीर केल्यानंतर सत्तांतरापर्यंतचे साधारणतः पाच महिने, पुढची सुमारे अडीच वर्षं विरोधी पक्षनेत्या, नंतर हत्येपर्यंतची चार वर्षं अशी सुमारे १९ वर्षांची इंदिरा गांधींची कारकीर्द. आता यापैकी दीड वर्ष त्यांना 'हुकूमशहा' मानायचं आणि साडेसतरा वर्षं लोकशाहीच्या पुजारी? की सर्व काळ त्यांच्यात हुकूमशाही प्रवृत्ती होत्या, फक्त त्यांचा हुकूमशहा ठरवण्यायोग्य असा वापर केवळ आणीबाणीतलं दीड वर्ष झाला असं समजायचं? त्यांच्यातला सुप्त हुकूमशहा त्यांच्या वर्तनातल्या वा वर्तनशैलीतल्या कोणत्या लक्षणांवरून ओळखायचा? अशी लक्षणं आज कोणा नेत्यात दिसत असतील तर काय करायचं? आणीबाणीच्या भाजप-परिवाराच्या प्रचारकी आकलनावर विसंबून, या नेत्याचं नाव इंदिरा गांधी तर नाही ना याची खात्री पटवून घ्यायची आणि नसेल तर निवांत राहायचं?

बघू या..

आणीबाणीपूर्व दहा वर्षांतल्या इंदिराजींच्या वर्तनशैलीवर हुकूमशहाचा शिक्का मारणं शक्य नाही. मात्र एकाधिकारवादी प्रवृत्ती बळावत चालल्याची स्पष्ट लक्षणं त्यात शोधता येतात. न्यायसंस्थेचं स्वातंत्र्य अडचणीचं वाटू लागणं, न्यायसंस्थेला दबावाच्या राजकारणाचं लक्ष्य बनवण्यात अनमान न करणं, हा त्याचाच धोकादायक आविष्कार. आणीबाणीतल्या सत्तांतरानंतरचं त्यांचं वर्तन पुन्हा प्रारंभीच्या दहा वर्षांतल्याप्रमाणं अधिकारकेंद्री, अविश्वासग्रस्त, घटनेच्या तांत्रिक चौकटींची पथ्यं पाळणारं, पण आत्म्याची फारशी दखल न घेणारं. आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यशैलीत याच मतदाराला इंदिरा गांधींच्या कार्यशैलीच्या काही खुणा दिसल्या असतीलही, पण त्यांच्यासारखा कणखर, निर्णायक नेता मिळाला याचं समाधानच गेल्या दोन वर्षांत दिसलं आहे! किंबहुना गेल्या ४० वर्षांत अधिकारकेंद्री कार्यशैली ही देशातल्या प्रादेशिक पक्षांसह बहुतेक पक्षांच्या नेतृत्वाची ओळख बनली आहे. राज्यांत अशा नेतृत्वानं याच कार्यशैलीत सत्ताही राबवली आहे. तेव्हा त्यात भविष्यातल्या 'हुकूमशाही'च्या धोक्याच्या घंटा ऐकू येण्याचा प्रश्नच नाही.

आणीबाणीतलं इंदिरा गांधींचं वर्तन निःसंशयपणे हुकूमशहाचा शिक्का समर्थनीय ठरवणारं.

आणि त्याचवेळी आणीबाणीतले शेवटचे पाच महिने या शिक्क्याला छेद देणारे.

ज्या लोकशाही मार्गानं आणीबाणी उठवण्याचा मार्ग प्रशस्त झाला, त्या निवडणुका



**घटनात्मक मूल्यं ही 'भारतीयत्वा'ची मूल्यं आहेत. सेक्युलर, उदारमतवादी, आधुनिक, बहुसांस्कृतिक समाज त्यात गृहीत आहे. सुसंस्कृत, आधुनिक, प्रगतिशील व विवेकी देशाच्या भवितव्याची हमी त्यातच आहे, याची जाणीव आपण क्षीण होऊ देतो आहोत का, असा संभ्रम वाटण्याजोगी परिस्थिती गेल्या चाळीस वर्षांत हळूहळू निर्माण झाली आहे. त्यात अर्थात सर्वच पक्षांच्या राज्यकर्त्यांचा वाटा मोठा आहे. विरोधकांना स्थानबध्द केलं वा कायद्यानं सेन्सॉरशिप लादली, तरच घटनात्मक हक्कांची पायमल्ली होते असं नव्हे.**



**आणीबाणीपूर्व दहा वर्षांतल्या इंदिराजींच्या वर्तनशैलीवर हुकूमशहाचा शिक्का मारणं शक्य नाही. आणीबाणीतल्या सत्तांतरानंतरचं त्यांचं वर्तन पुन्हा प्रारंभीच्या दहा वर्षांतल्याप्रमाणं अधिकारकेंद्री, अविश्वासग्रस्त, घटनेच्या तांत्रिक चौकटींची पथ्यं पाळणारं, पण आत्म्याची फारशी दखल न घेणारं. आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यशैलीत याच मतदाराला इंदिरा गांधींच्या कार्यशैलीच्या काही खुणा दिसल्या असतीलही, पण त्यांच्यासारखा कणखर, निर्णायक नेता मिळाला याचं समाधानच गेल्या दोन वर्षांत दिसलं आहे! किंबहुना गेल्या ४० वर्षांत अधिकारकेंद्री कार्यशैली ही देशातल्या प्रादेशिक पक्षांसह बहुतेक पक्षांच्या नेतृत्वाची ओळख बनली आहे.**

इंदिराजींनीच जाहीर केल्या. त्या निवडणूक आयोगाच्या स्वतंत्र यंत्रणेच्या अधिकारात आधीच्या निवडणुकांइतक्याच मुक्त वातावरणात झाल्या. निवडणुकीतल्या स्पष्ट प्रतिकूल कौलानंतर बिनबोभाट सत्तांतरही झालं. इतर देशांतल्या बहुतांशी हुकूमशहा सत्ताधाऱ्यांशी विपरीत असं हे वर्तन कसं समजून घ्यायचं?

हुकूमशाही ही लोकांपासून नेत्याला तोडते आणि वास्तवाच्या आकलनापासूनही. जेपींच्या नेतृत्वाला लोकांच्या मिळणाऱ्या प्रतिसादात परकीय शक्तींचं कारस्थान इंदिराजींना दिसू लागलं, तेव्हापासूनच लोकांच्या नसेवरचा त्यांचा हात सैल होत चालला होता. आणीबाणीत तो पूर्णपणे सुटला आणि लोकमताचा अंदाज त्यांना आला नाही म्हणून निवडणुकांचा धोका त्यांनी पत्करला का?

की लोकशाहीची वस्त्रं पूर्ण उतरवून, घटनेच्या दिखाऊ आवरणाखालच्या हुकूमशाहीच्या आधारे दीर्घकाळ कारभार करणं जमणारं नाही आणि त्यात प्रतिष्ठाही नाही, याची जाणीव त्यांना झाली म्हणून?

काँग्रेस चळवळीतल्या लोकशाही मूल्यांच्या उरल्या सुरल्या संस्कारांनी त्यांच्यातल्या हुकूमशहाला दुबळं केलं आणि लोकांकडे जायला भाग पाडलं की 'परकीय शक्तीपुरस्कृत अराजका'चा आणीबाणीच्या जालीम उपायांनी आता कायमस्वरूपी बंदोबस्त झाला आहे याची खात्री पटल्यानं, आधी नाईलाजानंच उचललेल्या अप्रिय पाऊलाला निरोप देण्याची संधी त्यांनी लोकांना दिली?

यातल्या कोणा एक उत्तरावर एकमत होण्यासारखं नाही.

आणीबाणीच्या अनुभवाचा अर्थ लावू पाहणाऱ्या वेगवेगळ्या साच्यांपैकी कोणता पटवून घ्यायचा हे शेवटी पूर्वग्रहच ठरवतो आणि आणीबाणीतल्याच या दोन काळांचा समन्वय आपापल्या साच्याशी घालताना, त्यातली विसंगती नजरेआड करण्यास यापैकीच एखादा पूर्वग्रह कामी येतो!

अधिक प्रस्तुत प्रश्न आहे तो, भविष्यातल्या हुकूमशाहीच्या धोक्याविषयी सर्वसामान्य जनतेला सजग करण्यात आणीबाणीच्या अनुभवानं काही भूमिका बजावली आहे का? किंवा तिच्या वार्षिक साजरीकरणात ती बजावण्याची क्षमता दिसली आहे का?

इंदिराजींच्या १९ महिन्यांच्या कारकीर्दीत त्यांना व त्यांच्या नावे पक्षाला झालेल्या मतदानाच्या आधारे, मतदारांच्या मनावरील आणीबाणीच्या अनुभवाच्या ठशाचा अंदाज घ्यायचा तर काय जाणवतं?

इंदिराजींच्या नेतृत्वात देशभरातील सर्वसामान्यांनी आणि त्यातही समाजातील दुर्बळ, अल्पसंख्य घटकांनी सामान्यपणे आश्वासकतेचा अनुभव घेतला. त्यांची एकाधिकारवादी निर्णयपध्दती कणखर, निर्णायक कार्यपध्दती म्हणून लोकांच्या मनावर ठसली आणि पसंतीची पावती मिळवून गेली. म्हणूनच आणीबाणीविषयीची नापसंती १९७७च्या निवडणुकीत व्यक्त करून झाल्यानंतर, १९८० मध्ये पुन्हा त्यांच्यावरच लोकांनी विश्वास दाखवला. आणीबाणीतला पोलिसी आणि प्रशासकीय अतिरेक लोकांच्या मनाला ज्या प्रमाणात भिडला, त्याप्रमाणात घटनात्मक दुरुपयोगाचं गांभीर्य पोचलं नाही. असा टोकाचा, जनतेला गृहीत धरणारा अतिरेक हा इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचा 'स्वभाव' मानायला लोकांनी नकार दिला. आणीबाणीतला अतिरेक हा इंदिराजींच्या कारकीर्दीतला अस्वीकारार्ह असा, पण तात्कालीक अपवाद होता, असाच त्यांच्या मनाचा कौल राहिला. त्यामुळे पुढच्या काळात बुध्दिजीवींमधला मर्यादित वर्ग, विशेषतः माध्यमातला आणि राजकीय-सामाजिक चळवळींतले नेते-कार्यकर्ते तेवढे आणीबाणीच्या आठवणी जागवण्यातलं 'थ्रिल' अनुभवताना आढळले! सामान्य मतदारासाठी ते 'थ्रिल' १९७७च्या मतदानात बजावलेल्या कर्तव्यानंतरच बहुधा संपलं होतं!

भारतातील घटनात्मक लोकशाहीपुढचा सर्वात गंभीर धोका म्हणून ज्या आणीबाणीचं रास्तपणे वर्णन होऊ शकतं, तो इतक्या सहजपणे मोडीत काढण्याचा सामान्य भारतीय मतदारांतला आत्मविश्वास कौतुकास्पदच आहे, पण भरवशाचाही आहे का?

याचं उत्तर माहीत नाही.

. . . . . . . . . . . . . . . . . . . .

**सतीश कामत**
kamats52@gmail.com

# आणीबाणीची कारणमीमांसा


**पी. एन. धर**

राष्ट्रपती राजवटीत गुजरातमधील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती चांगली सुधारली होती. पण ७ एप्रिलपासून बेमुदत उपोषणास आपण बसणार, असे मोरारजी देसाई यांनी जाहीर केले व गुजरातमध्ये वातावरण पुन्हा तापले. आपले लोकप्रतिनिधी निवडण्याचा हक्क जनतेला परत द्यावा याकरिता हे उपोषण होते. अशाच पद्धतीने विधानसभा बरखास्त करण्यास भाग पाडलेले होते. सरकारने सप्टेंबरमध्ये निवडणुका घेण्याचे ठरवले होते. पण देसाईंना त्या मेअखेर वा त्यापूर्वी हव्या होत्या. जयप्रकाश यांनी मोरारजी देसाई यांना जोरदार पाठिंबा दिला. 'सप्टेंबरमध्ये निवडणुका घेण्याचे सरकारचे आश्वासन म्हणजे हुशारीने ठरवलेला राजकीय बलात्कारच आहे,' असे जयप्रकाश म्हणाले.

सरकारने परत शरणागती पत्करली व देसाई यांचा जीव वाचवण्यासाठी भर उन्हाळ्यात म्हणजे १० जून १९७५ रोजी निवडणुका घेण्याचे जाहीर केले. देसाई यांनी उपोषण सोडले व जाहीर केल्याप्रमाणे १० जून रोजी निवडणुका घेण्यात आल्या. निवडणुकांचा निकाल १२ जून रोजी लागला. संघटना काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल व समाजवादी पक्ष या चार पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलल्या व देसाई नेते असलेल्या जनमोर्च्याने निवडणुकी जिंकल्या. या निकालामुळे पंतप्रधानांच्या राजकीय स्थानाला मोठा झटका बसला. कारण आपल्या पक्षासाठी त्यांनी राज्यात जोरदार प्रचार केला होता. त्याहून वाईट म्हणजे त्यांच्या नैतिक अधिकाराला त्याच दिवशी सकाळी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जगमोहन सिन्हा यांनी मोठा धक्का दिला. निवडणुकींत गैरप्रकार केले म्हणून न्यायमूर्तींनी पंतप्रधानांची लोकसभेवर झालेली निवड रद्द ठरवली होती. चार वर्षांपूर्वी राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांच्या निवडणुकांना आव्हान देणारा अर्ज केला होता. त्यावर न्यायमूर्तींनी हा निकाल दिला होता. १२ जून हा विरोधी पक्षांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आणि आनंदमय दिवस ठरला. खास करून जयप्रकाश नारायण यांच्यासाठी. कारण देशातील सर्व चुकांना त्यांच्या मते इंदिरा गांधी जबाबदार होत्या.

खूप प्रयत्न करूनही विरोधी पक्षांना जमले नव्हते ते न्या. सिन्हा यांनी त्यांच्यासाठी करून टाकले होते. इंदिरा गांधींच्या दृष्टीने त्यांच्या राजकीय जीवनातील हा सर्वांत जबर धक्का होता. भारताच्या राजकीय संघर्षातील दोन महत्त्वाच्या व्यक्ती इंदिरा गांधी व जयप्रकाश नारायण यांच्या कसोटीचा तो क्षण होता. न्यायालयीन निकालात ही दोघे कसा प्रतिसाद देतात ही कसोटी होती. भारतीय लोकशाही व कायद्याचे राज्य या दृष्टीनेही तो निर्णायकी क्षण होता. विरोधी पक्षांच्या दृष्टीने हा निकाल म्हणजे एका मोहिमेची परिपूर्ती होती. न्यायमूर्ती सिन्हा हे रातोरात त्यांचे हीरो बनले. ते सालोमन आहेत, अशी प्रशंसा करण्यात येऊ लागली. इंदिरा गांधी यांना सर्वोच्च न्यायालयात अपील करता यावे म्हणून निकालाची अंमलबजावणी २० दिवसांसाठी स्थगित करण्यात आली आहे, या निकालातील भागाकडे विरोधकांनी लक्षही दिले नाही.

विरोधकांना थांबायला वेळ नव्हता. इंदिरा गांधी यांना राजीनामा देण्यास भाग पाडावे म्हणून विरोधी पक्षांनी उघड व गुप्त मोहीम सुरू केली. जनसंघ, भारतीय लोकदल, संयुक्त समाजवादी पक्ष, संघटना काँग्रेस यांच्या कार्यकारिणी व अकाली दलाचे नेते यांनी एकत्र येऊन कृती कार्यक्रम ठरविण्यासाठी दहा सदस्यांची राष्ट्रीय कार्यक्रम समिती स्थापन केली. जनसंघाचे नानाजी देशमुख यांनी कार्यक्रमाचा मसुदा तयार केला. दिल्लीतील विविध भागांत विद्यार्थी व युवक यांच्या मिरवणुकी व निदर्शने आयोजित करणे,




**अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जगमोहन सिन्हा यांनी पंतप्रधानांची लोकसभेवर झालेली निवड रद्द ठरवली होती. १२ जून हा विरोधी पक्षांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आणि आनंदमय दिवस ठरला. खास करून जयप्रकाश नारायण यांच्यासाठी. कारण देशातील सर्व चुकांना त्यांच्या मते इंदिरा गांधी जबाबदार होत्या. खूप प्रयत्न करूनही विरोधी पक्षांना जमले नव्हते ते न्या. सिन्हा यांनी त्यांच्यासाठी करून टाकले होते. इंदिरा गांधींच्या दृष्टीने त्यांच्या राजकीय जीवनातील हा सर्वांत जबर धक्का होता. भारतीय लोकशाही व कायद्याचे राज्य या दृष्टीनेही तो निर्णायकी क्षण होता. विरोधी पक्षांच्या दृष्टीने हा निकाल म्हणजे एका मोहिमेची परिपूर्ती होती. न्यायमूर्ती सिन्हा हे रातोरात त्यांचे हीरो बनले.**

टोकाची भूमिका इंदिरा गांधींनी कशामुळे घेतली? रामलीला मैदानावरील भाषणात जयप्रकाश यांनी जे आव्हान दिले, ते त्यांनी स्वीकारायला हवे होते काय, या प्रश्नांची उत्तरे सोपी नाहीत. जयप्रकाशांपेक्षा इंदिरा गांधींचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होता. जयप्रकाश यांच्या दृष्टीने देशात जे काही घडत होते ते मध्ययुगीन नैतिक नाटकासारखे होते. एका कठीण देशाच्या कारभारापेक्षा क्रांतीचा जप ते करीत होते. दुसऱ्या बाजूला इंदिरा गांधींच्या दृष्टीने परिस्थिती त्यांना क्लेश देणारी होती. केवळ त्यांचे राजकीय भवितव्य पणाला लागलेले नव्हते, तर त्यांच्या पक्षात अंतर्गत कलह व फुटीरता यामुळे प्रचंड ताण निर्माण झाला होता. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या देशाच्या पंतप्रधान होत्या व आपण राजीनामा दिल्यावर देशाच्या कारभारावर काय परिणाम होईल याचा विचार त्यांना करायला हवा होता.

पंतप्रधानांना पाठिंबा देणारे उद्योगपती व व्यापारी यांना घेराव घालणे, गिरण्या व कारखाने यांच्या प्रवेशद्वारी सभा घेणे, दुपारच्या भोजनाच्या सुटीत केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या सभा घेणे, समाजातील शिक्षक, डॉक्टर्स, वकील, विद्यार्थी, झोपडपट्टीवासी आदी वर्गांची पंतप्रधानांच्या निवासस्थानी निदर्शने आयोजिणे, रात्री थाळ्या वाजविणे अशा सूचनांचा मसुद्यात समावेश होता.

जयप्रकाश नारायण यांनी या तयारीत भाग घेतला एवढेच नव्हे, तर नागरी असहकार विविध मार्गांनी व्यक्त करता येईल, असे जनमोर्च्याच्या वतीने रामलीला मैदानात आयोजिलेल्या सभेत सांगितले. सभेच्या अध्यक्षस्थानी मोरारजी देसाई होते. 'या मंडळींनी ऐकले नाही तर सरकारला बेदखल करायची पाळी येईल; त्यांना राज्य करण्याचा कायदेशीर, घटनात्मक व नैतिक अधिकार नाही. त्यामुळे आपण त्यांना बेदखल करू. आपण त्यांना सहकार्य करणार नाही, करापोटी एक पैसाही देणार नाही. तुम्हाला जर काही आदेश चुकीचे वाटले तर त्यांचे पालन करू नका.' असे आवाहन जयप्रकाश यांनी याच भाषणात सैनिकांना व सरकारी नोकरांना केले. 'याबद्दल माझ्यावर देशद्रोहाचा आरोप लावून दाखवाच' असे आव्हानही सरकारला त्यांनी दिले. या प्रक्षोभक भाषणानंतर मोरारजी देसाई यांनी कृती समितीने आखलेल्या आंदोलनाच्या कार्यक्रमाला 'तुम्ही सहमत आहात ना?' असे श्रोत्यांना विचारून सहमती मिळवली. हे सारे २५ जूनला संध्याकाळी घडले. दुसऱ्या दिवशी सकाळी इंदिरा गांधी यांनी विरोधकांच्या कारवायांवरील आपली प्रतिक्रिया आकाशवाणीवरून जाहीर केली.

राष्ट्रीय आणीबाणीची ती घोषणा होती.

अशी टोकाची भूमिका इंदिरा गांधींनी कशामुळे घेतली? रामलीला मैदानावरील भाषणात जयप्रकाश यांनी जे आव्हान दिले, ते त्यांनी स्वीकारायला हवे होते काय, या प्रश्नांची उत्तरे सोपी नाहीत. जयप्रकाशांपेक्षा इंदिरा गांधींचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होता. जयप्रकाश यांच्या दृष्टीने देशात जे काही घडत होते ते मध्ययुगीन नैतिक नाटकासारखे होते. एका कठीण देशाच्या कारभारापेक्षा क्रांतीचा जप ते करीत होते. दुसऱ्या बाजूला इंदिरा गांधींच्या दृष्टीने परिस्थिती त्यांना क्लेश देणारी होती. केवळ त्यांचे राजकीय भवितव्य पणाला लागलेले नव्हते, तर त्यांच्या पक्षात अंतर्गत कलह व फुटीरता यामुळे प्रचंड ताण निर्माण झाला होता. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या देशाच्या पंतप्रधान होत्या व आपण राजीनामा दिल्यावर देशाच्या कारभारावर काय परिणाम होईल याचा विचार त्यांना करायला हवा होता. त्यांच्या मनात अशा प्रकारे वैयक्तिक व सार्वजनिक चिंता यांचा कालवा झाला होता. ही गुंतागुंत सोडविणे सोपे नव्हते.

पहिली बाब त्यांच्या वैयक्तिक हिताची. सर्वोच्च न्यायालयाने अपिलावर निर्णय देण्याच्या आधीच आपण जर राजीनामा दिला तर जनमताच्या काही भागावर आपली छाप पडेल व सर्वोच्च न्यायालयाने जर अनुकूल निर्णय दिला तर आपण बहुधा सत्तेवर परतही येऊ, याची त्यांना जाणीव होती. जर विरोधी पक्षीयांनी– विशेषतः जयप्रकाश यांनी– निर्णयाची जबाबदारी सर्वस्वी त्यांच्यावर सोडली तर त्यांनी राजीनामा देणे अशक्य नव्हते. परंतु विरोधकांना परिस्थितीचा फायदा उठवायचा होता. आपले नव्याने प्राप्त झालेले सामर्थ्य त्यांना दाखवायचे होते आणि आपण पंतप्रधानांना राजीनामा द्यायला भाग पाडले, हे दाखवून द्यायचे होते. इंदिरा गांधींना अपील करायचा अधिकार न्यायालयाने दिलेला होता. पण त्यांनी अपील करण्याआधीच संघटना काँग्रेस, जनसंघ, भाक्रांद, समाजवादी व अकाली दल या विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या एका शिष्ट–मंडळाने राष्ट्रपतींची भेट घेतली व त्यांना एक निवेदन सादर केले. न्यायालयाचा स्पष्ट निर्णय असूनही इंदिरा गांधी आपल्या पदावर राहिल्याने गंभीर घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला आहे, असे या निवेदनात म्हटले होते आणि इंदिरा गांधींच्या राजीनाम्याची मागणी केली होती. जाहीर भाषणात इंदिरा गांधी या अत्यंत दुष्ट आहेत, असे चित्र हे नेते रंगवीत होते. या व्यक्तिगत हल्ल्यामुळे इंदिरा गांधींमधील लढवय्या वृत्ती उफाळून आली आणि स्वतःचे समर्थन करण्याचा त्यांचा निर्धार पक्का झाला.

पक्षामध्ये चालू असलेल्या घडामोडींचीही त्यांना काळजी वाटत होती. काँग्रेस संसदीय पक्षाने त्यांच्यावर संपूर्ण विश्वास व्यक्त केला असला तरी आपल्या हंगामी वारसदाराच्या

दृष्टिकोनाबद्दल त्यांना खात्री वाटत नव्हती. तो तिला परत येऊ देईल काय? त्यांना परत येण्यापासून रोखण्यासाठी संजयच्या काही भानगडी ती उकरून काढील काय? अशा प्रकारची त्यांना व्यक्तिगत काळजी वाटत होती.

आपण तात्पुरता राजीनामा दिला तरी पक्षात फूट पडेल, अशी त्यांना खात्री होती. विरोधी पक्ष सत्तेवर आला तर काय होईल या कल्पनेचेही त्यांना भय वाटत होते. कारण देशाच्या दृष्टीने ते हानिकारक होईल, असे त्यांचे मत होते. या सर्व गोष्टींनी त्या व्यथित होत्या.

इंदिरा गांधी यांनी राजीनामा दिला तर आपल्या हातची सत्ता जाईल, अशी ज्यांना भीती होती त्यांनी इंदिरा गांधींच्या घरासमोर पाठिंबा दर्शविणारी निदर्शने आयोजित केली. या मोहिमेत संजय गांधी व त्यांचे समर्थक आघाडीवर होते. उजव्या प्रतिगाम्यांविरुद्ध ठामपणे उभ्या राहा व राजीनामा देऊ नका असा सल्ला 'आयडियालॉग्ज'नी दिला. न्यायमूर्तींनी इंदिरा गांधींचे निवडणूक एजंट बसलेल्या यशपाल कपूर यांच्या राजीनाम्याच्या तारखेला एवढे महत्त्व का दिले, हे त्यांना समजेना. राजीनाम्याच्या तारखेनंतर त्यांनी वेतन घेतलेले नव्हते. न्या. सिन्हा यांच्यावर प्रचंड दडपण असून ते तुम्हास प्रतिकूल असा निकाल देणार आहेत, असे इंदिरा गांधी यांना एक पंधरवडा आधी सांगण्यात आले होते. 'रॉ'चे प्रमुख आर.एन. काव यांच्याकडे त्याबाबत उल्लेख करण्यापलीकडे इंदिरा गांधी यांनी काही केले नाही. असा काटेकोर निवडणूक कायदा करण्याची चूक आता देशाला भोवते आहे, असेही काही महाभाग म्हणाले.

या गदारोळात इंदिरा गांधी स्वतःच्या कोशात गेल्या. आपल्या जीवनातील सर्वोच्च राजकीय पेचप्रसंगाच्या वेळी आपला धाकटा मुलगा संजय सोडून त्यांचा कोणावरही विश्वास नव्हता. त्याच्या मारुती मोटार प्रकल्पाला विरोध करणारे व त्याला गांभीर्याने न घेणारे इंदिरा गांधींचे सहकारी व मदतनीस त्याला आवडत नसत. ही मंडळी आपल्या आईला राजीनामा देण्याचा सल्ला देणार हा त्याचा अंदाज बरोबर होता. आपली आई संरक्षण द्यायला अवतीभवती नसेल तर आपण गंभीर अडचणीत सापडू याची त्याला जाणीव होती. आपल्या बालपणातील असुरक्षिततेची भरपाई आपल्या मुलांची जास्त काळजी घेऊन इंदिरा गांधी यांनी केली. संजयच्या उणिवांकडे त्यांनी कानाडोळा केला. आपला निर्णय घेण्यात त्यांच्यापुढे संजयचे भवितव्य हा घटक होता.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांच्या न्यायालयात अलाहाबाद न्यायालयाच्या निकालाविरुद्ध निर्विवाद मनाई हुकूम मिळावा म्हणून इंदिरा गांधींनी अपील केले होते. पण अय्यर यांनी सशर्त मनाई दिली. त्यानुसार पंतप्रधान म्हणून काम करण्याची त्यांना मुभा होती, पण त्यांना लोकसभेचा मतदानाचा हक्क असलेला सदस्य म्हणून काम करता येणार नव्हते. हा निर्णायक क्षण होता. अय्यर यांच्या आदेशामुळे आपला अधिकार कमी झाला, असे इंदिरा गांधींना वाटले. दरम्यान विरोधी पक्षांनी देशव्यापी सत्याग्रहाचा आपला बेत जाहीर केला व इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लागू करण्याचा आपला तातडीचा बेत अमलात आणला.

जेव्हा तो निर्णायक क्षण आला तेव्हा जयप्रकाश यांनी कायद्याला त्याचा मार्ग अनुसरू दिला नाही. त्यांना इंदिरा गांधींच्या हेतूबाबत संशय होता, की त्यांचा लोकशाही प्रक्रियेवर विश्वास नव्हता, की भारतीय जनतेचा राजकीय मसीहा बनण्याची आपली महत्त्वाकांक्षा त्यांना पुरी करायची होती हा मुद्दा अलग आहे. त्याचप्रमाणे इंदिरा गांधी यांनी विरोधक आणि आपल्या पक्षातील बंडखोर यांना विधायक कार्यात गुंतवण्याऐवजी किंवा राजकीय पातळीवर त्यांच्याशी संघर्ष करण्याऐवजी दडपशाहीच्या उपायांवर अधिक विश्वास दाखवला. स्वतःच्या हातातील सत्ता जाईल म्हणून की देशाला सुरळीत मार्गावर आणण्यासाठी 'शॉक' देण्याच्या हेतूने त्यांनी आणीबाणी आणली, हा मुद्दा तेथे महत्त्वाचा नाही. देशाच्या राजकारणाचे ज्या दोघांत ध्रुवीकरण झाले होते ते –इंदिरा गांधी व जयप्रकाश– हे दोन्ही नेते लोकशाहीला चांगले नाहीत व कायद्याच्या राज्यावरील निष्ठेचा त्यांनी विश्वासघात केला.


. . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**पी.एन. धर**

(सौजन्य : 'इंदिरा गांधी, आणीबाणी आणि भारतीय लोकशाही'; अनुवाद : अशोक जैन, रोहन प्रकाशन, २००३.)



**स्वतःच्या हातातील सत्ता जाईल म्हणून की देशाला सुरळीत मार्गावर आणण्यासाठी 'शॉक' देण्याच्या हेतूने त्यांनी आणीबाणी आणली, हा मुद्दा तेथे महत्त्वाचा नाही. देशाच्या राजकारणाचे ज्या दोघांत ध्रुवीकरण झाले होते ते –इंदिरा गांधी व जयप्रकाश– हे दोन्ही नेते लोकशाहीला चांगले नाहीत व कायद्याच्या राज्यावरील निष्ठेचा त्यांनी विश्वासघात केला.**




# वाघाच्या पाठीवर!

**पुपुल जयकर**

**झुल्फिकार अली भुत्तो यांनी पाकिस्तानमध्ये निवडणुका घेण्याचं ठरवलं आणि त्यामुळे इंदिरेच्या मनात विचारचक्र सुरू झालं. पाकिस्तान लोकशाही देश बनत असताना भारताची हुकूमशाही राष्ट्र अशी प्रतिमा राहणं कितपत इष्ट, असा प्रश्न तिला पडला. तिची उपजत संवेदनशीलता जागी झाली. देशात सारं काही आलबेल नाही, हे तिला कळू लागलं. लोकांमध्ये वाढता असंतोष आहे, वातावरण जुलमी आहे, याचं तिला भान आलं. ती लोकांचं म्हणणं ऐकू लागली. आपल्या सल्लागारांबद्दल तिला संशय वाटू लागला. तिनं जे. कृष्णमूर्ती यांना भेटावं, त्यांचा सल्ला घ्यावा, असं मी सुचवलं.**

ब्रिटनमध्ये भारताचे उच्चायुक्त असलेले बी.के. नेहरू यांनी ब्रिटिश जनता व पाश्चिमात्य जगावर झालेल्या आणीबाणीच्या परिणामाबद्दल इंदिरेला रोखठोक ऐकवलं. आशियात आजूबाजूच्या देशांत हुकूमशाही असल्यानं लोकशाहीचा दीपस्तंभ म्हणून भारताकडे पाहिलं जायचं. भारताची ही प्रतिमा डागाळली गेली होती. तेव्हा आणीबाणी उठवून पुन्हा लोकशाही प्रस्थापित करावी, अशी विनवणी बी.के. नेहरू यांनी इंदिरेस केली. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व इंदिरेचे मुख्य सचिव पी.एन. धर यांनीही बी.के. नेहरूंच्या आणीबाणी उठवण्याच्या मागणीला पाठिंबा दिला आणि निवडणुका घ्याव्यात असं सुचवलं. त्यांच्या आदेशावरून 'इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिसी रिसर्च'नं एक अहवालही तयार केला. निवडणुका घेतल्या तर इंदिरेला सहज बहुमत मिळेल, असं या अहवालात म्हटलं होतं. तिनं दोघांचीही मतं ऐकून घेतली खरी, पण त्यावर काही कारवाई मात्र केली नाही.

झुल्फिकार अली भुत्तो यांनी पाकिस्तानमध्ये निवडणुका घेण्याचं ठरवलं आणि त्यामुळे इंदिरेच्या मनात विचारचक्र सुरू झालं. पाकिस्तान लोकशाही देश बनत असताना भारताची हुकूमशाही राष्ट्र अशी प्रतिमा राहणं कितपत इष्ट, असा प्रश्न तिला पडला. इंदिरेच्या आमंत्रणावरून मायकेल फूट व जेनी ली यांनी भारताला भेट दिली. जयप्रकाश नारायण यांनी लष्कराला आदेश न पाळण्याचं जे आवाहन केलं ते त्या दोघांना पसंत नव्हतं; परंतु या दोघांशी असलेल्या आपल्या मैत्रीत अंतराय निर्माण झाला आहे, असं इंदिरेला जाणवलं. आपण पूर्ण एकाकी पडलो आहोत, अशी तिची भावना झाली. विश्वास टाकावा असं तिला कोणीही नव्हतं. आनंदमयी मा यांची तिनं भेट घेतली, तेव्हा तर तिला रडूच कोसळलं.

आपल्यावरील टीकाकारांचा समाचार घेताना ती कडक, निष्ठुर असली तरी तिच्या भोवतालचं दूषित वातावरण विरघळू लागलं. तिची उपजत संवेदनशीलता जागी झाली. देशात सारं काही आलबेल नाही, हे तिला कळू लागलं. लोकांमध्ये वाढता असंतोष आहे, वातावरण जुलमी आहे, याचं तिला भान आलं. ती लोकांचं म्हणणं ऐकू लागली. आपल्या सल्लागारांबद्दल तिला संशय वाटू लागला.

भारतातील व परदेशातील मित्रांचे आवाज तिच्या कानात घुमू लागले. 'इंदू अशी वागेल अशी आमची अपेक्षा नव्हती.' हे त्यांचं वाक्य तिला सतत बोचू लागलं. दडपशाहीच्या उपायांचं समर्थन करणं तिला जड जाऊ लागलं. 'परोपकारी हुकूमशहा' म्हणून आपली केली जाणारी संभावना तिला खुपू लागली.

तिनं जे. कृष्णमूर्ती यांना भेटावं, त्यांचा सल्ला घ्यावा, असं मी सुचवलं. त्यांना ती अनेक वर्षं ओळखत होती आणि माझ्या घरी त्यांना ती भेटलीही होती. अंतर्ज्ञानावर आधारित असलेल्या त्यांच्या शिकवणीनं, त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वानं ती आकर्षित झालेली होती. अनेकदा त्यांच्याबद्दल तिनं माझ्याशी चर्चाही केली होती; परंतु त्यांना एकट्यानंच भेटून दीर्घ संवाद करण्यास ती संकोचत होती. १९७५च्या हिवाळ्यात जे. कृष्णमूर्ती भारतात आले नव्हते. आणीबाणीबद्दल त्यांना प्रचंड दुःख झालं होतं. भारतात एकाधिकारशाही लागू करायला नको होती, असं त्यांचं मत होतं. कृष्णमूर्तींनी देशात काय घडतंय हे जाणून

घेण्यासाठी मला १९७६ मध्ये पत्र पाठवलं होतं. भारतात आता हुकूमशाहीच राहणार आणि अन्य आशियाई देशांप्रमाणं तेही एकाधिकारवादी राष्ट्र बनणार, असं त्यांचे परदेशातील मित्र गृहित धरून चालले होते. कोणताही हुकूमशहा प्रतिक्रांती झाल्याशिवाय आपल्या हातची सत्ता सोडत नसतो, असं त्यांना सांगण्यात आलं होतं. मला पाठविलेल्या पत्रात यासंबंधी त्यांनी प्रश्नच प्रश्न विचारले होते. त्यांची सारी शिकवण ही स्वातंत्र्य व त्यातून उद्भवणारी कृती, मनाची मुक्ती यासंबंधी होती. ''सध्याच्या वातावरणात मला माझे विचार मांडू दिले जातील काय?'' असं कृष्णमूर्तींनी मला विचारलं होतं. मी त्यांचं मनोगत इंदिरेला सांगितलं आणि त्यांना भाषण करायचं स्वातंत्र्य मिळेल की नाही, अशी विचारणा केली. ती म्हणाली, ''त्यांचं स्वागतच होईल.''

भारताच्या प्राचीन इतिहासात, महाकाव्यांत पेचप्रसंगाच्या क्षणी नायक, सत्ताधीश हा संतपुरुषाशी संवाद साधतो, चर्चा करतो असे प्रसंग आहेत. इंदिरा गांधी व जे. कृष्णमूर्ती यांच्या भेटीची तुलना अशा भेटींशी करता येईल. कृष्णमूर्तींचं इंदिरेकडे काही मागणं नव्हतं किंवा तिला त्यांना काही द्यायचं नव्हतं. अर्थात अंतर्ज्ञानाची कवाडं खुली करणारं शब्दांचं देणं सोडून! स्वतःबद्दलच्या जाणिवेतून कृती उद्भवते. ती कृती त्या साधुपुरुषापासून स्वतंत्र असते.

कृष्णमूर्ती २४ ऑक्टोबर रोजी दिल्लीस आले. ते माझे पाहुणे होते. कृष्णाजींच्या भेटीसाठी मी इंदिरेला २७ ऑक्टोबरला घरी भोजनास आमंत्रित केलं. तिच्या आवडत्या जुन्या गुलाबी साडीत ती आली. भारतीय पंचांगानुसार आपला आज वाढदिवस आहे, असं तिनं काहीसं लाजतच कृष्णजींना सांगितलं. त्यांनी प्रेमानं तिचं अभिनंदन केलं. तिच्या अस्वस्थ मनातील प्रचंड भावनिक खळबळ त्यांना कळत होती. तिचा हात हातात घेऊन ते काही क्षण निःस्तब्ध बसून राहिले. ते म्हणाले, ''मॅडम, तुम्ही अत्यंत अस्वस्थ आहात.'' ती दचकलीच. वर नजर करून आपल्याकडे पाहणाऱ्यांची तिला सवय होती, पण हा ऐंशी वर्षांचा, कृश प्रकृतीचा साधुपुरुष तर थेट तिच्या डोळ्यांत पाहत होता!

''होय, परिस्थिती फारच धोकादायक बनली आहे. मी काय करावं असं तुम्हाला वाटतं?'' असं तिनं विचारलं. गेल्या अठरा महिन्यांत देशात घडलेल्या घटनांची माहिती ती देऊ लागली. मध्येच कृष्णमूर्ती म्हणाले, ''मला ते समजायचं नाही.''

तिचा डावा डोळा सारखा लवू लागला. तेव्हा तो बरा करण्याची जे. कृष्णमूर्तींनी तयारी दर्शवली. माझ्या हातात बरं करण्याचं सामर्थ्य आहे असं आई बालपणी मला सांगत असे, असं ते म्हणाले. क्षणभर इंदिरा काही बोलली नाही आणि कृष्णमूर्तींनीही काही आग्रह धरला नाही. पण अचानकपणे ती म्हणाली, ''हं, तुम्ही कराल मला मदत?'' कृष्णजींनी आपले दोन्ही हात तिच्या डोळ्यांवर ठेवले. इंदिरा अत्यंत शांत झाली. ते दोघेही उठले, तेव्हा ''पुन्हा कधी भेटायचं?'' असं तिनं विचारलं.

''केव्हाही.'' त्यांनी उत्तर दिलं.

ते खोलीतून बाहेर आले, तेव्हा ९ वाजले होते. जेवायच्या वेळेस अच्युतराव पटवर्धन व जे. कृष्णमूर्ती यांच्या मध्ये इंदिरा बसली होती. ती अत्यंत चूप होती. जेवण उत्तम होतं, पण तिनं फारसं खाल्लं नाही. जेवण चालू असताना कृष्णजींनी तिला संभाषणात ओढलं नाही, तिच्याकडे पाहिलं नाही की तिच्याशी ते बोलले नाहीत. तिची त्या वेळची मनोवस्था पाहता तिला तसदी देणं बरं नाही, असं त्यांना वाटलं. वातावरणातला तणाव कमी व्हावा म्हणून ते एल. के. झा यांच्याशी गप्पा मारू लागले, हास्यविनोद करू लागले आणि इंदिराही त्यात सामील झाली. जेवण संपत आलं तोवर इंदिरेचा खिन्न मूड पार गायब झाला होता. तिनं दोन सोविएत अंतराळवीरांचा एक किस्सा सांगितला,



**भारताच्या प्राचीन इतिहासात, महाकाव्यांत पेचप्रसंगाच्या क्षणी नायक, सत्ताधीश हा संतपुरुषाशी संवाद साधतो, चर्चा करतो असे प्रसंग आहेत. इंदिरा गांधी व जे. कृष्णमूर्ती यांच्या भेटीची तुलना अशा भेटींशी करता येईल. कृष्णमूर्तींचं इंदिरेकडे काही मागणं नव्हतं किंवा तिला त्यांना काही द्यायचं नव्हतं. अर्थात अंतर्ज्ञानाची कवाडं खुली करणारं शब्दांचं देणं सोडून! स्वतःबद्दलच्या जाणिवेतून कृती उद्भवते. ती कृती त्या साधुपुरुषापासून स्वतंत्र असते. कृष्णमूर्ती २४ ऑक्टोबर रोजी दिल्लीस आले. ते माझे पाहुणे होते. कृष्णाजींच्या भेटीसाठी मी इंदिरेला २७ ऑक्टोबरला घरी भोजनास आमंत्रित केलं.**

''अंतराळ भ्रमण करून आल्यावर ते दोघे निकिता क्रुश्चेव्हना भेटायला गेले. त्यांना क्रुश्चेव्हनं बाजूला घेऊन विचारलं, 'तुम्ही जेव्हा आकाशात होतात तेव्हा तुम्हाला गूढ प्रकाश, चमत्कारिक गोष्टी दिसल्या काय? शुभ्र दाढी असलेली, गूढ, महान व प्रकाशाच्या वलयातील एखादी आकृती दिसली काय?' 'होय, दिसली' असं त्यांनी सांगितलं. त्यावर 'मला वाटलंच होतं' असं क्रुश्चेव्ह म्हणाले आणि हे आपल्यातच ठेवायचं बरं का, अगदी कोणालादेखील सांगायचं नाही, असं त्यांनी त्या दोघांना बजावलं. नंतर ते अंतराळवीर जगप्रवासाला गेले. या प्रवासात त्यांनी व्हॅटिकन इथं पोप यांची भेट घेतली. प्रार्थना वगैरे झाल्यावर पोपनी त्यांना बाजूला घेतलं नि विचारलं, ''लेकरांनो, जेव्हा तुम्ही वर अंतराळात होतात तेव्हा तुम्हाला प्रकाश दिसला का? तुम्हाला एक मोठी, शुभ्र दाढी असलेली आकृती दिसली काय?'' त्यावर त्या दोघांनी उत्तर दिलं, ''छे! आम्हाला प्रकाश दिसला नाही, की कोणी दाढीधारीही दिसला नाही.'' तेव्हा पोप म्हणाले, ''मला वाटलंच होतं! पण हे कोणालाही सांगायचं नाही बरं, शपथ आहे तुम्हाला!'' तो किस्सा ऐकून जेवणाच्या टेबलावर एकच हशा उसळला.

आम्ही एकटेच असताना जे. कृष्णमूर्तींनी इंदिरेशी झालेल्या भेटीबद्दल सांगितलं. ते खूप भारावून गेलेले दिसत होते. ते म्हणाले, ''इंदिरेमध्ये काहीतरी खूप चांगलं आहे; पण ती अत्यंत त्रासून गेलेली, अस्वस्थ दिसते.''

२८ ऑक्टोबर रोजी मला इंदिरेचं एक पत्र आलं. त्यात कृष्णमूर्तींना पुन्हा भेटण्याची इच्छा तिनं व्यक्त केली होती. त्या दिवशी ती खूप कामात होती. मंत्रिमंडळाची बैठक होती, लोकसभेची बैठक चालू होती. लोकसभेची मुदत एक वर्षानं वाढवायच्या प्रस्तावावर चर्चा चालू होती. मी तिचे खाजगी सचिव एन. के. शेषन यांना फोन करून भेटीची वेळ कळवण्यास सांगितलं. चौकशी करून सांगतो, असं त्यांनी उत्तर दिलं. पण अचानक इंदिराच ११ वाजता आली. तिच्याबरोबर सुरक्षा कर्मचारी नव्हते. आल्या आल्या ती कृष्णमूर्तींना भेटायला गेली. त्यांची चर्चा एक तासभर चालू होती. ती खोलीबाहेर आली, तेव्हा तिच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. माझी नातपुतणी आदिती बैठकीच्या खोलीत बसली होती. तिला पाहताच इंदिरेनं तात्काळ आपल्या भावना आवरल्या. आदितीकडे पाहून तिनं स्मित केलं आणि काय वाचतेस, अशी विचारणा केली. मी इंदिरेबरोबर तिला गाडीपर्यंत पोचवायला गेले. तोवर तिचे सुरक्षा अधिकारी आले होते आणि ते तिची वाट पाहत थांबले होते.

''इंदिरा अत्यंत अस्वस्थ असून, तिच्या भोवती खूप हिंसाचार चालू असावा असं मला वाटतं'' एवढंच जे. कृष्णमूर्तींनी इंदिरेशी झालेल्या भेटीबद्दल सांगितलं. कित्येक महिने कृष्णमूर्तींच्या अंतर्मनात इंदिरेबद्दल विचार चालू होता. ते तिच्याबद्दल, तिच्या जीवनातील आरंभीच्या काळाबद्दल मला सतत विचारीत असत. इंदिरेची ऐकून घेण्याची वृत्ती आणि आपल्या कृत्यांचं समर्थन करायला नकार देणं यामुळे ते प्रभावित झाले होते. ''काहीही प्रतिक्रिया व्यक्त न करता ऐकून घेण्याची क्षमता असलेली, मन खुलं ठेवणारी उच्चपदावरील तीच एकमेव व्यक्ती असावी. तिच्यात हिंमत आहे आणि स्वतःचा विनाश होऊ न देता ती संकटाशी मुकाबला करू शकेल,'' असं ते म्हणाले.

१९७६ मध्ये कृष्णमूर्तींबरोबर झालेल्या भेटीबद्दल ती म्हणाली, ''मी हुंदके देत राहिले आणि काही केल्या मला अश्रू आवरेचनात. कित्येक वर्षांत मला असं रडू आलं नव्हतं.'' दुसऱ्या भेटीत काय घडलं हेही तिनं मला सांगितलं. तिनं वर्षभरात घडलेल्या घटना कृष्णमूर्तींना कथन केल्या होत्या. ''मी वाघाच्या पाठीवर स्वार झाले आहे. वाघानं मला ठार केलं तरी त्याची मला फिकीर नाही; पण मला त्याच्या पाठीवरून उतरावं कसं हेच समजत नाही.'' असं तिनं कृष्णमूर्तींना सांगितलं. तिचं म्हणणं ते लक्षपूर्वक ऐकत होते. ''तू जर बुद्धिमान असशील आणि तुला भीती वाटत नसेल तर वाघाला कसं काबून ठेवायचं हे कळेल.'' असं ते म्हणाले. ''मी काय करू?'' असं तिनं विचारलं तेव्हा सल्ला द्यायला त्यांनी नकार दिला. पण तिनं स्वतःचं आयुष्य, सारे संघर्ष, सारं दुःख, आपल्यावर होणारे सर्व हल्ले, आपल्या कृती, आपल्या

**२८ ऑक्टोबर रोजी कृष्णमूर्तींना पुन्हा भेटण्याची इच्छा तिनं व्यक्त केली. त्या दिवशी ती खूप कामात होती. मंत्रिमंडळाची बैठक होती, लोकसभेची बैठक चालू होती. लोकसभेची मुदत एक वर्षानं वाढवायच्या प्रस्तावावर चर्चा चालू होती. पण अचानक इंदिराच ११ वाजता आली. तिच्याबरोबर सुरक्षा कर्मचारी नव्हते. आल्या आल्या ती कृष्णमूर्तींना भेटायला गेली. त्यांची चर्चा एक तासभर चालू होती. ती खोलीबाहेर आली, तेव्हा तिच्या गालांवरून अश्रू ओघळत होते. तिनं वर्षभरात घडलेल्या घटना कृष्णमूर्तींना कथन केल्या होत्या. ''मी वाघाच्या पाठीवर स्वार झाले आहे. वाघानं मला ठार केलं तरी त्याची मला फिकीर नाही; पण मला त्याच्या पाठीवरून उतरावं कसं हेच समजत नाही.'' असं तिनं कृष्णमूर्तींना सांगितलं. ''तू जर बुद्धिमान असशील आणि तुला भीती वाटत नसेल तर वाघाला कसं काबून ठेवायचं हे कळेल.''**

चुका यांचा साकल्यानं विचार करावा आणि मग हेतुरहित व परिणामांची पर्वा न करता कृती करावी, असं सुचवलं. ''परिणाम काय होईल हे फारसं महत्त्वाचं नाही, योग्य कृती महत्त्वाची.'' असं त्यांनी सांगितलं, तेव्हा तिनं विचारलं, ''कसं?'' तेव्हा ''असं विचारू नकोस, पाहत राहा व पाहताना विचाराला त्यात मध्ये घुसू देऊ नकोस'' असं ते म्हणाले. त्यानंतर ते काही काळ स्तब्ध बसून राहिले. ती जाण्यासाठी उठली तेव्हा ते म्हणाले, ''तू जर योग्य कृती केलीस, तर त्याचे परिणाम भोगावे लागतील याची जाणीव आहे का तुला? ते तुला नष्ट करण्याचा प्रयत्न करतील.'' करुणेच्या प्रवाहात चिंब भिजून आपण बाहेर पडतो आहोत, असं त्या वेळी तिला वाटलं.

आणीबाणी उठवावी आणि निवडणुका जाहीर कराव्यात– मग त्याचे परिणाम काहीही होवोत– असं इंदिरेला २८ ऑक्टोबरला वाटू लागलं. आपला पराभव होण्याच्या शक्यतेवरही तिनं विचार केला होता. भवितव्य अज्ञात होतं आणि पुढचे काही महिने अत्यंत कष्टमय ठरणार होते, परंतु तिला प्रायश्चित्त घ्यायचं होतं. त्याला पर्याय नव्हता. ऋण फेडायलाच हवं होतं.

अनेकदा निरागसता, करुणा व शांतता यांतून महान घटनांचा जन्म होत असतो. कृष्णमूर्तींबरोबर झालेल्या भेटींमुळे इंदिरेच्या जाणिवेत चैतन्याचे स्फुल्लिंग फुलले होते. त्या साधुपुरुषाचा आवाज खोलवर पोहोचला होता. ती स्वप्नं पाहू लागली– पुन्हा येऊ न शकणारी स्वप्नं– पण स्वतःच्या मनाच्या गाभाऱ्यात दुमदुमणाऱ्या वडिलांच्या प्रतिध्वनीनं ती जागी झाली. तिच्यात रेंगाळणाऱ्या त्यांच्या अस्तित्वानं तिला निर्णय घेण्यास प्रवृत्त केलं.

लोकसभेची मुदत एक वर्षानं वाढवण्यात आली होती, त्यामुळे निवडणुका १९७८च्या सुरुवातीला घ्याव्या लागणार होत्या. डिसेंबरच्या मध्याला गोहत्ती इथं काँग्रेसचं अधिवेशन भरलं, तेव्हा इंदिरेनं आपल्या मनातील विचार कळू दिले नाहीत.

मिसाखाली स्थानबद्ध केलेल्या पक्षनेत्यांना सोडून द्यावं आणि निवडणुकांची घोषणा करावी, असं इंदिरेनं 'रॉ'चे प्रमुख आर. एन. काव यांना सांगितलं. काव यांना आश्चर्य वाटलं. पण देशातील राजकीय स्थितीबाबत अहवाल तयार करून देतो असं ते म्हणाले. इंदिरेच्या निर्णयानं तिच्या कुटुंबियांना धक्काच बसला. संजयचा कडाडून विरोध होता. तसंच हरयाणाचे मुख्यमंत्री बन्सीलाल, आर. के. धवन व संजयच्या अन्य समर्थकांचाही निवडणुका घेण्यास विरोध होता. निवडणुका लवकर घेतल्यास काय घडेल याचा अंदाज घेण्यास इंदिरेनं गुप्तचर यंत्रणेला सांगितलं होतं. इंदिरा काँग्रेस पक्षाचा पराभव होईल असा अहवाल गुप्तचर यंत्रणेनं दिला होता, असं मेनका गांधींचं म्हणणं आहे. ताबडतोब निवडणूक घेण्यात धोका आहे, असं मत आर. एन. काव यांनी व्यक्त केलं.

परंतु ताबडतोब निवडणुका घ्यायच्या आपल्या निर्णयावर इंदिरा अडून बसली होती. संजय तिचं मन बदलण्याचा प्रयत्न करीत होता.

निवडणुका घेण्याचा आपला निर्णय इंदिरेनं १८ जानेवारी १९७७ रोजी जाहीर केला. १९ मार्च रोजी मतदान होणार होतं. निवडणुका घेण्याचा निर्णय तिनं ज्या दिवशी जाहीर केला त्याच दिवशी विरोधी पक्षनेत्यांची कारागृहातून सुटका केली. मिसाखाली स्थानबद्ध केलेल्यांनाही तिनं नंतर सोडून दिलं. आणीबाणीविषयक कायदे मात्र तिनं उठवले नाहीत. आणीबाणीची घोषणा विरोधकांना धक्का देणारी व आश्चर्यचकित करणारी होती, तर निवडणुकांची घोषणा व नेत्यांची तुरुंगातून सुटका बुचकळ्यात पाडणारी होती. इंदिरेच्या हेतूबाबत त्यांना कमालीचा संशय येत होता. ते घाबरले होते आणि हा कसला तरी सापळा आहे असं त्यांना वाटत होतं.

समाजवादी नेते गंगाशरण सिन्हा हे निवडणुकीची घोषणा झाली तेव्हा जयप्रकाश नारायणांच्या समवेत होते. त्यांचा त्यावर विश्वासच बसेना. नोव्हेंबरमध्ये लोकसभेची मुदत एक वर्षानं वाढवल्यामुळे अशा घोषणेवर विश्वास बसणं कठीणच होतं. जयप्रकाश म्हणाले, ''इंदिरेनं धैर्य दाखवलं. तिनं मोठं पाऊल उचललं आहे.''

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**पुपुल जयकर**

(सौजन्य : 'इंदिरा गांधी';
अनुवाद : अशोक जैन, राजहंस प्रकाशन, १९९३)

**आणीबाणी उठवावी आणि निवडणुका जाहीर कराव्यात– मग त्याचे परिणाम काहीही होवोत– असं इंदिरेला २८ ऑक्टोबरला वाटू लागलं. आपला पराभव होण्याच्या शक्यतेवरही तिनं विचार केला होता. भवितव्य अज्ञात होतं आणि पुढचे काही महिने अत्यंत कष्टमय ठरणार होते, परंतु तिला प्रायश्चित्त घ्यायचं होतं. त्याला पर्याय नव्हता. ऋण फेडायलाच हवं होतं. कृष्णमूर्तींबरोबर झालेल्या भेटींमुळे इंदिरेच्या जाणिवेत चैतन्याचे स्फुल्लिंग फुलले होते. त्या साधुपुरुषाचा आवाज खोलवर पोहोचला होता. ती स्वप्नं पाहू लागली– पुन्हा येऊ न शकणारी स्वप्नं– पण स्वतःच्या मनाच्या गाभाऱ्यात दुमदुमणाऱ्या वडिलांच्या प्रतिध्वनीनं ती जागी झाली. तिच्यात रेंगाळणाऱ्या त्यांच्या अस्तित्वानं तिला निर्णय घेण्यास प्रवृत्त केलं.**

**नैतिक काय? आणि अनैतिक काय? सैनिक म्हणून लढताना दुसऱ्याचा जीव घेणे, ही हिंसा नव्हे? आपला मार्ग निष्कंटक करण्यासाठी कैद्याचा बळी देणे समर्थनीय? जीव वाचविण्यासाठी रणभूमी सोडून अज्ञात स्थळी लपणे हा राष्ट्रद्रोह? युद्धाचे वैय्यर्थ समजल्यावर माघार घेणे किंवा सर्वनाशी आदेशाचे पालन न करणे हे बंड? अशा 'पळपुट्या' सैनिकांना शत्रूसैन्यापुढे शरणागती पत्करू देण्यासाठी मदत करणे ही कर्तव्यच्युती? गायिका बनण्याच्या महत्त्वाकांक्षेसाठी गेस्टापोच्या अधिकाऱ्याबरोबर संबंध ठेवणे क्षम्य? आपल्या ज्यू मित्राला वाचविण्यासाठी त्याच्याशी प्रतारणा करणे गैर नाही? परिचारिका असूनही आपल्या डॉक्टरला मृत्यूच्या दाढेत लोटणे अधर्म नव्हे? नाझींच्या तावडीतून सुटताना म्हाताऱ्या वडिलांना मागे सोडून देणे पाप नाही?**

# दुसरे महायुद्ध

गायीच्या मागे धावत असलेला कसाई आणि खोटे बोलून तिला वाचविणारा साधू यांची एक गोष्ट संस्कारक्षम वयात बहुतेकांनी ऐकलेली असते. जीव खाऊन धावत सुटलेली गाय जंगलात शिरते. साधूचे लक्ष तिच्याकडे जाते. पाठोपाठ हातात धारदार सुरा घेऊन आलेला कसाई पाहून परिस्थिती साधूच्या लक्षात येते. 'गाय पाहिली का? कुणीकडे गेली?' या कसायाच्या प्रश्नावर साधू मुद्दामच चुकीच्या दिशेने बोट दाखवतो. गाय वाचते. तात्पर्य, एखाद्या गायीचा जीव वाचवता येत असेल, तर खोटे बोलले तरी चालते.

आता गोवधबंदीसारख्या नाजूक आणि संवेदनशील विषयावर आसपासचे जंगल धगधगलेले असताना नातीला गोष्ट सांगतो, तेव्हा मी गायीऐवजी बोकड किंवा ससा वगैरे असा कालानुरूप बदल करतो. पण तात्पर्य सांगताना जीभ जरा कचरतेच.

पाप कोणते? आणि पुण्यकर्म कुठले?

उदरभरणासाठी प्राणी मारणे हे वाईट की कमी नैतिक? आणि



# तिसऱ्या नजरेतून

## आल्हाद गोडबोले

**‘अवर मदर्स, अवर फादर्स’ मालिका प्रश्नांची अशी भुतावळ उभी करते. दुसरे महायुद्ध संपून सत्तर वर्षे होत असताना हॉफमन इतिहासाच्या बाटलीचे बूच उघडतो आणि ‘पेंडोराच्या बॉक्स’मधून अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांची भेंडोळी बाहेर पडू लागतात. प्रत्येक भागानंतर सरासरी शहात्तर लाख जर्मन नागरिकांना विचार करायला लावलेली, उत्तरे शोधायला लावलेली अशी ही मालिका. दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासातील नैतिक-अनैतिकतेचे बुरखे फाडणारी ही मालिका साधू आणि कसाई यांच्या गोष्टीची आठवण करून देते.**

*****

खोटे बोलणे तुलनेने बरे की कमी अनैतिक?

नैतिक-अनैतिकतेच्या लहानपणच्या कल्पना उतारवयात काळ्याकुट्ट किंवा पांढऱ्याशुभ्र अशा एकाच रंगात रंगवता येईनाशा होतात. या गोष्टीचेही तेच होते. गाय वाचविण्यासाठी खोटे बोलणे साधूच्या दृष्टीने पुण्यकर्म असेल, पण कसायाच्या लेखी तेच पाप असणार.

समजा, कसायाला न्यायनिवाडा करायला सांगितले तर तो साधूचे कृत्य गुन्हाही ठरवेल. पण त्याला न्यायाधीश व्हायची संधी दिली तर!

दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड-अमेरिकादी दोस्त राष्ट्रांनी जर्मनीचा हुकुमशहा ॲडॉल्फ हिटलर याला कसाई ठरवून इतिहास लिहिला, युरोपचा नकाशा नव्याने आखला, जर्मनीचे आणि राजधानी बर्लिनचे तर जरासंधासारखे दोनच नव्हे, चार तुकडे करून डावीकडचा तुकडा उजवीकडे फेकला, ॲडॉल्फ नावाची घृणा पुढच्या चार पिढ्यांना वाटावी, असे चित्रपट काढले. ही यादी बरीच लांबवता येईल. याचा



**दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड-अमेरिकादी दोस्त राष्ट्रांनी जर्मनीचा हुकुमशहा ॲडॉल्फ हिटलर याला कसाई ठरवून इतिहास लिहिला, युरोपचा नकाशा नव्याने आखला, जर्मनीचे आणि राजधानी बर्लिनचे तर जरासंधासारखे दोनच नव्हे, चार तुकडे करून डावीकडचा तुकडा उजवीकडे फेकला, ॲडॉल्फ नावाची घृणा पुढच्या चार पिढ्यांना वाटावी, असे चित्रपट काढले. ही यादी बरीच लांबवता येईल. याचा अर्थ हिटलर साव होता, असे मुळीच नाही. तो कसाईच होता, पण दोस्त 'साधू' नक्कीच नव्हते.**

अर्थ हिटलर साव होता, असे मुळीच नाही. तो कसाईच होता, पण दोस्त 'साधू' नक्कीच नव्हते. गेल्या सत्तर वर्षांतील लिखाण, पुस्तके, चित्रपट, माहितीपट वगैरे सारा इतिहास वाचला / पाहिला तर लक्षात येते, खरे आणि खोटे हे काळ्या आणि पांढऱ्या अशा दोनच रंगात रंगविता येणार नाही. त्या दरम्यान धूसर इतिहास खूपच मोठा असावा आणि तो शोधून इतिहासाच्या धुरामागील चित्र स्पष्टपणाने चितारणे तितकेच कठीण असावे.

इतिहासकार असा प्रयत्न करतात, दावेही करतात. तरीसुद्धा लिहिला गेलेला किंवा सर्वज्ञात 'इतिहास' आणि 'प्रत्यक्षात घडलेले' या दोन्हींच्या दरम्यान खूपच दऱ्या आणि खाई असतात. त्या दिसत नाहीत. तिथपर्यंत वारंवार जाऊन त्यांचा शोध घ्यावा लागतो. त्या जेवढ्या बुजवल्या जातील, तेवढे इतिहासाचे चित्रण परिपूर्ण होऊ शकते. तोपर्यंत तो तुकड्या-तुकड्यांचाच राहतो. ग्रंथ, संशोधन, डॉक्युमेंटेशन आदींच्या रूपातील या तुकड्या-तुकड्यांच्या शक्य तेवढे मधोमध उभे राहून इतिहास वाचला तरच हे धूसर वलय बाजूला सारून त्यातल्यात्यात वास्तव किंवा सत्याच्या जवळ जाणारा भूतकाळ दिसू शकतो.

दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भात बोलायचे तर असा प्रामाणिक प्रयत्न गेल्या सत्तर वर्षांत किती झाला आणि कुणीकुणी केला?

*****




दुसरे महायुद्ध हा दहा-वीस वर्षांत पिसून टाकण्याएवढा लहान विषय नाही. त्यावर आजवर उदंड लिखाण झाले आहे, चित्रपट-माहितीपट निघाले आहेत, चर्चा झडल्या आहेत. तरीसुद्धा त्यावर अजूनही पुस्तके प्रसिद्ध होत आहेत, नवनवे संशोधन आणि तपशील बाहेर येत आहेत. अगदी ताजे उदाहरण म्हणजे, यंदाचे साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळालेली लेखिका स्वेतलाना अलेक्सिविच. अवघी पाच पुस्तके खात्यावर असलेल्या स्वेतलानाचा हा गौरव अनेकांना चकित करणारा आहे. त्यावर उलटसुलट चर्चाही सुरु झाली आहे. जन्माने युक्रेनियन, आता बेलारूसची नागरिक आणि मूळची रशियन पत्रकार - लेखिका असलेली, ६७ वर्षांची, स्वेतलाना हिचे लिखाण मुख्यतः सोव्हिएत युनियननंतरच्या रशियाचा 'इतिहास' नोंदविणारे आहे. अर्थात त्याला दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी आहेच, हे महत्त्वाचे.

इआन केर्शॉ पासून ॲन्टनी बीवर किंवा ॲना रीडपासून टिमोथी स्नायडर आणि वासिली ग्रॉसमनपासून ऑस्टिन ॲपपर्यंत अनेकांनी लिहिलेला दुसऱ्या महायुद्धाचा, त्यानंतरच्या युरोपचा, युरेशियाचा इतिहास आज उपलब्ध आहे.

जॉन कीगन, तसेच इआन केर्शॉ आणि ॲन्टनी बीवर हे तिघेही ब्रिटीश इतिहासकार. जर्मन इतिहासाचे भाष्यकार इआन केर्शॉ हिटलरच्या चरित्रांमुळे अधिक ओळखले जातात.

'स्टालिनग्राड' तसेच बर्लिन : 'द डाउनफॉल १९४५' या पुस्तकांमुळे प्रसिद्ध असलेले ॲन्टनी बीवर यांचे तीन वर्षांपूर्वी आलेले 'द सेकंड वर्ल्ड वॉर' रशियाने घातलेल्या बंदीमुळे सध्या चर्चेत आहे. सोव्हिएत युनियन कोसळल्यानंतर रशियाने जी युद्धविषयक कागदपत्रे खुली केली, त्यावर या पुस्तकामुळे बराच प्रकाश पडतो. मात्र रशियाने बीवर यांना 'नाझींचा सहानुभूतीदार' ठरविले आहे.

ॲना रीडची ग्रंथसंपदा मोजकीच आहे. पण तिच्या 'लेनिनग्राड : द एपिक सीज ऑफ वर्ल्ड वॉर टू, १९४१ -१९४४' या ग्रंथाने सेंट पीटर्सबर्ग (तत्कालीन लेनिनग्राड) नगराची विलक्षण कहाणी जगापुढे आणली. हिटलरच्या

सेनेचा वेढा असताना या शहराने केवळ उपासमारीमुळे सुमारे आठ लाख जीव गमावले, तरीही लेनिनग्राड पावणेतीन वर्षे नाझींच्या हाती कसे पडू दिले नाही, याची थरारक शौर्यगाथा तिने अनेक डायऱ्या आणि कागदपत्रांच्या मदतीने लिहिली आहे.

वासिली ग्रॉसमन (१९०५-१९६४) हा दुसऱ्या महायुद्धातील आघाडीवरील सोव्हिएत युनियनचा (ज्यू) पत्रकार होता. मात्र नंतर तो कट्टर स्टालिनद्वेष्टा झाला. 'लाईफ ॲन्ड फेट' ही त्यांची गाजलेली कलाकृती त्यांच्या निधनानंतर आणि सोव्हिएत युनियन नामशेष झाल्यावरच प्रसिद्ध होऊ शकली.

टिमोथी स्नायडर हा अमेरिकन इतिहासकार. 'ब्लडलॅन्डस' हा त्यांचा गाजलेला ग्रंथ. 'हॉलोकास्ट' म्हणजे छळछावण्यांपेक्षाही अधिक भीषण हत्या हिटलर आणि स्टालिन यांच्या कारकिर्दीत पोलंड, बेलारूस, बाल्टिक देश, युक्रेन या पूर्व युरोपियन प्रदेशात झाल्याचा इतिहास ते या ग्रंथात नोंदवतात.

याउलट, पराभूत राष्ट्रांना इतिहास नसतो, या तत्त्वानुसार पराभूत जर्मनीत गेल्या सत्तर वर्षांत त्या काळचा 'इतिहास' गाडण्याचेच प्रयत्न अधिक झाले. जर्मनांनीही इतिहासाचा उपसा करण्याचे शक्यतो टाळले. साहजिकच दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासाचे मूळचे जर्मन - आणि अर्थात त्याचे इंग्लिश 'व्हर्जन' - फारसे उपलब्ध नाही. अपवाद म्हणावा तर ऑस्टिन ॲप यांचा. अमेरिकेत राहून ते जर्मनीची बाजू ठामपणाने मांडत राहिले. मूळचे जर्मन, पण जन्माने अमेरिकन, दुसऱ्या महायुद्धात अमेरिकन लष्कराकडून सहभागी झालेले ऑस्टिन ॲप यांचे लिखाण अमेरिकेचा बुरखा फाडणारे आहे. 'हॉलोकास्ट' म्हणजे हिटलरच्या कथित 'ज्यू शिरकाणा'चा इतिहास अतिशयोक्त असल्याचा त्यांचा दावा आहे. उदंड असे त्यांचे लिखाण अमेरिकेत जतन केले गेले आहे, हे मात्र आवर्जून नमूद करायला हवे.

दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास असा अनेकांनी लिहिला आहे.

'व्हॉट इज हिस्टरी' या ग्रंथातून इतिहासाचे अर्थ सांगणारे ई एच. कार यांचे १९८२ मध्ये वयाच्या नव्वदाव्या वर्षी निधन झाले, तेव्हाही त्यांचे 'अ हिस्टरी ऑफ सोव्हिएत युनियन' प्रकल्पाचे लिखाण चालूच होते. तोपर्यंतचे १४ खंड प्रसिद्ध झालेले असूनही हा इतिहास संपलेला नव्हता! इतिहासाचा शोध असा अनंत असतो, म्हणूनच दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास अनेक इतिहासकार अजून लिहीतच आहेत आणि तरीही तो अपूर्णच राहणार आहे.

या यादीत आता स्वेतलाना अलेक्सिविच हिची भर पडली आहे.

स्वेतलाना हीसुद्धा जॉन कीगन, वासिली ग्रॉसमन आणि ॲना रीडप्रमाणेच पत्रकार आहे. तिची शैली पत्रकारितेला साजेशी, एखाद्या विषयात तळापर्यंत शोध घेण्याची आहे. तरीसुद्धा तिचे लिखाण नोबेल देण्याएवढे वेगळे, लक्षणीय का वाटावे, हा वेगळा चर्चेचा (आणि वादाचाही) विषय आहे. तो तूर्त बाजूला ठेवू.

मुद्दा हा की, युद्धाचे हे भूत जर्मनीच्या, युरोपच्या, रशियाच्या आणि अमेरिकेसह जगाच्या पाठीवरून उतरायला अजून तयार नाही. 'अवर मदर्स, अवर फादर्स' ही जर्मन मालिका किंवा 'जनरेशन वॉर' हे तिचे अमेरिकन चित्रपट-रुपांतर या सगळ्या वावटळीत अधिक लक्षवेधी ठरते.

*****

निर्माता निको हॉफमन आणि दिग्दर्शक फिलिप काडल्बाक यांनी 'अवर मदर्स, अवर फादर्स' नावाची मालिका जर्मन दूरचित्रवाणीवर

**इतिहासाचा शोध असा अनंत असतो, म्हणूनच दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास अनेक इतिहासकार अजून लिहीतच आहेत आणि तरीही तो अपूर्णच राहणार आहे. या यादीत आता स्वेतलाना अलेक्सिविच हिची भर पडली आहे. युद्धाचे हे भूत जर्मनीच्या, युरोपच्या, रशियाच्या आणि अमेरिकेसह जगाच्या पाठीवरून उतरायला अजून तयार नाही. 'अवर मदर्स, अवर फादर्स' ही जर्मन मालिका किंवा 'जनरेशन वॉर' हे तिचे अमेरिकन चित्रपट-रुपांतर या सगळ्या वावटळीत अधिक लक्षवेधी ठरते.**



सादर केल्यावर जर्मनीत त्यावर चर्चा झालीच. पण त्यापेक्षा अमेरिकेला त्याची अधिक गंभीरपणे दखल घ्यावी लागली.

दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासातील नैतिक-अनैतिकतेचे बुरखे फाडणारी ही मालिका साधू आणि कसाई यांच्या गोष्टीची आठवण करून देते.

नैतिक काय? आणि अनैतिक काय?

सैनिक म्हणून लढताना दुसऱ्याचा जीव घेणे, ही हिंसा नव्हे? आपला मार्ग निष्कंटक करण्यासाठी कैद्याचा बळी देणे समर्थनीय? जीव वाचविण्यासाठी रणभूमी सोडून अज्ञात स्थळी लपणे हा राष्ट्रद्रोह? युद्धाचे वैय्यर्थ समजल्यावर माघार घेणे किंवा सर्वनाशी आदेशाचे पालन न करणे हे बंड? अशा 'पळपुट्या' सैनिकांना शत्रूसैन्यापुढे शरणागती पत्करू देण्यासाठी मदत करणे ही कर्तव्यच्युती? गायिका बनण्याच्या महत्त्वाकांक्षेसाठी गेस्टापोच्या अधिकाऱ्याबरोबर संबंध ठेवणे क्षम्य? आपल्या ज्यू मित्राला वाचविण्यासाठी त्याच्याशी प्रतारणा करणे गैर नाही? परिचारिका असूनही आपल्या डॉक्टरला मृत्यूच्या दाढेत लोटणे अधर्म नव्हे? नाझींच्या तावडीतून सुटताना म्हाताऱ्या वडिलांना मागे सोडून देणे पाप नाही?

'अवर मदर्स, अवर फादर्स' मालिका प्रश्नांची अशी भुतावळ उभी करते. दुसरे महायुद्ध संपून सत्तर वर्षे होत असताना हॉफमन इतिहासाच्या बाटलीचे बूच उघडतो आणि 'पेंडोराच्या बॉक्स'मधून अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांची भेंडोळी बाहेर पडू लागतात. प्रत्येक भागानंतर सरासरी शहात्तर लाख जर्मन नागरिकांना विचार करायला लावलेली, उत्तरे शोधायला लावलेली अशी ही मालिका.

*****

दुसरे महायुद्ध जगाच्या दृष्टीने सत्तर वर्षांपूर्वी संपले असेल, जर्मनांसाठी ते अजून चालूच आहे. अर्थात तसे ते हॉलिवुडच्या निर्माते-दिग्दर्शकांच्या लेखीही संपलेले नाही. दोस्तांनी जिंकलेल्या लढाया, हिटलरमधील हुकुमशहा, त्याच्या नाझी राजवटीने ज्यूंचा केलेला अनन्वित छळ, वेहरमाश्ट म्हणजे जर्मन सेनेचे अत्याचार किंवा त्यांचे पराभव आणि फजितवडे अशा कितीतरी - खऱ्या-खोट्या आणि कल्पित - कथानकांवर दरवर्षी नवनवीन चित्रपटांची भर त्यांच्याकडून घातली जाते आहेच. पण 'अ ब्रिज टू फार' किंवा 'पियानिस्ट'सारखा एखाददुसरा अपवाद वगळला तर हिटलर आणि त्यापेक्षा सारे जर्मन दुष्ट, क्रूर किंवा मूर्ख दाखविण्याची परंपरा गेली सात दशके हॉलिवुड इमानेइतबारे सांभाळत आहे. ते पाहून आजच्या पिढीतील जर्मनांमधील अपराधीपणाची भावना वाढतच असणार. जर्मनीच्या दोन दीर्घ भेटींनंतर आणि वास्तव्यानंतर मला हे प्रकर्षाने जाणवले होते. हिटलरबद्दलचा जगाचा द्वेष त्यांना किती बोचत

**'अ ब्रिज टू फार' किंवा 'पियानिस्ट'सारखा एखाददुसरा अपवाद वगळला तर हिटलर आणि त्यापेक्षा सारे जर्मन दुष्ट, क्रूर किंवा मूर्ख दाखविण्याची परंपरा गेली सात दशके हॉलिवुड इमानेइतबारे सांभाळत आहे. ते पाहून आजच्या पिढीतील जर्मनांमधील अपराधीपणाची भावना वाढतच असणार. जर्मनीच्या दोन दीर्घ भेटींनंतर आणि वास्तव्यानंतर मला हे प्रकर्षाने जाणवले होते.**



असेल, याचे एक उदाहरण म्हणजे दुसरे महायुद्ध संपल्यापासून गेल्या सत्तर वर्षांत एकाही मुलाचे नाव 'ॲडॉल्फ' ठेवले गेलेले नाही.

हिटलरचा गौरव राहो, पण त्याची आठवण करून देणाऱ्या पाट्यासुद्धा म्युनिक-बर्लिनसारख्या ऐतिहासिक शहरांतून फिरताना दिसत नाहीत. महायुद्धकालीन स्थळांना भेटी देताना इतिहाससुद्धा जेत्या इंग्लंड-अमेरिकेच्या सोयीनुसारच सांगितला जातो. याचा अर्थ हिटलरची प्रतिमा हिरोसारखी रंगवावी, त्याचे उदात्तीकरण करावे किंवा नाझी राजवट आणि निओ-नाझी चळवळीबद्दल सहानुभूती दाखवावी, असे मुळीच नाही. पण हिटलरची नावनिशाणी अशी पुसली जाणार नाही, हेही तितकेच खरे.

कोणताही इतिहास अलिप्तपणे राहो, शक्य तेवढा सत्याचा शोध घेणारा असावा, अशी अपेक्षा असते. जर्मन आणि जर्मनीच्या बाबतीत तसे झाल्याचे अथवा होत असल्याचे दिसत नाही. या साऱ्या इतिहासाकडे पाहताना जर्मनांची किती कुचंबणा होत असेल, याची जाणीवही तिथे राहून आल्याशिवाय कळत नाही.

इतिहास फक्त जेत्यांचा असतो आणि पराभूतांनी त्याचे भान ठेवूनच चित्रपटसुद्धा बनवायचे असतात, हे जगन्मान्य वास्तव जर्मन चित्रपट-माहितीपट निर्मात्यांनी आजवर स्वीकारलेले आहे. मुळात जर्मन चित्रपट, माहितीपट किंवा मालिका अगदी कमी खर्चाच्या - 'लो बजेट' - असतात. इंग्लंड-अमेरिकेत त्यांना मागणीच नसते. पण या परंपरेला अपवाद ठरला तो निको हॉफमनच्या 'अवर मदर्स, अवर फादर्स' या दूरचित्रवाणी मालिकेचा. खुद्द जर्मनीत सरासरी प्रत्येकी ७६ लाख प्रेक्षकांनी ही मालिका पाहिली आणि ती चर्चेचा विषय बनली. ही मालिका दहा वर्षे परिश्रम घेऊन आणि तब्बल एक कोटी चौदा लाख युरो खर्चून तयार केली गेली, असे सांगितले गेले, तेव्हा अमेरिकेत मात्र त्याची टरच उडवली गेली. कारण वीस वर्षांपूर्वी बनविलेल्या 'टायटॅनिक' फिल्मसाठी दोनशे कोटी डॉलर्स (सुमारे पावणेदोनशे कोटी युरो!) खर्च केले गेले होते. म्हणजे हॉलिवुडच्या बजेटमध्ये हॉफमनच्या मालिकेसारख्या शेकडो कलाकृती तयार झाल्या असत्या. असो. मुद्दा हा की, असे असूनही, निको हॉफमन याने प्रत्येकी दीड तासाचा एक अशा तीन भागांत सादर केलेली 'अवर मदर्स, अवर फादर्स' ही मालिका अमेरिका, इंग्लंड आणि पाश्चिमात्य राष्ट्रांमध्येही गतवर्षी दोन भागातील चित्रपटाच्या स्वरुपात वितरित झाली. त्यावर वृत्तपत्रादी माध्यमांनी आणि बीबीसी आदि वाहिन्यांनी गंभीर चर्चाही घडवून आणल्या.

जर्मनांनी बनविलेला महायुद्धावरील चित्रपट किंवा टीव्ही सिरीयल अमेरिकेत आणि 'दोस्तां'च्या देशांत दाखविण्याची पद्धत नाही. पण या मालिकेचे हक्क मात्र अमेरिकेच्या 'म्युझिक बॉक्स फिल्म्स' या वितरण कंपनीने

**मुळात जर्मन चित्रपट, माहितीपट किंवा मालिका अगदी कमी खर्चाच्या - 'लो बजेट' - असतात. इंग्लंड-अमेरिकेत त्यांना मागणीच नसते. पण या परंपरेला अपवाद ठरला तो निको हॉफमनच्या 'अवर मदर्स, अवर फादर्स' या दूरचित्रवाणी मालिकेचा. ही मालिका दहा वर्षे परिश्रम घेऊन आणि तब्बल एक कोटी चौदा लाख युरो खर्चून तयार केली गेली, असे सांगितले गेले, तेव्हा अमेरिकेत मात्र त्याची टरच उडवली गेली.**



**जर्मनांनी बनविलेला महायुद्धावरील चित्रपट किंवा टीव्ही सिरीयल अमेरिकेत आणि 'दोस्तां'च्या देशांत दाखविण्याची पद्धत नाही. पण या मालिकेचे हक्क मात्र अमेरिकेच्या 'म्युझिक बॉक्स फिल्म्स' या वितरण कंपनीने विकत घेतले आणि 'जनरेशन वॉर' या नावाने दोन भागांत चित्रपटाच्या रूपात ती दाखविली गेली. जर्मन निर्मात्याने तयार केलेली आणि तिचे हक्क घेऊन अमेरिकेत दाखविली गेलेली जर्मनीच्या गेल्या सत्तर वर्षांच्या इतिहासातील ही पहिली कलाकृती आहे!**

विकत घेतले आणि 'जनरेशन वॉर' या नावाने दोन भागांत चित्रपटाच्या रूपात ती दाखविली गेली. जर्मन निर्मात्याने तयार केलेली आणि तिचे हक्क घेऊन अमेरिकेत दाखविली गेलेली जर्मनीच्या गेल्या सत्तर वर्षांच्या इतिहासातील ही पहिली कलाकृती आहे!

असे काय आहे या मालिकेत किंवा चित्रपटात?

*****

मालिकेचे नेपथ्य असे – साल १९४१. समर म्हणजे उन्हाळा संपत आला आहे. दुसरे महायुद्ध भरात आले आहे. हिटलरने रशियाविरुद्ध दुसरी आघाडी उघडली आहे. तिथे लष्करात नव्याने दाखल झालेल्या उमद्या तरुणांना पाठविले जात आहे. विल्हेल्म आणि फ्रिडहेल्म हे या आघाडीवर निघालेले दोघे भाऊ, तसेच नवोदित गायिका ग्रेटा, बदललेल्या परिस्थितीत अमेरिकेला जाण्याचे स्वप्न पाहणारा तिचा जिवलग (ज्यू) मित्र व्हिक्टर आणि परिचारिकेचा अभ्यासक्रम पूर्ण करून लष्करी रुग्णालयांत रुजू होण्यास निघालेली शार्लोट असे हे पाच बालपणापासूनचे सवंगडी. विशीच्या उंबरठ्यावर नियती त्यांना रणांगणावर धाडते आहे. त्यांच्या वाटाही वेगळ्या होत आहेत. म्हणून ते बर्लिनच्या एका बीअर गार्टनमध्ये/बारमध्ये निरोपाची पार्टी आयोजित करतात. युद्ध निर्णायक टप्प्यात आलेले आहे, ते फार काळ चालणार नाही, असा यापैकी (व्हिक्टर सोडून) चौघांनाही ठाम विश्वास आहे. चार महिन्यांतच आपण परत येऊ आणि याच ठिकाणी नाताळात भेटू, असे ते ठरवितात.

प्रत्यक्षात युद्ध पुढे साडेतीन वर्षे लांबते. या काळात या पाचजणांवर कोणकोणते प्रसंग ओढवतात, त्यांना ते कसे सामोरे जातात, कसोटीच्या क्षणी ते कसे वागतात, त्यांच्या स्वभावात कसे बदल होत जातात, हे सारे दिग्दर्शक फिलिप काडल्बाकने या मालिकेत अत्यंत संवेदनशील पद्धतीने मांडले आहे. त्यांच्यातील बालपणापासूनची निरागसता, कोवळीक, आशावाद, माणुसकी, करुणा आदि सुंदर भावना करपून कशा जातात; त्यांची जागा स्वार्थ, सूड, क्रौर्य आणि नंतर अपराधीपणाची भावना कशा घेते, हे अनेक प्रसंगांतून आपल्याला सहज जाणवते. विशेषतः नैतिक–अनैतिकता यांच्या संघर्षात झालेली त्यांची ससेहोलपट पाहताना आपणही अस्वस्थ होतो. फ्रिडहेल्म म्हणतो, त्याप्रमाणे हे युद्ध प्रत्येक माणसातला वाईटपणा बाहेर आणते!

साहजिकच १९४५ च्या नाताळात ते पुन्हा बर्लिनच्या त्याच बारमध्ये भेटतात, तेव्हा त्यांच्या नजरा अपराधीपणाच्या टोचणीने आणि शरमेने खाली जातात. आपल्या नैतिक



अधःपाताची जाणीव त्यांना मान वर करून मित्रांकडे पाहण्याचे बळही देत नाही.

*****

महायुद्धाला सत्तर वर्षे होत आली असताना या मालिकेची निर्मिती केली जात होती. प्रत्यक्ष महायुद्ध अनुभवलेले, लढाईत भाग घेतलेले जर्मन आता नव्वदीच्या वळणावर असतील. खुद्द हॉफमनचे वडील हयात आहेत आणि युद्धाचे एक जिवंत साक्षीदार आहेत. त्यांच्याशी लहानपणापासून झालेल्या बोलण्यांतून युद्धाचे शेकडो कंगोरे हॉफमनला उलगडत गेले. त्याच्या मते युद्धाचे शेकडो पैलू तपासून पाहायचे असतील, 'इतिहासा'मागचा खरा इतिहास जाणून घ्यायचा असेल, तर तत्कालिन साक्षीदारांच्या हयातीतच ते व्हायला हवे आणि त्या दृष्टीने ही अखेरची संधी आहे. कारण युद्धाबद्दल खरेखुरे बोलू शकणारी ही अखेरचीच पिढी असेल. आपण जो काही अभ्यास केला, त्याच्या आधारावर हॉफमन त्यांच्यापुढे आणि नंतरच्या पिढ्यांतील जर्मनांपुढे महायुद्धाचे एक (जर्मन) चित्र मालिकेच्या माध्यमातून रेखाटतो आणि प्रत्यक्षात कसे आणि काय घडले असेल, त्याऐवजी काय करायला हवे होते? अशा अनेक प्रश्नांची भुतावळ उभी करतो.

इंग्लिश-अमेरिकी पत्रपंडित आणि विचारवंत काही म्हणोत, पण इतिहासाकडे असे वळून पाहणे धाडसाचे आहे आणि हॉफमन-काडल्बाक त्यासाठी अभिनंदनास पात्र आहेत.

*****


वास्तविक थोडे तटस्थपणे पाहिले तर असे जाणवते की, इतिहासाला दोन बाजू असतात, तसे या पाच तरुणांच्या प्रत्येक कृत्यालाही दोन बाजू आहेत. अगदी न्युरेम्बर्गच्या धर्तीवर शहानिशा करायची ठरविली तरी, त्यांच्यातील साधू 'हो, पण मी गाय वाचवली' असे म्हणू शकेल आणि 'खोटे बोलून आम्हाला उपासमार घडविणे, हे पाप नाही का?' असे कसाई विचारू शकेल! कोणता गुन्हा क्षम्य किंवा कोणता अधिक गंभीर, याचा निवाडा प्रेक्षक करतील, पण निदान त्यांच्यापुढे हे प्रश्न उपस्थित तरी करायला हवेत.

युद्धाला सत्तर वर्षे होत आल्यावर या साऱ्या प्रश्नांकडे पाहण्याचा सामान्य माणसाचा दृष्टिकोन बदलला आहे का, बदलतो आहे का, हेही तपासून पाहण्यासारखे असणारच. इंग्लंड-अमेरिका-रशिया किंवा इतर 'दोस्त' राष्ट्रांच्या नागरिकांची उत्तरे काय असतील, हे सांगण्याची गरज नाही. किंबहुना 'जनरेशन वॉर' चित्रपटांवरील परीक्षणे वाचल्यावर न्युरेम्बर्ग कोर्टाचे 'न्यायाधीश' अजून हयात आहेत, याची साक्ष पटते. त्यांच्या नजरेचे मला तरी आश्चर्य वाटले नाही. मला दखल घ्यावीशी वाटली ती सरासरी ७६ लाख जर्मन प्रेक्षकांची, 'त्या ठिकाणी आपण असता तर' या हॉफमनच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणाची, दुसऱ्या महायुद्धाने त्यांना शिकवलेल्या धड्याकडे आणि आपल्याच इतिहासाकडे न्यायबुद्धीने पाहण्याच्या त्यांच्या उदार भूमिकेची, तसेच काळाची पुढची वाटचाल भान ठेवून करण्यासाठी त्यांना इतिहासाने दिलेल्या शहाणपणाची!

खरे तर, आपल्याच कृत्यांचा आपल्यालाच जाब विचारण्यासाठी नुसते धाडस असून चालत नाही, आपल्या हातून घडले ते चुकीचे असेल तर ते आतातरी मान्य करण्याची तयारी आपण दाखवू शकतो का, असा प्रश्न हॉफमन फक्त जर्मनांनाच विचारतो आहे असे नाही, तर तत्कालिन 'विजेत्यां'पुढे आणि इतिहासकारांपुढेही हाच प्रश्न तो या मालिकेच्या निमित्ताने ठेवतो आहे, असे मला वाटते.

'कन्फेशन' किंवा अपराधाची कबुली ही ख्रिश्चन धर्मातील सर्वात थोर आणि वेगळी शिकवण आहे, हे बहुतेकांना मान्य व्हावे. जर्मन माणूस याच भावनेतून दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासाचा धांडोळा घेतो आहे. विजेते मात्र अजूनही आपली नजर बदलायला तयार नाहीत, बुरखे बाजूला करून 'कन्फेशन बॉक्स'जवळ जायला तयार नाहीत, एवढे मात्र 'अवर मदर्स, अवर फादर्स' हे नाव बदलून 'जनरेशन वॉर'च्या रूपात 'इतिहास' दाखविणाऱ्या दोस्तांच्या उदाहरणातून जाणवले.

**आल्हाद गोडबोले** . . . . . . . . . . . .
भ्रमणध्वनी - ९५९४५४४८८८
alhadgodbole@gmail.com




आपण जो काही अभ्यास केला, त्याच्या आधारावर हॉफमन त्यांच्यापुढे आणि नंतरच्या पिढ्यांतील जर्मनांपुढे महायुद्धाचे एक (जर्मन) चित्र मालिकेच्या माध्यमातून रेखाटतो आणि प्रत्यक्षात कसे आणि काय घडले असेल, त्याऐवजी काय करायला हवे होते? अशा अनेक प्रश्नांची भुतावळ उभी करतो. खरे तर, आपल्याच कृत्यांचा आपल्यालाच जाब विचारण्यासाठी नुसते धाडस असून चालत नाही, आपल्या हातून घडले ते चुकीचे असेल तर ते आतातरी मान्य करण्याची तयारी आपण दाखवू शकतो का, असा प्रश्न हॉफमन फक्त जर्मनांनाच विचारतो आहे असे नाही, तर तत्कालिन 'विजेत्यां'पुढे आणि इतिहासकारांपुढेही हाच प्रश्न तो या मालिकेच्या निमित्ताने ठेवतो आहे.

**कितीही मानवी संघर्ष आणि नैसर्गिक उत्पात घडून आले तरीही, मानवी स्थलांतराच्या अव्याहत प्रक्रियेत आणि त्या प्रक्रियेतून आकारास येत जाणाऱ्या सामूहिक गुणवत्तेवरच माणसाची प्रगती आणि समृद्धी अवलंबून असणार आहे. त्या अर्थाने, माणसाच्या आजवरच्या उत्क्रांती, प्रगती आणि अधोगतीचा इतिहास हा मानवी स्थलांतराचाच समांतर इतिहास राहिला आहे. सक्तीने वा स्वेच्छेने स्थलांतर करणारे, विस्थापित, निर्वासित, शरणार्थी आदींना विरोध करताना या वैश्विक सत्याचं भान आहे रे' वर्गातल्या देश आणि प्रांतांना राखावं लागणार आहे. ते या पुढच्या काळात राखलं गेलं तरच, मानवी प्रगतीचा प्रवाह अखंड, अविरत सुरु राहणार आहे, मात्र भविष्यकाळात जगभरातल्या उपऱ्यांचा आक्रोश समजून न घेता या प्रवाहाला रोखण्याचे हेतूपुरस्सर प्रयत्न होत गेले, तर ती कदाचित मानवजातीच्या अधोगतीची सुरुवात असेल...**

धर्म-वंश-प्रांत-देश यात झालेली विभागणीच आज जगाच्या मुळाशी येऊ पाहतेय. हिंसेला हिंसेने उत्तर दिले जातेय. असहिष्णुतेला असहिष्णुतेची जोड मिळत चाललीय. सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्रात गौरी-गणपतीचे उत्सवी वातावरण असताना तिकडे हजारो मैल दूर तुर्कस्तानच्या समुद्रकिनाऱ्यावर आयलान कुर्दी नावाच्या तीन वर्षांच्या निर्वासित सिरीयन मुलाचा निष्प्राण देह फेसाळत्या लाटा झेलत पडून होता. त्याची एकच चूक होती, ती म्हणजे, सुडाच्या आगीत होरपळणाऱ्या सिरियातून बाहेर पडून सुरक्षित ठिकाणी निघालेल्या शेकडो निर्वासितांसोबत तोही निघाला होता. आयलान तर खूपच लहान होता. आई-बाप निघताहेत म्हटल्यावर त्याच्याकडे पर्यायही नव्हता, पण आयलानसारखीच अवस्था आज जगभरातल्या हजारो-लाखो स्थलांतरितांची, निर्वासितांची झालेली आहे. राहत्या ठिकाणी दहशतवादाने, राजकीय अस्थिरतेने, यादवी युद्धाने परिसीमा गाठलेली असल्याने जिवाच्या आकांताने मार्ग दिसेल, त्या दिशेने ते सैरावरा धावत सुटलेत. पोटात अन्न-पाण्याचा थेंब नसताना हजारो मैलांचा कधी जंगल-पर्वतातून, कधी धगधगत्या सीमारेषांवरून, कधी खवळलेल्या समुद्रातून खडतर प्रवास करताहेत. त्यातल्या अनेकांच्या नशिबी दुर्लक्षित मरण येतंय, जे वाचताहेत त्यांना जीवघेण्या अत्याचारांना, शोषणाला तोंड द्यावं लागतंय. काहींचं आयुष्य आयलान कुर्दीप्रमाणे वाटेतच संपतंय आणि काहीजण चिवटपणे जगण्याचा संघर्ष करत या देशातून त्या देशांत सुरक्षित आसरा शोधत भटकताहेत. आज हजारो नव्हे, तर लाखो लोक आक्रोश करत वाट फुटेल तिकडे धावत सुटलेत. त्यातून हिंसक संघर्षाची न संपणारी साखळी आकारास येत चाललीय. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर मायग्रेशन (आयओएम), युनायटेड नेशन्स यासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या दबावाला न जुमानता हंगेरीसारखा दांडगा देश, 'निर्वासितांचे लोंढे हे ख्रिश्चन धर्मावरचे अतिक्रमण आहे' असा कांगावा करून आगीत तेल ओतण्याचं काम करताना दिसताहेत, तर जर्मनीसारखा एकेकाळी ज्यू लोकांच्या हत्याकांडांसाठी बदनाम झालेला देश 'विल्किोमेन बेनवेनू, सलाम आलइकुम' म्हणत खुल्या दिलाने सिरियातून आलेल्या हजारो-लाखो निर्वासितांना सामावून घेताना दिसतोय. इतरवेळी बिनभरवशाचं जिणं जगणाऱ्या जगभरातल्या उपऱ्यांचा आक्रोश कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालला आहे

दहशतवादी कारवाया, नागरी-लष्करी उठाव, यादवी युद्ध, वंशसंहार यांतून सुटका करून घेणारे निर्वासित, चक्रीवादळ, महापूर, भूकंप आदी नैसर्गिक आपत्तींनी त्रस्त होऊन डोक्यावर छप्पर आणि हाताला काम मागणारे विस्थापित, आर्थिक प्रगतीच्या इर्षेने घराबाहेर पडणारे स्थलांतरित या सगळ्यांवर होणारे परिणाम निरनिराळे असले तरीही, त्यांची



ओळख एकच ती म्हणजे, स्थलांतरित. या घटकेला जगाची लोकसंख्या ७०० कोटींच्या वर पोहोचली आहे. त्यातले ३.२ टक्के इतके म्हणजेच जवळपास २३ कोटी लोक या ना त्या निमित्ताने स्वत:चा देश आणि प्रांत सोडून स्थलांतरितांचं जिणं जगताहेत. त्यातल्या विस्थापित-निर्वासितांची संख्या जवळपास ६ कोटी म्हणजेच, एका अख्खा इंग्लंडच्या लोकसंख्येइतकी प्रचंड आहे. ऐंशीच्या दशकात महासत्ता मधल्या संघर्षाचा केंद्रबिंदू अफगाणिस्तान होता, नव्वदच्या दशकात तो इराककडे सरकला. आता तो, सिरिया, येमेन, उत्तर आफ्रिकेतील देशांकडे स्थिरावला आहे. हे देश दशकभराहून अधिक काळ सततची राजकीय-लष्करी अस्थिरता अनुभवताहेत. 'आयएस' आणि 'इसिस'सारख्या मूलतत्ववादी दहशतवादी संघटनांनी पश्चिम आशियातल्या जवळपास सगळ्याच देशांना विळखा घालण्यास प्रारंभ केला आहे. स्वाभाविकपणे या देशांतून रोजगार आणि सुरक्षित आयुष्यासाठी परागंदा होणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. यातले बहुतेक सगळे देश तुर्कस्तान, जर्मनी, हंगेरी, ग्रीस, ऑस्ट्रिया आदी युरोपीय देशांना समुद्रमार्गे जोडलेले असल्याने भू-मध्य समुद्रातून निर्वासित-स्थलांतरितांनी खच्चून भरलेल्या बोटी युरोपीय शहरांकडे जाण्याचे प्रमाणही मोठे आहे.

'आयओएम'च्या मिसिंग मायग्रंट प्रोजेक्ट'नुसार अनियमित स्थलांतरितांसाठी युरोप हा सगळ्यात धोकादायक खंड बनला आहे. सप्टेंबर २०१५ पर्यंत सुखी जीवनाच्या शोधात निघालेले २७०१ जण या समुद्रात बुडून मरण पावले आहेत. स्थलांतर करताना मरण पावलेल्यांचा या कालावधीतला आकडा ३७२९ इतका आहे. म्हणजेच, जवळपास ७२ टक्के मृत्यू भू-मध्य समुद्रात झालेले आहेत. एकूण मरण पावलेल्यांमध्ये ४० टक्के प्रमाण काँगो, सोमालिया, दक्षिण सुदान आदी आफ्रिकी देशांतून स्थलांतर करू पाहणारे आहेत. साहजिकच हाच समुद्रप्रदेश दुर्घटनांचे केंद्रबिंदूही ठरला आहे. याच वर्षी या समुद्रप्रदेशात लिबियाहून युरोपकडे निघालेली ८०० स्थलांतरित प्रवाशांची बोट बुडाली होती. या बोटीवर बहुतेक सगळे प्रवासी पुरुष आणि लहान मुले होती. या दुर्घटनेत केवळ २५ जणांचे प्राण वाचले होते. परंतु केवळ समुद्रमार्गे प्रवास करणारे स्थलांतरित मरणाच्या दारात पोहोचलेले नाहीत, तर ऑस्ट्रियासारख्या देशात फ्रिझर असलेल्या ट्रकमधून हमरस्त्याने प्रवास करताना वाटेतच चार अल्पवयीन मुलांसह ७१ स्थलांतरित श्वास कोंडून मरण पावल्याची घटना घडली आहे. या घटनेतले संबंधित ट्रकचालक आणि ट्राफिकिंग एजंटांनी

**सक्तीने वा स्वेच्छेने स्थलांतर करणाऱ्यांच्या आजच्या अवस्थेच्या मुळांचा शोध घेणाऱ्या अशा कितीतरी घटना, कहाण्या सांगता येतील. आजवर किती स्थलांतरित असुरक्षित जिणं जगताहेत याची आकडेवारी सादर करता येईल, पण मुद्दा आकडेवारी-अहवालांचा नाही, तर मानवी स्थलांतराची प्रक्रिया समजून घेण्याचा आणि त्या प्रक्रियेतून प्रगती आणि अधोगतीचा आलेख समजून घेण्याचा आहे.**

# स्थलांतर थांबले; माणूस संपला!

**शेखर देशमुख**





**दहशतवादी कारवाया, नागरी-लष्करी उठाव, यादवी युद्ध, वंशसंहार यांतून सुटका करून घेणारे निर्वासित, चक्रीवादळ, महापूर, भूकंप आदी नैसर्गिक आपत्तींनी त्रस्त होऊन डोक्यावर छप्पर आणि हाताला काम मागणारे विस्थापित, आर्थिक प्रगतीच्या इर्षेने घराबाहेर पडणारे स्थलांतरित या सगळ्यांवर होणारे परिणाम निरनिराळे असले तरीही, त्यांची ओळख एकच ती म्हणजे, स्थलांतरित. या घटकेला जवळपास २३ कोटी लोक या ना त्या निमित्ताने स्वत:चा देश आणि प्रांत सोडून स्थलांतरितांचं जिणं जगताहेत.**

दाखवलेले क्रौर्य इतके भीषण की, जो ऑस्ट्रियन ट्रकचालक या सिरियन निर्वासितांना सुरक्षित स्थळी घेऊन चालला होता, त्याने निर्वासित मरण पावल्याचे बघून वाटेतच ट्रक सोडून दिला होता आणि पुढचे दोन दिवस कुजलेल्या मृतदेहांनिशी तो ट्रक हायवेवर एका जागी उभा होता. ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभी, ७५ निर्वासितांचे कुजलेल्या अवस्थेतले मृतदेह लिबियातल्या त्रिपोलीच्या समुद्रकिनाऱ्यावर आणले गेले होते. थोडक्यात, आयलानचा मृतदेह पाहून जग हळहळलं, मात्र, तेवढ्याच संवदेना बधीर करणाऱ्या घटना इतरत्रही घडताहेत. त्याची ठळकपणे नोंद घेतली जात नाही, इतकेच.

आपल्याकडे जसा उत्तर भारतीयांच्या विरोधातला राग व्यक्त करताना, 'इकडे कशाला मरायला येतात? जा म्हणावं दुसरीकडे कुठेतरी, युपी-बिहारची घाण आम्ही का सांभाळायची' असा उद्दाम सवाल करणाऱ्यांची संख्या मोठी आहे, तशीच ती या घटकेला युरोपातही वाढली आहे. निर्वासितांची ही घाण अरब राष्ट्रांनी सांभाळावी असा तो बदसूर आहे. म्हणूनच हंगेरीसारखे देश निर्वासित येऊ नये म्हणून विजेचा प्रवाह असलेल्या तारांचे प्राणघातक कुंपण उभारताहेत. अन्न-पाण्यावाचून तडफड झाल्यामुळे बिथरलेल्या निर्वासितांना धडा शिकवण्यासाठी सर्रास हिंसेचा मार्ग अवलंबला जातोय. पण 'आमच्याकडे कशाला ही घाण' असा सवाल करण्याचा किंवा प्राप्त परिस्थितीत हात झटकण्याचा काहीएक अधिकार युरोप-अमेरिकेला या घडीला उरलेला नाही, असं स्थलांतरितांची बाजू मांडणाऱ्या जगभरातल्या जाणकार-विचारवंतांचं म्हणणं आहे. अमेरिकेने जगावर सत्ता गाजवण्याच्या असुरी महत्वाकांक्षेपायी इजिप्त, इराक, अफगाणिस्तान यासारख्या देशांतले प्रस्थापित सरकार उथलवून टाकण्यासाठी आधी स्थानिक बंडखोरांच्या टोळ्यांना सढळ हस्ते मदत केली, मग ते बंडखोर शिरजोर होऊ लागल्यावर सबंध देशच्या देश हिंसेच्या आगीत ढकलून दिले. सद्दाम हुसेन, मुअम्मर गद्दाफी, होस्नी मुबारक आदी हुकुमशहांना धडा शिकवण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स आदी राष्ट्रांच्या सैन्याने कधी जिहादी गटांना हाताशी धरलं, तर कधी घातक अण्वस्त्र लपवल्याचा कांगावा केला. कशासाठी? तर या हुकुमशहांच्या कराल दाढेतून निरपराध नागरिकांची सुटका करण्यासाठी! त्या धुमश्चक्रीत सद्दाम हुसेन आणि गद्दाफीला संपवण्यात आलं. ते मरणारच होते. लष्करी कारवाईचा हेतू सफल झाला. आता लिबिया काय नि इराक काय, जिहादी टोळ्यांच्या ताब्यात गेला आहे. इजिप्तवर अस्थिरतेचे सावट कायम आहे. ज्यांच्या उज्ज्वल भवितव्याची वचनं देत अमेरिका आणि त्याच्या दोस्तांनी हा उत्पात घडवून आणला, ती इराक-इजिप्त आणि लिबियातली सामान्य जनता जिवाच्या भीतीने देशातून परागंदा झालेली आहे. अफगाणिस्तान आणि इराकची पुनरावृत्ती सिरियामध्ये होणार असल्याची साधार भीती अमेरिका-रशियामधल्या ताज्या लष्करी संघर्षाने निर्माण केली आहे. ७०-८०च्या दशकात या दोन्ही मस्तवाल देशांनी अफगाणिस्तानचा युद्धभूमी म्हणून वापर केला होता. आज तेच कमनशिबीपण सिरियाच्या वाट्याला आलेलं आहे. अमेरिकेच्या नजरेत, सिरियाचा अध्यक्ष बशर-अल असाद आणि इस्लामिक स्टेट ही सुन्नीबहुल दहशतवादी संघटना भुईला भार आहेत. त्यामुळे तिचा शक्य तितक्या लौकर खात्मा घडवून आणावा, हा अमेरिकेचा इरादा आहे, तर रशियाचा दावा हा आहे की, असाद हा सेक्युलर राज्यकर्ता आहे आणि अमेरिकापुरस्कृत इस्लामी दहशतवादी गट हा सिरियाला मोठा धोका आहे. सबब, रशियाने सिरियातल्या अमेरिकापुरस्कृत दहशतवादी गटांना संपवण्यासाठी पर्यायाने सिरियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी हवाई हल्ले सुरू केले

आहेत. आंतरराष्ट्रीय युद्धतज्ज्ञांच्या मते, दांडगट पुतिन यांनी अमेरिकेच्या लष्करी वर्चस्वाला मोठे आव्हान दिले आहे. त्यामुळे महासत्तांच्या संघर्षात पुन्हा एकदा जग भरडून निघणार आहे. याचा थेट परिणाम, नजीकच्या काळात सक्तीच्या स्थलांतराची प्रक्रिया अधिकाधिक वेग घेण्यावर होणार आहे. युरोप-अमेरिकेच्या युद्धखोर धोरणांमुळेच मुळांपासून उखडले गेलेल्या देशांतले लोकच मुख्यत: युरोपात या घडीला आश्रय मागताहेत. म्हणूनच, या स्थलांतरितांना परतवून लावण्याचा नैतिक अधिकार या देशांना उरलेला नाही, हा युक्तिवाद पूर्णपणे पटणारा आहे.

वर्तमानात सुरू असलेल्या विध्वंसाचा अदमास घ्यायचा झाला तर, सिरियात रक्तरंजित संघर्ष सुरू होऊन पाच वर्षं उलटली आहेत. आतापर्यंत जवळपास ७६ लाख लोक देशांतर्गत विस्थापित झाले आहेत. ४० लाख निर्वासित सिरियाच्या बाहेर वास्तव्य करून आहेत. परिस्थिती इतकी भीषण आहे की, जगात दरदिवशी निर्वासितांचं जिणं नशिबी येणाऱ्या पाचापैकी, एक जण सिरियन आहे. सिरियाचा मानवी विकास निर्देशांक ३८ वर्षांपूर्वी जिथे होता, तिथे पोहोचला आहे. 'यूएस कौन्सिल फॉर फॉरेन रिलेशन्स'ने तयार केलेल्या अहवालानुसार सिरियात सुरू असलेल्या संघर्षामुळे आजवर दोन लाख लोक मरण पावले आहेत. याच दरम्यान, रशियन एजंट रासायनिक शस्त्रास्त्रांची देवाण-घेवाण करताना रंगेहात पकडला गेल्याचा अमेरिकेने दावा करणं किंवा पेंटागॉन'ने असादच्या विरोधात सिरियन फुटीरतावादी टोळ्यांतल्या जवळपास वीस हजार बंडखोरांना प्रशिक्षण देण्यासाठी आखण्यात आलेली पन्नास कोटी अमेरिकी डॉलर्सची योजना गुंडाळून ठेवण्याचं घाईघाईने घोषित करणं, या दोन घटना जगावर येऊ घातलेल्या संकटांची चाहूल देण्यास पुरेशा आहेत. या संभाव्य संकटामुळे केवळ सिरिया वा पश्चिम आशियातले देशच नव्हे, तर युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातले समाजसमूह सैरभैर होणार आहेत. पहिल्या महायुद्धापासूनच्या निर्वासित-विस्थापितांच्या समस्यांचे शंभर वर्षानंतर एक भयावह वर्तुळ पूर्ण होताना दिसतेय. युएनएचसीआर म्हणजेच युनोच्या



निर्वासितांसाठी कार्यरत असलेल्या उच्चायुक्तालयाने मदतीचं आवाहन करण्यासाठी जगभरातल्या प्रसिद्धी माध्यमांमध्ये जाहिरात प्रकाशित केली आहे. त्या जाहिरातीत किनाऱ्याला लागलेल्या छोट्याशा बोटीतून उतरणारे सिरियन निर्वासित आणि आयलान कुर्दीच्याच वयाचं तीन-चार वर्षांचं परिस्थितीने भेदरलेलं पोर दिसतंय. त्यातच मोहमूद नावाच्या एका निर्वासिताचा उद्‌गार आहे. त्यात तो म्हणतो, 'इट वॉज डेंजरस टु डू दी क्रॉसिंग बट डू यू नो व्हॉट? कम्पेअर्ड टु एव्हरीथिंग वुई हॅव विटनेस्ड, ऑल द थिंग्ज हॅपनिंग ॲट होम, नथिंग कुड बी ॲज बॅड. वुई न्यू वुई हॅव टु ट्राय'...संवेदना जागृत असलेल्या माणसाच्या अंगावर शहारे आणणारं हे वाक्य आहे.

सक्तीने वा स्वेच्छेने स्थलांतर करणाऱ्यांच्या आजच्या अवस्थेच्या मुळांचा शोध घेणाऱ्या अशा कितीतरी घटना, कहाण्या सांगता येतील. आजच्या घडीला नेमके किती स्थलांतरित असुरक्षित जिणं जगताहेत, याची आखीव-रेखीव आलेखांसह आकडेवारी-अहवाल सादर करता येईल. पण, मुद्दा आकडेवारी-अहवालांचा नव्हे, तर मानवी स्थलांतराची प्रक्रिया समजून घेण्याचा आणि त्या प्रक्रियेतून आकार घेत गेलेल्या प्रगती आणि अधोगतीचा आलेख समजून घेण्याचा आहे.

अन्न आणि सुरक्षित आसऱ्याच्या शोधात असलेलं माणसाचं स्थलांतर अगदी होमो सेपियनच्या काळापासूनचं आहे. त्याच गरजेतून त्याने सबंध पृथ्वी पादाक्रांत केली, परंतु, या स्थलांतराला पहिल्यांदा अर्थ प्राप्त आला, तो

**त्यामुळे महासत्तांच्या संघर्षात पुन्हा एकदा जग भरडून निघणार आहे. याचा थेट परिणाम, नजीकच्या काळात सक्तीच्या स्थलांतराची प्रक्रिया अधिकाधिक वेग घेण्यावर होणार आहे. युरोप-अमेरिकेच्या युद्धखोर धोरणांमुळेच मुळांपासून उखडले गेलेल्या देशांतले लोकच मुख्यत: युरोपात या घडीला आश्रय मागताहेत. केवळ सिरिया वा पश्चिम आशियातले देशच नव्हे, तर युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातले समाजसमूह सैरभैर होणार आहेत. पहिल्या महायुद्धापासूनच्या निर्वासित-विस्थापितांच्या समस्यांचे शंभर वर्षानंतर एक भयावह वर्तुळ पूर्ण होताना दिसतेय.**

मध्ययुगीन काळात. लिन व्हाइट ज्यु. नावाचे इतिहासकार होते. त्यांनी मानवी प्रगतीला पोषक ठरलेल्या घटकांची नोंद घेताना 'मिडिएव्हल टेक्नॉलॉजी अँड सोशल चेंज' (१९६२) या नावाच्या पुस्तकात अशी मांडणी केली होती, की रिकिब किंवा रकाब, घोड्याची लोखंडी नाल आणि लगाम या तीन साधनांच्या शोधाने मध्ययुगात प्रगतीची बीजं रोवली. रिकिब असल्यामुळे घोडेस्वाराची घोड्यावरची मांड पक्की झाली. त्याच्या दोन्ही पायांना आधार मिळाला. त्याला शस्त्रास्त्र सोबत नेता येणे शक्य झाले. नालेमुळे घोड्यांची टाप पक्की बनली आणि लगाम हाती आल्याने घोड्यावर म्हणजेच, त्या काळच्या जगण्यावर माणसाचे नियंत्रण आले. त्यातूनच शेतीआधारित सरंजामशाही अवतरली. त्याच सरंजामशाहीने जग जिंकू पाहणाऱ्या योद्ध्यांना शस्त्रास्त्रेही पुरवली.

अर्थात, केवळ शेतीआधारित व्यवस्था आकारास येऊन उपयोग नव्हता. कारण, ही व्यवस्था काहीशी बंदिस्त स्वरुपाची होती. मानवी प्रगतीची इतर दालनं खुली होण्यासाठी सामूहिक गुणवत्ता हीच मोठी गरज होती. ती गुणवत्ता आकारास येण्याचा आणि पर्यायाने मानवी उत्क्रांती आणि प्रगती-समृद्धी साधण्याचा एकमेव मार्ग मानवी स्थलांतर हाच होता. स्थलांतराच्या आधुनिक इतिहासाचा मागोवा घेताना असं जाणवतं की, १८०० ते १८६० या काळात घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीमुळे, दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे ब्रिटन आणि जर्मनीहून लाखोंच्या संख्येने लोक उत्तर अमेरिककडे स्थलांतर करते झाले. पुढे १८६० ते १९२० या काळात स्कॅन्डिनेव्हिआ, आयर्लंड, इटली, स्पेन आणि पूर्व युरोपातून जवळपास ३० लाख स्थलांतरितांनी अमेरिकेचा रस्ता धरला. म्हणूनही १८४० ते १९१४ हा काळ 'एज ऑफ मास मायग्रेशन' म्हणूनही इतिहासात नोंदला गेला. मात्र १९१४ पासून सुरू झालेल्या पहिल्या महायुद्धाने अवघ्या जगाचेच भागधेय बदलून टाकले. या महायुद्धामुळे जग दोन गटांत विभागले गेले. सीमारेषा अधिक ठळक बनल्या. मानवी स्थलांतरावर बंधनं येत गेली.  एका देशातून बाहेर पडून दुसऱ्या देशाची सीमा ओलांडताना ओळखपत्रे गरजेची ठरू लागली. तोवर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सरंजामशाहीचे प्रतीक असलेल्या रशियाने पासपोर्टचा प्रयोग राबवला होता. युरोपात मात्र त्यावर अशा प्रकारे कागदपत्रं असावी की नसावी यावर वादविवाद झडत होते. फ्रान्सला खरं तर तेही नवे नव्हते, कारण फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात स्थलांतरावर बंधन आणण्याच्या हेतूने राजकीय स्तरावर तेव्हाही मुत्सद्यांमध्ये जोरदार खडाजंगी झालेली होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभी काही युरोपियन राष्ट्रांनी मानवी स्थलांतरावर बंधनं आणण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या होत्या, परंतु पहिल्या महायुद्धामुळे सुरक्षेच्या कारणास्तव आंतरराष्ट्रीय सीमांवरच्या माणसाच्या मुक्त वावरावर खऱ्या अर्थाने पहिल्यांदा पारपत्राच्या रूपाने कायदेशीर बंधनं येण्यास सुरुवात झाली होती. कायद्याने स्थानिक आणि विदेशी असे दोन भेद निर्माण केले होते. १९१७ मध्ये फ्रान्सने परदेशी नागरिकांना अधिकृत कागदपत्रं बंधनकारक केली होती. जर्मनी आणि ब्रिटनने फ्रान्सचा कित्ता गिरवला होता. अमेरिकेने स्थलांतर करू पाहणाऱ्यांसाठी 'लिटरसी टेस्ट' बंधनकारक केली होती. ऑस्ट्रेलियाने 'डिक्टेशन टेस्ट' लागू केली होती. ही महायुद्धादरम्यानची तात्पुरती उपाययोजना होती, तरीही कालांतराने अपवाद नियमात प्रवर्तित झाला होता. याच काळात राष्ट्रवादाची भावना प्रखर होण्यास प्रारंभ झाला होता. देशाशी निष्ठा राखणं प्रतिष्ठेचं आणि देशातून स्थलांतर करणं मानहानीचं लक्षण मानलं जाऊ लागलं होतं. या गुंत्याला वांशिक भेदाचीही जाडसर किनार लाभली होती.

**पहिल्या महायुद्धाने अवघ्या जगाचेच भागधेय बदलून टाकले. या महायुद्धामुळे जग दोन गटांत विभागले गेले. सीमारेषा अधिक ठळक बनल्या. मानवी स्थलांतरावर बंधनं येत गेली.  एका देशातून बाहेर पडून दुसऱ्या देशाची सीमा ओलांडताना ओळखपत्रे गरजेची ठरू लागली. सुरक्षेच्या कारणास्तव आंतरराष्ट्रीय सीमांवरच्या माणसाच्या मुक्त वावरावर खऱ्या अर्थाने पहिल्यांदा पारपत्राच्या रूपाने कायदेशीर बंधनं येण्यास सुरुवात झाली होती. कायद्याने स्थानिक आणि विदेशी असे दोन भेद निर्माण केले होते.**



महायुद्धाने जगात संशय आणि असुरक्षिततेचं बीज पेरलं होतं, त्याचाच परिणाम म्हणून १९१९ मध्ये जर्मनी आणि अमेरिकेने आणि १९२० मध्ये ब्रिटनने पासपोर्ट सक्तीचा केला आणि तिथून स्थलांतराच्या मुक्त प्रक्रियेवर राजकीय व्यवस्थांचा वचक बसण्यास प्रारंभ झाला.

प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ मॅट रिडली 'दी रॅशनल ऑप्टिमिस्ट' (२०१०) या ग्रंथात स्थलांतरातून आकारास येणारी मानवी प्रगतीची प्रक्रिया व्यवस्थित उलगडून दाखवतात. ते म्हणतात, ज्या क्षणी मानवाने स्वत:जवळच्या साधनांची देवाणघेवाण सुरू केली, तेव्हा प्रगतीचे एक दार उघडले. या देवाणघेवाणीतून माणसामध्ये कौशल्याची (इनोव्हेशन) प्रेरणा जागृत झाली. त्यातून पुढे अधिक कौशल्य (स्पेशलायझेशन) माणसाच्या अंगी येत गेले. त्यातून तंत्र प्रगतीकडे (टेक्नॉलॉजिकल ॲडव्हान्समेंट ) तो झेपावला. त्यातून तंत्र प्रगतीची त्याची आस अधिक विस्तारली, त्यातून जो आत्मविश्वास आला, त्याने आधुनिक प्रगतीचा (प्रॉस्पेरिटी) पाया रचला. पण हे सगळं घडण्यासाठी कारणीभूत ठरली, ती सामूहिक गुणवत्ता. रिडलींच्या भाषेत, कलेक्टिव्ह इंटेलिजन्स. तो आला कारण, माणसाने स्वत:ला हलतं-फिरतं ठेवलं. अशाच हलत्या-फिरत्या राहण्याने त्याने विज्ञानयुगात आणि विज्ञानामुळे त्याने आधुनिक आणि उत्तर आधुनिकोत्तर युगात धडक मारली. यात माणसाचं एका जागेकडून दुसऱ्या जागेकडे स्थलांतर महत्वाचं. सामूहिक गुणवत्तेतून आकारास आलेल्या व्यवस्थेने माणसाला व्यापार-व्यवहाराची प्रेरणा दिली. असं म्हणतात की, व्यापार बहरला की, सर्जनशीलता आणि परस्परभिन्न संस्कृती-परंपरांबद्दलची आत्मियताही विस्तारते. व्यापार-व्यवहार घडला नसता, तर मानवी जगण्यात प्रगतीची शक्यताच निर्माण झाली नसती. जसं सजीवांच्या उक्रांतीसाठी शरीराचं मीलन आवश्यक तसंच तंत्रप्रगतीसाठी देवाण-घेवाण महत्त्वाची.

इतिहासाच्या ज्या-ज्या टप्प्यांवर या प्रक्रिया सुलभपणे घडत गेल्या, माणसाची प्रगती उत्तरोत्तर होत गेली. पण जेव्हा कधी या प्रक्रियेत खंड पडला, माणसाने स्वत:चाच घात करून घेतला. अशा एका घातक टप्प्याचं वर्णन करताना मॅट रिडली म्हणतात की, स्वयंपूर्णता एका टप्प्यापर्यंत योग्य असली तरीही स्वयंपूर्णतेचा टोकाचा आग्रह माणसाला अधोगतीकडे घेऊन जातो. अंगी कौशल्य असूनही केवळ सामूहिक गुणवत्तेला नकार दिल्याने ३५ हजार वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियातल्या टास्मानिया बेटांवर वस्तीला असलेल्या आदिवासी जमाती काळाच्या ओघात मागे पडत गेल्या. अधोगतीचे बळी ठरलेल्या टास्मानियन लोकांचा पहिल्यांदा शोध लागला तो, ब्रिटिशांना. नव्या प्रदेशाच्या शोधात असलेले ब्रिटिश टास्मानियन आदिवासींना पाहून हबकले, कारण, या लोकांकडे थंडीपासून बचाव करणारे कपडे नव्हते, मासेमारीची वा वन्य पशूंच्या शिकारीसाठी आवश्यक टोकदार अशी आयुधं नव्हती, समुद्राच्या पाण्यावर प्रवास करण्यासाठी आवश्यक सुरक्षित अशी तराफा वा बोट नव्हती. जगापासून अलिप्त राहिल्याच्या काळात सुकलेल्या गवताच्या गंजींपासून त्यांनी जो काही तराफा बनवला होता, तो दर्जाहीन आणि उपयुक्तताशून्य होता. तो एकतर पुरुष वल्हवून पुढे नेऊ शकत होते, अन्यथा महिलांना पाण्यात पोहत राहून तो पुढे-पुढे ढकलावा लागत होता. त्यामुळे एकतर हा तराफा किनाऱ्याला लागण्याआधीच समुद्र वा नदीच्या पाण्यात बुडून जात होता, वाटेत तुटूनही जात होता. त्यामुळे टास्मानियन जमातीतल्या टोळ्यांना जगाशी संपर्क ठेवणं अवघड ठरत होतं. स्थलांतराअभावी ज्ञानाचं-

**माणसाचं एका जागेकडून दुसऱ्या जागेकडे स्थलांतर महत्वाचं. सामूहिक गुणवत्तेतून आकारास आलेल्या व्यवस्थेने माणसाला व्यापार-व्यवहाराची प्रेरणा दिली. असं म्हणतात की, व्यापार बहरला की, सर्जनशीलता आणि परस्परभिन्न संस्कृती-परंपरांबद्दलची आत्मियताही विस्तारते. व्यापार-व्यवहार घडला नसता, तर मानवी जगण्यात प्रगतीची शक्यताच निर्माण झाली नसती. इतिहासाच्या ज्या-ज्या टप्प्यांवर या प्रक्रिया सुलभपणे घडत गेल्या, माणसाची प्रगती उत्तरोत्तर होत गेली. पण जेव्हा कधी या प्रक्रियेत खंड पडला, माणसाने स्वत:चाच घात करून घेतला.**





**जर्मनीने मानवी प्रगती आणि समृद्धीला सहाय्यभूत ठरणारं हे वैश्विक सत्य ओळखून सध्या तरी समंजस भूमिका घेतली आहे.**

संस्कृतीचं आदान-प्रदान थांबत गेल्याने हाच काळ जमातीसाठी अधोगतीकडे नेणारा ठरला होता. हाच साधारण प्रकार अंदमानातल्या जमातींबाबतही घडत होता. आज एकविसाव्या शतकातही अंदमानातल्या जारवा, सेंटिनेल आदी जमाती आदिमानव काळातलं जिणं जगताहेत आणि जग त्यांच्याकडे आपलं सांस्कृतिक लेणं म्हणून बघण्याची हौस भागवून घेतंय. खरं तर या जमाती हा आपला सांस्कृतिक वारसा नव्हे, मानवी अधोगतीचं धडधडीत प्रतीक आहेत.

ऱ्हाइस जोन्स नावाच्या पुरातत्व संशोधकाने प्रथम टास्मानियन जमातीच्या अधोगतीचे निदान करताना स्लो स्टँग्युलेशन ऑफ दी माइंड' असे निरीक्षण मांडले होते. परंतु त्यांचे हे म्हणणे पुढे त्यांच्याच सहकाऱ्यांनी खोडून काढले. ते खोडून काढताना त्यांच्या सहकाऱ्यांच्या असे लक्षात आले होते की, टास्मानियन जमातीतल्या माणसाच्या बुद्धिमत्तेत काहीही दोष नव्हता. दोष वैयक्तिक बुद्धिमत्तेच्या आधारे आकारास न आलेल्या त्यांच्या सामूहिक गुणवत्तेत होता. जमातीचं अलिप्त राहणं, स्वयंपूर्णता या दोन गोष्टी त्यांच्या मुळाशी आल्या होत्या. त्यांच्या अधोगतीचं प्रमुख कारण ठरल्या होत्या. म्हणजेच गुणवत्ता आणि व्यापार-व्यवहाराची देवाण-घेवाण मानवी प्रगतीत फार महत्त्वाची भूमिका बजावत आली आहे. स्थलांतर या प्रक्रियेचा 'ड्राइव्हिंग फोर्स' राहिला आहे. हे एकदा समजून घेतलं की, स्थलांतर मग ते सक्तीचं असो वा स्वेच्छेने झालेलं, ते गरजेचं की बिनगरजेचं, हा प्रश्नच बिनमहत्त्वाचा ठरतो. स्थलांतरित किंवा निर्वासित आमच्या इथेच कशाला मरायला येतात, ही टिप्पणीसुद्धा आत्मघातकी ठरते.

मानवी स्थलांतराची प्रक्रिया वेदनादायी आहे हे खरेच, तरीही या वेदनेतून अमेरिका-ऑस्ट्रेलियासारखे संपन्न देश आकारास आले आहेत, याच वेदनेतून दोन टोकांवर फुलत गेलेल्या संस्कृतींचा संकरही घडून आला आहे; धर्म आणि परंपरांचा, संगीत, नृत्य, नाट्य, चित्र-शिल्प आदी कलांचा विस्तारही घडून आलेला आहे. त्या अर्थाने स्थलांतराच्या प्रक्रियेने सृजनाचं बीज रोवत माणसाचं जगणं अधिक वैविध्यपूर्ण, अधिक अर्थपूर्ण केलं आहे. या घडीला अमेरिका ही महासत्ता आणि न्यूयॉर्क ही जगाची आर्थिक राजधानी गणली जाते. परंतु २० व्या शतकापर्यंत महासत्तेचा हा

भारतातील कलेचा विस्तार आणि त्यात वेळोवेळी होत गेलेले बदल, नव्या कलांशैलींचा झालेला उदय यामागे देखील नागरीकरण आणि त्यासाठी होत असलेले स्थलांतर कारणीभूत ठरलं आहे.
संदर्भ- बौद्ध कलेचा इतिहास या कार्यशाळेत डॉ. अरविंद जामखेडकर यांनी दिलेले व्याख्यान

### नागरीकरण आणि प्रगतीची शाश्वत वाट...

भारतातील दुसऱ्या नागरिकरणाच्या प्रक्रियेशी बौद्ध धर्माचा भारतातील उदय जोडला गेला आहे. नागरिकरणाच्या प्रक्रियेमध्ये स्थलांतर हा अनुस्युत असलेला भाग असतो. लोक विविध ठिकाणाहून शहराच्या दिशेने जातात, त्या प्रक्रियेमध्येच नगरे, महानगरे अस्तित्वात येत असतात. भारतातील दुसऱ्या नागरीकरणाच्या कालखंडामध्ये जैन आणि बौद्ध हे दोन नागर धर्म अस्तित्त्वात आले. या नागर धर्मांनी त्या वेळचे प्रगत तंत्रज्ञान लोकांमध्ये रुजवण्याचे काम केले. हा भारतातील लोहयुगाशी जोडलेला भाग होता. याच कालखंडापूर्वीही महाराष्ट्रात शेती होत होती. पण त्यासाठी लाकडाचा नांगर वापरला जात होता. पण उत्तर भारतातून गंगेच्या खोऱ्यातून आलेल्या बौद्ध भिक्खूंनी लोखंडाचा नांगराचा फाळ महाराष्ट्रात आणल्याचा उल्लेख सोपाऱ्याच्या पूर्णाच्या कथेत वाचायला मिळतो. या लोखंडी फाळामुळे शेतीच्या तंत्रामध्ये आमूलाग्र बदल झाला.
- (संदर्भ- सोपाऱ्याच्या पूर्णाची, बौद्ध संप्रदायाची कथा)



मान इंग्लंडला होता आणि लंडन हे त्या काळी जागतिक महानगर होतं. संपूर्ण जगावर नियंत्रणही याच लंडन शहरामधून ठेवलं जात होतं. लंडनच्या जन्मापासूनच रोमन, जर्मन, आयरिश, फ्रेंच या सगळ्यांनी मिळून लंडन आणि इंग्लंडला आकार दिला होता. औद्योगिक-सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातले क्रांतिकारक बदल मुख्यत्वे लंडन आणि इंग्लंडच्या साक्षीने घडले होते. १६६२ हा ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात घडून येणाऱ्या क्रांतीचा आरंभबिंदू होत्या. त्या वर्षी लंडन रॉयल सोसायटीची स्थापना झाली होती. १६६५ मध्ये रॉबर्ट हूक या शास्त्रज्ञाने सूक्ष्मदर्शकाचा शोध लावला होता. त्याच दरम्यान, रॉबर्ट बॉयलने रसायनशास्त्राची मुहूर्तमेढ रोवली होती. अठरावे शतक 'एज ऑफ एनलायटनमेंट'चे ठरले होते. १७६० मध्ये जेम्स वॅटने वाफेवर चालणाऱ्या यंत्राचा शोध लावला होता. १७८३ मध्ये जगातली पहिली कापड गिरणी मँचेस्टर इथे उभी राहिली होती. १८१४ मध्ये जॉर्ज स्टिफन्सनने बनवलेले वाफेचे इंजिन रेल्वे रुळांवरून धावले होते. १८३०मध्ये जगात पहिल्यांदा लंडनच्या रस्त्यांवर गॅसचे दिवे पेटले होते. १८८० मध्ये लंडनमध्ये पाणी शुद्धीकरणाचे तंत्र विकसित झाले होते. अशी मानवी प्रगती आणि समृद्धीची दमदार पावलं उमटल्यामुळेच जगाचे नेतृत्व आपसूक इंग्लंडकडे गेलं होतं. या सगळ्याच्या मुळाशी नि:शंसय सामूहिक गुणवत्तेवर आधारित कौशल्य आणि या परिस्थितीला पोषक ठरणारी स्थलांतराची प्रक्रिया होती.

जर्मनीने मानवी प्रगती आणि समृद्धीला सहाय्यभूत ठरणारं हे वैश्विक सत्य ओळखून सध्या तरी समंजस भूमिका घेतली आहे. यंदाच्या वर्षी जवळपास ८ लाख स्थलांतरितांना सामावून घेण्याचं अधिकृत धोरणच जर्मनीने जाहीर केलं आहे. त्यातल्या त्यात युरोपियन युनियनचा भाग नसला तरीही, युरोपवर प्रभाव असलेल्या इंग्लंडनेही प्रतिष्ठेपोटी आपली दारं स्थलांतरितांसाठी खुली करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, इंग्लंड-जर्मनीइतकं शहाणपण युरोपातले इतर पुढारलेले देश दाखवायला तयार नाहीत. या सगळ्या देशांना पश्चिम आशिया येणारे स्थलांतरित, ही मोठी घाण वाटतेय. हे स्थलांतरीत इस्लामच्या नावाने आपल्यावर अतिक्रमण करतील, असा कांगावा केला जातोय. पण एक गोष्ट युरोपातले हे सगळे स्वाभिमानी देश आणि त्या देशातले राष्ट्रभक्त लोक विसरताहेत की, २०२० पर्यंत पश्चिमी युरोपातल्या देशांतल्या लोकसंख्येचे सरासरी वय ४५ असणार आहे. अमेरिकेत हीच सरासरी ३७ पर्यंत पोहोचलेली असणार आहे. म्हणजेच, युरोप असो वा अमेरिका दोन्ही ठिकाणी तरुण मनुष्यबळाची मागणी खूप मोठी असणार आहे. हे मनुष्यबळ नाकारण्याची मस्ती, वर्तमानात जरी खपून गेली, तरीही भविष्यात मनुष्यबळ आयात करण्यावाचून या देशांकडे पर्याय नसणार आहे.

केवळ स्थलांतर नव्हे तर वेळोवेळी निसर्गामध्ये झालेल्या महत्त्वाच्या बदलांनी म्हणजेच आलेलं हिमयुग किंवा उष्मयुग यामुळे त्याच्याशी जुळवून घेण्यासाठी मानवाने मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले आहे. त्या प्रक्रियेमध्ये तो उत्क्रांतही झाल्याचे विज्ञानानं सिद्ध झालं आहे. मानवाला मिळालेल्या मोठ्या नैसर्गिक आव्हानांशी आणि बदलांशी त्याचं स्थलांतर जोडलं गेलं आहे. त्यामुळेच माणसाचा इतिहास हा स्थलांतराचा इतिहास आहे.
- डॉ. कुरुष दलाल, क्लायमेंट चेंज ॲण्ड अपॉर्च्युनिटी या परिषदेत केलेले भाषण, मुंबई विद्यापीठ, २०१२

**इंग्लंड-जर्मनीइतकं शहाणपण युरोपातले इतर पुढारलेले देश दाखवायला तयार नाहीत. या सगळ्या देशांना पश्चिम आशिया येणारे स्थलांतरित, ही मोठी घाण वाटतेय. हे स्थलांतरीत इस्लामच्या नावाने आपल्यावर अतिक्रमण करतील, असा कांगावा केला जातोय.**

अर्थात, स्थलांतरितांना स्वीकारणं-नाकारणं त्या-त्या वेळच्या राजकीय-सामाजिक-आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असणार आहे, हेही खरंच आहे. अशा वेळी वर्तमानाचा संदर्भ घेऊन भविष्याचं चित्र रेखाटताना असं ढोबळपणे म्हणता येईल की, पारंपरिक (सामाजिक-आर्थिक विषमता, विकसित देशांची आर्थिक वृद्धी, नागरीकरण, शैक्षणिक आकांक्षा, विकसित देशांतील वृध्दत्वाकडे झुकू लागलेली लोकसंख्या, वातावरण बदल आणि नैसर्गिक आपत्ती) आणि अपारंपरिक कारणांमुळे (दहशतवाद, यादवी युद्धे, टोळी युद्धे आदी) विकसित देशांकडे घेऊन जाणाऱ्या स्थलांतराच्या वाटा हळूहळू बुजू लागल्या आहेत. जगात अमेरिका-कॅनडा, पश्चिम युरोप, रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया हे विकसित देश-खंड आहेत. यातल्या युरोप-अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया खंडाकडे मानवी स्थलांतरांचा ओघ शतकभरापासून कायम आहे. परंतु, स्थलांतराचा एक प्रवाह मागास देशांकडून विकसनशील देश, असाही राहिला आहे. तो प्रवाह मात्र खंडित होण्याचा धोका असल्यानेच, आज युरोप-अमेरिका या दोन खंडांकडे धाव घेणाऱ्या स्थलांतरितांची संख्या दिसामाजी वाढताना दिसतेय.

यापूर्वी आफ्रिका आणि भारतीय उपखंडातल्या विकसनशील तसेच आर्थिकदृष्ट्या मागास देशांतील स्थलांतरितांचा मोठा भार पश्चिम आशियातले तेलसंपन्न देश पेलत आले होते. राजेशाही सत्ता असलेल्या या वाटेवर पैसा होता, पण माणूस म्हणून सन्मान नव्हता. परंतु स्थलांतराच्या त्याही वाटा सततच्या हिंसक संघर्षामुळे हळूहळू बुजत चालल्या आहेत. एकेकाळी आफ्रिका खंडातही स्थलांतर करण्याचा प्रघात होता, परंतु सततच्या यादवी युद्धांनी तोही खंड बाद ठरवला आहे. रशिया हा दादा देश, परंतु अमेरिकेसारखीच जगावर राज्य करण्याची महत्वाकांक्षा आणि हुकुमशाही पद्धतीची राजवट स्थलांतराच्या प्रक्रियेला पोषक राहिलेली नाही. चीन हा खरा तर आशिया खंडातला बलवान देश, परंतु तिथेसुद्धा कट्टर साम्यवादी धोरणांमुळे सामूहिक स्थलांतराला पोषक भूमी राहिलेली नाही. एरवी, धार्मिक कट्टरतेमुळे सर्वच देश बंदिस्त होत चालले आहेत. संशय आणि असुरक्षिततेच्या भीतीपोटी अधिकाधिक शस्त्रसज्ज होत चालले आहेत. आज जसे इंग्लंड-अमेरिकेत स्थलांतरविरोधी वातावरण आहे, तसेच ते भारतातही तयार झालेले आहे.

आज माणूस म्हणून नव्हे, धर्म, वंश, जात अशा वर्गवारीत देश आणि समूह एकवटू लागले आहेत. सामूहिक गुणवत्तेला हानीकारक वातावरणाची ही सुरुवात आहे. परंतु, आशावादी मंडळींचा एक वर्ग, युनोसारख्या संघटना जगाचा, पर्यायाने मानवी प्रगती आणि समृद्धीचा समतोल बिघडू देणार नाही, असे म्हणताहेत, तर माहिती-तंत्रज्ञानाच्या वेगवान घोड्यावर स्वार झालेला दुसरा वर्ग इंटरनेट नावाचं आयुध मानवी प्रगती-समृद्धीचा मार्ग वाहता ठेवील, याबाबत नि:शंक आहे. हे खरं की युरोप-अमेरिकेचं वर्चस्व असलं तरीही युनोच्या अस्तित्वामुळे उर्वरित जगाचा आवाज थोडाफार का होईना, ऐकला जातोय. पण इंटरनेट अवतरलंय, मानवी स्थलांतर सुरू राहिलं काय नि थांबलं काय, फारसा फरक पडणार नाही, असा दावा फारसा गांभीर्याने घेण्यासारखा नाही. कारण, इंटरनेट हा काही चमत्कार नाही, तो माणसाने लावलेला शोध

**आज युरोप-अमेरिका या दोन खंडांकडे धाव घेणाऱ्या स्थलांतरितांची संख्या दिसामाजी वाढताना दिसतेय. धार्मिक कट्टरतेमुळे सर्वच देश बंदिस्त होत चालले आहेत. संशय आणि असुरक्षिततेच्या भीतीपोटी अधिकाधिक शस्त्रसज्ज होत चालले आहेत. आज जसे इंग्लंड-अमेरिकेत स्थलांतरविरोधी वातावरण आहे, तसेच ते भारतातही तयार झालेले आहे. आज माणूस म्हणून नव्हे, धर्म, वंश, जात अशा वर्गवारीत देश आणि समूह एकवटू लागले आहेत. सामूहिक गुणवत्तेला हानीकारक वातावरणाची ही सुरुवात आहे.**

सिंधु संस्कृती म्हणजेच हडप्पा आणि मोहोंजोदारोची संस्कृती ही प्राचीन भारतीय संस्कृती मानली जाते. त्या काळातही मानवी स्थलांतराची प्रक्रिया घडत होती. महाराष्ट्रातल्या उस्मानाबाद जिल्ह्यातल्या तेर आणि प्रकाशे इथं हडप्पा संस्कृतीचे या ना त्या रुपात अवशेष सापडले आहेत. यातलं तेर हे तर जागतिक व्यापाराचं, त्यातही ज्याला आज इमिटेशन ज्वेलरी म्हणतात, तशा प्रकारच्या दागिन्यांच्या निर्मितीचं प्रमुख केंद्र होतं. तेर तिग्रीस आणि युफ्रेटस नदी खोऱ्यात वसलेल्या मेसोपोटेमिया आणि रोमशी व्यापाऱ्याने जोडलेलं गाव होतं. इतकेच नव्हे तर पुरातत्त्वतज्ज्ञांना आफ्रिकेच्या पूर्व किनारपट्टीवरील अनेक ठिकाणी सिंधु संस्कृतीचे पुरावे सापडले आहेत. त्यात हडप्पामध्ये वापरली गेलेल्या टेराकोट्टाच्या पट्टिका सापडल्या आहेत. या पट्टिकेवरील हडप्पाची भाषा अद्याप अज्ञात आहे. तिचा शोध घेण्याचे प्रयत्न आजवर अयशस्वी ठरले आहेत. या टेराकोट्टाच्या मातीच्या पट्टिकांवर विविध प्राण्यांची चित्रे आहेत. यांचा वापर व्यापारासाठी सिल म्हणून होत असावा, असा पुरातत्त्वतज्ज्ञांचा अंदाज आहे.

– सिंधु संस्कृतीचा इतिहास व जागतिक व्यापार संबंध- संशोधन प्रबंध, मुंबई विद्यापीठासाठी, विनायक परब

आहे. अर्थातच त्याचं नियंत्रणही माणसाच्या, पर्यायाने बलवान व्यवस्थांच्या हातात असणार आहे. याचा प्रत्यय पश्चिम आशियातील आणि देश, चीन, रशिया, भारत आदी देशातल्या नागरिकांना आतापासूनच येऊ लागला आहे. या देशांमध्ये इंटरनेटवर नियंत्रण आणणारे कायदे अस्तित्वात येऊ लागले आहेत. त्या कायद्यांच्या आधारे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मार्ग सोयीनुसार हळूहळू बंद केले जाताहेत. अशा अवस्थेत प्रत्यक्ष माणसाचे स्थलांतर हाच मानवी प्रगतीचा शाश्वत राजमार्ग असणार आहे.

म्हणूनच युरोपातल्या सध्याच्या स्थलांतरित–निर्वासितांच्या किंवा स्थलांतरित–निर्वासितांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे पाहताना उलटा विचार करत, समजा माणसाचं स्थलांतर थांबलं तर? असा प्रश्न व्यापक स्तरावर विचारणं खूप गरजेचं आहे. कारण दोष, स्थलांतराच्या प्रक्रियेचा वा त्या प्रक्रियेत सामील माणसांचा नव्हे तर देशोदेशीच्या नियोजनकर्त्यांचा, त्यांच्या संकुचित मनोवृत्ती आणि माणुसकीविरोधी ध्येय–धोरणांचा आहे, हे आजवरचा इतिहास एकदा–दोनदा नव्हे, हजारदा सिद्ध झालेलं आहे.

. . . . . . . . . . . . . . . . . . . .


**शेखर देशमुख**
भ्रमणध्वनी : ९८१९६९६६७६
deshmukhshekhar101@gmail.com

**संदर्भ साहित्य**

दी रॅशलन ऑप्टिमिस्ट–मॅट रिडली, हार्पर–कॉलिन्स पब्लिशर २०१०
एक्सेप्शनल पीपल–इयान गोल्डिन, जेफ्री कॅमेरॉन, मीरा बलराजन, प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस,२०११
लंडननामा–सुलक्षणा महाजन, रोहन प्रकाशन, २०१०.
डायस्पोरा डेव्हलपमेंट अँड डेमोक्रसी–देवेश कपूर, प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, २०१०
दी इकॉनॉमिस्ट –सप्टेंबर २०१५
फ्रंटलाइन–सप्टेंबर २०१५
पूरक माहिती विनायक परब.

**युरोपातल्या सध्याच्या स्थलांतरित–निर्वासितांच्या किंवा स्थलांतरित–निर्वासितांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे पाहताना उलटा विचार करत, समजा माणसाचं स्थलांतर थांबलं तर? असा प्रश्न व्यापक स्तरावर विचारणं खूप गरजेचं आहे.**

**ग्रंथाली प्रकाशित आणि शिल्पा खेर लिखित तीन पुस्तके प्रसिद्ध!**





सिमी या कथानायकाभोवती ही कथा फिरते. सिमीची मॅगनस व इतर चार मित्रांशी ओळख होते. हे चार मित्र जगातल्या वेगवेगळ्या भागातून आलेले आहेत. मॅगनस हा ऐलियन आहे. मॅगनस या पाच मुलांना त्यांच्यातल्या सुप्त शक्तीची जाणीव करून देतो. ही जाणीव करून देण्यासाठी काही स्वप्नप्रवास आहे. शेवटी मुलांना आपल्यामधील शक्तीची जाणीव होते. कळते की एकदा आपण ठरवले की या जगात अशक्य असं काहीच नाही.

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




अद्वैत–ॲन या दोन व्यक्तीभोवती ही कथा आहे. अद्वैत हा कॅप्टन भास्कर व आदिती यांचा अंध मुलगा. अद्वैत फ्रान्समध्ये शिकत असून पुन्हा भारतात येऊन काम करण्याची त्याला अनिवार ओढ आहे. ही कथा म्हणजे अद्वैत–ॲनचा भारतप्रवास आहे. यात त्यांना माह, जो, रॉन ह्या व्यक्ती भेटतात. इथलं अध्यात्म, समाजातील प्रचंड विषमता, गौरवशाली संस्कृती, एकीकडे हरवत चाललेली जीवनमूल्ये. यांचा मेळ साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**




ही कथा आजच्या तरुणांना मिहीरच्या आत्मचरित्राद्वारे आत्मविश्वास ही यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली आहे हा संदेश देण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे. मिहिर आणि त्याच्या सिव्हिलमध्ये गलेलठ्ठ पगाराची नोकरी, तसेच व्यवसाय करणाऱ्या मित्रांच्या गाठीभेटीतून झालेल्या संवादातून यशस्वी जीवनाचं रहस्य उलगडून दाखवलं आहे. दुसरे पुस्तक

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**




# अमेरिकन वैपुल्याची अडगळ

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**त्या**ग आणि भोग यांच्यात केव्हाच लग्नमोड होऊन आपण त्यागाला अध्यात्म्याच्या पुस्तकात कोंडून ठेवलं आणि फक्त भोगच खिशात ठेवला. असं अमेरिकेतच नव्हे तर हल्ली भारतातही आढळतं. अमेरिका मुळातच एक समृद्ध देश. त्यामुळे इथे भोगवादी होण्यास मुळीच वेळ लागत नाही. भौतिक वस्तूंचं संपादन करणं हा इथे धर्म समजतात. खरं म्हणजे तो भांडवलशाहीचा आत्माच. जनतेच्या खरेदीवर या राज्यप्रणालीचा डोलारा पुढे सरकतो.

अमेरिकन माणसाची घरं जगात सर्वात मोठी. त्यापुढे युरोपी किंवा जपानी लोकांची संकुलं झोपड्यांसारखी छोटेखानी वाटतात. अनेक वर्षांपूर्वी इंग्लंडमध्ये असताना आम्ही एका घराचे धनी झालो. पण त्याची अमेरिकन निवासस्थानाशी तुलना होत नाही.

सर्वसाधारण अमेरिकन माणसाच्या घरात गेलं तर काय आढळतं? वस्तूंची अडगळ. ते मोठं असलं तरी त्यात मावणार नाहीत एवढ्या गोष्टी असतात. मध्यमवर्गीय घरात सरासरी चार शयनगृहं, दोन-तीन स्नानगृहं, भली मोठी बैठक आणि एक नव्हे तर निदान दोन वाहनालयं. कारण त्याच्या घरी दोन वाहनं असतातच. पण घरमालक-मालकीण, शिवाय घरात किशोरवयीन मूल असेल तर त्याचा खटारा वेगळा.

एवढं सुविधायुक्त घर राहण्यास अपुरं का पडावं? कारण ते वस्तूंनी तुडुंब भरलेलं असतं. घरात चिरंजीवांच्या खोलीत जा. छोटूच्या खोलीत एवढी खेळणी आढळतात की ती क्लोजेट, कपाटं, अंथरूणाखालील व भोवतालची जागा व्यापून टाकतात. दर वाढदिवसाला आजी-आजोबा व नातेवाईक या वस्तू विकत घेऊन या बालकावर खेळण्यांचा वर्षाव करतात. शिवाय दरवेळी मॉलवर गेलं की, टीव्हीवर पाहिलेल्या अद्यावत खेळासाठी त्याचं रडगाणं सुरूच. ही खेळणी म्हणजे आपल्या भातुकलीचा खेळ नव्हे. ती आकारानं

**सर्वसाधारण अमेरिकन माणसाच्या घरात गेलं तर काय आढळतं? वस्तूंची अडगळ. ते मोठं असलं तरी त्यात मावणार नाहीत एवढ्या गोष्टी असतात. मध्यमवर्गीय घरात सरासरी चार शयनगृहं, दोन-तीन स्नानगृहं, भली मोठी बैठक आणि एक नव्हे तर निदान दोन वाहनालयं.**

मोठी असतात. त्यांचा पियानो घ्या. तो खऱ्या वाद्याएवढा मोठा नसला तरी कुत्र्याएवढा मोठा असतोच. थोडक्यात म्हणजे अमेरिकेतल्या मुलांना खेळण्यांची नशा लागलेली असते. या महासत्ताक राष्ट्रात जगातली फक्त ३.९ टक्के मुलं आहेत. पण ती जगातली ४० टक्के खेळणी वापरतात. भौतिकवादाचं सार यातच सामावलेलं आहे असं म्हणता येईल.

लवकरच ही खेळणी त्या खोलीत मावत नाहीत. मग खोलीबाहेर बोळीत त्यांचा ढीग लागतो. ती जागा अपुरी पडू लागल्यावर एकतर त्यांची तळघरात हकालपट्टी करण्यात येते नाहीतर गराजमध्ये थप्पी लावण्यात येते. अमेरिकेत चीनप्रमाणे 'एकच पुरे!' असा कायदा नाही. त्यामुळे अनेक घरात बहिणभाऊ सापडतात. म्हणजे या अडगळीला दोनच्या आकड्यात गुणल्यावरच वैपुल्याची खरी कल्पना येते.

पण लहान मुलांवर खापर कशाला फोडा? घरातले प्रौढ तोच कित्ता गिरवत असतात. प्रथम आपण मालकाच्या स्नानगृहाचा दौरा करू! उच्चभ्रू घरात मालक व मालकीण यांच्यासाठी स्वतंत्र स्नानगृहे सापडतात. पण सर्वसामान्यांच्या नशिबात ती व्यवस्था अजून आली नाही. समोरच्या आरशामागे एक किंवा दोन कपाटं लपलेली असतात. तो आरसा म्हणजे त्यांचं दार. ते उघडताना काळजी घ्यावी लागते. कारण त्यातल्या वस्तू बाहेर पडण्याची शक्यता. ते कपाट औषधाच्या गोळ्यांनी भरलेलं असतं. मालक-मालकीण धडधाकट असले तरी घरात औषधं सापडतातच. डोकदुखी, अपचन, बद्धकोष्ठता अशी दुखणी कुणाला होत नाहीत? कधी कधी तिथे मनोविकारावरच्या गोळ्याही असतात. अमेरिकेतल्या २५ टक्के स्त्रिया अशा गोळ्यांवर जगतात असं आढळून आलं आहे.

गोळ्यांशिवाय तिथे बँडेजेस, दाढीचं सामान, दंतमंजन, कंगवे अशा गोष्टी गर्दी करतात. अमेरिकन स्त्रिया आकर्षक दिसण्यासाठी मांड्या, पोटऱ्यांवरचे व काखेतले केस कापतात. त्यासाठी लागणारी शस्त्रंही तिथे आढळतात. एवढी सौंदर्यप्रसाधनं तिथे कोंबल्यावर अत्तराच्या बाटल्यांसाठी जागा कुठे राहणार! त्या बाहेर लावून ठेवण्यात येतात. इथे एका बाटलीनं काम चालत नाही. टीव्हीवरच्या जाहिरातीमुळे किंवा डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये प्रवेशस्थळी मनगटावर तिथल्या मुलीनं फवारे उडवल्यामुळे आपण त्या विकत घेण्यास उद्युक्त होतो आणि त्या काही स्वस्त नसतात. एक कुप्पी ८०-९० डॉलर म्हणजे पाच-साडेपाच हजार रुपयांच्या घरात. अशा अर्धा डझन बाटल्या तरी असतात. यावरून सौंदर्यप्रसाधनासाठी किती भांडवली गुंतवणूक करावी लागते याची कल्पना येईल.

आंघोळीसाठी फवाऱ्याखाली उभं राहिल्यावर अमेरिकेतील वैपुल्याचं दुसरं दर्शन घडतं. तिथे शांपू व कंडिशनरच्या बाटल्यांची रांग असते. त्या निरनिराळ्या कंपन्यांच्या बाटल्या निव्वळ लहरीनुसार घेतलेल्या असतात. पण हळूहळू त्यांची संख्या एवढी वाढते की तिथली जागा कमी पडते. यावरचं औषध एकच. मोठी बाथरूम करणे.

मालक व मालकीणीची क्लोजेट्स स्वतंत्र असतात. ही वस्त्रालयं कपड्यांनी व पादत्राणांनी तुडुंब भरलेली असतात. सर्वसामान्यांच्या घरात सरासरी २९ प्रकारचे जोडे व २४८ निरनिराळी वस्त्रं संग्रही असतात असा नुकताच शोध लागला. अशा वेळी 'मला काही नको. पाठीवर एक शर्ट असला की चालतं', हे भारतीय तत्त्वज्ञान किती तोकडं वाटतं याचा विचारच केलेला बरा. अर्थातच ही २९ प्रकारची खेटरं ठेवण्याएवढी क्लोजेट्समध्ये जागा नसते. म्हणून ती पुन्हा गराजमध्ये पाठवण्यात येतात.

अमेरिकन घरातलं स्वैपाकघर प्रशस्त

**अमेरिकेतल्या मुलांना खेळण्यांची नशा लागलेली असते. ती जगातली ४० टक्के खेळणी वापरतात. भौतिकवादाचं सार यातच सामावलेलं आहे. महाराष्ट्रात जेवढे दिवाळी अंक निघतात तेवढ्याच प्रकारचे अमेरिकेत सिरिल्स विकत मिळतात आणि दर आठवड्याला त्यात भर पडते. लहान मुलांचं ते आवडतं खाद्य. त्यांच्या आवडीची सर्व सिरिल्स संग्रही ठेवण्यास किती जागा लागत असेल याची कल्पना करणं कठीण.**





असतं. त्यात एक स्वतंत्र बेटच (Island) आढळतं. शिवाय पाकसाहित्य ठेवण्यासाठी अगणित कपाटं आणि कोठीची स्वतंत्र लहान खोली असते. परंतु अमेरिकन किराणा मालाच्या दुकानात तर ५०,००० हून अधिक वस्तू विकायला असतात. त्या शिवाय या देशात संसार चालत नाही. म्हणजे एवढं मोठं बेट व कोठडीची खोली असलेलं स्वैपाकघर लहान पडतं. त्यात हवाबंद पाण्याच्या २४ किंवा ४८ बाटल्यांचा किंवा कोकच्या कॅनस्चा गुच्छ ठेवण्यास जागाच उरत नाही. एकवेळ पाणी सोडून द्या. पण कोक या देशात जगण्यासाठी आवश्यक समजला जातो. पुन्हा या गोष्टींची बोळवण गराजमध्ये केली जाते. महाराष्ट्रात जेवढे दिवाळी अंक निघतात तेवढ्याच प्रकारचे अमेरिकेत सिरिल्स विकत मिळतात आणि दर आठवड्याला त्यात भर पडते. लहान मुलांचं ते आवडतं खाद्य. कारण त्यांच्या काही काही प्रकारात ४०-५० टक्के साखर असते असं आढळून आलं. त्यांच्या आवडीची सर्व सिरिल्स संग्रही ठेवण्यास किती जागा लागत असेल याची कल्पना करणं कठीण.

माझ्या मते घरातला सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे गराज. हे वाहनालय अर्थातच गाड्या ठेवण्यासाठी. पण तिथे क्वचितच वाहनं सापडतात. घरातली सगळी अडगळ तिथे साचल्यामुळे गाडी उभी करण्यास जागाच नसते. एकूण ७५ टक्के घरात अशी स्थिती आढळते. मग ती बाहेर ठेवावी लागते. इथल्या वस्तूत जे वैविध्य सापडतं ते घरात दुसरीकडे कुठेच दिसत नाही. इथे टेनिसच्या बॅट्स, बागेत काम करण्यास लागणारी मोठ्या उत्सुकतेनं विकत घेतलेली व क्वचितच वापरलेली उपकरणं, पाहुण्यांसाठी उपयोगात आणलेलं घडीचं अंथरूण, जुनी कागदपत्रं, अगणित खेटरं, कोकच्या बाटल्या, खेळ अशा विविध वस्तू सापडतात. गराज म्हणजे संसारात विसर पडलेल्या गोष्टींची स्मशानभूमी.

बदली झाली म्हणजे किंवा वासंतिक स्वच्छतेच्या मोहिमेत (Spring Cleaning) गराज सेल (Garage Sale) आयोजित केला जातो. याचा हेतू घरातल्या त्याज्य वस्तू दुसऱ्या कुणाच्या माथी मारणे व निवास संकुलात रिक्त जागा निर्माण करणे. म्हणजे मॉलवर गेल्यावर नवीन वस्तू विकत घेण्यास मार्ग मोकळा होतो. या विक्रीतून फार कमी कमाई होते. एकेकाळी मॉलवर विशिष्ट टायच्या (Tie) प्रेमात पडलेला व त्यासाठी ६५ डॉलर मोजणारा मालक आता ते कंठवस्त्र १० सेंटाला विकलं गेलं तर कृतज्ञता मानतो. याप्रमाणे घरातली अडगळ कमी करण्यात येते.

आजकालच्या इलेक्ट्रॉनिक संस्कृतीत नवीनच प्रकारची अडगळ सुरू झाली आहे. त्याला स्टिव्ह जॉब्ज जबाबदार आहे. त्याचा आयफोन काही घरात एकटा सापडत नाही. त्याबरोबर आयपॅड, आयट्यून, लॅपटॉप व नुकतंच बाजारात आलेलं आय घड्याळ असतंच. या सर्वात एक गुण सापडतो तो म्हणजे त्याच्या सारख्या नवीन आवृत्त्या बाजारात आणल्या जातात आणि जुन्यांची एकदम अडगळ निर्माण होते. जुन्याच्या विनाशातून नवीन सर्जनशील गोष्टी अस्तित्वात येतात असं गोंडस तत्त्वज्ञान या धडपडीमागे असलं तरी त्यामुळे तयार झालेल्या अडगळीचं काय करावं याचं उत्तर या तत्त्वज्ञानात सापडत नाही.

दहा-पंधरा हजार डॉलरचं अनोखं आय घड्याळ ॲपल कंपनीनं बाजारात नुकतंच आणलं. त्यात सोनं व हिरे असल्यामुळे ते गराज सेलमध्ये विकता येणार नाही. हे घड्याळ अमेरिकेत सध्या ३४९ डॉलरला विकत मिळतं पण ते जडजवाहीरमंडित उपकरण घरातली संपत्ती म्हणून ठेवणं भाग पडेल. त्यातलं तंत्रज्ञान भलेही जुनं झालं असेल; पण सोनं व हिरे कधीच कालबाह्य होणार नाहीत.

यावर उपाय म्हणून अध्यात्मप्रवण भारतीय माणूस म्हणेल की अशी बिकट

**घरातला सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे गराज. हे वाहनालय अर्थातच गाड्या ठेवण्यासाठी. पण तिथे क्वचितच वाहनं सापडतात. घरातली सगळी अडगळ तिथे साचल्यामुळे गाडी उभी करण्यास जागाच नसते. एकूण ७५ टक्के घरात अशी स्थिती आढळते. मग ती बाहेर ठेवावी लागते. इथल्या वस्तूत जे वैविध्य सापडतं ते घरात दुसरीकडे कुठेच दिसत नाही.**

परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच थोडं त्यागाकडे वळलं आणि मूठ आवळून धरली तर? अबब! अशी विचारसरणी भांडवलशाहीवादी देशात अधर्मीय समजण्यात येते. कारण त्यांचं ७० टक्के अर्थकारण ग्राहकांच्या खरेदीवर अवलंबून असतं. म्हणून त्यानं भोगाऐवजी त्याग केला तर देशाच्या अर्थव्यवस्थेला ग्रहण लागेल. एकदा बुशच्या कारकीर्दीत तर सरकारनं अर्थकारणाला उत्तेजन देण्यास सर्व करदात्यांना पैसे वाटले. मी त्या १५० डॉलरचं काय केलं ते आता आठवत नाही. पण ते खर्च करून माझ्यापरीनं अर्थकारणाला टेकू दिला असावा असं वाटतं. खरं म्हणजे भारतीय रेल्वेला किंवा एअर इंडियाला जसं नफा म्हणजे काय हे जसं ठाऊक नाही तसंच अमेरिकन माणूस बचत कशी करावी याविषयी अनभिज्ञ असतो. त्याला 'थोडी तरी शिल्लक पाड!' असं सांगणं म्हणजे व्रात्य मुलाला 'रडू नकोस!' अशी आज्ञा देण्यासारखं. त्याला खर्च करणे हा माणसाचा उपजत गुण वाटतो. भारतीय माणूस सरासरी ३० ते ३५ टक्के शिल्लक टाकतो तर अमेरिकन माणसाची बचत महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाप्रमाणे उणे असते. या बाबतीत त्याला सोबत आहे. खुद्द अमेरिकन सरकारच आपला गाडा चालवण्यासाठी दर मिनिटाला दहा लाख डॉलर (म्हणजे ६.२ कोटी रुपये) उसने घेते. मग ग्राहकानं उधारीवर नाही तर कर्ज काढून वस्तू विकत घेतल्या आणि राष्ट्रीय अर्थकारणात भर टाकण्याचं देशहित केलं तर बिघडलं कुठे?

या प्रवृत्तीला अमेरिकेतील जाहिरातबाजी उत्तेजन देते. इथल्या दूरचित्रवाणी जाहिरातींचा अखंड भडिमार सुरू असतो. मुत्रीघरात गेलं तरी त्यापासून सुटका होत नाही. समुद्रकाठावर सूर्यस्नान घेण्यासाठी पहुडलं तरी आकाशात धुरानं रेखाटलेली जाहिरात दिसतेच. प्रत्येक गोष्ट 'सवलती'च्या दरानं विकल्या जाण्याचा आभास निर्माण करण्यात आल्यामुळे ग्राहक खरेदी करण्याकडे आकृष्ट झाले तर नवल कसलं? माझंच बघा ना!


मी त्या दिवशी सामाजिक कार्य करण्याचं ठरवलं. म्हणजे मॉलवर गेलो. मला काहीही विकत घ्यायचं नव्हतं. पण 'मेसी'मध्ये १२५ डॉलरची विजार खरोखरीच १७ डॉलरला मिळाली. अशा वेळी 'त्या विजारीची जरूरी आहे का?' असा प्रश्न विचारणं म्हणजे एकांतात प्रेयसी भेटली तर 'तुला दोडक्याची भाजी आवडते का?' असा अकाव्यात्मक प्रश्न विचारल्यासारखं होईल. आता अशा लहरी खरेदीमुळे माझं वस्त्रालय खच्च भरलं आहे. म्हणून मोठं घर घ्यावं का याचा विचार डोक्यात कधीकधी येतो.

अव्याहत खरेदी करण्यासाठी या देशात पोषक वातावरण आहे. एक तर जीवनापयोगी वस्तूंचे भाव त्या मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यात येत असल्यामुळे डॉलरमध्ये तरी स्वस्त वाटतात. त्यामुळे एकाऐवजी चार प्रकारचे शांपू विकत घेतले तर खिशाला फार मोठी फोडणी बसत नाही. मी एकदा पुण्यातल्या मॉलवर गेलो आणि तिथले भाव बघून आयुष्यात प्रथमच रिकाम्या हातांनी परत आलो. त्यापेक्षा चांगल्या गुणवत्तेचे कपडे स्वस्त दरात अमेरिकेत विकले जातात.

दुसरं म्हणजे अमेरिकन माणसाचं उत्पन्न. तो सरासरी ५५,००० डॉलर वर्षाकाठी कमावत असल्यामुळे आणि खिशात पाच-सात पतपत्र भोकं पाडत असल्यामुळे ही खरेदी करण्यास त्याला फार ताण पडत नाही.

वस्तू विकत घेण्याची सुलभता त्यात भर घालते. मॉलवर जाणं बंद केलं म्हणून आजकाल खरेदी काही थांबत नाही. संगणकावर दोन-तीन टिचक्या मारल्या की दोन दिवसात ॲमेझॉन त्या अलिबाबासारखी वेबसाइट आपली इच्छा पूर्ण करते. हल्ली

**अमेरिकन माणूस बचत कशी करावी याविषयी अनभिज्ञ असतो. त्याला खर्च करणे हा माणसाचा उपजत गुण वाटतो. भारतीय माणूस सरासरी ३० ते ३५ टक्के शिल्लक टाकतो तर अमेरिकन माणसाची बचत महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाप्रमाणे उणे असते. अमेरिकन सरकारच आपला गाडा चालवण्यासाठी दर मिनिटाला दहा लाख डॉलर उसने घेते. मग ग्राहकानं कर्ज काढून वस्तू विकत घेतल्या आणि राष्ट्रीय अर्थकारणात भर टाकण्याचं देशहित केलं तर बिघडलं कुठे?**



**भौतिक प्राप्तीमुळे आयुष्य सुखी होतं का? याविषयीही संशोधन करण्यात आलं. ज्यांची घरं वस्तूंनी भरगच्च भरलेली असतात त्यांची मनःस्थिती अस्थिर व प्रक्षोभक असते असं मनोविकारतज्ज्ञांना आढळून आलं. हल्लीचं आयुष्य निरनिराळ्या ताणांनी भरलेलं असतं. त्यातला एक महत्त्वाचा ताण म्हणजे वस्तूंची वानवा नसून भरमसाठ वस्तुप्राप्ती. आपल्या वित्तराजधानीतलं जीवन जास्त दगदगीचं. तसंच वस्तुसंपादनाचा रोग जडलेल्यांचं. हे लोक एवढे तणावग्रस्त असतात की सर्व घर वस्तूंनी भरल्यामुळे त्यांना पाहुण्यांना घरी बोलावण्याची देखील लाज वाटते. या रोगावरचं उघड औषध म्हणजे मूठ आवळून धरणे हे नसून वस्तू घरात सुव्यवस्थितपणे कशा लावाव्यात याचं शिक्षण घेणे हे होय.**

महाजालावर होणारी खरेदी खूप वाढली आहे. एवढी की काही दुकानांचं अस्तित्वच धोक्यात आलं आहे. मला तर हे सर्व काही अमेरिकन माणसं न बघताच केवळ चित्र बघून दक्षिण कोरिया किंवा फिलिपाईनवरून वधू आयात करतात असं वाटतं. प्रत्यक्षात बघितल्याशिवाय, त्याला स्पर्श केल्याशिवाय मी काहीच विकत घेत नाही.

अमेरिकन माणसाला वस्तुप्राप्तीसाठी दोन दिवस थांबणं एक शिक्षाच वाटते. म्हणून जास्त पैसे भरले तर वस्तू एका दिवसात दारावर येऊ शकतात. पण हा विलंबदेखील अनेकांना सहन होत नाही. हा उताविळपणा लक्षात घेऊन ॲमॅझॉनचा संस्थापक व कार्यकारी मुख्याधिकारी जेफ बेझोनं ड्रोन्स (drones) वस्तूने पाठवण्याचे प्रयत्न सुरू केले. म्हणजे संगणकावर ऑर्डर दिली की आपण मागवलेल्या वस्तू घेऊन येणारं ते लघुयान लवकरच आपल्या अंगणात उतरेल व शीघ्रसुख अनुभवता येईल.

या वृत्तीला शास्त्रोक्त अधिष्ठान आहे असं शास्त्रज्ञांना आढळून आलं. कुठल्याही खरेदीपासून माणसाला क्षणिक सुख मिळतं. त्यावेळी मेंदूत डोपामीन (dopamin) नावाचं एक द्रव्य निर्माण होतं. सुखाचा या द्रव्याशी जवळचा संबंध आहे. मग बाजारात जाऊन आपण हे सुख विकत घेऊ शकतो का? या डोपामीनच्या गोळ्या फस्त केल्यानं वस्तुलाभाचं सुख अनुभवता येईल का? दुर्दैवानं ते शक्य नाही. याचं कारण असं की हे द्रव्य मेंदूत शिरण्यापूर्वीच शरीर त्याचा नाश करतं. ही डोपामीनप्रणीत संवेदना सारखी मिळत राहावी म्हणून ग्राहक नेहमी वस्तू संपादन करीत राहतो.




याचाच अर्थ असा की वस्तूप्राप्तीपेक्षा त्याची प्रक्रिया महत्त्वाची असते. त्यावेळी एक प्रकारची नशा चढते. शिकारीपेक्षा शिकार करण्याच्या प्रक्रियेत थरार असतो तसं. यावेळी वस्तू दुय्यम महत्त्वाची ठरते. अनेक लोकांच्या घरी वेष्टनात बांधलेल्या वस्तू जशाच्या तशा पडलेल्या दिसतात. विकत घेण्याचा आनंद ओसरला की वस्तूत फारसा रस राहत नाही.


महत्त्वाचा मुद्दा असा की या भौतिक प्राप्तीमुळे आयुष्य सुखी होतं का? याविषयीही संशोधन करण्यात आलं. ज्यांची घरं वस्तूंनी भरगच्च भरलेली असतात त्यांची मनःस्थिती अस्थिर व प्रक्षोभक असते असं मनोविकारतज्ज्ञांना आढळून आलं. हल्लीचं आयुष्य निरनिराळ्या ताणांनी भरलेलं असतं. त्यातला एक महत्त्वाचा ताण म्हणजे वस्तूंची वानवा नसून भरमसाठ वस्तुप्राप्ती. या ताणाचं एक लक्षण म्हणजे कॉर्टीसॉल (Cortisol) नावाच्या रक्तद्रव्याचं वाढलेलं प्रमाण. ते मुंबईकरांमध्ये नागपूरकरांपेक्षा जास्त असतं. कारण आपल्या वित्तराजधानीतलं जीवन जास्त दगदगीचं. तसंच वस्तुसंपादनाचा रोग जडलेल्यांचं. हे लोक एवढे तणावग्रस्त असतात की सर्व घर वस्तूंनी भरल्यामुळे त्यांना पाहुण्यांना घरी बोलावण्याची देखील लाज वाटते.

या रोगावरचं उघड औषध म्हणजे मूठ आवळून धरणे हे नसून वस्तू घरात सुव्यवस्थितपणे कशा लावाव्यात याचं शिक्षण घेणे हे होय. यासाठी या देशात वास्तुरचनाकारांचा एक स्वतंत्र धंदाच जन्माला आला आहे. हे तज्ज्ञ घरी येऊन सर्व वस्तू योग्यपणे लावून घराला थोडंतरी घरपण आणून देतात. त्यामुळे असंतुलित मन समतोल होतं. या व्यवसायाला अमेरिकेत तेजी आली आहे. संयुक्त महासंघाच्या एका अहवालानुसार १० सर्वाधिक सुखी किंवा आनंदी देशात अमेरिकेचा क्रम लागत नाही. ही आकडेवारी मला बोलकी वाटते. शेवटी भोगापेक्षा त्यागानेच जीवनाला तृप्ती लाभते हे भारतीय तत्त्वज्ञान खरं आहे असंच म्हणावं लागेल. नाही तर भौतिक वैपुल्याची अडगळ होते हेच खरं.

. . . . . . . . . . . . . . . . . . . . .


**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

latalabh@aol.com



महाराष्ट्राचे लाडके आबा आज आपल्यात नाहीत
त्यांचा अंजनी ते राजधानी असा प्रवास...
पुस्तकांच्या माध्यमातून वाचा !
विचारांनी आमच्यातच आहात...
शब्दरुपाने असणारच आहात...
म्हणूनच अपराजित आहात...
संस्कृती
सहृदय योद्धा
मी कसा घडलो
Marching on to Serve
'मी कसा घडलो'
संस्कृती प्रकाशन
६८८,नारायण पेठ,अप्पा बळवंत चौक,नू.म.वि.शाळेसमोर,पुणे-४११०३०
मो. ९८२३०६८२९२/९९२३६९२५७५
sanskrutiprakashan@yahoo.com
www.sanskrutiprakashan.com

# स्मार्ट सिटी स्वप्न की सत्य?

प्रभाकर भिडे

मार्च २०१४ मध्ये आपल्या लोकसभेची निवडणूक झाली. त्यांत भाजपने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार व प्रचारप्रमुख म्हणून घोषित केले. त्यांनी निवडणूक प्रचारामध्ये भारताच्या भवितव्यासंबंधी अनेक योजना जाहीर केल्या. त्या निवडणूक जाहीरनाम्यात समाविष्ट केल्या. त्यांतली एक योजना म्हणजे भारतात शंभर स्मार्ट सिटीची निर्मिती पुढील पाच वर्षांत करायची.


भारतीय जनतेने त्यांच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवून भाजपला बहुमताने निवडून दिले. १९७७ नंतर हे प्रथमच घडत होते. भाजपने पंतप्रधानांचा शपथविधी आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला. वर्षभरात सत्तेवर आल्यावर काही चांगल्या योजनांची अंमलबजावणी सुरु केली. सर्व लोकांसाठी जीवन ज्योती विमा योजना, जीवनसुरक्षा योजना, स्वच्छता अभियान, गॅस वितरण करणाऱ्या इतर असंघटित कामगारांसाठी मेडिक्लेम व इतर कल्याणकारी योजना– तशा प्रकारच्या जाहिराती दूरदर्शनवर व इतर संपर्क माध्यमांवर दिसू लागल्या. पण आता लोकांना उत्सुकता होती की 'स्मार्ट सिटी' योजनेचे काय झाले? तिची अंमलबजावणी केव्हा होणार?

पंतप्रधान कार्यालयातून या योजनेसाठी नागरी विकास (अर्बन डेव्हलपमेंट) खात्याला त्यासंबंधीच्या सूचना देऊन योजनेसाठी अंमलबजावणी, त्यासंबंधीची अपेक्षा व कार्यपद्धती याबद्दल सविस्तर निवेदन घोषित करण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या.

त्यांच्यातर्फे दीपास दास (दाश) यांनी स्मार्ट सिटी म्हणजे काय? तसेच त्याची अंमलबजावणीची कार्यपद्धती, अर्बन डेव्हलपमेंट खात्याची मान्यता वगैरेची माहिती आता प्रसिद्ध केली आहे.

शंभर स्मार्ट सिटी बांधायचे मिशन किंवा ध्येय कशा प्रकारे असेल याची एक सर्वांगीण रूपरेषा जनतेपुढे ठेवली गेली आहे. अर्थात कागदावर सर्व योजना अतिशय आकर्षक दिसतात पण आपण त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमी पडतो असा अनुभव आहे. मग ती धरणाची योजना असेल, फ्लायओव्हर, ब्रीज असेल– निश्चित वेळेमध्ये कोणतीच पुरी होत नाही. त्याकरिता अनेक कारणे सांगितली जातात आणि त्याचा खर्च कित्येक पटीने वाढतो. याला कोणतीच सरकारी यंत्रणा जबाबदार धरली जात नाही किंवा जसे शहरात होणाऱ्या अवैध बांधकामासाठी

**नरेंद्र मोदींनी निवडणूक प्रचारामध्ये भारताच्या भवितव्यासंबंधी अनेक योजना जाहीर केल्या. त्या निवडणूक जाहीरनाम्यात समाविष्ट केल्या. त्यांतली एक योजना म्हणजे भारतात शंभर स्मार्ट सिटीची निर्मिती पुढील पाच वर्षांत करायची. शंभर स्मार्ट सिटी बांधायचे मिशन किंवा ध्येय कशा प्रकारे असेल याची एक सर्वांगीण रूपरेषा जनतेपुढे ठेवली गेली आहे. अर्थात कागदावर सर्व योजना अतिशय आकर्षक दिसतात पण आपण त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमी पडतो असा अनुभव आहे.**



कुठल्याही नगरपालिकेच्या अधिकाऱ्याला दोषी धरले जात नाही. (फक्त अवैध बांधकाम पाडण्यासाठी धावाधाव होते.) सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे कायद्याची कडक (यशस्वी) अंमलबजावणी झाली पाहिजे किंवा तो विकतही घेता येता कामा नये. (नाहीतर सलमान खानला जामीन देण्यासाठी कोर्ट वेळ संपल्यावरही चालू ठेवले जाते. सामान्य माणसांना जामीन देण्यासाठी कोर्टाची वेळ संपते.) या गोष्टीचे कोणास काही वाटत नाही.

वाढते नागरीकरण थांबवणे आता कोणाच्याच हातात नाही. हे सत्य जितक्या लवकर आपण स्वीकारू तेवढे बरे. गावाकडून माणसे नोकरीसाठी, व्यवसायासाठी चित्रपटांत/ नाटकात करियर करण्यासाठी शहरात येतात. कारण येथे बऱ्याच संधी असतात. (महात्मा गांधींच्या म्हणण्यानुसार गावाच्या विकासाला महत्व दिले गेले नाही, तेथे आपण तरुण वर्गांना भवितव्यासाठी संधी निर्माण केल्या नाहीत, मग त्यांना शहरात येण्याशिवाय पर्याय नाही.) पूर्वी पुण्याला तरुण वर्ग फक्त शिक्षणाकरिता येत असे कारण पुणे विद्येचे माहेरघर होते. आता पुण्याचे महत्व आय टी हब, नारायण मूर्ती यांची इन्फोसिस व तत्सम कंपन्या याकरिता आहे. त्याकरिता शेकडो तरुण मुंबईहून, महाराष्ट्रातून पुण्याला येतात. त्यांची राहण्याची, ट्रान्सपोर्टची, पाणीपुरवठ्यापासूनची सर्व व्यवस्था करण्यासाठी महानगरपालिकेकडे काही भावी योजना आहे का? उत्तर नकारार्थी आहे. वाढती वस्ती मग शहराच्या आजूबाजूला वसू लागते. तेथे नागरी सुविधांवर प्रचंड ताण पाडतो. मग ती सार्वजनिक हॉस्पिटल असो की पाणीपुरवठा असो. आता पुण्याच्या भोवती पिंपरी चिंचवड असो की धायरी गाव असो, बांधकाम व्यावसायिक प्रथम इमारती उभ्या करतात मग नागरी सुविधा उपलब्ध करतो. पण बऱ्याच वेळा त्या पुरेशा नसतात. मग जास्त पैसे दिले की त्या काही प्रमाणात मिळू लागतात. याला काही प्रमाणात आळा बसावा याकरिता स्मार्ट सिटी योजनेचा विचार सुरु झाला.


काय आहे ही योजना?

खरे म्हणजे भारतात सुनियोजित शहर वसविण्याचा प्रयोग पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात केला. सध्या पंजाब व हरयाणाची राजधानी असलेले चंदिगड शहर या पद्धतीने वसविले गेले. सरळ मोठे रस्ते, इमारती व सरकारी कार्यालयासाठी नियोजित जागा, बाग, रस्ते, शाळा, यांसाठी प्रत्येक विभागात राखीव जागा, शहरी वाहतुकीसाठी पुरेशी बस व्यवस्था, टेलिफोन यंत्रणा, बाजार मॉल याचे प्लॅनिंग, सरकारी पातळीवर सामान्य लोकांना परवडतील अशी घरे अशा सर्व योजना प्रसिद्ध फ्रेंच वास्तुशास्त्रज्ञ व नगर रचनाकार ला कार्बुझिये या जगविख्यात माणसाच्या मार्गदर्शनाखाली अमलात आल्या. आता नुकतेच निधन पावलेले वास्तुरचनाकार चार्ल कोरिया त्या टीममध्ये होते. आज पन्नास वर्षांनंतरही चंदिगड मानवी वस्तीला व जीवनमानाला पोषक असे शहर आहे. तसेच पूर्वीच्या काही संस्थानिकांनी आपल्या राजधान्या मानवी जीवनाचा उत्कर्ष साधेल अशा बांधल्या आहेत. त्यामध्ये बडोदे, जयपूर, उदयपूर अशी अनेक शहरे आहेत. अजूनही ती शहरे बघितली की मानवी जीवनाला, राहणीमानाला पोषक असून ती मानवी विकासाची मूल्ये जपणारी शहरे वाटतात. माणसाला चांगले जीवन जगल्याचे समाधान मिळते.

आज शहरे ही लोकांची आशास्थाने किंवा संधी मिळण्याची ठिकाणे आहेत. ती शहरे समस्या न राहता उत्तरे झाली पाहिजेत. लोक जगण्याची आशा घेऊन शहरात येतात. शहरे त्यांना (मुंबई असो की पुणे) निराश करीत नाहीत. मराठी अभिनेता भारत गणेशपुरे



**भारतात सुनियोजित शहर वसविण्याचा प्रयोग पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात केला. चंदिगड शहर या पद्धतीने वसविले गेले. सरळ मोठे रस्ते, इमारती व सरकारी कार्यालयासाठी नियोजित जागा, बाग, रस्ते, शाळा, यांसाठी प्रत्येक विभागात राखीव जागा, शहरी वाहतुकीसाठी पुरेशी बस व्यवस्था, टेलिफोन यंत्रणा, बाजार मॉल याचे प्लॅनिंग, सरकारी पातळीवर सामान्य लोकांना परवडतील अशी घरे अशा सर्व योजना पन्नास वर्षांनंतरही चंदिगड मानवी वस्तीला व जीवनमानाला पोषक असे शहर आहे.**




**नवीन उभारल्या जाणाऱ्या शहरात स्मार्ट सिटीचे ध्येय किंवा मिशन गाठायचे असेल तर आवश्यक गोष्टी कुठल्या आहेत? जनतेच्या मूलभूत गरजांची परिपूर्ती करून लोकांच्या राहणीमान व जीवनमानास पोषक असे वातावरण निर्माण करणे. चोवीस तास पाणी व विजेची उपलब्धता सॅनिटेशन आणि सार्वजनिक कचरा व्यवस्था गतिमानतेने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पुरेशी पार्किंग व्यवस्था, सरकारी शाळांची व्यवस्था व समान शिक्षणपद्धती, सक्षम ड्रेनेजची व्यवस्था.**

म्हणतो की, मी मुंबईला कधीच नावे ठेवत नाही कारण मुंबईने मला बोलाविले नाही. मीच चांगल्या भवितव्यासाठी मुंबईला चिकटलो. मग कशाला नावे ठेवायची? राजकपूरच्या श्री ४२० चित्रपटात भिकाऱ्याच्या तोंडी एकाच वाक्य आहे- मुंबई जिंकायला सगळीकडून लोक येतात, पण मुंबई सर्वांना जिंकते. कितीही मोठा माणूस असला तरी मुंबईच्या सागरात तो मिठासारखा विरघळतो. येथील कचरा, घाण, गोंगाट गर्दी सहन करतो.) कारण इथे त्याला रोजी रोटी मिळते.

अशी शहरे वाईट असतील तर ती जगण्याला आवश्यक असलेल्या पोषक मूल्याच्या अभावामुळे. या मूल्यांची स्थापना किंवा पुनर्स्थापना कशी होऊ शकेल? त्याला सरकारच्या म्हणण्यानुसार स्मार्ट सिटी हे उत्तर असू शकेल. सरकारने स्मार्ट सिटीसंबंधी गाईडलाईन सूचना घोषित केल्यानंतर त्यामध्ये जे विभाग केले आहेत, त्यांत राज्य सरकारना वेगवेगळ्या मोठा शहरांमधील काही म्युनिसिपल वॉर्ड निवडण्याचे अधिकार दिले आहेत. त्यामध्ये ५०० एकरपर्यंतच्या (Retrofitting 500 -cres) च्या जागा निश्चित करायच्या आहेत. कनॉट प्लेस किंवा मुंबईचा भेंडी बाजार एरीया अशी उदाहरणे दिली आहेत.

दुसरी योजना आहे Greenfield 250 Acres बऱ्याच मोठ्या शहराबाहेरच्या मोकळ्या जागा घेऊन त्यांत जमीन सपाटीकरण / पुनरुभारणी करून त्याचा विकास करणे. यामध्ये आऊटर दिल्ली किंवा गुजरातमधील Gift City अशी उदाहरणे दिली आहेत.

तिसरी योजना आहे (Re developement 50 Acres) यामध्ये सध्या असलेल्या बिल्टप एरियाचा नवीन लेआऊट बनवून त्यात मूलभूत सोयी देऊन असलेल्या + नवीन योजनेची मदत घेऊन त्यांचा विकास घडविणे. जसे- दिल्लीमध्ये किडवाई नगर - अशी उदाहरणे दिली आहेत.

नवीन उभारल्या जाणाऱ्या शहरात स्मार्ट सिटीचे ध्येय किंवा मिशन गाठायचे असेल तर आवश्यक गोष्टी कुठल्या आहेत?

जनतेच्या मूलभूत गरजांची परिपूर्ती करून लोकांच्या राहणीमान व जीवनमानास पोषक असे वातावरण निर्माण करणे.

या शहरांत निश्चितपणे चोवीस तास पाणी व विजेची उपलब्धता असेल. जर त्यासंबंधी काही अडचण निर्माण झाली तर लोकांना संपर्कयंत्रणेद्वारा सूचना करणे आवश्यक आहे, ती अडचण दूर झाल्यावरही तशी सूचना दिली जाते.

सभोतालचे वातावरण स्वच्छ, राहण्याजोगा परिसर, पर्यावरणाचा विचार याची योग्य अंमलबजावणी होणे या गोष्टींचा समावेश आहे. सॅनिटेशन आणि सार्वजनिक कचरा व्यवस्था अतिशय सक्षमपणे राबविली जाईल.

गतिमानतेने चालणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था लोकांच्या सोयीची असून बसेसचे वेळापत्रक बस थांब्यावर लावलेले असेल. बसेस शक्यतो त्या वेळेनुसार चालणे गरजेचे आहे.

शहरांमध्ये I.T. Connection आणि ई- गव्हर्नर्स आवश्यक असून त्यामध्ये नागरिकांचा सहभाग असावा.

नागरिकांची सुरक्षितता व रक्षण (कोणत्याही अडचणी किंवा संकटसमयी) याचा पूर्ण विचार असेल.

नागरिकांना वरील सुविधांबाबत काही त्रुटी किंवा बदल झाल्यास तसे त्यांना कळविण्यासंबंधी सक्षम संपर्क यंत्रणा असेल.

अशा शहरामध्ये ऊर्जेचा योग्य वापर व आवश्यक तेथे तेलाच्या बचतीसंबंधी सूचना करणारी यंत्रणा आवश्यक आहे.

घन कचरा कंपोस्ट करण्यासाठी जागा व इतर कचऱ्यासाठी शुद्धीकरण यंत्रणा; यासाठी योग्य मीटर व्यवस्था असेल.

सगळ्यात महत्वाचे म्हणजे अशा शहरांत पुरेशी पार्किंग व्यवस्था असेल. ट्रॅफिकसाठी सुयोग्य यंत्रणा याची निर्मिती करावी लागेल.

स्मार्ट सिटीमध्ये प्रत्येक भागामध्ये सरकारी शाळांची व्यवस्था व सर्व शाळांमध्ये एकच व समान शिक्षणपद्धती व अभ्यासक्रम असणे गरजेचे आहे. प्रत्येक विभागामध्ये सार्वजनिक उद्याने, बागा आणि शहरांतील मोकळ्या जागेवर हिरवळ असेल.

सांडपाण्यासाठी सक्षम ड्रेनेजची व्यवस्था असावी. ही शहरे साधारण दहा लाख लोकवस्तींची असतील किंवा मोठ्या शहरांतील दहा लाख लोकवस्तीच्या विभागांचा यासाठी विचार करता येईल.

अशा शहरासाठी दरवर्षी प्रत्येक शंभर कोटी देण्यात येतील. ते पाच वर्षांपर्यंत देण्यात येतील याचाच अर्थ सरकारचा प्रत्येक शहरासाठी पाचशे कोटींपर्यंत खर्च अपेक्षित असेल.

पहिल्या वर्षी राज्य सरकार, महापालिका यांच्या सहकार्याने वीस शहरे निश्चित केली जातील. पुढील दोन वर्षे आणखी चाळीस शहरांचा विचार करण्यात येईल.

अशा तऱ्हेने शंभर शहरांची निर्मिती किंवा विकास करण्याची आणि आज अशा भकास झालेल्या शहरांतील लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी सरकारचा स्मार्ट सिटी, अमृत व सर्वांना परवडणारी घरे असा योजनांचा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न आहे. या तिन्ही योजनांसाठी चार लाख कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अशा शहरांची योजना राबविण्यासाठी अमेरिकेतील स्मार्ट सिटी कौन्सिलची मदत घेण्यात येईल.

या स्मार्ट सिटी योजनेसाठी शहर नियोजन तज्ज्ञांचा शंभरजणांचा गट तयार करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली किंवा देखरेखेखाली या शहरांची योजना राबविण्यात येईल.

प्रत्येक शहरामध्ये एक विशेष अभ्यासगट यंत्रणा निर्माण केली जाईल. त्यांच्यातर्फे स्मार्ट सिटी कृती आराखडा राबविण्यात येईल. अशा पद्धतीने केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना व



तत्संबंधी यंत्रणा निर्माण करून राज्य सरकारवर अशा शहरांची नावे ठरविण्यास सांगितले.

मुंबईत गर्दी वाढल्याने चाळीस वर्षांपूर्वी नवी मुंबईची निर्मिती करण्यात आली. नवीन मुंबईच्या उभारणीत गरिबांसाठी स्वस्त घरकुलाची रचना केली गेली. रस्ते सरळ, मोठे तयार केले गेले. राहण्याजोगी घरे बांधण्यासाठी वेगवेगळे विभाग करून त्यांची वेगवेगळ्या सेक्टरमध्ये आखणी केली गेली. नवी मुंबई हार्बरमार्गे मुंबईशी जोडून वाहतुकीची सोय केली गेली. तसेच नवी मुंबईची वेगळी बस सर्व्हिस सुरू झाली. नवी मुंबईतील स्टेशनांची रचना करताना सौंदर्य व स्वच्छता याचा विचार केला गेला. अजून तरी त्या स्टेशनवर मुंबईतील स्टेशनसारखा बकालपणा आढळत नाही. नवी मुंबईची रचना करताना चार्ल्स कोरियांनी सावली व प्रकाशाचा संगम साधला होता. आनंदी रहिवासाचे एक उदाहरण घालून दिले. पण काळाच्या ओघात व योग्य देखभालीमध्ये आपण कमी पडलो. आता शहरे खरोखरीच पुनरुज्जीवित करायची असतील तर चार्ल्स कोरियासारख्या नगररचनातज्ज्ञांचा सल्ला, मार्गदर्शन व सहभाग महत्वाचा आहे.

आपण बोलतो जास्त व कृती कमी करतो. मुंबईचे शांघाय करण्याची भाषा माजी मुख्यमंत्र्यांनी केली पण पुढे काय झाले? चीन

**चाळीस वर्षांपूर्वी नवी मुंबईची निर्मिती करण्यात आली. गरिबांसाठी स्वस्त घरकुलाची रचना केली गेली. रस्ते सरळ, मोठे तयार केले गेले. राहण्याजोगी घरे बांधण्यासाठी वेगवेगळे विभाग करून त्यांची वेगवेगळ्या सेक्टरमध्ये आखणी केली गेली. हार्बरमार्गे मुंबईशी जोडून वाहतुकीची सोय केली गेली. तसेच वेगळी बस सर्व्हिस सुरू झाली. स्टेशनांची रचना करताना सौंदर्य व स्वच्छता याचा विचार केला गेला. नवी मुंबईची रचना करताना चार्ल्स कोरियांनी सावली व प्रकाशाचा संगम साधला होता.**



एकापाठोपाठ एकेक शहरे बांधून समृद्ध कशी करतो हे जाणून घेण्याची इच्छा आपण करीत नाही. पण आपल्याकडे अनेक कारणे तयार असतात. चीनमध्ये लोकशाही नाही. त्यांनी ठरविले ते होऊ शकते. पण त्यांनी पाच वर्षांत केले ते आपणाला पंधरा वर्षांत जमत नाही.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरुत्थान योजना २००५ साली सुरु झाली. त्यामध्ये पुणे शहरांतील रस्ते सुधारणा, वाहतूक व्यवस्था, नदी सुधारणा, सांडपाणी प्रक्रियासंबंधीच्या योजना तयार झाल्या. त्यासाठी निधी मंजूर झाला. आता २०१५ साल आले तरी पुण्याच्या नदीची अवस्था वाईटच आहे. चाळीस टक्केही कामे झाली नाहीत. याला जबाबदार कोण ? सरकारइतकाच लोकांचा सहभाग, त्यांची सजगता. शहरे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी जनतेची सुद्धा असते. आपली उदासीनता याला कारणीभूत आहे. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे. (People are getting what they deserved.) माणसाला त्याच्या योग्यतेप्रमाणेच मिळते.

स्मार्ट सिटीची ही चर्चा चालू असतानाच (जून २०१५ मध्ये) ऑस्ट्रेलियातील पर्थ या स्मार्ट सिटीमध्ये राहण्याचा योग आला. ते स्वान नदीच्या काठावर बसले आहे. काठ दोन्ही बाजूला व्यवस्थित बांधले आहेत. त्यामध्ये कोणी कपडे धुवत नाही की गुरे धुवत नाहीत. काठावर सायकलस्वारांसाठी छोटासा ट्रॅक आहे. तसाच पायी चालणाऱ्यांसाठी छोटा रस्ता आहे. दोन्ही रस्ते डांबरी आहेत. तरी बोराएवढेसुद्धा खड्डे नाहीत. त्यापलीकडे नदीच्या काठावर हिरवळ व मोठेमोठे वृक्ष आहेत. ते वृक्ष जंगली असून त्याची खोडे पांढरी आहेत. पण झाडे बारा महिने हिरवीगार असतात. नदीकाठावर कधीही गेले तरी प्रसन्न वाटते. काही लोकांच्या खासगी बोटी असून ते शनिवार-रविवारी येऊन समुद्र पर्यटनाचा आनंद लुटतात. स्वान नदी पुढे समुद्राला मिळते. तेथे उपसागरात चांगले बंदर तयार झाले आहे. ते उत्तम राखले आहे. पर्थमधील सर्व रस्ते सरळ आडवे/उभे. सगळीकडे ऑटोमॅटिक सिग्नल यंत्रणा चोवीस तास काम करते. आपल्याकडे वाहनांचा वेग मर्यादित राहावा म्हणून स्पीड ब्रेकर असतात पण प्रत्येक स्पीडब्रेकरला प्रवाशांना हिसका बसतो. पर्थमध्ये अतिशय कमी उंचीचे पण रुंद स्पीडब्रेकर आहेत. त्यामुळे वाहनाच्या वेगावर नियंत्रण राहते व प्रवाशांना त्रास होत नाही. तेथे कितीतरी छोट्याछोट्या गोष्टीमधून मानवी जीवनाला समाधान व आनंद मिळावा अशी योजना असते. ज्या आपण सहजपणे करू शकतो.


तेथे प्राथमिक शिक्षणामध्ये सर्वत्र समान व्यवस्था व अभ्यासक्रम एकच असतो. प्रत्येक विभागातील शाळांमध्येच त्या विभागातील मुलांनी गेले पाहिजे. शिक्षण सार्वजनिक असून मोफत आहे. जर तो देशाचा रहिवासी नसेल तर त्याच्याकडून भरपूर फी घेतली जाते. इयत्ता पाचवीपर्यंत अभ्यास कमी, पण व्यक्तिमत्व विकास, वेगवेगळ्या कलांचा परिचय जास्त असतो, वेगवेगळ्या खेळांची सवय व इतर कलांमधून विद्यार्थ्याने आपले पुढील करियर निवडायचे असते. माध्यमिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना बराच अभ्यास असतो पण तोपर्यंत त्यांचा बौद्धिक विकास झालेला असतो. आपल्याकडे के. जी. पासूनचा अभ्यास हेच तत्व आहे.

पर्थमध्ये तीन विद्यापीठे आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, जॉन कार्टीन युनिव्हर्सिटी, मरडॉक युनिव्हर्सिटी. त्यामध्ये सर्व विभाग असून पेट्रोलियम व खनिज (खाणी) यांचे विशेष विभाग आहेत.

येथे खासगी गाड्यांचा प्रचंड वापर आहे तरी कोठेच रस्ते खराब झालेले नाहीत. विशेषतः डांबरी असूनसुद्धा. किंवा कोठेच ट्रॅफिक जॅम होत नाही (सक्षम वाहतूक व्यवस्था). ज्येष्ठ नागरिकांपासून लहान

**पर्थमधील सर्व रस्ते सरळ आडवे/उभे. सगळीकडे ऑटोमॅटिक सिग्नल यंत्रणा चोवीस तास काम करते. आपल्याकडे वाहनांचा वेग मर्यादित राहावा म्हणून स्पीड ब्रेकर असतात पण प्रत्येक स्पीडब्रेकरला प्रवाशांना हिसका बसतो. पर्थमध्ये अतिशय कमी उंचीचे पण रुंद स्पीडब्रेकर आहेत. त्यामुळे वाहनाच्या वेगावर नियंत्रण राहते व प्रवाशांना त्रास होत नाही. तेथे कितीतरी छोट्याछोट्या गोष्टीमधून मानवी जीवनाला समाधान व आनंद मिळावा अशी योजना असते. ज्या आपण सहजपणे करू शकतो.**

मुलांपर्यंत बसमध्ये चढण्या उतरण्यासाठी वेगळी व्यवस्था आहे. बसेस टाईमटेबलाप्रमाणे येतात. बसेसची संख्या व स्थिती पुरेशी आहे. शहरात जेवढी पर्यटन स्थळे आहेत ती अतिशय निगुतीने जपली जातात. त्यांची काळजी घेतली जाते. त्यासाठी प्रत्येक पर्यटकांकडून प्रवेश फी घेतली जाते. त्यांतूनच गाईडचा व इतर खर्च केला जातो. आपण शिवाजी महाराजांचे नाव घेतो. त्यांच्या रायगडावर आता लिफ्टने जाता येते. पण वर बघायचे काय? पूर्वीचा इतिहास काय होता? ह्या गोष्टी सांगण्यासाठी सरकारी स्तरावर मार्गदर्शकाची पुरेशी योजना नाही. लोक रायगडावर दोन तास भटकतात. जुन्या मोडक्या इमारती व महाराजांची छत्री व इतर वास्तू पाहतात. तेथे पूर्वी चांगल्या, स्वच्छ पाण्यासाठी तलाव होते. पण आपण त्याही व्यवस्था नीट पाहत नाही. लोक मजा करण्यासाठी रायगडावर जातात. जाताना दारूच्या बाटल्या बरोबर नेतात. ती संरक्षित वास्तू सुरक्षित कशी राहील याची काळजी करीत नाही. पूर्वीच्या कुलाबा जिल्ह्याचे नाव बदलून रायगड जिल्हा असे केले. त्यातून शिवभक्ती कशी फुलणार? (वास्तविक कुलाबा नावाचा किल्ला अलिबागला आहे. त्याचेच नाव जिल्ह्याला दिले होते. (आपण सवंग लोकप्रियतेच्या मागे जातो, ते आता सोडले पाहिजे.) रायगडावरील पूर्वीचे वैभव किंवा त्याची प्रतिकृती कशी उभी राहील हे पाहिले पाहिजे. त्याकरिता रायगडावर प्रवेश फी, मार्गदर्शक, सुरक्षारक्षक, देणगी स्वीकारण्याची



व्यवस्था एवढ्या साध्या गोष्टी आपण किंवा सरकार करीत नाही. गडावर दारूबंदी असावी. त्याऐवजी आपण समुद्रात तीनशे कोटी रुपये खर्चून स्मारक बांधायची योजना आखत आहोत. गमतीची गोष्ट म्हणजे 'महाराजांची वननिती' असा एक बोर्ड तेथे आहे, पण आपण रायगडावर एकही झाड लावले नाही. रायगडावर झाडी नाही. उघडा बोडका आहे.

याउलट पर्थमध्ये सर्वत्र मोकळी जागा आहे. तेथे हिरवळ आहे. (वास्तविक हा मुळात वालुकामय प्रदेश आहे.) सर्वत्र पुळणीसारखी बारीक वाळू दिसते. आपल्यासारखी काळी किंवा मुरमाड माती नाही.

सांडपाणी व्यवस्था, कचरा व्यवस्थापन अतिशय सक्षम आहे. मानवी जीवन व राहणीमान मूल्य याची जपणूक केली जाते. जागतिक सर्व्हेमध्ये मानवी जीवनाला राहण्यायोग्य अशा शहरांची क्रमवारी लावली

**पर्थमध्ये खासगी गाड्यांचा प्रचंड वापर आहे तरी कोठेच रस्ते खराब झालेले नाहीत. विशेषतः डांबरी असूनसुद्धा. किंवा कोठेच ट्रॅफिक जॅम होत नाही (सक्षम वाहतूक व्यवस्था). ज्येष्ठ नागरिकांपासून लहान मुलांपर्यंत बसमध्ये चढण्या उतरण्यासाठी वेगळी व्यवस्था आहे. बसेस टाईमटेबलाप्रमाणे येतात. बसेसची संख्या व स्थिती पुरेशी आहे.**



तर त्यात पर्थचा नंबर आठवा लागतो. मुंबईचा क्रमांक एकशेसतरा आहे. पर्थची लोकसंख्या अठरा लाख असून ते वेस्टर्न ऑस्ट्रेलिया राज्याची राजधानी आहे. शहरामध्ये फक्त मुख्य शहरांमध्ये (जसे आपल्याकडे फोर्ट किंवा कुलाबा एरीया आहेत.) बहुमजली इमारती आहेत. व्यापारी संकुले आहेत. बाकी सर्वत्र छोटी छोटी कौलारू किंवा पत्र्यांचे छत असलेली घरे आहेत. प्रत्येक घराभोवती छोटीशी पण सुंदर बाग आहे. लोक स्वतःहून स्वच्छता पाळतात. आपल्याकडे कुत्र्यांना सकाळी प्रातर्विधीसाठी रस्त्यावर आणतात. त्यांच्याकडे याला परवानगी नाही. मालकांनी पाळीव प्राण्यांची व्यवस्था ठराविक जागी करावी असा नियम आहे व तो कोणीच मोडीत नाही. ऑस्ट्रेलिया आपल्यासारखाच ब्रिटिश राजवटीखालील देश होता पण त्यांनी ब्रिटिशांचे चांगले गुण घेतले– जे नेमके आपण विसरलो. ब्रिटिशांची स्वच्छता, जुन्या वास्तूंची निगराणी, कमी बोलणे या गोष्टी घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या दूरचित्रवाहिन्यांचा प्रत्येक चॅनेलवर इतकी चर्चासत्रे असतात की त्यांचे विषय ऐकून हसू येते. त्यातून निष्पत्ती काही नाही. पण हे सर्व लोकांना आवडते म्हणूनच चालू आहे असे सांगितले जाते. असो.


या पार्श्वभूमीवर सर्वार्थाने स्मार्ट सिटी असलेले पर्थ बघितल्यावर केंद्र सरकारची योजना निश्चितपणे काळानुसार चालणारी, तरुण पिढीला त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य वाटेल. नवीन सरकारचा विचार व योजना निश्चितपणे चांगली आहे. त्यादृष्टीने मंत्रिमंडळातील ज्येष्ठ अधिकारी अशा तऱ्हेच्या शहरांचा अभ्यास करीत असल्याचे नमूद केले आहे. त्यांनी कोरिया, कॅनडा, नॉर्थ अमेरिका आणि नॉर्डिक देश यांच्याशी त्यासंबंधात संपर्क केल्याचे त्यांच्या टिपणीत नमूद केले आहे. मागच्या पिढीतील ज्येष्ठ अभियंता विश्वेश्वरय्या यांनी हैदराबाद व सिकंदराबाद अशा जोडशहरांची निर्मिती करून एक आदर्श समोर ठेवला आहे. असे नवीन संकल्पना घेऊन काम करणारे अभियंते आणि शहर रचनातज्ञ एकत्र आले तर काहीतरी चांगले घडेल अशी आशा ठेवण्यास हरकत नाही.

एकीकडे आपण स्वर्गातून गंगा पृथ्वीवर आणणाऱ्या भगीरथाची परंपरा सांगायची, मात्र जगात चांगल्या चाललेल्या गोष्टीची आपल्या परंपरा व संस्कृतीशी नाळ न जोडता तिचा वृथा अभिमान बाळगायचा. आशियातील छोट्या देशांनी उपलब्ध साधनसामग्रीमध्ये आपापले देश सुधारले. मग आपण त्यांचा कित्ता केव्हा गिरवणार? एकीकडे आपले पंतप्रधान म्हणतात की भारत जगातील सर्वात तरुण देश आहे. या स्मार्ट सिटी या योजनेनिमित्त ज्येष्ठांचे मार्गदर्शन व तरुण पिढीचे काम एकत्र आणून माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचे स्वप्न साकार करता येईल. तीच त्यांना योग्य श्रद्धांजली ठरेल.

काय होते त्यांचे स्वप्न? भारत २०२० साली जगातील एक महान आणि महत्वाची सत्ता असेल. याचाच अर्थ स्वप्न आणि सत्य एकत्र येतील. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की Action Speaks Louder Than Words. त्याचा प्रयत्न करुया.

**प्रभाकर शं. भिडे**
भ्रमणध्वनी : ९८९२५६३१५४
bhideprabhakar@gmail.com

**नवीन सरकारचा विचार व योजना निश्चितपणे चांगली आहे. मागच्या पिढीतील ज्येष्ठ अभियंता विश्वेश्वरय्या यांनी हैदराबाद व सिकंदराबाद अशा जोडशहरांची निर्मिती करून एक आदर्श समोर ठेवला आहे. असे नवीन संकल्पना घेऊन काम करणारे अभियंते आणि शहर रचनातज्ञ एकत्र आले तर काहीतरी चांगले घडेल अशी आशा ठेवण्यास हरकत नाही.**




IRDA Regn. No. 512
एलआयसीचा
जीवन रक्षक
Plan no. 827
UIN: 512N289V01
तुमच्या आनंदाचा रक्षक.
• जोखीम संरक्षण: खालीलपैकी जे अधिक असेल ते आणि लॉयल्टी ॲडिशन (जर असेल तर)
a. मूळ विमा रक्कम; किंवा
b. वार्षिक हप्त्याच्या 10 पट; किंवा
c. मृत्यूच्या तारखेपर्यंत भरलेल्या सर्व हप्त्यांचे 105%
• मुदतपूर्ती लाभ: मूळ विमा रक्कम अधिक लॉयल्टी ॲडिशन (जर असेल तर)
• पात्रता वय: 8 ते 55 वर्षे
• पॉलिसी कालावधी: किमान 10 वर्षे; कमाल 20 वर्षे
• किमान आणि कमाल विमा रक्कम: ₹ 75,000 - ₹ 2,00,000
आपल्या एजंट/शाखेशी संपर्क साधा किंवा
www.licindia.in ह्या आमच्या वेबसाइटला भेट द्या,
56767474 वर 'तुमच्या शहराचे नाव' (उदा. 'Mumbai') SMS करा.
Follow us: LIC India Forever
बनावट फोन कॉल्स आणि खोट्या व फसवणूक करणाऱ्या ऑफर्स पासून सावध रहा
विमा ही आग्रहाची विषयवस्तू आहे.
विक्री संपन्न करण्यापूर्वी कृपया जोखमीचे घटक,
नियम आणि अटींच्या तपशीलवार माहितीसाठी विक्री संबंधित पुस्तिका काळजीपूर्वक वाचा.
LIC/01/14-15/44/MAR
जीवनाच्या सोबतही, जीवनाच्या नंतरही.
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

# पुरस्कार, तिरस्कार, सोपस्कार इत्यादी

आपलं पुस्तक, चित्रपट, कलाकृती लोकांना आवडावी, असं प्रत्येक लेखक-कलाकाराला वाटतं. रसिकांनी त्याच्या पसंतीची पावती दिल्यावर होणारा आनंद तर त्याहून अधिक मोलाचा - अगदी पुरस्कारापेक्षाही जास्त! पण पुढं पुढं रसिकांच्या संख्येपेक्षा पुरस्कारच इतके वाढत जातात की, त्यांचं काय करायचं, कळेनासं होतं. सध्या साहित्य-कलेच्या प्रांतात पुरस्कार परत करण्याची जी लाट उसळली आहे, ती 'अडगळ कमी करण्याच्या हेतूने तर नाही ना?' असा प्रश्न काही रसिकांना पडला आणि प्रसिद्ध चित्रकार **प्रदीप म्हापसेकर** यांनी कुंचला हातात घेऊन त्याला असे रूप दिले...

('मी मराठी'च्या सौजन्याने)




मला सांगा या वयात पुरस्कार शोधायला वर
माळ्यावर चढायला हवेच होते का?


अरे देवा ..! तुम्ही  ते दोन्ही पुरस्कार परत केलेत
..आता मी हे कांदे बटाटे कशात ठेऊ?


मला वाटलेच होते तुम्ही ते डबडे परत
करणार ..मीच भंगारवाल्याला देऊन
टाकले . चांगले ५२ रुपये मिळालेत !


म्हणे लेखक ..! पुरस्कार परत करून चांगले आठ दिवस
झालेत .अजून पेपरात कुठे तुमचे साधे नाव नाही


आमचे हे अगदी खुळचट आहेत , पुरस्कार
घरात ठेवला नी मिक्सर तिकडे जमा
करून आलेत !


तो पुरस्कार ठेवा तिथेच !आधी ही तुमची रद्दी
ध्या कुणाला तरी

करिअरचं असं एक वळण.. जेव्हा आपल्याला मिळणाऱ्या संधीचं गांभीर्य कळलेलं नसतं. आपण आपल्या जगण्याच्या जोषात कामही करून मोकळे होतो.. खूप दिवसांनी, महिन्यांनी तर कधी वर्षांनी जाणवतं की मिळालेली ती संधी लाखमोलाची होती. आपण त्याचं सोनं केलं का? अशाच एका भूमिकेबद्दल मला लिहायचं आहे. मी कितपत न्याय दिला माहिती नाही. पण त्या भूमिकेने माझं मात्र सोनं केलं. त्या व्यक्तिरेखेचं नाव – रमा आंबेडकर.



# रमेत रमले रमणी मी...

## सोनाली कुलकर्णी

डॉ. जब्बार पटेलांबरोबर मला १९९४ साली 'मुक्ता' ह्या सिनेमात काम करायला मिळालं होतं. त्यांच्याबरोबर काम करणं ही अजिबात टेक्निकल प्रोसेस नसते.. डॉक्टरांबरोबर खूप वेळ घालवावा. त्यांच्या चिमुकल्या दरबारात सामील व्हावं.. तिथे खूप गोड गदारोळ चालू असतो. डॉक्टरांना सगळ्यांनी थांबावं, रेंगाळावं असं वाटत असतं. मला ह्याचा अंदाज अजून आला नव्हता.. निम्म्या वेळेला मी पुण्याहून आलेले असायचे किंवा मला पुण्याला परत तरी जायचं असायचं. त्यांनी मुक्ताचं शुटिंग पुण्यात केलं. पण नंतर १९९६–९७ साली 'आंबेडकर' ह्या चित्रपटाची तयारी मुंबईत एनएफडीसी कॅम्पमध्ये असलेल्या त्यांच्या ऑफिसात सुरू होती. मी मुंबईच्या ह्या भागात फारशी आले नव्हते. नेहरु तारांगण, एनएफडीसीची आलिशान इमारत, तिथलं थिएटर, आताची आर्ट गॅलरी ही निराळीच दुनिया वाटायची.

हे सगळं वातावरण आणि प्रशस्त प्रांगण ओलांडून आपण पहिल्या मजल्यावरच्या डॉक्टरांच्या ऑफिसमध्ये शिरलो की जवळजवळ एखाद्या लायब्ररीत शिरल्यासारखं वाटायचं. डॉ. जब्बार पटेल नावाचे लायब्रेरिअन, विचारवंत, दिग्दर्शक, हसतमुख चेहऱ्याने कुणाला तरी भारतीय राजकारणातली एखादी घटना आख्यायिकेसारखी रंगवून सांगताना दिसायचे. मी गेले त्या दिवशी ऑफिसच्या वरच्या स्टुडिओत बरीच चहलपहल होती. माझ्या आधी मोहन गोखलेंची लूक टेस्ट होती गांधीजींच्या भूमिकेसाठी. मी ऑफिसमध्ये शिरल्यापासून गांधीजींचा मुक्तपणे सर्वत्र संचार सुरू होता. त्यामुळे आधीच एक ऐतिहासिक टच् मिळाला होता. गांधीजी सर्व कामांमध्ये रस घेत होते. जिने चढउतार करत होते. इतरांना सल्ले, सूचना देत होते. मला तर दडपणच आल्यासारखं झालं होतं. आता आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त झालेले, तेव्हाही त्याच पॅशनने काम करणारे, रंगभूषाकार विक्रम गायकवाड जय्यत तयारीत होते. विक्रमसर शांतपणे काम करून मोकळे होतात. 'हे बघा मी ह्या

**खूप दिवसांनी, महिन्यांनी तर कधी वर्षांनी जाणवतं की मिळालेली ती संधी लाखमोलाची होती. आपण त्याचं सोनं केलं का? अशाच एका भूमिकेबद्दल मला लिहायचं आहे. मी कितपत न्याय दिला माहिती नाही. पण त्या भूमिकेने माझं मात्र सोनं केलं. त्या व्यक्तिरेखेचं नाव – रमा आंबेडकर.**




कलाकाराचा कायापालट केला हे अधोरेखित करून ज्याला त्याला सांगणं, ही त्यांची स्टाईलच नाही. कधी कधी तर ते इतके मग्न असतात कामात, सुचलेल्या विचारात आणि मेकअप करण्यात की, ते काहीतरी अद्‌भुत घडवतायत असं वाटतसुद्धा नाही. माझी ट्रायल सुरू करण्याआधी बसवलेल्या खुर्चीसमोरच्या आरशात जेव्हा गांधीजी डोकावले आणि चष्म्याच्या फ्रेमविषयी मराठीत बोलायला लागले, तेव्हा मी रीतसर चपापलेच!

माझ्या कानावर माधुरी दीक्षित, दीप्ती नवल वगैरे बरीच नावं आली होती रमा आंबेडकरांच्या भूमिकेसाठी.. आपला काही निभाव लागत नाही ह्याची मला जवळजवळ खात्री होती. पण डॉक्टरांची आज्ञा शिरसावंद्य मानून मी ट्रायलला गेले होते. किमान अयोग्य उमेदवार करण्याचं भाग्य तरी लाभावं म्हणून.. या दिवशी महेंद्र तेरेदेसाई, कांचन नायक, मदन रत्नपारखी इत्यादी डॉक्टरांचे उजवे हात आणि स्वत: डॉक्टर ह्यांनी रेफरन्स म्हणून मला रमाबाईंचा एक फोटो दाखवला. त्या खुर्चीवर बसलेल्या, सोबत तरुण आंबेडकर, कुटुंबीय आणि एक कुत्रा.. मी बराच वेळ त्या फोटोकडे पाहिलं. त्या फोटोत चेहऱ्यावर जे भाव होते.. त्याच्याशी मला नातंच सांगता येईना. त्यात अळवावरच्या पाण्यासारखं काहीतरी होतं. निर्लेप, किंचित मिटलेलं काहीतरी होतं त्या चेहऱ्यात.

विक्रमसर त्यांच्या सहाय्यकांबरोबर तयार होतेच. मी जसं फोटोकडे पाहिलं होतं.. आरपार घुसत, तसंच काहीसं विक्रमसर माझा चेहरा पाहत राहिले.. 'होईल, होईल' असं काहीतरी म्हणाले. आणि मग त्यांचे हात, बोटं झपाटल्यासारखी कामाला लागली. त्यांनी फारसा काही मेकअप केला नाही. चक्क पाच-दहा मिनिटांत ते समाधानाने मान डोलवायला लागले. मला त्यांनी अजून काहीतरी बदल करावे माझ्यात, थोडक्यात एक विविध आणि खूप प्रयत्न केल्याचा इफेक्ट तरी द्यावा असं वाटत होतं. पण तिथल्या सगळ्यांमध्ये मी बऱ्यापैकी








**रेफरन्स म्हणून मला रमाबाईंचा एक फोटो दाखवला. त्या खुर्चीवर बसलेल्या, सोबत तरुण आंबेडकर, कुटुंबीय आणि एक कुत्रा. मी बराच वेळ त्या फोटोकडे पाहिलं. त्या फोटोत चेहऱ्यावर जे भाव होते, त्याच्याशी मला नातंच सांगता येईना. त्यात अळवावरच्या पाण्यासारखं काहीतरी होतं. निर्लेप, किंचित मिटलेलं काहीतरी होतं त्या चेहऱ्यात.**

लिंबूटिंबू होते. त्यामुळे गुपचूप कपडे बदलून, साडी नेसून आले. विक्रमसर म्हणाले, 'फॅण्टॅस्टिक. बघ आरशात.' मी अवाक् झाले. फक्त नऊवारी साडीचं ते श्रेय नव्हतं. त्यांनी माझ्यात रमाबाई रंगवल्या होत्या. कशाप्रकारे ते त्यांचे तेच जाणोत. पण आरशात मला रमा आंबेडकरच दिसल्या.

अशोक मेहता आले. त्यांच्याबरोबर एक छोटा लवाजमा. माझं फोटोसेशन झालं. थोडंसं शुटिंग पण झालं. डॉक्टर म्हणाले, 'फर्स्टक्लास. हुबेहूब वाटतेस तू.' माझ्या आत का कोण जाणे काहीतरी कोमेजल्यासारखं झालं होतं. तो मी पाहिलेल्या फोटोचा परिणाम असावा, गांधीजींच्या धारदार निरखण्याचा असावा किंवा एवढं सगळं करून मला काही ही भूमिका मिळण्याची शक्यता नाही ह्याचा कॉम्प्लेक्स असेल. मला जायला सांगितल्यावर मी स्वत:चे कपडे घातले. जरा वेळ निकाल कधी कळेल हे विचारावं की नाही ह्या धाकधुकीत घालवला आणि मोहन गोखलेंच्या गांधीजींना बघण्यात दंग होऊन गेले. तंतोतंत गांधीजी. ते देहबोली बदलत होते, अँगल बदलत होते, चष्मा बदलत होते, गप्पा मारत होते. मला त्या वातावरणात आपण आसपास असणं फार लाखमोलाचं वाटत होतं.. तोपर्यंत मी सहा-सात सिनेमे केले होते.. करिअर नावाच्या उसळणाऱ्या प्रवाहाची ओळख एव्हाना झाली होती. तिथे होडी टाकायला मिळणार की नाही, माहीत नव्हतं. पण इतरांचं कसब बघायला मिळणं मोठं ठाव घेणारं वाटत होतं..

त्या बघण्याबरोबरच करण्याची जबाबदारी सोपवली गेली. इतर मोठ्या नावांचं काय आणि का झालं माहीत नाही. पण रमा आंबेडकरांची भूमिका मला मिळाली, असं कळल्यावर मुंबईच्या पुढच्या ट्रिपमध्ये 'आंबेडकर ऑफिस'ला गेल्यावर मी सरसावून तयारीला लागायचं ठरवलं. डॉक्टरांकडे मी फोटो, पुस्तक आणि फुटेज जे काही असेल ते मागितलं. डॉक्टर म्हणाले, 'फोटो दाखवला की तुला लूक टेस्टच्या दिवशी.' मी म्हटलं, 'हो, पण तो एकच होता. अजून जे काही असतील ते सगळे दाखवा.' डॉक्टर म्हणाले, 'अगं नाहीत फार. तू रमेचा संसार हे प्रकरण वाच. आपल्याकडे आहेत ती सगळी पुस्तकं वाच. तुला आंबेडकरांबद्दल जास्त कळेल.' मला रमाबाईंबद्दल जास्त माहिती हवी होती. चांगदेव खैरमोडे यांनी लिहिलेले आंबेडकर चरित्राचे खंड डॉक्टरांनी दिल्यावर रमाचं चरित्र समजलं, तरी प्रतिमा धूसरच राहिली होती. बराच उहापोह झाल्यावर फोटोंचं आणखी एक पाकीट डॉक्टरांच्या टेबलावर आलं. मी उत्साहानं डोकावले तर त्यात पुन्हा तो मी आधी पाहिलेलाच फॅमिली फोटो होता. इतर फोटो चाळल्यावर चक्क रमाबाईंचा एक सोलो फोटो हाती लागला. पण नीट पाहिल्यावर कळलं, की ती त्या फॅमिली फोटोतलीच छबी आहे. फक्त वेगळी काढून एनलार्ज केलेली. मी हिरमसून गेले. जे काही वाचलं त्यात काबाडकष्ट, आजारपण, एकटेपणा, त्याग ह्याचं वर्णन ममतेनं केलेलं दिसलं. मी तेव्हा साधारण बावीस वर्षांची होते. माझी पिढी, माझ्या जवानीचा जोष पाहता मला रमाबाई फार सपक वाटल्या.


हे लिहितानाही माझा हात थांबला दोनदा. कारण हे सुरुवातीचं वाटणं होतं. डॉक्टरांनी सिनेमाच्या निमित्तानं संशोधनच करायला घेतलं होतं. ते, सूनी तारापोरवाला आणि इतर सर्व सहाय्यक मिळून बाबासाहेबांच्या तळागाळात उतरले होते. डॉ. जब्बार पटेल भारताचा इतिहास आणि समाजकारण कोळून प्यायले आहेत. त्यात त्यांना माणसांविषयी, नेत्यांविषयी खास आत्मीयता. त्यांचं मन जाणणं, त्यांची समाजशीलता अभ्यासणं - हा डॉक्टरांचा छंद आणि गरज. ते एकटे विद्वान होऊ शकत नाहीत. सोबतच्या माणसांना सांगणं, शिकवणं ही त्यांची निकड असते. मी रमाबाईंबद्दल कुरकुर केल्यावर ते म्हणाले, 'अगं बाळे, विचार कर ना, त्या कशा जगल्या असतील.. तुझ्या पुण्याच्या घरी फोन आहे, तुझ्याकडे पेजर आहे. तू संपर्कात राहू शकतेस..सातासमुद्रापलीकडे असलेल्या नवऱ्याला भेटायला न मिळणं हे कसं सहन केलं असेल रमाबाईंनी!'

मी गप्प झाले.. विचार करायला लागले. हा नवा धडा होता. ॲक्टर म्हणून किती वाव आहे ॲक्टिंगला, ह्या चाकोरीबाहेर येऊन माणूस जाणून घेण्याची प्रक्रिया समोर चालून आली होती. ते माणूस काही दशकांपूर्वीचं होतं. पण माझ्याच मातीतलं होतं. स्त्रीचं होतं.

म्हटलं तर साधं आणि म्हटलं तर असामान्य होतं.. डॉक्टरांनी आणि त्यांच्या स्क्रिप्टने माझी रमाबाईंशी ओळख करून दिली आणि एका पॉंईटला मला त्या ओळखीपासून पळ काढावासा वाटू लागला. अठरा विश्वे दारिद्र्य, पण ते कुठे सांगायची सोय नाही. कारण इतक्या मोठ्या पुढाऱ्याची बायको सूर्य उगवण्यापूर्वी शेण गोळा करून, गोवऱ्या करून विकते हे जगाला कळलं तर केवढी नाचक्की झाली असती. त्यामुळे तांबडं फुटायच्या आधी प्रातर्विधी उरकून शेण गोळा करण्याची घाई. स्वत:च्या तब्येतीच्या नावानं आनंद होता. त्यात वारंवार येणारं गरोदरपण, बाळंतपणं आणि काही गर्भपात, शिवाय काही अपत्यांचे अकाली मृत्यू.. ह्या घटना लिहितानाही एक क्लिष्ट कंटाळा जाणवतो. मग मण्यांसारख्या ह्या घटना ओवत रमा नावाची एक मुलगी कशी जगली असेल? माझं धट्टंकट्टं असणं, स्वत: कमावणं, पुरात उडी टाकायला उत्सुक असणं आणि त्याच्या अगदी विरुद्ध हे एका जिवाचं जगणं वयाच्या बाविसाव्या वर्षी मला पिळवटून गेलं. का असं, ह्या प्रश्नाला 'काळ' हे उत्तर नव्हतं फक्त.. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, स्त्रियांचं स्थान, कुपोषण, अशिक्षितपणा, जातिव्यवस्था, अर्थकारण, आयुष्यमान आणि एखाद्याची परिस्थिती आणि उभारी घेऊ पाहणारं मन ह्याची एक किचकट नक्षी तयार झाली मनात.. असं वाटलं, माझ्याच वयाच्या, त्या रमाचा हात धरावा आणि म्हणावं, झुगारून टाक हे सगळे विळखे.. हे बघ मी तुला हात देतेय. ये बाहेर त्या उदासवाण्या अंधारातून.. मला वाटायचं, त्या हाताची एक वात होत जातेय मऊमऊ. मी कितीही हापसत राहिले तरी ती दौपद्रीच्या साडीसारखी संपतच नाही, संपतच नाही.. जरा वेळानं मीच दमून गुडघे टेकते तेव्हा त्या वातीला जब्बार पटेलांनी पेटवलेलं असायचं. एखादं माणूस गेल्यावर चाळणीखाली, टोपलीखाली दिवा लावतात, ना काही जणं.. ती पणती आहेत रमाबाई. गढुळलेल्या वातावरणात स्वत:च्या शक्तीनुसार तेवत राहणारी..

सिनेमातला माझा पहिलाच प्रसंग फार बोलका होता. रमाबाई दिराकडून पत्र लिहून घेत असतात. आंबेडकर इंग्लंड-अमेरिका-कुठे गेलेत, ते माहीत नसलेली. बोटीने परदेशी खूप लांब कुठेतरी गेलेत एवढंच तिला माहीत असतं. हवापाण्याची खबर द्यावी तितक्या वस्तुनिष्ठ पद्धतीनं घरच्यांची माहिती दिली जाते. आपलं एक बाळ गेलं. दुसऱ्याच्या औषधांसाठी पैसे नाहीत, पण तुम्ही काळजी करू नका. तुम्ही तुमचा अभ्यास नीट करा.. किती कळवळून आलं असेल खरं त्यांना हे सगळं सांगताना. त्या तरुण मनाला किती वाटलं असेल की, सोडा सगळं काम आणि या इकडे, इथे थांबा; आमची देखभाल करा. निर्णय घ्या. माझ्यासोबत राहा.. पण उघडपणे हे म्हणण्याचा तो काळ नव्हता. रमाबाईंनी नवऱ्यासाठी मूक प्रेम कसं व्यक्त केलं असेल? पत्रात शेवटचं वाक्य आहे, 'इथे सगळ्यांना तुमची आठवण येते.' आपण काय म्हणालो असतो? आय लव्ह यू, आय मिस यू.. किंवा अहो, मला तुमची खूप आठवण येते हो, असं सुद्धा म्हणण्याची मुभा घेतली नाही रमाबाईंनी. 'इथे सगळ्यांना' ह्या तृतीयपुरुषी अनेकवचनात - वाचणाऱ्यानं भावना समजून घ्यावी अशी अपेक्षा होती.

सर्कसमध्ये रिंगमास्टर प्राण्यांना 'टेम-डाऊन' करत असतो. तसे डॉक्टर आम्हा कलाकारांना आणि टेक्निशिअन्सना शांत करत असायचे. प्रेरणा देत असायचे. ह्या सिनेमात खूप मोठा हात आहे अनेकजणांचा. पैकी पहिला म्हणजे नितीन देसाई. त्याची स्वतंत्र कलादिग्दर्शक म्हणून सुरुवात होती. नितीनने केलेलं माझं स्वयंपाकघर, आमची चाळ, 'मूक नायक'चं ऑफिस, ट्राम, नवं घर, तिथली पुस्तकांची लायब्ररीवजा खोली.. हे सारं अवाक करणारं होतं. नव्हे, आजही आहे. त्यासाठी नितीनने किती पिसाटासारखं काम केलंय ते आम्ही प्रत्यक्ष पाहिलंय. आंबेडकरच्या सेटवर त्याची नवी कॉण्टेसा गाडी आली तेव्हा त्यांनी आम्हाला फिल्मसिटीतून एक चक्कर मारून आणली होती. त्याचा केवढा अभिमान वाटला होता तेव्हा.. तसाच अभिमान अशोक मेहता नावाच्या आमच्या सिनेमॅटोग्राफरबद्दलही वाटायचा. काय ते लायटिंग, काय त्या फ्रेम्स. किती प्रेमळपणा ह्या वेड्या माणसात! आजही कॅमेरामन लोकांनी एक-एक सीन डिसेक्ट





**मण्यांसारख्या ह्या घटना ओवत रमा नावाची एक मुलगी कशी जगली असेल? माझं धट्टंकट्टं असणं, स्वत: कमावणं, पुरात उडी टाकायला उत्सुक असणं आणि त्याच्या अगदी विरुद्ध हे एका जिवाचं जगणं वयाच्या बाविसाव्या वर्षी मला पिळवटून गेलं. का असं, ह्या प्रश्नाला 'काळ' हे उत्तर नव्हतं फक्त. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, स्त्रियांचं स्थान, कुपोषण, अशिक्षितपणा, जातिव्यवस्था, अर्थकारण, आयुष्यमान आणि एखाद्याची परिस्थिती आणि उभारी घेऊ पाहणारं मन ह्याची एक किचकट नक्षी तयार झाली मनात. असं वाटलं, माझ्याच वयाच्या, त्या रमाचा हात धरावा आणि म्हणावं, झुगारून टाक हे सगळे विळखे.**

**नितीनने केलेलं माझं स्वयंपाकघर, आमची चाळ, 'मूक नायक'चं ऑफिस, ट्राम, नवं घर, तिथली पुस्तकांची लायब्ररीवजा खोली हे अवाक करणारं होतं. नव्हे, आजही आहे. त्यासाठी नितीनने किती पिसाटासारखं काम केलंय ते आम्ही प्रत्यक्ष पाहिलंय. तसाच अभिमान अशोक मेहता नावाच्या आमच्या सिनेमॅटोग्राफरबद्दलही वाटायचा. काय ते लायटिंग, काय त्या फ्रेम्स. किती प्रेमळपणा ह्या वेड्या माणसात! आजही कॅमेरामन लोकांनी एक-एक सीन डिसेक्ट करून बघावा अभ्यास म्हणून.**

करून बघावा अभ्यास म्हणून. काळ कसा उभा करावा, प्रकाशाचा सोर्स कसा निर्माण करावा हे शिकण्यासाठी. मेहता पतिपत्नींना मूलबाळ नव्हतं. ते सगळ्यांनाच माया लावायचे. सेटवर कधीतरी त्यांची कुत्री यायची, तीही पॉश एसी कारमधून. तेव्हा विश्वास बसायचा नाही की, कधीतरी हा माणूस सेटवर चहा आणि वडे आणण्याचं काम करायचा.

भारताला गांधी ह्या सिनेमासाठी ऑस्कर मिळवून देणारी आंतरराष्ट्रीय किर्तीची वेशभूषाकार भानू अथैय्या. त्यांना ऑस्कर का मिळाले असेल किंवा त्या महान का आहेत ह्याची प्रचिती मला आमच्या आंबेडकरच्या सेटवर वारंवार आली. एक छोटा मोन्ताज होता. रमेला बाळ झालं आहे आणि वातावरण जरा आनंदी आहे असा. त्यात माझ्या कानाला काहीतरी बांधलेलं हवं होतं. भानुताई सेटवर आल्या तेव्हा मी फक्त पदर डोक्यावरून घेतला होता. भानुताईंनी त्यांच्या अख्ख्या कॉस्च्युम डिपार्टमेंटला जे फैलावर घेतलं! त्यांना त्या काळी एखाद्या जुन्या साडीचं, धडुत्याचं वापरून जुनं झालेलं, मऊ असं, कानाला कसं बांधायचे, तसं कापड/फडकं हवं होतं. त्यांना बाकीच्यांनी समजावून सांगितलं की, अहो पंधरा-वीस सेकंदांचा शॉट आहे फक्त. त्यावर भानुताई अजिबात बधल्या नाहीत. कानाला बांधायची ती जुनाट घडी मिळवायला तीन-चार तास लागले. तोपर्यंत त्यांनी शुटिंग थांबवून धरलं. मनासारखा कपडा मिळाल्यावर मगच त्यांनी हिरवा कंदील दाखवला.

किती शिकायला मिळतं ह्या कलासक्त



माणसांकडून! आपण आपल्या कामाबद्दल ठाम असण्याचाही आत्मविश्वास असतो. मला माझ्यामुळे दुसऱ्याचा वेळ जाऊ नये ह्याचा पराकोटीचा न्यूनगंड आहे. पण त्यासाठी वेळ मारून नेण्यापुरतं काम करायची तयारी आहे का, असा यक्षप्रश्न ह्या सगळ्या धुरंधरांना बघून माझ्या मनाला पडला. कलाकाराचा मेकअप होईपर्यंत थांबतात ना सगळे.. तसंच वेशभूषा, लायटिंग, सेटिंग होईपर्यंत धीर धरायलाच हवा असतो. मामुट्टी असे धीरोदात्त वागताना मी पाहिले आहेत. ह्या मल्याळी नटानं भीमराव आंबेडकर नावाचा, खालच्या जातीतला, मराठी कुटुंबातला, विदेशात शिकलेला, भारत नावाच्या नुकतंच स्वातंत्र्य मिळवलेल्या देशाची राज्यघटना लिहिणारा मानवतावादी नेता कसा काय साकारला असेल? सिनेमात ते तिशीपासून अखेरपर्यंत दिसतात. तो सगळा मेकअप करून घेणे- त्यात प्रोस्थेटिकपण आलं - वेशभूषा, वय, देहबोली, भाषा.. सगळंच आलं. माझा लेख वाचल्यावर मामुट्टीसरांसाठी तुम्ही हा सिनेमा परत एकदा पाहा. तिथे दुसरा कोणी कलाकार सुचूच शकत नाही.

डॉक्टरांनी खूप धाडसानं रमा आणि बाबासाहेबांचा एक तरल, कोमल सीन लिहिलाय सिनेमात. बाबासाहेब रमाला 'एल्फिन्स्टन' म्हणायला शिकवतात, तो गोडवा, ते हसणं मामुट्टीसरच करू जाणे किंवा गांधीजींची बातमी येते तेव्हाच्या त्यांच्या शॉटवर तर मी जीव ओवाळून टाकते! एखादा फार फार पोचलेलाच नटसम्राट असं काम करू शकतो किंवा अशी भावना समजून व्यक्त करू शकतो. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार ही तर एक लहानशी पावती होती त्यांना त्यांच्या कामासाठी. पण आज माझ्यासारख्या हजारो प्रेक्षकांच्या मनात त्यांनी जे घर केलंय, त्याचा पत्ता तर कधीच पुसला जाणार नाही.

मामुट्टीसरांचा स्वभाव खूप मिश्कील. ते सतत कुणाची ना कुणाची फिरकी घ्यायचे. एकदा अजय नावाचा माझा एक सहकलाकार न झोपता, थोडीशी दारू पिऊन सेटवर आला. तेव्हा मेथड ॲक्टिंगवरून सरांनी त्याला इतकं चिडवलं. ते म्हणाले, एवढं रिअल काम करत बसलास तर ॲक्टिंग कधी करणार? उद्या तुला चोराची भूमिका मिळाली तर? किंवा एखाद्या

सिनेमात एड्स झाला असेल तर? त्या दिवशीच्या सीनमध्ये थोडी धक्काबुक्की होती. मामुट्टीसर म्हणायला लागले, मला पण खरं ॲक्टिंग करायची खुमखुमी आली आहे – देतोच तुला चारदोन दणके! ही सगळी चेष्टा बरं का. कामाच्या वेळी काम. प्रॉम्प्टिंग कसं घ्यावं ही कला त्यांच्याकडून शिकावी. संपूर्ण तन्मयता. स्वत:ची ॲक्शन तर झालीच, पण रिॲक्शन शॉट पण परफेक्ट! फक्त आम्हा सहकलाकारांची परीक्षा असायची की कुणीतरी मोठमोठ्याने त्यांचे 'क्यूज' बोलत असलं, तरी आम्ही विचलित न होता स्वत:चा अभिनय चालू ठेवायचा. आमचा एक पावसातला शॉट होता. प्रॉडक्शनच्या काही गडबडीमुळे मी शुटिंग संपवून पुण्याला पोचले आणि परत तातडीने मुंबईला परत यायला सांगितलं. मी आल्यापावली दुसरी एशियाड पकडली. तिकडे मामुट्टीसरांची वेगळीच तगमग सुरू होती. त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. त्यांचं मुंबईतलं वास्तव्य कायम लीला हॉटेलमध्ये असायचं. त्यांची बायको चक्क मुंबईत येऊन थांबली होती आणि आमचा हा पावसाचा सीन आला! मी कधीच मामुट्टीसरांना इतकं बेचैन पाहिलं नव्हतं. इतके रागावले होते ते आमच्या युनिटवर! त्यांची अजून एक तक्रार असायची मराठी माणसांबद्दल. ते म्हणजे तुम्ही एकत्र कसे जेवत नाही? एकमेकांसाठी काही पदार्थ आणत कसे नाही? आम्ही केरळमध्ये कसे खिलवतो. तुम्ही फार रूक्ष माणसं बाबा! मग पुण्यात एकदा त्यांच्यासाठी साग्रसंगीत डबा घेऊन गेले होते मी– पापड, लोणचं आणि दहीभातासकट! काय खूष झाली होती स्वारी! आपली माती, आपला कम्फर्ट झोन सोडून आलेल्या कलाकारांना कितीदा आणि कसं कसं स्वत:ला ढवळून काढत शांत करावं लागतं, ह्याचा मला चांगलाच अनुभव आहे. त्या अर्थानं मामुट्टीसर खरंच महान आहेत.

रमाबाईंचं बसणं, बोलणं, चालणं हे सगळं मिळालेल्या दीड फोटोवरून जोखणं माझ्यासाठी अग्निपरीक्षेइतकं कठीण होतं. शिवाय त्याच्या जोडीला भावना व्यक्त करायच्या. पण एक खरं की, ही भूमिका माझ्या अंगात भिनली. रमाबाईंशी माझा थेट संवादच झाला म्हणूया. प्लँचेटसारखा. माझ्या अनेकविध शंकांना, प्रश्नांना रमाबाईंनी फार जाणती आणि संयमी उत्तरं दिली. तरीही मी ठेचकाळले तेव्हा त्या आसुसून माझ्याकडे पाहायच्या आणि मला म्हणायच्या, 'तू संसारात पडलीस ना की, मग मिळतील तुला माझी उत्तरं.. आणि तुमचं शिक्षण, तंत्रज्ञानाची झेप पहाता, मला न मिळालेली उत्तरंही तू मिळव.'

रमाबाईंना उबळ येऊन त्यांच्या खोकल्यातून पडणारे रक्त बघून कासावीस होणारे आंबेडकर आणि स्वतःचा मृत्यू समोर दिसत असताना विठ्ठलाची आस धरणाऱ्या रमाबाई यांचा सीन डॉक्टरांनी फार फार अप्रतिम डिझाईन केलाय. डॉक्टर आणि त्यांच्या टीमने जी वाक्यं लिहिली होती, सेटवर जी वातावरण निर्मिती केली होती.. त्यात कमालीचं गांभीर्य होतं. आंबेडकर नव्या घरात राहायला जातात, त्यांच्या भव्य लायब्ररीत रमाबाईंचं असणंसुद्धा कल्पना करताना गळ्यात आंवढा आणतं. एवढ्या उच्चशिक्षित माणसाची ही अशिक्षित, अशक्त पत्नी.. संपूर्ण सिनेमातला ह्या दोघांचा सगळ्यात मोठा संवाद.. जिथे आंबेडकरांना रमेला वैद्यकीय उपचारांसाठी विलायतेला घेऊन जाण्याचे वेध आहेत; तर डोळे मिटण्यापूर्वी एकदा तरी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाच्या चरणी लीन होण्याची एकमेव इच्छा रमाबाई बाळगून आहेत.. ह्या दोघांना पाहून आपलं हृदय उचंबळून येतं. कसे राहिले असतील हे दोन जीव एकत्र? आपलं काम आणि कुटुंब– आपलं कुटुंब आणि आपला संसार– हे किती वेगळे परीघ आहेत.


**आंतरराष्ट्रीय किर्तीची वेशभूषाकार भानू अथैय्या. त्यांना ऑस्कर का मिळाले असेल किंवा त्या महान का आहेत ह्याची प्रचिती मला आमच्या आंबेडकरच्या सेटवर वारंवार आली. रमाबाईंचं बसणं, बोलणं, चालणं हे सगळं मिळालेल्या दीड फोटोवरून जोखणं माझ्यासाठी अग्निपरीक्षेइतकं कठीण होतं. शिवाय त्याच्या जोडीला भावना व्यक्त करायच्या. पण एक खरं की, ही भूमिका माझ्या अंगात भिनली. रमाबाईंशी माझा थेट संवादच झाला म्हणूया.**



**आपलं समर्पण देशासाठी असं मानणारा एक व्हिजनरी आणि समर्पण म्हणजे काय हे समजूही न शकणारी, कुटुंबासाठी झिजणारी एक प्रेमळ सामान्य स्त्री! आपल्या मनावर परंपरांचं, संस्कारांचं जोखड आहे– त्याखाली आपण दबत चाललोय ह्याची तिला जाणीवही नाही. नवऱ्याच्या मनातल्या करोडो रुपयांच्या विचारांपेक्षाही, तिला त्याच्या पोटात वेळेवर जाणाऱ्या घासाबद्दल विवंचना आहे. पावसात उभे असलेले रमा–भीमराव आपापल्या डोळ्यांतून झरणाऱ्या पाण्यात कशाला तिलांजली देत असतील?**

आपलं समर्पण देशासाठी असं मानणारा एक व्हिजनरी आणि समर्पण म्हणजे काय हे समजूही न शकणारी, कुटुंबासाठी झिजणारी एक प्रेमळ सामान्य स्त्री! आपल्या मनावर परंपरांचं, संस्कारांचं जोखड आहे– त्याखाली आपण दबत चाललोय ह्याची तिला जाणीवही नाही. नवऱ्याच्या मनातल्या करोडो रुपयांच्या विचारांपेक्षाही, तिला त्याच्या पोटात वेळेवर जाणाऱ्या घासाबद्दल विवंचना आहे.. पावसात उभे असलेले रमा–भीमराव आपापल्या डोळ्यांतून झरणाऱ्या पाण्यात कशाला तिलांजली देत असतील? न वाचणाऱ्या अपत्यांना? देशाच्या पारतंत्र्याला? आपली खोकल्याची उबळ नवऱ्याला ऐकू जाऊन त्यांचं कामातलं लक्ष विचलित होऊ नये म्हणून केलेल्या धडपडीला? स्पृश्यास्पृश्यतेला की, एकमेकांवर अपार प्रेम असूनही न देता आलेल्या प्रेमाला? आज २०१५ मध्ये आपण फक्त इॅमेजिन करू शकतो– की हे उभयता कसे असतील.. काय दुवा असेल.. कुठला घट्ट पीळ होता– त्यांच्यामधल्या बंधाचा.. मला त्यामुळेच अनेकदा हा सिनेमा खराच वाटतो. असं वाटतं.. की हेच, असंच झालं असेल. हे सत्य असेल.

'सत्य' बनवणाऱ्या या सिनेमाच्या निर्मितीच्या वेळी अनेक विलक्षण विरोधाभासी घटना चालू असायच्या. फिल्मसिटीत शुटिंगचे नवे फ्लोअर्स बनवले गेले होते. यातल्या एका स्टुडिओचं तर उद्घाटनच आंबेडकरच्या सेटने झालं होतं. ती चाळ, घरं आणि तिथली आमच्या माणसांची लगबग, मूड्स ह्यात जब्बार पटेलांना सिनेमासाठी कसं लक्ष केंद्रित करता



येत असेल? ह्या सिनेमात मकरंद अनासपुरे आहे, हे किती जणांना माहिती आहे? मकरंद तेव्हा निव्वळ स्ट्रगलर होता. इतका लाघवी स्वभाव आहे त्याचा.. निर्मळ आणि आनंद निर्माण करणारा.. तो आमच्या सीनमध्ये कायम 'गर्दीतला एक' असायचा. पण जेव्हा त्याला आंबेडकरांना चहा नेऊन देण्याचा सोलो शॉट मिळाला, तेव्हा मी, आसावरी घोटीकर आणि मकरंदनी आमच्या मेकअपरुममध्ये एक छोटंसं सेलिब्रेशनच केलं होतं. १९९७ साली मी माझी पहिली कार विकत घेतली होती. ती बघायला डॉक्टर आणि मामुट्टीसकट सगळे पार्किंगपर्यंत आले होते. त्यांनी सगळ्यांनी दाखवलेल्या कौतुकामुळे मला मी खूपच काहीतरी मोठा तीर मारला आहे असं वाटायचं. खरं तर किती दिग्गज माणसं ही.. एखाद्या नवख्या अभिनेत्रीला प्रोत्साहन देण्याची तसदी त्यांनी घेतली नसती तरी चाललं असतं, पण पुढे डॉक्टरांमधला 'वडील'पणा ठळकपणे पुढे आला.. मी नवशिकी असताना मुंबईच्या ट्रॅफिकमध्ये कार चालवू नये म्हणून इतके रागवायचे! 'तू ड्रायव्हर ठेव' म्हणून मागे लागायचे. सेटवर पोचले की– 'गाडी चालवत आलीस का?' हा त्यांचा ठरलेला प्रश्न असायचा. परत जाताना मान हलवत 'ए नीट जा ग..' म्हणायचे.. आता वाटतं, ते स्मिता पाटीलच्या बेभान ड्रायव्हिंगला दबले होते कदाचित.. ते वेल्हाळ पाखरू उडून गेल्यावर आम्हा बाकीच्या चिमण्यांना त्यांच्या काळजीचा पदर कायम मिळत राहिला.

ह्या सिनेमाला अजून एक सरताज होता. तो म्हणजे ह्यातलं संगीत. शांत वाटण्यासाठी मी माझ्याच काही सिनेमांच्या सीडी ऐकते. त्यांपैकी एक म्हणजे– आंबेडकरची सीडी! ह्याचे संगीतकार आहेत– अमर हळदीपूर. त्यांनी स्वतः स्वतंत्र असं दिग्दर्शनाचं काम कमी केलंय, असं मला वाटतं. जास्त करून ते म्युझिक अॅरेंजर आहेत. पण ह्यातल्या सर्व रचना त्यांनी इतक्या लाजबाब केल्या आहेत. त्याचं थोडं क्रेडिट अर्थातच डॉक्टरांना देऊ या. कारण त्यांना स्वतःला संगीताचा उत्तम कान आहे. सामना, जैत, उंबरठा, विदूषक, सुबल, मुसाफिर, मुक्ता ह्या सर्व सिनेमांचे म्युझिक ट्रॅक फार फार श्रवणीय आहेत. सगळे संगीत

दिग्दर्शक, गीतकार ह्यांच्याशी डॉक्टरांचा उत्तम संवाद असतो.. मला असं वाटतं, ह्या सगळ्या सिनेमांची गाणी लोकप्रिय होण्यात जितका गीत, संगीत आणि गायकांचा हात आहे, तितकाच डॉक्टरांचाही आहे. अमर हळदीपूर ह्यांचं कास्टिंग त्यांना कसं सुचावं, हे मला न उमगलेलं कोडं आहे. पण ह्या कोड्याचं एक नक्षीदार अवर्णनीय उत्तर हळदीपूरांनी त्यांच्या संगीतातून अमर करून ठेवलंय.

रमाबाईंचा मृत्यू हा ह्या चित्रपटातला निःशब्द करून सोडणारा प्रसंग. तो प्रसंग शूट करताना मला काम तर काहीच नव्हतं.. फक्त श्वास नियंत्रित करून जमिनीवर– तिरडीवर झोपायचं होतं. मला नेसवलेली हिरवी साडी, कपाळभर पसरलेलं कुंकू आणि कमी कामाचा निश्वास– अशा तरल मनोवस्थेत मला एक विचित्र समाधान वाटलं एक क्षण.. सधवा असताना मरण्याचं.. हा विचार मनात आला आणि माझ्या अंगावर काटाच आला! इतकी खोल बुडी कधी घेतली रमाबाईंनी माझ्या मनात? त्यांची भावना मला कशी स्पर्शून गेली? स्वतःच्या मृत्यूबद्दल माझ्या मनात कधीच काही कल्पनाविलास होत नाही मग त्यादिवशी मला जे रितं रितं आणि तरीही संपूर्ण वाटत होतं ते कुठून आलं? मी पडून होते तिरडीवर. आजूबाजूला कितीतरी गदारोळ चालू होता. लाईट ॲडजस्ट होत होते. कलाकारांची ये-जा चालू होती. चहावाटप चालू होते. डॉक्टर आमच्या आरपार काहीतरी तंद्रीत होते. विचारात होते. कुणाचे तरी हास्यविनोद चालू होते. कुणाचे बूट घातलेले पाय माझ्या अंगाला धडकत होते.. मी मरून गेले होते. अनेकांसाठी. इतकं उदास वाटलं.. इतकं नको वाटलं जिणं.. इतकं हरल्यासारखं वाटलं.. आणि तितकंच सुटल्यासारखं-सोडवल्यासारखं वाटलं. भावनांना, नात्यांना आयुष्य प्रवाही केल्यासारखं वाटलं. आपुले मरण पाहिले म्या डोळा.. ह्याची तंतोतंत प्रचिती आली. माझ्या प्रेताशेजारी बसलेल्या मामुट्टींच्या चेहऱ्यावर 'सरणार कधी रण' असे भाव दिसत होते. सगळेजण खूप वाईट वाटून घेत होते आणि मलाही सगळ्यांसाठी भरून येत होतं..

६ डिसेंबर १९९९. शिवाजी पार्क, दादर, मुंबई. एरवी ही जागा फक्त आसपासचे पत्ते शोधण्यासाठी ठाऊक असते. पण त्या दिवशी पार्कात उभारलेल्या स्टेजवर आम्ही होतो– डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिनेमाचे कास्ट आणि क्रू.. आणि समोर होता अथांग समुद्र.. माणसांचा. माझी नजर पोचेल तिथपर्यंत तुडुंब गर्दी होती. डोकीच डोकी.. आमच्या म्युझिक रिलीजचा एक ऐतिहासिक कार्यक्रम पार पडला. घोषणांनी आणि जयजयकारानं आसमंत दुमदुमून गेला होता. रमाईचा गजर, भीमशक्तीच्या गर्जना, बौद्ध घोष.. मी अनिमिष नजरेने, अविश्वासानं तो सोहळा पाहत होते. कार्यक्रम संपला आणि मी बुडून गेले. हजारो लोक मामुट्टी सरांच्या आणि माझ्या पाया पडत होते.. माझी आई गर्दीत कुठेतरी हरवली. आमची ताटातूट झाली. मी तिला शोधायचा प्रयत्नही करू शकले नाही. आबालवृद्धांनी माझ्या पायाला मिठी घातली होती. माणसांच्या अंतःकरणाला पूर आला होता आणि माझे पाय त्यात चिंब भिजले होते. एका क्षणानंतर मी ज्येष्ठ-श्रेष्ठांना 'अहो, नको-नको' सुद्धा म्हणू शकले नाही. माझ्या डोक्यावरून, पाठीवरून फिरलेले हात, त्या ओल्याचिंब नजरा, गळामिठी घातलेले हात आणि हृदयं, डोक्यावर कडाकडा मोडलेली बोटं– माझ्या आत तर चिरकाळ राहणार आहेतच. पण ते सारं त्याचे खरे धनी असलेल्या आकाशातल्या– त्या मिणमिणत्या ज्योतीला पोचू देत. त्याचबरोबर तिला जन्म देणाऱ्या माझ्या बापाला– डॉ. जब्बार पटेलांनाही.. जयभीम!

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**सोनाली कुलकर्णी**
sonali@sonalikulkarni.org

**अशा तरल मनोवस्थेत मला एक विचित्र समाधान वाटलं एक क्षण– सधवा असताना मरण्याचं. हा विचार मनात आला आणि माझ्या अंगावर काटाच आला! इतकी खोल बुडी कधी घेतली रमाबाईंनी माझ्या मनात? त्यांची भावना मला कशी स्पर्शून गेली? स्वतःच्या मृत्यूबद्दल माझ्या मनात कधीच काही कल्पनाविलास होत नाही मग त्यादिवशी मला जे रितं रितं आणि तरीही संपूर्ण वाटत होतं ते कुठून आलं? मी मरून गेले होते. अनेकांसाठी. इतकं उदास वाटलं.. इतकं नको वाटलं जिणं.. इतकं हरल्यासारखं वाटलं.. आणि तितकंच सुटल्यासारखं– सोडवल्यासारखं वाटलं.**



# आता पुण्यातील रसिक वाचकांची पुस्तकखरेदी

म्हात्रे पुलाजवळ,
डीपी रोडवरच!

## मॅजेस्टिक बुक गॅलरी

ग्रंथांच्या मनोहारी विश्वात फेरफटका मारून
प्रसन्न वातावरणात पुस्तकखरेदीचा आनंद घ्या!

म्हात्रे पुलाजवळ, शंभर फूट डीपी रोड, शुभारंभ लॉन्ससमोर,
पुणे ४११ ०५२

विविध विषयांवरची हजारो मराठी व इंग्रजी पुस्तके
वेधक मांडणीत एकत्रित पाहा.

भरपूर पार्किंगची सोय



पुस्तकखरेदीच्या विविध योजनांचा लाभ घ्या.

वाचनालयांसाठी खास सवलत!

दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

**ह्या जाहिरातीचे कात्रण घेऊन येणाऱ्यास २० % सवलत.**

**साहित्य अकादेमी** प्रादेशिक कार्यालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई 400014
फोन: 022-24135744, 24147650 E-mail: rs.rom@sahitya-akademi.gov.in

**कादंबरी**

**मृगरेखा** रु. 180/-
अमिताव घोष
अनु. अलका नाम्रेकर कुलकर्णी

**चार अध्याय** रु. 90/-
रवींद्रनाथ ठाकुर
अनु. नीलिमा भावे

**शांतला** रु. 150/-
के.व्ही. अय्यर
अनु. द.रा. बेन्द्रे

**बाणभट्टाची आत्मकथा** रु. 130/-
हजारीप्रसाद द्विवेदी
अनु. र.श. केळकर

**चक्षुशल्य** रु. 150/-
रवींद्रनाथ ठाकुर
अनु. शंकर बाळाजी शास्त्री

**मानवी दशावताराचा खेळ** रु. 180/-
पन्नालाल पटेल
अनु. सुषमा करोगल

**बाळ गांधी बापु गांधी झाले, त्याची गोष्ट** रु. 150/-
बोळूवार महमद कुंत्रि
अनु. अ.रा. यार्दी

**नगरमंथनम्** रु. 90/-
ओ.पी.शर्मा 'सारथी'
अनु. मैत्रेयी जोशी

**कविता**

**...म्हणे तेव्हा राजाधिराज झोपेत होते** रु. 125/-
उमा शंकर चौधरी
अनु. प्रकाश भातम्ब्रेकर

**ही वीणा प्राचीन** रु. 175/-
ओ.एन.व्ही. कुरुप
अनु. निशिकांत ठकार

**संशयात्मा** रु. 175/-
ज्ञानेंद्रपति
अनु. प्रफुल्ल शिलेदार

**मराठी ग़ज़ल : अर्धशतकाचा प्रवास** रु. 175/-
संपादक : राम पंडित

**कथा**

**मोरनामा आणि इतर कथा** रु. 130/-
इंतजार हुसैन
अनु. भास्कर लक्ष्मण भोळे

**क्रौंच पक्षी** रु. 100/-
वैदेही
अनु. उमा वि. कुलकर्णी

**नाटक**

**रविंद्रनाथ ठाकुरांची चार नाटके** रु. 100/-
अनु. छाया महाजन

**निवडक मराठी एकांकिका** रु. 160/-
संपादक : सुधा जोशी, रत्नाकर मतकरी

**हेल्मलँडचे चांचे** रु. 100/-
हेनरिक इब्सेन
अनु. के.ज. पुरोहित

**भारतीय साहित्याचे निर्माते**

**दिनकर केशव बेडेकर** रु. 50/-
रणधीर शिंदे

**विजय तेंडुलकर** रु. 50/-
दत्ता भगत

**दुर्गा भागवत** रु. 50/-
शोभा नाईक

**बालकवी** रु. 50/-
दमयंती पांढरीपांडे

**भाऊ पाध्ये** रु. 50/-
राजन गवस

**वि.द.घाटे** रु. 50/-
अनंत देशमुख

**अन्य**

**मराठी संतकवयित्रींचा इतिहास** रु. 175/-
संपादक विद्यासागर पाटंगणकर

**भाषावार प्रांतरचना आणि मराठी (काही परिप्रेक्ष्यं)** रु.150/-
संपादक : रमेश नारायण वरखेडे

**विवेकानंदांचे चरित्र** रु. 75/-
रोमा रोलां
अनु. विमलाबाई देशपांडे

**निवडक हरि नारायण आपटे** रु. 150/-
संपादक : विद्याधर पुंडलीक

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य** रु. 200/-
संकलन व प्रस्तावना: लक्ष्मण गायकवाड

**स्त्रियांचे मराठीतील निबंधलेखन** रु. 350/-
संपादक: विद्युत भागवत

**श्री तुकारामाच्या अभंगांची चर्चा - खंड 1 व 2** रु. 300/-
वासुदेव बळवंत पटवर्धन
गणेश हरी केळकर

**मराठी लोकगीते : संस्कृती अभ्यासाची साधने** रु. 110/-
संपादक : रमेश नारायण वरखेडे

**English Publications**

**Monsoon Showers in Goa & The Mythical Mermaid** Rs.100/-
Balivada Kantha Rao
Tr. Sujata Patnaik

**The Non-Resident Indian And Other Poems** Rs. 75/-
Attoor Ravivarma
Tr. P.P. Raveendran

**The Melting Stone & Other Plays** Rs.100/-
Ramdeo Jha
Tr. Rajanand Jha

**Marathi Poetry:1975-2000** Rs.150/-
Comp. & Tr. Santosh Bhoomkar

**The Life and Works of Maharshi Vitthal Ramji Shinde** Rs. 320/-
G.M. Pawar
Tr. Sudhakar Marathe

**To Catch A Poem** Rs.120/-
Ed. Anju Makhija &
Jane Bhandary

**Banaras and Other Poems** Rs.100/-
Kedarnath Singh
Ed. K. Satchidanandan
Introduction Harish Trivedi

**Colours Caught in Mist** Rs.120/-
Govind Mishra
Tr. Pratik Kanjilal

***Subscribe to : समकालीन भारतीय साहित्य*** **Single Copy : Rs.25, 1 Year: Rs.125, 3 Years: Rs.350**
***Indian Literature*** **Single Copy : Rs. 50, 1 Year: Rs. 250, 3 Years: Rs. 650**
**साहित्य अकादेमी 'बुक-क्लब' चे अवश्य सदस्य व्हा**

संस्कृती, लोकसाहित्य, लोककला, संतसाहित्य, रंगभूमी अशा अनेक क्षेत्रांत संशोधन करण्यात हयात घालविलेले डॉ. रा.चिं. ढेरे हे महाराष्ट्राचे एक भूषणच आहे. लज्जागौरी, श्रीविठ्ठल : एक महासमन्वय, अशा एकाहून एक महान ग्रंथांची निर्मिती केलेल्या 'अण्णां'ची ओळख साहित्य-संस्कृतीच्या अभ्यासकांना आहेच.

# प्रिय अण्णा

वर्षा ढेरे-गजेंद्रगडकर

प्रिय अण्णा,

तुम्हाला आज पहिल्यांदाच पत्र लिहिते आहे. आजपर्यंत पत्र लिहिण्याची वेळ कधी आली नाही. कारण आपण एकमेकांपासून तितके लांब गेलोच नाही. पण कदाचित त्यामुळेच काही काही गोष्टी बोलायच्या राहून गेल्या असतील. काही आठवणी सांगायच्या राहिल्या असतील, काही अगदी साधेसे प्रश्नही विचारायचे राहिले असतील. जवळ असलो तरी तेवढा वेळ आणि तेवढा निवांतपणा नाहीच मिळाला आजवर. म्हणून आता हे पत्र.

ताई -दादासारख्या माझ्याही लहानपणच्या पुष्कळ आठवणी तुमच्याजवळ असणार; काही ठळक, स्पष्ट; काही पुसट अस्पष्ट. शेंडेफळ म्हणून माझे वेगळे, जास्त लाड झाले का? बहुदा तसं नसावं. तिन्ही मुलांना तुम्ही सारखं वाढवलंत. दादा लहानपणी थोडा द्वाड असल्यामुळे त्याला पुष्कळदा रागवावं लागलं, हे मला आठवतं. ताई आणि मी मात्र वाचन, अभ्यास, शाळा, स्पर्धा या सगळ्यात रमलेल्या असायचो. त्यामुळे त्याच्या दृष्टीनं आम्ही घरातल्या मोठ्या माणसांच्या लाडक्या होतो. त्यातून तुमच्याकडून आणि आई-आत्यांकडून ऐकलं, तशी मी लहानपणापासून समजूतदार! त्यामुळे कदाचित माझ्यावर तुमचा जास्त जीव असणार. पण वागवण्यात तुम्ही फरक केल्याचं मला आठवत नाही. त्यातून आम्हा तिघा भावंडांमध्ये प्रत्येकी पाचेक वर्षांचं अन्तर असल्यामुळे आमच्यातही कधी बरोबरी, भांडणं, हेवेदावे झाले नाहीत.



आपण श्रीमंत म्हणावं इतके सधन कधीच नव्हतो. पण घरातल्या आर्थिक प्रतिकूलतेची झळ ताई-दादाच्या तुलनेत मला कमी लागली. अर्थात तुमची विद्वत्ता आणि सहृदयता यामुळे भौतिक कमतरतांची उणीव आम्हाला कधीच भासली नाही. आपल्याकडे पैसे-दागिने ठेवण्यासाठीचं कपाट नसलं तरी इतर कुणाकडेच नसणारा पुस्तकांचा दुर्मिळ आणि प्रचंड खजिना होता. भारी कपडालत्ता आणि घरातल्या इतर चीजवस्तू नसल्या तरी तुमच्यामुळे घरी येणारी विद्वान, रसिक मंडळी आणि अगदी साधी, सर्वसामान्य पण तुमच्यावर, आपल्या घरावर जिवापाड प्रेम करणारी माणसं होती. नोकरी-व्यवसाय करणाऱ्या इतर वडिलांपेक्षा आपले वडील वेगळे आणि व्यासंगी आहेत आणि त्यांच्यामुळे एका अलौकिक जगाचा अनुभव आपल्याला मिळतो आहे, ही जाणीव आमच्यासाठी लौकिक श्रीमंतीवर मात करणारी होती.

त्यामुळेच लहानपणच्या त्रासाच्या, दुःखाच्या, कष्टांच्या आठवणी आम्हा तिघा भावंडांच्या मनात नाहीत. बरोबरच्या मुलांसारखे काही अनुभव आपल्याला घेता येत नाहीत, याचं एखाद्या वेळी वाईट वाटायचं. पण तेही अगदी क्षणभर. त्याचा सल कधी मनात राहिला नाही आमच्या. मला आठवतंय, एकदा शाळेची ट्रीप अजंठा-वेरूळची लेणी पाहायला जाणार होती. मी चौथीत असेन तेव्हा. शाळेत नोटीस आल्यावर मी तुम्हाला सांगितलं. त्या वेळी ट्रीपची फी देणं बहुदा शक्य नसणार. पण तुम्ही तसं सांगून मला निराश केलं नाही. 'शाळेबरोबर जाण्याऐवजी आपण घरचे सगळेजण नंतर जाऊया, ती मजा जास्त असेल की नाही?' हे तुमचे शब्द ऐकल्यावर मी खरंच त्या कौटुंबिक सहलीची कल्पना करण्यात इतकी गुंगून गेले की मैत्रिणींसोबत आपल्याला जाता येत नाहीये हा विचारच माझ्या मनाला शिवला नाही. शाळेत बाईंना नकार सांगताना क्षणभर कष्टी झाले मी आणि ट्रीपवरून आल्यावर मुलींच्या त्याविषयीच्या गप्पा ऐकताना जरा बाजूला पडल्यासारखंही वाटलं. पण ते अगदी क्षणिक. एरवी तुमचा नावलौकिक, तुमचे मानसन्मान या सगळ्याचा उजळपणा सोबत होताच की आणि त्याचं इतरांना असलेलं अप्रूपही वेळोवेळी जाणवत होतंच.

चौथीच्या वर्षातली आणखी एक आठवण माझ्यापाशी आहे. तुम्हालाही आठवत असणारच तो प्रसंग. वार्षिक परीक्षेत मी नूतन मराठी विद्यालयात पहिली आले होते आणि मला वेगवेगळ्या विषयासाठीची वगैरे मिळून एकूण सोळा बक्षिसं मिळाली होती. त्या समारंभाला आईसोबत तुम्ही पण आला होता. बक्षीस समारंभासाठी तुम्ही येण्याची ती पहिलीच वेळ होती. तोपर्यंत माझ्यापेक्षा नऊ-दहा वर्षांनी मोठ्या असणाऱ्या ताईनं शाळा-कॉलेजमध्ये किती तरी स्पर्धा गाजवल्या होत्या, बक्षिसं मिळवली होती. पण तुम्ही कधीच त्या समारंभांना गेला नव्हता. त्यामुळे भरपूर बक्षिसं मिळाल्याचा माझा बालसुलभ आनंद तुम्ही समोर आहात म्हटल्यावर कित्येक पटींनी वाढला होता. एकूणच व्याख्यानं किंवा

**पण अशा थोर पित्याच्या सावलीत मोठे होण्याचे भाग्य लाभलेल्या त्यांच्या मुला-मुलींच्या मनात त्यांची प्रतिमा कशी असेल? – या प्रश्नाचे, डॉ. रामचंद्र चिंतामणी ढेरे यांची कन्या वर्षा हिचे, हे पत्र-रूप उत्तर.**



**एकूणच व्याख्यानं किंवा सार्वजनिक कार्यक्रमांना तुम्ही आयुष्यभर शक्य तितकं टाळत आलात. त्यात वेळ घालविण्यापेक्षा लेखनाची दीर्घ बैठक तुम्ही महत्वाची मानली. श्रोत्यांच्या टाळ्यांचं व्यसन एकदा लागलं की त्यातून स्वतःला सोडवणं अवघड, असं तुम्ही नेहमी म्हणत आलात. पण हे काही न समजण्याच्या त्या वयात कुठल्याच समारंभांना न जाणारे अण्णा माझ्या बक्षीस समारंभाला आले, या जाणिवेनं माझा हुरुप, आनंद आणि अभिमान मनात मावेनासा झाला होता.**

सार्वजनिक कार्यक्रमांना तुम्ही आयुष्यभर शक्य तितकं टाळत आलात. त्यात वेळ घालविण्यापेक्षा लेखनाची दीर्घ बैठक तुम्ही महत्वाची मानली. श्रोत्यांच्या टाळ्यांचं व्यसन एकदा लागलं की त्यातून स्वतःला सोडवणं अवघड, असं तुम्ही नेहमी म्हणत आलात. पण हे काही न समजण्याच्या त्या वयात कुठल्याच समारंभांना न जाणारे अण्णा माझ्या बक्षीस समारंभाला आले, या जाणिवेनं माझा हुरुप, आनंद आणि अभिमान मनात मावेनासा झाला होता. खरं सांगायचं तर आज इतक्या वर्षांनतर सुद्धा मला या आठवणीनं लहानपणचं ते निरंजन सुख परत मिळाल्यासारखं वाटतं.


घरातल्या एकूण आर्थिक परिस्थितीची जाण शेंडेफळ असून मलाही लवकर आली. नव्या वह्या-पुस्तकं घेण्याऐवजी शाळेची पुस्तकं सेकंडहँड घेण्याचा आणि आदल्या वर्षीच्या वह्यांमधले राहिलेले कोरे कागद बाईंडरकडे देऊन त्याच्या वह्या करून घेण्याचा आग्रह मी तुम्हाला करायची. एक वर्ष मात्र तुम्ही मला नवीन वह्या-पुस्तकं घेऊन दिलीत. आणि आपल्या परिचितांपैकी एकांच्या माझ्याच वयाच्या मुलीला बाईंड केलेल्या वह्या आणि सेकंडहँड पुस्तकांचा संच घेऊन दिलात. त्या वेळी त्यांची परिस्थिती आपल्यासारखीच असल्यामुळे रेशनवर मिळालेल्या आपल्या घरच्या धान्यातलं धान्य देण्यापासून इतर पुष्कळ मदत तुम्ही त्यांना अनेक वर्षं करत होताच. त्या वर्षापासून आम्ही दहावी होईपर्यंत त्यांच्या मुलीच्या शिक्षणासाठी तुम्ही हेही केलंत. त्या वेळी मला दुहेरी आनंद झाला होता, हे मला अजून आठवतंय. मला नव्या-कोऱ्या सुरेख वासाची वह्या-पुस्तकं मिळाली होती आणि आपल्या ओळखीच्या एका मुलीच्या शिक्षणाला आपली थोडीशी तरी मदत झाली होती. मुख्य म्हणजे या गोष्टीमुळे त्या काळात नकळत आम्हा दोघींमध्ये कुठलाही संकोच नसणारा मैत्रीचा एक धागा निर्माण झाला होता.

दहावीत भरपूर मार्क्स मिळाल्यानंतर मी सायन्सकडे जायचं ठरवलं आणि फर्ग्युसन कॉलेजची निवड केली. माझे सगळेच विषय चांगले होते. पण माझा कल सायन्सकडे होता. ओळखीपाळखीच्या सगळ्यांनी मीही ताईप्रमाणे आर्टसला जाईन असं गृहीत धरलं होतं. तुम्ही मात्र चर्चा, सल्ले या कशाच्या फंदात न पडता माझ्या इच्छेनुसार फर्ग्युसनला सायन्सला मला प्रवेश घेऊन दिलात. प्रवेशाच्या दिवशी माझ्यासोबत तुम्ही कॉलेजमध्ये आलात तेव्हा संस्कृतचे डॉ. मो.गो. धडफळे यांच्याकडे मला घेऊन गेलात आणि त्यांच्याशी माझ्या प्रवेशाबद्दल बोलून 'आजपासून तुम्ही हिचे लोकल गार्डीअन आहात असं मी मानतो; काही लागलं तर तिला मदत करा' असं सांगितलंत. कॉलेजच्या, तेही फर्ग्युसनच्या नव्या वातावरणात आपली लेक रुळायला वेळ लागेल



# पद्मगंधा.कॉम

## 'पद्मगंधा.कॉम' वर पुस्तके खरेदी करा आणि मिळवा सर्व पुस्तकांवर २०% सूट




अन्नपूर्णा

मूळ किंमत ₹ १७० । सवलतीत ₹ १३५




श्रीपर्वताच्या छायेत

मूळ किंमत ₹ ३१० । सवलतीत ₹ २४५




त्रिविधा

मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०




मागोवा मिथकांचा

मूळ किंमत ₹ १८० । सवलतीत ₹ १४५



भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र

मूळ किंमत ₹ १२०० । सवलतीत ₹ ९६०




रानवाटांचे मूड्स

मूळ किंमत ₹ ३२० । सवलतीत ₹ २५५




घर सैनिकांचे

मूळ किंमत ₹ ३०० । सवलतीत ₹ २४०




गालिबचे उर्दू काव्यविश्व अर्थ आणि भाष्य

मूळ किंमत ₹ ५३० । सवलतीत ₹ ४२५




कलर्स ऑफ द प्रिझन

मूळ किंमत ₹ १६० । सवलतीत ₹ १३०



तात्पर्य

मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०



आणखी, एक गाऊल

मूळ किंमत ₹ २६० । सवलतीत ₹ २०८



ध्वनिमुद्रिकांच्या दुनियेत

मूळ किंमत ₹ १६० । सवलतीत ₹ १३०

**पद्मगंधा प्रकाशन**

१९६६, तारा-भुवन माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६

**Website:** www.padmagandha.com **Email-id:** p.padmagandha@gmail.com |info@padmagandha.com

**Facebook:** www.facebook.com/pages/Padmagandha-Prakashan



का काय, अशी साशंकता तुमच्या मनात असणार आणि त्यामुळेच डॉ. धडफळ्यांशी बोलून तुम्ही मला आणि स्वतःलाही आश्वस्त केलं असणार.

बारावीनंतर मेडिकलला जावं असं मला वाटत होतं. मार्क्सही होते. पण तिथला खर्च, घरात तशी काहीच पार्श्वभूमी नसणं आणि या सगळ्यामुळे पुढे सेट्ल होण्यात अडचणी येण्याची शक्यता लक्षात घेऊन मी बी.एससी. करावं असं आपण सगळ्यांनी विचार करून ठरवलं. त्या वेळी करावी लागलेली ही तडजोड तुम्हाला डाचली होती की काय कुणास ठाऊक? पुढे ८७ साली माझ्या एम.एससी.च्या वेळी पर्यावरणशास्त्र हा नवा अभ्यासक्रम सुरु झाला होता आणि नवा असल्यामुळे फीही खूप होती. पण तुम्ही माझी आवड लक्षात आल्यावर आणि प्रवेश परीक्षेतून माझी निवड झाल्यावर 'फीची काळजी करू नको. करू आपण सोय' असं मला सांगितलंत आणि मागची कसर भरून काढलीत. त्यावेळी तुम्ही माझ्या फीचे पैसे कसे उभे केलेत ते मला आजपर्यंत कळलं नाही.

तशा तुमच्या बाबतीत अनाकलनीय किंवा चमत्कारासारख्या अनेक गोष्टी आहेत, असं मला नेहमी वाटतं. दारिद्र्य, गंभीर आजारपणं, पोरकेपण अशा अनेक प्रकारच्या प्रतिकूलतांना तोंड देत तुम्ही एवढं अफाट लेखन केलंत, हा चमत्कारच आहे, अण्णा. शिवाय हे लेखनही संशोधनात्मक स्वरूपाचं. प्रखर बुद्धिमत्ता, विलक्षण प्रतिभा आणि जबरदस्त अंतःप्रेरणा यांच्या बळावर तुम्ही एकांडी वाटचाल केलीत. एखाद्या विद्यापीठानं करावं असं काम तुम्ही गेली साठ वर्षं अव्याहत करत आलात. नोकरी न करता आणि व्यावसायिक लेखन न करता आपल्या घराचा रथ आज ज्या टप्प्यावर आला आहे, तो टप्पा खरं तर आपल्यालाही थक्क करणारा आहे. आत्याची छोटीशी नोकरी आणि आईचे अमाप कष्ट यांचा हातभार यामागे आहेच. तरीही मला पुष्कळवेळा वाटतं की तुमच्या महाप्रचंड कामाला एखाद्या अद्भुत, अनाम शक्तीचाही पाठिंबा असावा.

मला आठवतंय तेव्हापासून तुम्ही ठराविक वेळी नोकरीला जाणाऱ्या माणसासारखे शिस्तीनं लिहीत आला आहात. आपण शनिवार पेठेत राहत होतो, तेव्हा जवळ नारायण पेठेत तुमची लहानशी अभ्यासिका होती. भाड्याचीच जागा होती ती. सकाळ आणि दुपार अशा दोन्ही वेळी तुमचं तिथेच लेखन-वाचन चालायचं. जमिनीवर सतरंजी घालून उतरत्या लाकडी डेस्कसमोर लिहीत बसलेली तुमची आकृती माझ्या आजही डोळ्यांसमोर आहे. भोवती पुस्तकांचे इतके उंच ढीग असायचे की तुम्हाला पटकन शोधता यायचं नाही. नंतर 'विदिशा'त राहायला गेल्यावरही तुमचा मुख्य मुक्काम वरच्या पुस्तकांच्या मजल्यावर असायचा. आपल्याला राहायला मोठी जागा मिळाली, यापेक्षाही पुस्तकांना प्रशस्त, स्वतंत्र जागा मिळाली याचा आनंद तुम्हाला अधिक होता.

अण्णा, पुस्तकांखेरीज दुसरं कुठलंच व्यसन तुम्हाला आजपर्यंत आपल्या विळख्यात ओढू शकलं नाही. पानशेत प्रलयाच्या वेळी तुम्ही ज्या दहा बाय दहाच्या लहानशा खोलीत संसार थाटला होता, तिथेही संसारोपयोगी वस्तूंपेक्षा जास्त पुस्तकंच होती, असं मी तुमच्याकडून अनेक वेळा ऐकत आले आहे. पुराचं पाणी वाढायला लागलं तेव्हाही तुम्हाला पहिली काळजी वाटली ती पुस्तकांची. लहानपणापासून आमच्या हातातही तुम्ही किती प्रकारची पुस्तकं ठेवलीत! मराठीतल्या उत्तमोत्तम साहित्याखेरीज टागोर, शरदचंद्र चटर्जी आणि प्रेमचन्दांपासून चेकॉव, दोस्तोवस्की, शेक्सपिअर आणि गटेपर्यंत सगळ्यांची ओळख आम्हाला शाळेच्या वयापासून झाली ती तुम्ही दिलेल्या या पुस्तकांमुळेच. वाढदिवस किंवा इतर कुठल्या निमित्ताशिवायही तुमच्याकडून पुस्तकांचा खाऊ आम्हाला वर्षानुवर्षं अखंड मिळत राहिला आहे. माझ्याकडच्या पर्यावरणाविषयीच्या संग्रहातली निम्म्याहून अधिक पुस्तकं तर तुम्हीच घेऊन दिली आहेत. संगीतात तुम्हाला विशेष रस नसला तरी ऋत्विकची-तुमच्या नातवाची- या क्षेत्रातली आवड पाहून तुम्ही त्याच्यासाठीसुद्धा संगीतविषयक पुष्कळ नवी-जुनी दुर्मिळ पुस्तकं गेल्या काही वर्षांमध्ये आणली आहेत.

अनेक वर्षं घरखर्च कसाबसा भागवत तुम्ही पुस्तकसंग्रह वाढवत नेलात. दुर्मिळ


**दारिद्र्य, गंभीर आजारपणं, पोरकेपण अशा अनेक प्रकारच्या प्रतिकूलतांना तोंड देत तुम्ही एवढं अफाट लेखन केलंत, हा चमत्कारच आहे, अण्णा. शिवाय हे लेखनही संशोधनात्मक स्वरूपाचं. प्रखर बुद्धिमत्ता, विलक्षण प्रतिभा आणि जबरदस्त अंत:प्रेरणा यांच्या बळावर तुम्ही एकांडी वाटचाल केलीत. एखाद्या विद्यापीठानं करावं असं काम तुम्ही गेली साठ वर्षं अव्याहत करत आलात. तरीही मला पुष्कळवेळा वाटतं की तुमच्या महाप्रचंड कामाला एखाद्या अद्भुत, अनाम शक्तीचाही पाठिंबा असावा.**

पोथ्या, हस्तलिखितं, वेगवेगळ्या विषयांवरची नियतकालिकं, निरनिराळे कोश यांना सामावून घेणारा तुमचा पुस्तकसंग्रह सतत वाढतच राहिला आहे. अगदी एखाद्या ओळीच्या लहानशा संदर्भासाठी सुद्धा तुम्ही पुस्तक विकत घेत आलात. धर्मेतिहास, लोकसंस्कृती, लोकसाहित्य, मूर्तीविज्ञान, संतसाहित्य, समाजेतिहास यासारख्या प्रमुख अभ्यासधारांखेरीज इतर शब्दशः शेकडो विषयांना स्पर्श करणारी पुस्तकं तुम्ही मधमाशीच्या चिकाटीनं जमा करत आलात. ग्रंथपालाची मदत न घेता तुम्ही तुमच्या शिस्तीनं, सोयीनं पुस्तकांची व्यवस्था लावलीत आणि त्यामुळेच त्या त्या वेळी हवा असलेला संदर्भ बहुतेक वेळी तुमच्या सहज हाताशी असायचा.तुमच्या या व्यासंगाचा लाभ इतर कितीतरी अभ्यासकांना झाला आहे. प्रत्यक्ष संदर्भ तर तुम्ही त्यांना उपलब्ध करून दिलेतच पण एखादी शंका कुणी विचारायचा अवकाश,त्या विषयावर प्रबंध लिहून व्हावा, इतकं ज्ञान समोरच्याला सहज मिळून जायचं, हे आम्ही घरचे लोक सतत पाहत आलो आहोत.

आपल्या हातून वयोमानानुसार यापुढे कितपत काम होईल असा विचार पाच-सहा वर्षांपूर्वी मनात आल्यावर तुम्ही पुस्तकांचा पसारा थोडा कमी करायचं ठरवलंत. काही ग्रंथालयांना आणि संशोधन केंद्रांना पुस्तकं द्यायचा निर्णय घेताना तुम्हाला किती यातना झाल्या होत्या ते आम्हाला सगळ्यांनाच ठाऊक आहे. मुलं दूर जाताना व्हावा तसा त्रास झाला तुम्हाला. लग्नानंतर मी सासरी जाताना रडलात तसे रडलात त्यावेळी. अर्थात त्यानंतरही चांगलं पुस्तक दिसलं तर ते खरेदी करण्याचा मोह तुम्हाला आवरता आलेला नाही, हेही आम्ही पाहिलं-अनुभवलं आहे. अलीकडे म्हणजे २०१२ मध्ये तुमच्या व्यंकटेशावरच्या संशोधनासाठी तुम्ही, ताई आणि मी दक्षिणेत गेलो तेव्हाही खरेदी केलेल्या पुस्तकांसाठी आपल्याला नव्या बॅग्ज खरेदी कराव्या लागल्या होत्या आणि सामानाचं वजन जास्त झाल्यामुळे वेगळा चार्ज देऊन विमानातून आपण पुस्तकं आणली होती हे तुम्हालाही आठवत असणार.

तुमच्या लेखनाविषयी, संशोधनकार्याविषयी आजवर अनेक तज्ञांनी लिहिलं आहे. अनेक पुरस्कार आणि सन्मानांच्या निमित्तानं तुमच्या कामाचं महत्व अधोरेखितही झालं आहे.त्याविषयी लिहिण्याइतका माझा अधिकार नाही अण्णा. पण तुमच्या सगळया लेखनाला शाश्वत आणि अभेद्य अशा मूल्यांचं जे अधिष्ठान आहे, ते फार फार दुर्मिळ आहे, हे मात्र मला प्रकर्षानं जाणवत आलं आहे. तुम्ही पूर्वसूरींचं ऋण कायम मानत आलात आणि ते खुलेपणानं व्यक्तही करत आलात. परंपरेचं बोट तुम्ही धरलं ते कायम नव्या वाटा शोधण्यासाठी. तुमचा बहुविद्याशाखीय दृष्टिकोन संस्कृतीची अनेक कोडी उलगडण्यासाठी तुमच्या उपयोगी पडला आणि त्यानं आजवर अंधारात राहिलेले ज्ञानाचे कितीतरी कोपरे उजळवले.तुम्ही ज्ञानाला कप्प्यांमध्ये कधी विभागलं नाहीत. तुमची सहृदय आणि साक्षेपी संशोधनदृष्टी नेहमी कित्येक युगांचा विशाल आणि अखंड पैस असलेल्या ज्ञानप्रवाहाचा धांडोळा घेत राहिली. संशोधनातून हाती आलेलं सत्य तुम्ही पुनःपुन्हा तपासून घेत आलात आणि ते निर्भीडपणे मांडतही आलात. तुमच्या सश्रद्ध मनानं सत्य लपविण्याची किंवा त्याला फसवा चेहरा देण्याची चूक कधीच केली नाही आणि नवे पुरावे हातात आल्यावर त्या प्रकाशात सत्य पुन्हा एकदा तपासून बघताना तुम्ही कधी कचरलाही नाहीत.

अनेकवेळा भल्या-बुऱ्या, प्रामाणिक-अप्रामाणिक हेतूंनी तुमच्या संशोधनावर टीका झाली. विठ्ठलावरच्या संशोधनाच्यावेळी तर आक्षेप आणि तुमचं उत्तर अशी लेखमालाच केसरीमध्ये चालू होती. नंतरही अशा वेळा आल्या. पण तुम्ही डगमगला नाहीत. कारण सत्य तुमच्या ओंजळीत होतं. त्याचं तेज इतरांच्या नजरेला न सोसवण्याइतकं प्रखर असलं तरी तुमच्या संशोधक नजरेला त्यानं दिपवलं नव्हतं. पण ही लढत सोपी नव्हती अण्णा, तेव्हाही आणि आजही. आणि तुम्ही सिंहासारखे एकटे लढत आलात. अर्थात या वाद आणि टीकांमध्ये तुम्ही फार काळ अडकूनही पडला नाहीत. सर्व बाजूंनी टीकेचा समाचार घेतल्यानंतर तुम्ही नेहमीच शांतपणे पुढच्या कामाकडे वळायचात आणि त्यात पूर्ण बुडून जायचात. नरहर कुरुंदकरांसारखा एखादा



**अण्णा, पुस्तकांखेरीज दुसरं कुठलंच व्यसन तुम्हाला आजपर्यंत आपल्या विळख्यात ओढू शकलं नाही. पुस्तकांचा पसारा थोडा कमी करायचं ठरवलंत. काही ग्रंथालयांना आणि संशोधन केंद्रांना पुस्तकं द्यायचा निर्णय घेताना तुम्हाला किती यातना झाल्या होत्या ते आम्हाला सगळ्यांनाच ठाऊक आहे. मुलं दूर जाताना व्हावा तसा त्रास झाला तुम्हाला. लग्नानंतर मी सासरी जाताना रडलात तसे रडलात त्यावेळी. अर्थात त्यानंतरही चांगलं पुस्तक दिसलं तर ते खरेदी करण्याचा मोह तुम्हाला आवरता आलेला नाही, हेही आम्ही पाहिलं-अनुभवलं आहे.**



**अण्णा, आता जग फार फार बदललं आहे. तुमच्यासारखं ज्ञानकेंद्रित आयुष्य जगणं आता अशक्य आहे. नकली, वरवरच्या आणि तकलादू गोष्टींचं वजन आता अफाट वाढवलं आहे आणि सगळ्या शुद्ध, शाश्वत आणि टिकाऊ गोष्टींना अनाथ, निर्वासित करून सोडलं आहे. साहित्यव्यवहार आणि एकूणच ज्ञानव्यवहार आता पूर्वीसारखा शुद्ध-पारदर्शक नाही राहिलेला अण्णा. या वातावरणात निखळ ज्ञानप्रेरणा सोबत घेऊन वाटचाल करणाऱ्या लोकांनी कसं जगायचं, सांगा नं?**

खंदा आणि क्रियाशील पाठीराखा सोडला तर तुमच्या पाठीशी कुणीच नव्हतं. आजही नाही. अशा कुठल्याही वेळी तुम्हाला कधी एकटेपण जाणवलं का अण्णा? का तुमच्या अभ्यासाची आणि त्यातून समोर आलेल्या सत्यांची ताकद तुमच्या सोबत होती? आता आणखी विस्कळीत झालेल्या, आणखी दुभंगलेल्या समाजामध्ये हरवत चाललेल्या निखळ ज्ञानप्रेरणा पाहताना भविष्यातला संभाव्य काळोख तुम्हाला अस्वस्थ करतो की तुम्ही निर्माण केलेला उजेड तुम्हाला ही अनिश्चित आणि असुरक्षित परिस्थिती पेलायची ताकद देतो आहे?

प्रसिद्धी आणि पैसा या तुमच्या प्रेरणा कधीच नव्हत्या. कोणत्याही अपेक्षेखेरीज तुम्ही एखाद्या तपस्व्याप्रमाणे ज्ञानसाधना करत आलात; थोडीथोडकी नव्हे, तर सहा दशकं अव्याहत करत आलात. आर्थिक व्यवहारा-ऐवजी तुम्ही ज्ञानव्यवहार महत्वाचा मानलात. आर्थिक प्रतिकूलतेचा बाऊ न करता तुम्ही तुमच्या मार्गानं जात राहिलात. या वाटचालीत जे जे भलं-बुरं वाट्याला आलं त्याचा स्वीकार तुम्ही निर्ममपणे करत गेलात. नावलौकिक आणि पुरस्कार तुम्ही ज्या स्थितप्रज्ञ वृत्तीनं स्वीकारलेत त्याच शांत वृत्तीनं तुम्ही मित्रांचे अकाली मृत्यू आणि जवळच्या मानलेल्या लोकांनी केलेली प्रतारणाही स्वीकारलीत. सुदैवानं तुम्हाला मित्रमंडळी, वाचक आणि अनेक ज्येष्ठ आणि तरुण अभ्यासक यांचं भरभरून प्रेमही मिळालं. पण अण्णा, आता जग फार फार बदललं आहे. तुमच्यासारखं ज्ञानकेंद्रित आयुष्य जगणं आता अशक्य आहे. पैसा हाच जगण्याचा गाभा झाला आहे आणि खऱ्या विद्वत्तेला अनेकानेक अडचणींचा सामना करावा लागतो आहे. प्रत्येक कालखंडात सुष्ट-दुष्ट यांचं द्वंद्व असतंच. गैरव्यवहार आणि वाईट प्रवृत्तीही असतात. पण जागतिकीकरणाच्या लाटेनं नकली, वरवरच्या आणि तकलादू गोष्टींचं वजन अफाट वाढवलं आहे आणि सगळ्या शुद्ध, शाश्वत आणि टिकाऊ गोष्टींना अनाथ, निर्वासित करून सोडलं आहे. साहित्यव्यवहार आणि एकूणच ज्ञानव्यवहार आता पूर्वीसारखा शुद्ध-पारदर्शक नाही राहिलेला अण्णा. राजकारण, गटबाजी, जातपात, साटीलोटी आणि वशिलेबाजी अशा अपप्रवृत्तींनी त्याला नासवलं आहे. या वातावरणात निखळ ज्ञानप्रेरणा सोबत घेऊन वाटचाल करणाऱ्यांनी कसं जगायचं, सांगा नं?

अण्णा, तुम्हाला या कशाची कल्पनाच नाही, असं मी म्हणणार नाही. फक्त अशा जगात जगताना आमची फार ससेहोलपट होते आहे, हे तुम्हाला आज सांगावंसं वाटतं आहे. तुमच्यामुळे ज्या निरंजन मूल्यांचं अवकाश आम्ही अनुभवलं, ज्या विशुद्ध अवकाशात आम्ही वाढलो, ते आता फार दूर गेलं आहे आणि पायाखालची जमीन तर प्रदूषणानं अतिविषारी बनली आहे. तिथे पाय रुजवण्याची भीती वाटावी अशी परिस्थिती आहे. हे विष आम्हाला संपवणार नाही, हे निश्चित. आपल्या अस्तित्वावरच कुणी घाला घालू बघितला तर सर्वशक्तीनिशी उभं राहण्याची ताकदही दिली आहे तुम्ही आम्हाला. पण बुद्धी आणि आर्थिक व्यवहार यांची सांगड घालतच आम्हाला जगावं लागणार. आमच्यासाठी ही गोष्ट सोपी नाही. त्यासाठी लागणारं बळही तुमच्याकडूनच हवं आहे अण्णा. तुमची समजूत ते देईल, हे मला माहीत आहे.

तुम्हाला आठवतंय, मी मॉन्टेसरीत असताना एकदा तुम्ही मला न्यायला आला होतात. शाळेच्या आवारात तुम्हाला कुणी तरी ओळखीचं भेटलं म्हणून तुम्हाला वर्गापाशी यायला वेळ लागला होता. पण तोवर सगळी मुलं आपापल्या पालकांसोबत घरी गेली होती. त्यावेळी मला भयंकर असुरक्षित वाटलं असणार. कारण मी मांडलेला आकांत मला अजून आठवतो आहे. खरं तर तुम्ही अगदी जवळ, शाळेच्या पटांगणातच होतात. पण एकटेपणाच्या जाणीवेनं माझा जीव फार कासावीस झाला होता. आजच्या जगात आम्ही तिघं भावंडं एका प्रकारे एकटीच आहोत अण्णा. पण तुम्ही समोर आहात, आम्हाला आश्वस्त करायला. आहात ना? त्याच बळावर आम्ही पुढे चालत राहू.

तुमची,
वर्षा

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**वर्षा गजेंद्रगडकर**
भ्रमणध्वनी : ९८२२० ५६१२४
varshapune19@gmail.com

## स्त्री-संघर्ष, उमेद आणि कर्तृत्व प्रतिबिंबित करणारी ३ पुस्तकं...

रोहन प्रकाशन



### १२ स्त्रियांनी आपल्या अस्तित्वासाठी केलेला संघर्ष आणि मिळवलेला स्वतःचा पैस...

संपादन : **लीला गुलाटी, जसोधरा बागची**

अनुवाद : **मीना वैशंपायन**

किंमत रु. २५०



### एक व्यापक जीवनानुभूती देणारा अनोखा ललित संग्रह...

लेखिका : **पद्मजा फाटक (मजेत)**

किंमत रु. २००



### सत्यकथा एका झरीनाची... गगनाला गवसणी घालणाऱ्या उमेदीची!

लेखिका : **शोभा बोंद्रे**

किंमत रु. २४०

**रोहन प्रकाशन**

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०

पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०

मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

E-mail : rohanprakashan@gmail.com


अधिक माहिती व ONLINE SHOPPING यासाठी

**www.rohanprakashan.com**

सर्वत्र उपलब्ध

# देवतरु पारिजात

**प्रा. नीला कोर्डे**



''लक्ष्मी-कौस्तुभ-पारिजातक-सुरा...'' विवाहप्रसंगी मंगलाष्टकांमध्ये हमखास म्हटला जाणारा हा श्लोक आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहे. समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नांची नामावली या श्लोकात आली आहे. या चौदा रत्नांपैकी एक रत्न म्हणजे पारिजात! रत्न याचा अर्थ उत्कृष्ट वस्तू. पारिजाताला रत्न म्हटल्याने तो सर्व वृक्षांमध्ये श्रेष्ठ असल्याचे स्पष्ट होते.

या वृक्षाच्या पारिजात या नावाचा संबंधही त्याच्या समुद्रातून झालेल्या उत्पत्तीशी आहे. हेमाद्रि नावाच्या संस्कृत टीकाकाराने पारिजात या शब्दाची व्युत्पत्ती पुढीलप्रमाणे दिली आहे. पारमस्यास्तिति पारी पारिण्यब्धौ जातः पारिजातः।

अर्थ - ज्याला पार म्हणजे किनारा आहे तो पारी म्हणजेच समुद्र. समुद्रात जो उत्पन्न झाला तो पारिजात.

समुद्रमंथनातून बाहेर आलेला पारिजात देवांनी स्वर्गात नेला आणि इंद्राच्या नंदनवनात लावला. अशाप्रकारे हा वृक्ष स्वर्गीय झाला. या स्वर्गीय पारिजाताला 'देवतरु' म्हटले आहे. अमरकोशात पुढील पाच देवतरु सांगितले आहेत-

*पञ्चैते देवतरवो मन्दारः पारिजातकः।*
*संतानः कल्पवृक्षश्च पुंसि वा हरिचन्दनम्।।*

अर्थ - मंदार, पारिजातक, संतान, कल्पवृक्ष व हरिचंदन हे पाच देवतरू आहेत.

पारिजात, पारिजातक किंवा प्राजक्त जसा वनात वाढतो तसा उपवनातही लावला जातो. मध्यम उंचीच्या रुक्ष दिसणाऱ्या या वृक्षाची फुले मात्र जणू नाजूकतेची परिसीमाच! मोतिया-पांढरा रंग असणारी ही फुले त्यांच्या मध्यभागी असणारा लालकेशरी ठिपका आणि तसाच लालकेशरी देठ यांच्यामुळे तर अधिकच खुलून दिसतात. समुद्रातून निघाल्यामुळे जणू समुद्रातील मोत्यांचा आणि पोवळ्यांचा रंग या फुलांनी घेतला आहे. इतकेच नव्हे तर समुद्रातील जलही त्यामध्ये आहे. कारण हातात घेतल्यावर काही वेळातच या फुलांचे अक्षरशः पाणी होऊन जाते. रात्री फुलणाऱ्या या फुलांचा सुगंधही त्यांच्या रूपाप्रमाणेच मोहविणारा! पण

**समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नांची. या रत्नांपैकी एक रत्न म्हणजे पारिजात! रत्न याचा अर्थ उत्कृष्ट वस्तू. पारिजाताला रत्न म्हटल्याने तो सर्व वृक्षांमध्ये श्रेष्ठ असल्याचे स्पष्ट होते. पारिजात या नावाचा संबंधही त्याच्या समुद्रातून झालेल्या उत्पत्तीशी आहे. पार म्हणजे किनारा आहे तो पारी म्हणजेच समुद्र. समुद्रात जो उत्पन्न झाला तो पारिजात.**

रातराणी, निशिगंध यांच्यासारखा मादक मात्र नाही. पारिजाताच्या सुवासामुळे संस्कृतमध्ये सुवासालाही 'पारिजात' हे नाव देण्यात आले आहे. पारिजात आणि सुवास हे जणू समानार्थी शब्द आहेत. रात्री फुललेल्या या फुलांची 'अरुण-उषेच्या मीलनकाली' म्हणजे पहाटे पखरण होते.

पारिजाताची फुले पहाटे गळून पडत असल्यामुळे त्याला मिळालेले वनस्पतीशास्त्रीय नाव मात्र काहीसे विचित्र आहे. निक्टॅन्थस अर्बोर-ट्रिस्टिस' (Nyctanthes arbor tristis) हे त्याचे वनस्पतीशास्त्रीय नाव! निक्टॅन्थस म्हणजे रात्री फुलणारा! पारिजाताच्या टपटप पडणाऱ्या फुलांवर अश्रूंची कल्पना केल्यामुळे त्याला ''अर्बोर ट्रिस्टिस' म्हणजे अश्रू ढाळणारे, दुःखी दिसणारे, झाड मानले आहे. यामुळेच त्याला 'ट्री ऑफ सॉरो' (Tree of sorrow) हे नाव मिळाले. वनस्पतीशास्त्रात पारिजाताविषयी 'अश्रूंची झाली फुले' ऐवजी 'फुलांचे झाले अश्रू' म्हटले आहे!

वनस्पतीशास्त्रदृष्ट्या नकारात्मक नाव मिळालेल्या पारिजातावर कवी कुसुमाग्रजांनी मात्र किती सुंदर, सकारात्मक कल्पना केली आहे! मोतिया शुभ्र आणि लालकेशरी रंगाने युक्त फुले असणारा हा वृक्ष 'रागी' (राग = लाल रंग, आसक्ति) असूनही 'विरागी' आहे. म्हणूनच या 'सात्त्विक' वृक्षाला कुसुमाग्रजांनी 'संन्यस्त' म्हटले आहे. अश्रू ढाळणाऱ्या नव्हे, तर माणिक-मोत्यांचा रंग असणाऱ्या सुवासिक फुलांची बरसात करून आपले पुष्पवैभव भूमातेला अर्पण करणाऱ्या, या वृक्षाविषयी आपल्या 'उषःकाल' या नितांतसुंदर निसर्गकवितेत कुसुमाग्रज म्हणतात-

*माणिक-मोत्यांची पायाशी घालून बरसात*
*बसे संन्यस्त पारिजात*
*वाहू लागला सुगंधवास तो वातावरणी*
*झाला उषःकाल राणी*

खरोखर 'संन्यस्त' हेच विशेषण या सात्त्विक वृक्षाला योग्य आहे!

केवळ फुलांच्या रूपाने पारिजात माणिक-मोतीच देतो असे नव्हे, तर फुलांच्या रूपाने तो पैसेही देतो. पारिजाताची फळे चपटी, वर्तुळाकार असून सुरुवातीला हिरवी आणि नंतर तपकिरी दिसतात. प्रत्येक फळाचे दोन भाग



असून प्रत्येकात एकेक बी असते. ही गोल चपटी फळे नाण्यांप्रमाणे दिसतात. जणू पारिजाताच्या रूपाने निसर्गाने 'पैशाचे झाड'च लावलेले आहे!

असा हा पारिजात प्राचीन वेदवाङ्मयात आढळत नसला तरी रामायण, महाभारत आणि पुराणे यांमध्ये मात्र आढळतो. रामायण आणि महाभारत यांमध्ये पारिजाताविषयीची समुद्रमंथनाची कथा आली आहे. तसेच पारिजात स्वर्गात नेल्यानंतर कृष्णाने तो पुन्हा पृथ्वीवर आणल्याची म्हणजेच 'पारिजातहरणा' (उत्तर खंड) यांमध्ये आणि महाभारताचे खिल (appendix) मानल्या गेलेल्या हरिवंशात आपल्याला पाहावयास मिळते.

त्रिलोकाला त्रास देणारा प्रागज्योतिषपूरचा राजा भूमिपुत्र भौमासूर म्हणजेच नरकासूर याचा इंद्राच्या विनंतीवरून श्रीकृष्ण वध करतो. यानंतर नरकासुराने हिरावून घेतलेली देवमाता अदिती हिची कुंडले परत करण्यासाठी कृष्ण सत्यभामेसह स्वर्गात गेला असता नंदनवनातील पारिजातवृक्ष तिच्या दृष्टीस पडतो. तिला तो वृक्ष आपल्या उपवनात असावा अशी तीव्र इच्छा होते. तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी कृष्ण इंद्राशी युद्ध करतो

**पारिजाताची फुले पहाटे गळून पडत असल्यामुळे त्याला मिळालेले वनस्पतीशास्त्रीय नाव मात्र काहीसे विचित्र आहे. निक्टॅन्थस म्हणजे रात्री फुलणारा! पारिजाताच्या टपटप पडणाऱ्या फुलांवर अश्रूंची कल्पना केल्यामुळे त्याला ''अर्बोर ट्रिस्टिस' म्हणजे अश्रू ढाळणारे, दुःखी दिसणारे, झाड मानले आहे. यामुळेच त्याला 'ट्री ऑफ सॉरो' हे नाव मिळाले.**



**पारिजाताचे फूल इच्छित सुगंध देणारे, इच्छित उष्णता किंवा शीतलता देणारे तसेच प्रेमवृद्धी करणारे असते. त्या फुलापासून अन्य फुलेही प्राप्त होतात. ते फूल इच्छिल्याप्रमाणे लहान-मोठे होणारे असते. रात्री दिव्याप्रमाणे प्रकाश देते. इच्छित गीते, मधुर वाद्ये ऐकविते.**



आणि पारिजात वृक्ष पृथ्वीवर आणतो, अशी पारिजातहरणाची कथा आहे.

भागवत पुराणाच्या दशम स्कंधातील ५९व्या अध्यायात ही पारिजातहरणाची कथा आली आहे. सत्यभामेच्या सांगण्यावरून कृष्णाने पारिजात वृक्षच उपटल्याचे पुढील श्लोकात सांगितले आहे-

*चोदितो भार्ययोत्पाट्य पारिजातं गरुत्मति।*
*आरोप्य सेन्द्रान्विबुधान्निर्जित्योपानयत्पुरम्।।*

(भागवत दशम स्कन्ध-अध्याय ५९ श्लोक क्र. ३९)

अर्थ - पत्नीच्या आग्रहावरून कृष्णाने पारिजात उपटून काढला आणि गरुडाच्या खांद्यांवर ठेवून आपल्या पुरामध्ये म्हणजे द्वारकानगरीत आणला. त्याला विरोध करणाऱ्या इंद्रादि देवांशी त्याने युद्ध केले.

सत्यभामेच्या गृहोद्यानात स्थापना केलेल्या या पारिजाताविषयी पुढे म्हटले आहे -

*स्थापितः सत्यभामाया गृहोद्यानोपशोभनः।*
*अन्वगुर्भ्रमराः स्वर्गात्तद्गन्धासवलम्पटाः।।*

(भागवत दशम स्कन्ध श्लोक क्र. ३०)

अर्थ - द्वारकेस आल्यावर कृष्णाने त्या पारिजातकाची सत्यभामेच्या गृहोद्यानात स्थापना केली. त्यामुळे त्या उद्यानाला फारच शोभा आली. त्या वृक्षाच्या फुलांच्या सुगंधावर मोहित झालेले भ्रमर स्वर्गातून त्याच्या मागोमाग आले होते.

विष्णुपुराणात अध्याय ३० आणि ३१मध्ये आलेली पारिजातहरणाची कथाही भागवत पुराणातील कथेप्रमाणेच आहे. फक्त ती अधिक विस्तृत आहे. या कथेतही दिव्य म्हणजे स्वर्गीय पारिजाताचे वर्णन आले आहे. इंद्रपत्नी शचि हिच्यासाठी खास स्वर्गात आलेला हा वृक्ष खरोखरच दिव्य होता. त्याची साल सोन्याची असून त्याची कोवळी पालवी ताम्रवर्णाची होती. शिवाय तो सुगंधी फळांनीही लगडून गेला होता.

सत्यभामेला अशा वृक्षाच्या फुलांचा अलंकरणासाठी मोह होणे स्वाभाविकच होते.

यानंतर कृष्ण आणि इंद्रादि देव यांच्यातील युद्धाचे वर्णनही तपशिलवार आणि अलंकारिक पद्धतीने आहे. नंतर कृष्ण आणि इंद्र यांचा समेटही दाखविला आहे. इंद्र कृष्णाचे परमात्मास्वरूप जाणून स्वखुशीने त्याला पारिजात वृक्ष देतो. हा अद्भुत वृक्ष पृथ्वीवर सत्यभामेच्या उद्यानात आणल्यानंतर त्याचा सुगंध तीन योजने पसरतो. इतकेच नव्हे तर त्याच्या जवळ जाणाऱ्या यादवांना आपल्या दिव्य पूर्वजन्माची स्मृती होते.

सर्व पुराणांमध्ये भागवत पुराण सर्वाधिक प्रसिद्ध असूनही विष्णु पुराणातील पारिजातहरणाची कथा काव्यमय असल्याने चित्ताकर्षक झाली आहे. हरिवंशाच्या विष्णुपर्वात अध्याय ६४ ते ७६मध्ये पारिजातहरणाची कथा आहे. त्यांपैकी अध्याय ६४ मध्ये श्रीकृष्ण पारिजात पृथ्वीवर आणीत असता इंद्राने त्याला विरोध केला नाही, असे दाखविले आहे. परंतु अध्याय ६५ पासूनचा कथाभाग वेगळा आहे. तो असा -

अदितीला तिची दिव्य कुंडले देऊन स्वर्गातून आल्यानंतर कृष्ण आपली पट्टराणी रुक्मिणी हिच्यासह रैवतक पर्वतावर जातो. रुक्मिणीच्या उपवासाचे पारणे असल्याने कृष्ण ब्राह्मणांची अगत्यपूर्वक पूजा करून त्यांना संतुष्ट करतो. कृष्णाच्या रैवतक पर्वतावरील वास्तव्यात एकदा तो रुक्मिणीसह एका आसनावर बसला असता नारदमुनी तेथे येतात आणि त्यांच्याकडे असलेले स्वर्गीय-पारिजात वृक्षाचे फूल कृष्णास देतात. रुक्मिणी कृष्णाच्या बाजूलाच बसलेली असल्याने सहजच तो ते फूल तिला देतो. ती ते केसांत माळते. नंतर नारदमुनी त्या फुलाचे माहात्म्य रुक्मिणीला सांगतात-

ते फूल इच्छित सुगंध देणारे, इच्छित उष्णता किंवा शीतलता देणारे तसेच प्रेमवृद्धी करणारे असते. त्या फुलापासून अन्य फुलेही प्राप्त होतात. ते फूल इच्छिल्याप्रमाणे लहान-मोठे होणारे असते. रात्री दिव्याप्रमाणे प्रकाश देते. इच्छित गीते, मधुर वाद्ये ऐकविते.

रुक्मिणीकडे ते पारिजाताचे फूल एक संवत्सरपर्यंत राहणार असते. रुक्मिणीला पारिजात पुष्प मिळाल्याची वार्ता तिच्या अन्य सवतींच्या परिचारिका आपल्या स्वामिनींना सांगतात. कृष्णाची दुसरी प्रिय पत्नी सत्यभामा हिला मात्र ही गोष्ट सहन होत नाही. ती क्रोधाने आपले केशरी वस्त्र सोडून शुभ्र वस्त्र परिधान करते. सजल मेघात तारका शिरावी त्याप्रमाणे क्रोधागारात प्रवेश करते. ही गोष्ट कृष्णाच्या

लक्षात येताच तो क्रोधागारात शिरून सत्यभामेची समजूत घालू लागतो.

यानंतरचा कथाभाग सत्यभामेचे ‘पुण्यकव्रत’ संपन्न करण्यासाठी कृष्णाने इंद्राशी युद्ध करून पारिजात वृक्ष पृथ्वीवर आणल्याचा व पुण्यकव्रताच्या समाप्तीनंतर तो पुन्हा स्वर्गाला नेल्याचा आहे.

हरिवंशातील पारिजातहरण कथेत पारिजाताविषयी काही विशेष नमूद करण्यासारख्या गोष्टी आहेत. त्यामध्ये पारिजाताच्या उत्पत्तीविषयी असे म्हटले आहे की, धर्मनिष्ठ महात्मा कश्यप यांनी आपल्या प्रिय पत्नीचे-अदितीचे पुण्यकव्रत संपन्न होण्यासाठी हा महावृक्ष निर्माण केला. तो सर्वदा सुवास देणाऱ्या व सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या (पुरविणाऱ्या) अशा पुष्पांनी सर्वदा भरलेला असे. त्याला सर्वदा तीन शाखा असत. तो प्राणिमात्रांचे मन हरण करणारा असून सर्वदाच दर्शनीय होता. कारण त्या महावृक्षावर सर्व प्रकारची पुष्पे आढळत. हा तरु कश्यपांनी मंदार नामक कल्पवृक्षाचे सार काढून निर्माण केला असल्यामुळे सर्व वृक्षांत श्रेष्ठत्व पावला.

अदितीने कश्यपांच्या कंठात पुष्पमाला घालून, त्यांना पारिजात वृक्षाला बांधून त्यांच्यासह तो वृक्ष नारदमुनींना दान दिला. तसेच इंद्रपत्नी इंद्राणी, सोमपत्नी रोहिणी आणि कुबेरपत्नी ऋद्धि यांनीही सौभाग्यप्राप्त्यर्थ या वृक्षाचे नारदमुनींना असेच दान दिले. यावरून हा वृक्ष स्त्रियांना सौभाग्य देणारा आहे असे मानले जाते. गंगानदीच्या ‘पारावर’ म्हणजे परतीरावर हा ‘जात’ म्हणजे उत्पन्न झाला म्हणून याला ‘पारिजात’ असे नाव पडले. हा मंदार-पुष्पांनी युक्त असल्याने याला मंदार असेही म्हणतात. शिवाय अज्ञानी लोक हा वृक्ष कोणता हे ओळखता न आल्यामुळे ‘‘कोऽपि अयं दारुः।’’ हा कोणतातरी वृक्ष आहे असे म्हणू लागल्यामुळे त्याला ‘कोविदार’ असेही नाव पडले. अशा प्रकारे हा दिव्य वृक्ष मंदार, पारिजात आणि कोविदार या तिन्ही नावांनी प्रसिद्ध आहे.

हरिवंशामध्ये अशा प्रकारची स्वर्गीय पारिजाताविषयी माहिती आली आहे. सत्यभामेसाठी पारिजातहरण करणाऱ्या स्वतः कृष्णालाही हा वृक्ष कदंबाप्रमाणेच प्रिय आहे. या वृक्षांचेही जणू कृष्णावर प्रेम आहे. म्हणूनच तो श्रावणात फुलून कृष्णजन्माचे स्वागत करतो. श्रावणातल्या रिमझिम जलधारांमध्ये पहाटे भिजलेल्या पारिजातकाची फुले खरोखरच मोत्यांप्रमाणे पाणीदार दिसतात. श्रावणात फुलणाऱ्या पारिजाताविषयी आपल्या ‘श्रावणमास’ या कवितेत बालकवी म्हणतात-
‘‘पारिजातही बघता भामा रोष मनीचा मावळला.’’

स्वर्गीय पारिजात पृथ्वीवर आल्यानंतर जसे त्याने पृथ्वीरील वनांना आणि उपवनांना सुगंधित केले, तसाच अभिजात संस्कृत साहित्यातही त्याचा मंद मधुर गंध दरवळत राहिला.

आदिकवी वाल्मीकींच्या रामायणात अयोध्येतील अशोक वाटिकेचे वर्णन आहे. अंतःपुरातील या वाटिकेत अशोक, चंपक, बकुल यासारख्या वृक्षांबरोबरच पारिजातही लावण्यात आला होता. त्याचा उल्लेख पुढील श्लोकात आला आहे.

*चम्पकाशोकपुन्नागमधूकपनसासनैः।*
*शोभितां पारिजातैश्च विधूमज्वलनप्रभैः।।*
(रामायण उत्तरकाण्ड सर्ग ४२ श्लोक क्र. ३)

अर्थ – ती अशोक वाटिका धूमविरहीत अग्नीप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या चम्पक, अशोक, पुन्नाग, मधूक (मोहाचे झाड), पनस (फणस), असन तसेच पारिजात या वृक्षांनी शोभिवंत दिसत होती.

यानंतरच्या अभिजात संस्कृत साहित्यातही पारिजाताला महत्त्वाचे स्थान दिलेले दिसून येते.



**सत्यभामेसाठी पारिजातहरण करणाऱ्या स्वतः कृष्णालाही हा वृक्ष कदंबाप्रमाणेच प्रिय आहे. या वृक्षांचेही जणू कृष्णावर प्रेम आहे. म्हणूनच तो श्रावणात फुलून कृष्णजन्माचे स्वागत करतो. श्रावणातल्या रिमझिम जलधारांमध्ये पहाटे भिजलेल्या पारिजातकाची फुले खरोखरच मोत्यांप्रमाणे पाणीदार दिसतात. स्वर्गीय पारिजात पृथ्वीवर आल्यानंतर जसे त्याने पृथ्वीरील वनांना आणि उपवनांना सुगंधित केले, तसाच अभिजात संस्कृत साहित्यातही त्याचा मंद मधुर गंध दरवळत राहिला.**





कविकुलगुरू कालिदासाच्या 'रघुवंशम्' आणि 'कुमारसम्भवम्' या दोन विदग्ध महाकाव्यांमध्ये पारिजात आला आहे. रघुवंशाच्या सहाव्या सर्गातील इन्दुमती-स्वयंवर वर्णनात, स्वयंवरास जमलेल्या सर्व राजांमध्ये रघुपुत्र अज कसा श्रेष्ठ होता हे सांगताना कालिदास म्हणतो-

*तेषां महार्हासन संस्थितानामुदारनेपथ्यभृतां स मध्ये।*
*रराज धाम्ना रघुसूनुरेव*
*कल्पद्रुमाणामिव पारिजातः ।।६।।*

(रघुवंशम् सर्ग ६ श्लोक क्र. ६)

अर्थ - अत्यंत मौल्यवान आसनांवर बसलेल्या, उत्कृष्ट वेष धारण केलेल्या त्या राजांमध्ये तो रघुपुत्र अज स्वतेजाने, कल्पवृक्षांमध्ये जसा पारिजात, तसा शोभत होता.

कालिदासाने अजाला स्वर्गीय पारिजाताची उपमा देऊन पारिजाताचे कल्पवृक्षांमधील श्रेष्ठत्वही सूचित केले आहे. देवतरुंमध्ये कल्पवृक्ष स्वतंत्र असला तरी येथे पारिजातालाही कल्पवृक्ष मानले आहे.

कुमारसंभवात पारिजात अनेक वेळा आला आहे. शिव-पार्वतीचा पुत्र कार्तिकेय याच्या संभवाची म्हणजे जन्माची कथा असणाऱ्या या काव्यात शिव-पार्वतीच्या प्रणयक्रीडेचे वर्णन करताना कवी म्हणतो -

*तां पुलोमतनयालकोचितैः*
*पारिजातकुसुमैः प्रसाधयान।*
*नन्दनै चिरमयुग्मलोचनः सस्पृहं*
*सुरवधूभिरीक्षितः ।।*

(कुमारसम्भवम् सर्ग ८ श्लोक क्र. २७)

अर्थ - ज्यावेळी शिव (अयुग्मनेत्र) नंदनवनात पुलोमतनयेच्या (इंद्रपत्नीच्या) केसांत माळण्यास योग्य असणाऱ्या पारिजात-कुसुमांनी पार्वतीचे प्रसाधन करीत असे, तेव्हा देवांगना त्याच्याकडे साभिलाष नजरेने पाहत असत.

**कालिदासाने अजाला स्वर्गीय पारिजाताची उपमा देऊन पारिजाताचे कल्पवृक्षांमधील श्रेष्ठत्वही सूचित केले आहे. देवतरुंमध्ये कल्पवृक्ष स्वतंत्र असला तरी येथे पारिजातालाही कल्पवृक्ष मानले आहे.**



दुसऱ्या एका श्लोकात म्हटले आहे -

*रतिश्लथं तत्कबरीकलापमंसावसक्तं*
*विगलत्प्रसूनम्।*
*स पारिजातोद्भवपुष्पमय्या स्रजा*
*बबन्धामृतमूर्तिमौलिः ।।*

(कुमारसम्भवम् सर्ग ९ श्लोक क्र. २१)

अर्थ - रतिक्रीडेच्या वेळी सैल होऊन पार्वतीच्या खांद्यांवर रुळणाऱ्या केशकलापातील फुले ओघळली असता, शिवाने पुन्हा तो केशकलाप पारिजात पुष्पांच्या मालेने बांधला.

आणखी एका श्लोकात पारिजाताचा सुगंध वाहून आणणाऱ्या आणि पार्वतीच्या सुरतश्रमांचा परिहार करणाऱ्या वायूचा उल्लेख आला आहे-

*स्वर्वाहिनीवारिविहारचारी*
*रतान्तनारीश्रमशान्तिकारी।*
*तौ पारिजातप्रसवप्रसङ्गौ मरुत्सिषेवे*
*गिरिजागिरीशौ ।।*

(कुमारसम्भवम् सर्ग ९ श्लोक क्र. ३८)

अर्थ - शिव आणि पार्वती यांची स्वर्गंगेच्या जलाने शीतल झालेल्या, फुललेल्या पारिजातामुळे सुगंधित झालेल्या, तसेच रतिश्रांत नारीचा श्रमपरिहार करणाऱ्या वायूने सेवा केली.

कुमारसंभवातील आणखी एका श्लोकात देवाधिराज इंद्र आपल्या मुकुटावर पारिजात पुष्पे धारण करीत असल्याचा उल्लेख आहे.

*किरीटकोटिच्युतपारिजातपुष्पोत्करेणानामितेन*
*मूर्ध्ना।*
*स्वर्गेकवन्द्यो जगदेकवन्द्यं तं देवदेवं प्रणनाम*
*देवः ।।*

(कुमारसम्भवम् सर्ग १२ श्लोक क्र. २९)

अर्थ - स्वर्गात ज्याची सर्वजण पूजा करतात त्या देवेंद्राने जेव्हा सर्व जगाला वंदनीय असणाऱ्या महादेवाला प्रणाम करण्यासाठी मस्तक झुकविले, तेव्हा त्याच्या मुकुटाच्या टोकावरील पारिजातपुष्पे खाली पडली.

स्वर्गातील वैजयंत प्रासादाच्या वर्णनातही पारिजात आला आहे-

*निसर्गकल्पद्रुमतोरणं तं पारिजातप्रसवस्रगाढ्यम्।*
*दिवैः कृतस्वस्त्ययनं मुनीन्द्रैरन्तः प्रविष्टप्रमदं*
*प्रपेदे ।।*

(कुमारसम्भवम् सर्ग १३ श्लोक क्र. ४३)

अर्थ - कार्तिकेयाने पारिजात पुष्पमालांनी संपन्न, कल्पवृक्षांचे नैसर्गिक तोरण असणाऱ्या

वैजयंत प्रासादात प्रवेश केला. तिथे त्याचे आधीच प्रवेश केलेल्या अप्सरांनी तसेच कल्याणकारक मंत्रपाठ (स्वस्त्ययनम्) केलेल्या मुनिवरांनी स्वागत केले.

शिव-पार्वतीशी संबंधित असलेल्या कुमारसम्भवातील हे पारिजातविषयक उल्लेख पाहिल्यावर असे दिसून येते की, हा वृक्ष शिव-पार्वतीना प्रिय आहे. म्हणूनच हिंदी भाषेत या वृक्षाला नाव मिळाले आहे, हरसिंगार!

मराठीतही शिव-पार्वतीविषयक भावगीतांमध्ये पारिजात आला आहेच!

*पार्वती वेची बिल्वदले*
*फुले लहरली प्राजक्तावर*
*तो तर भासे प्रसन्न शंकर*
*सुमने कसली हास्य हराचे*
*भूमीवर उधळे*

इथे मोती-पोवळ्यांचा रंग असणाऱ्या पारिजात पुष्पांवर कर्पूरगौर शिवाच्या पोवळ्यासारख्या ओठांवर धवल दंतपंक्तीतून उमटणाऱ्या हास्याची केलेली कल्पना नितांत रमणीय आहे.

कालिदासाच्या महाकाव्यांमध्ये पारिजात आला असला तरी तो खऱ्या अर्थाने बहरला आहे बाणभट्टाच्या 'हर्षचरितम्' आणि 'कादम्बरी' या गद्यकाव्यांमध्ये!

सम्राट श्रीहर्षाच्या राजदरबारी असणाऱ्या बाणभट्टाचे पारिजातावर अगदी मनापासून प्रेम आहे. त्याच्या 'हर्षचरितम'मध्ये पारिजात अनेक वेळा आला आहे.

सम्राट हर्षवर्धनाच्या दर्पशात नावाच्या हत्तीच्या वर्णनात, त्याच्या गंडस्थळातून वाहणाऱ्या मदाला पारिजाताचा सुगंध असल्याचा उल्लेख आहे-

*पारिजातकवनांनी वोपभुक्तानि पुनः पुनः*
*करटाभ्यां बहलामोद व्याजेन विसृंजन्तम् ।।*

(हर्षचरितम् द्वितीयः उच्छ्वासः)

अर्थ - जणू काही आपण उपभोगिलेली (संचार केलेली) पारिजात वनेच तो गंडस्थळातून पाझरणाऱ्या मदाच्या सुगंधाच्या मिषाने मुक्त करीत होता.

आणखी एका ठिकाणी दर्पशातालाच, ज्याच्याभोवती शेकडो शिलीमुख म्हणजे भ्रमर गुंजारव करीत आहेत अशा पारिजात वृक्षाची उपमा दिली आहे -

*शिलीमुखशतझाङ्कारितं पारिजातपादपं ।।*

(हर्षचरितम् द्वितीयः उच्छ्वासः)



**कालिदासाच्या महाकाव्यांमध्ये पारिजात आला असला तरी तो खऱ्या अर्थाने बहरला आहे बाणभट्टाच्या 'हर्षचरितम्' आणि 'कादम्बरी' या गद्यकाव्यांमध्ये! सम्राट श्रीहर्षाच्या राजदरबारी असणाऱ्या बाणभट्टाचे पारिजातावर अगदी मनापासून प्रेम आहे. त्याच्या 'हर्षचरितम'मध्ये पारिजात अनेक वेळा आला आहे.**

*With Best Compliments From*

**Granthali's leading paper supplier**

**Mayur Paper Corporation**

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com



हर्षचरिताच्या चौथ्या उच्छ्वासात श्रीहर्षाच्या जन्मोत्सवाचे वर्णन आले आहे. त्यामध्ये 'आमोद' या शब्दावर श्लेष साधून बाणाने म्हटले आहे–

*''शनैः शनैर्व्यजृम्भत... सनन्दनवन इव पारिजातकामोदैः उत्सवामोदः।''*

अर्थ – नंदनवनात पारिजातक आमोद म्हणजे पारिजाताचा सुगंध पसरावा त्याप्रमाणे सर्वत्र हळूहळू उत्सवाचा आमोद म्हणजे आनंद पसरला.

श्रीहर्षाची भगिनी राज्यश्री हिच्या विवाह सोहळ्याचे वर्णनही चौथ्या उच्छ्वासात आले आहे. या वर्णनात नव–वरवेषातील ग्रहवर्म्याला पारिजाताची उपमा दिली आहे–

*''कुसुम–सौरभ–गर्वभ्रान्त–भ्रमरकुल–कलप्रलाप*
*सुभगः पारिजात इव जातः श्रिया सह पुनरवतरितो मेदिनीं।''*

ग्रहवर्म्याच्या गळ्यात सुगंधी फुलांची जयमाला असल्यामुळे त्याच्याभोवती भ्रमर गुंजारव करीत होते. त्यामुळे जन्मतःच राजवैभव असणारा (श्रियासह) ग्रहवर्मा समुद्रमंथनातून लक्ष्मीसह (श्रियासह) बाहेर पडलेल्या पारिजाताप्रमाणे भासत होता.

तसेच स्वर्गातून पृथ्वीवर आणलेल्या पारिजाताप्रमाणे ग्रहवर्मा शोभून दिसत होता.

हर्षचरिताच्या सातव्या उच्छ्वासात दिग्विजयासाठी प्रयाण करणाऱ्या हर्षवर्धनास इंद्राच्या नंदनवनात वाढणाऱ्या बालपारिजाताची उपमा दिली आहे.

''बाल एव पारिजात पादप इव आखण्डलभूमिमारूढः।''

अर्थ – आखण्डलाच्या म्हणजे इंद्राच्या भूमीत (नन्दनवनात) वाढणाऱ्या बालपारिजाताप्रमाणे श्रीहर्षाने बाल असतानाच आखण्डलभूमी म्हणजे इंद्रपद प्राप्त केले.

यानंतर लक्ष्मीने (राज्यलक्ष्मीने) अखिल क्षीरसागराचे माधुर्य घेऊन श्रीहर्षाला आलिंगन दिल्याचा उल्लेख आला अहो. यामुळे श्रीहर्षाला दिलेली पारिजाताची उपमा योग्यच वाटते. पारिजात आणि लक्ष्मी दोघेही क्षीरसागरातून आल्यामुळे त्यांचे साहचर्य आहेच!

हर्षचरितातील पारिजाताचा आणखी एक विशेष सांगण्यासारखा आहे. श्रीहर्षाच्या जन्मोत्सवाच्या वेळी सेवक सुगंधी चूर्णाने भरलेल्या लाल रंगाच्या थैल्या घेऊन जात असल्याचा उल्लेख हर्षचरितात आला आहे–

*गुञ्जन्मधुकरकुल–पीयमानपारिजातपरिमलानि पाटलकानि च।*

हर्षचरिताच्या 'शंकर' नामक प्राचीन टीकाकाराने आपल्या 'संकेत' या टीकेमध्ये पारिजात हे एक सुगंधी चूर्ण असल्याचे म्हटले आहे. (पारिजा सुगन्धिद्रव्यचूर्णम्) हे चूर्ण सहकार (आंबा), चंपक, लवली (राय आवळा), लवंग, वेलची, कंकोळ आणि कापूर यांच्या मिश्रणाने बनविले जात असे. याच्या सुवासामुळे याला सुगंध या अर्थी पारिजात हे नाव पडले असावे. आजच्या काळातील, विविध प्रकारच्या मुखवासांप्रमाणे, या चूर्णाचा 'मुखवास' म्हणून उपयोग करण्यात येत असे.

बाणभट्टाच्या 'कादम्बरी' या गद्यकाव्यात आलेले स्वर्गीय पारिजात मंजरीचे वर्णन संस्कृत साहित्यातील उत्कृष्ट वर्णनाचा नमुना आहे. हे वर्णन लिहिताना बाणभट्टाची लेखणीच जणू पारिजात मंजरी झाली आहे असे वाटते. 'कादम्बरी'ची नायिका कादंबरी हिची सखी महाश्वेता वसंतऋतूत वनात विहार करीत असता, वनातील सर्व पुष्पगंधांना मागे टाकणाऱ्या दिव्य पुष्पगंधाने मोहित होते. त्या सुगंधाचा शोध घेत असताना तापस ऋषिकुमार पुंडरीक तिच्या दृष्टीस पडतो. त्याने कानावर अलंकार म्हणून धारण केलेल्या स्वर्गीय पारिजात मंजरीचा तो सुगंध असतो. महाश्वेता त्या तेजस्वी तापसाच्या प्रथमदर्शनीच प्रेमात पडते. महाश्वेतेला पुंडरीकाकडे आकृष्ट करणाऱ्या या पारिजात मंजरीने जणू 'प्रेमदूती'चे कार्य केले आहे.

जिच्यातून अमृतबिंदू ठिबकत आहेत अशी ही पुष्पमंजरी देवदानवांनी मंथन केलेल्या क्षीरसागरातून निघालेल्या पारिजाताची असते. स्वतः पारिजाताच्या फुलांच्या आणि पल्लवांच्या माला परिधान केलेल्या नंदनवन देवतेने ही मंजरी पुंडरिकाला उपहार म्हणून दिलेली असते. महाश्वेतेच्या मुखातून या पारिजात मंजरीचे वर्णन करताना बाणाची प्रतिभाही 'फुली फुलून' आली आहे. महाश्वेता म्हणते –

वसन्तदर्शनानन्दितायाः स्मितप्रभामिव वनश्रियः – वसंताच्या दर्शनाने आनंदित

**'कादम्बरी'ची नायिका कादंबरी हिची सखी महाश्वेता वसंतऋतूत वनात विहार करीत असता, वनातील सर्व पुष्पगंधांना मागे टाकणाऱ्या दिव्य पुष्पगंधाने मोहित होते. त्या सुगंधाचा शोध घेत असताना तापस ऋषिकुमार पुंडरीक तिच्या दृष्टीस पडतो. त्याने कानावर अलंकार म्हणून धारण केलेल्या स्वर्गीय पारिजात मंजरीचा तो सुगंध असतो. महाश्वेता त्या तेजस्वी तापसाच्या प्रथमदर्शनीच प्रेमात पडते. महाश्वेतेला पुंडरीकाकडे आकृष्ट करणाऱ्या या पारिजात मंजरीने जणू 'प्रेमदूती'चे कार्य केले आहे.**

झालेल्या वनश्रीच्या स्मितप्रभेसारखी.
मलयमारुतागमनार्थं लाजाञ्जलिमिव

मधुमासस्य - वसंतऋतूने मलय पर्वतावरून वाहत येणाऱ्या वायुलहरींच्या आगमनाप्रीत्यर्थ वाहिलेल्या लाह्यांच्या ओंजळीसारखी

यौवनलीलाभिव कुसुमलक्ष्म्याः

पुष्पसंपदेची जणू यौवनलीला (यौवनातील सौंदर्य).

*सुरत-परिश्रम-स्वेदकण-जालकावलीभिव रतेः*

- रतीला कामक्रीडेच्या परिश्रमाने आलेल्या घर्मबिंदूजालाच्या मालिकेप्रमाणे,

*ध्वजचिह्नचामरपिच्छिकामिव मनोभवगजस्य*

- मदनरूपी हत्तीची विजयपताका असणाऱ्या मोरपिसांच्या चवरीसारखी, मधुकरकामुक अभिसारिकाम् - भ्रमररूपी कामुकाची अभिसारिका असल्याप्रमाणे.

कृत्तिकातारास्तबकानुकारिणीम्- कृत्तिका नक्षत्रातील तारासमूहाचे अनुकरण करणारी (तारक समूहाप्रमाणे असणारी).

पुराणातील स्वर्गीय पारिजात वृक्षाच्या कृत्रिम वर्णनापेक्षा बाणाने केलेले हे स्वर्गीय पारिजात मंजरीचे वर्णन किती सहजसुंदर आहे!

बाणभट्टाच्या गद्यकाव्यांनंतर मात्र संस्कृत साहित्याच्या उत्कर्षकाळात पारिजाताचा उल्लेख फारसा आढळत नाही.

नारायणराम आचार्य यांनी संपादित केलेल्या 'सुभाषितरत्नभाण्डागार' या ग्रंथात पारिजातविषयक पुढील दोन सुभाषिते आढळतात.

*परिमलसुरभितनमभसो बहवः कनकाद्रिपरिसरे तरवः।*
*तदपि सुराणां चेतसि निवासितमिव पारिजातेन।।*
(सुभाषित रत्नभाण्डागार-वृक्षान्योक्तयः)

अर्थ - मेरू पर्वताच्या परिसरात नभाला (नभ = आकाश, स्वर्ग) आपल्या सुवासाने सुगंधित करणारे अनेक वृक्ष आहेत. तरीसुद्धा देवांच्या मनात पारिजातालाच स्थान आहे.

*पारिजाततरुं यावन्न लभेत मधुव्रतः।*
*भ्रमणं तावदेवास्य कुञ्जे कुञ्जे तरौ तरौ।।*

(सुभाषितरत्नभाण्डागारं वृक्षान्योक्तयः)

अर्थ - जोपर्यंत भ्रमराला पारिजात तरु मिळत नाही तोपर्यंत त्याचे कुंजाकुंजांतून आणि तरुतरूंवर भ्रमण चालूच राहते.

या दोन्ही सुभाषितांमध्ये पारिजाताचे सर्व वृक्षांमधील श्रेष्ठत्व सांगितले आहे.

अभिजात संस्कृत साहित्याच्या अपकर्ष कालात जे संस्कृत साहित्य निर्माण झाले, त्यामध्ये 'पारिजातहरणा'वर आधारित नाटिका, रूपक, चम्पू तसेच अन्य काव्ये रचली गेली. रमानाथ शिरोमणीचे पारिजातरूपकम्, मदनाची पारिजात मञ्जरी नाटिका, गोपालदास-दिवाकर-कवि चन्द्रोदय यांचे पारिजातहरणम् काव्य, उमापतिः कविराज नारायण रघुनाथ यांचे पारिजातापहरण काव्य यांच्याव्यतिरिक्त विशेष उल्लेखनीय काव्य म्हणजे पंधराव्या शतकात होऊन गेलेला शेषनरसिंहसूरि याचा पुत्र शेषश्रीकृष्ण याची हरिवंशावर आधारित 'पारिजातहरणचम्पूः' (चम्पूः = गद्यपद्यमिश्रित काव्य-स्त्रीलिंगी) विशेष उल्लेखनीय आहे.

आपल्या धर्मग्रंथांमध्येही पारिजाताला स्थान मिळाले आहे. भगवद्गीतेचे पठण करण्यापूर्वी करादिन्यास, हृदयादिन्यास आणि ध्यान सांगितले आहे. ध्यानामध्ये कृष्णाविषयी जो श्लोक आहे, त्यात कृष्णाला 'प्रपन्नपारिजात' म्हटले आहे. येथे पारिजाताचा कल्पतरू म्हणून उल्लेख केलेला असून कृष्ण शरणागतांना पारिजाताप्रमाणे इच्छित फळ देतो असे म्हटले आहे.

निरनिराळ्या देवतांच्या पूजाविधीत पारिजाताची पत्रे व पुष्पे आवश्यक सांगितली आहेत.

वामाचारी शाक्तपंथीय सप्तमी तिथीस रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी राजश्यामला देवीची पारिजातकाच्या फुलांनी पूजा करतात. यामुळे या देवीचे सामीप्य प्राप्त होते असे मानले आहे. (संदर्भ- भारतीय संस्कृतिकोश खंड ५ पृष्ठ ५३१)

उत्तर प्रदेशातील किंतूर या कुंतीने वसविलेल्या गावी 'पारिजाता' देवीचे मंदिर असून त्या मंदिरापासून एक मैलावर पारिजातकाचा एक वृक्ष आहे. ही पारिजातादेवी कुंतीचेच रूप मानतात. याविषयी एक आख्यायिका प्रचलित आहे. ती अशी -

सूर्य कुंतीला दररोज स्वर्गातून पारिजाताचे फूल आणून देत असे. एक दिवस आकाश मेघाच्छादित झाल्यामुळे सूर्याला ते काम करता आले नाही. तेव्हा अर्जुनाने स्वर्गातून तिला पारिजात वृक्षच आणून दिला. तोच हा



**उत्तर प्रदेशातील किंतूर या कुंतीने वसविलेल्या गावी 'पारिजाता' देवीचे मंदिर असून त्या मंदिरापासून एक मैलावर पारिजातकाचा एक वृक्ष आहे. ही पारिजातादेवी कुंतीचेच रूप मानतात. सूर्य कुंतीला दररोज स्वर्गातून पारिजाताचे फूल आणून देत असे. एक दिवस आकाश मेघाच्छादित झाल्यामुळे सूर्याला ते काम करता आले नाही. तेव्हा अर्जुनाने स्वर्गातून तिला पारिजात वृक्षच आणून दिला. तोच हा पारिजात वृक्ष होय. या वृक्षावरून कुंतीला पारिजाता हे नाव पडले.**



पारिजात वृक्ष होय. या वृक्षावरून कुंतीला पारिजाता हे नाव पडले. स्थानिक लोक या पारिजातकाला नवसही बोलतात. नवदंपती प्रथम याच्या दर्शनाला येतात. इथे मुलांचे जावळ वगैरे संस्कारही करतात. मंगळवारी जत्राही भरते. (संदर्भ– भारतीय संस्कृतिकोश खंड ५ पृष्ठ ५३१)

देवलोकातील पारिजात पृथ्वीवर यावा त्याप्रमाणे देववाणीतील म्हणजेच संस्कृत भाषेतील पारिजात भारतीय भाषांमध्ये आला आहे. 'अमृताते पैजा जिंकणाऱ्या' मायमराठीत परिमळला आहे. 'मोगरा फुलला...' म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनाही गीतेच्या श्लोकांमध्ये भेदभाव करू नये हे सांगताना, पारिजाताच्या फुलांचा दृष्टान्त देण्याचा मोह झाला आहे. ते म्हणतात–

*तैसे पहिले सरते। श्लोक न म्हणावे गीते।*
*जुनी नवी पारिजाते। आहाती काई।।*

(ज्ञानेश्वरी अध्याय १८ ओवी क्र. १६८०)

अर्वाचीन मराठी साहित्यात तर पारिजात कुसुमांची पखरणच झाली आहे. आपल्या भावगंधाने त्यांनी मराठी भावगीतांना सुगंधित केले आहे.

*दूर आर्त सांग कुणी छेडिली आसावरी*
*पारिजातकुसुमे ही उधळली मनावरी*

उषःकाली उधळलेल्या पारिजात कुसुमांप्रमाणे कृष्णाच्या बासरीतून छेडलेल्या आसावरीच्या आर्त सुरांनी व्याकुळ झालेली राधा...

*बहरला पारिजात दारी*
*फुले का पडती शेजारी*

कृष्णाची कृष्ण–नीति ओळखून आपला सत्य–भाम म्हणजे सात्त्विक संताप व्यक्त करणारी सत्यभामा...

*अंगणी पारिजात फुलला*
*बहर तयाला काय, माझिया*
*प्रीतीचा आला*
*धुंद मधुर हा गंध पसरला*
*गमते मजला मुकुंद हसला*
*सहवासातुर मदिय मनाचा*
*कणकण मोहरला*

(गीतकार– विद्याधर गोखले, नाटक सुवर्णतुला)

अंगणात फुललेल्या पारिजाताने मोहरलेली रुक्मिणी...

या साऱ्या कृष्णाच्याच नायिका... कोणी व्यथित तर कोणी तृप्त...

सासरी गेलेल्या लेकीलाही माहेरच्या अंगणातला पारिजात आठवतो.

माझिया माहेरा जा रे पाखरा,
अंगणात पारिजात तिथे घ्या हो घ्या विसावा
दरवळे बाई गंध चोहीकडे गावोगावा
हळूच उतरा खाली फुले नाजूक मोलाची
माझ्या मायमाउलीच्या काळजाच्या की तोलाची
(गीतकार– ग. दि. माडगूळकर)

मायमाउलीच्या मायेच्या ओलाव्याने भरलेल्या कोमल काळजाला नाजूक, आर्द्र पारिजात पुष्पांखेरीज अन्य उपमा देताच येणार नाही.

अशी ही मायमाउली आपल्या सुकुमार बाळालाही प्राजक्ताच्या फुलाच्या रूपातच पाहते– ती आपल्या शेजारणीला म्हणते –

*नको गडे शेजीबाई पाहू डोळे वटारून।*
*बाळ प्राजक्ताचे फूल जाईल ना कोमेजून।।*

प्रेमिकांचे सात्त्विक, वासनाविरहित, विशुद्ध प्रेम व्यक्त होते ते या पारिजात कुसुमांनीच!

*प्रीतीचा पारिजात फुलला*
*सुगंध त्याचा तुझ्या नि माझ्या हृदयी दरवळला*

मंद मधुर गंधाची, स्पर्शाने कोमेजून जाणारी ही फुले जणू अशारीर प्रेमाचे प्रतीक आहेत.

मराठीतील केवळ गीतांमध्येच नव्हे तर गद्यातही पारिजाताला स्थान आहे. विशेषतः सच्छील, सत्प्रवृत्तींच्या व्यक्तींचे वर्णन करताना त्यांना पारिजाताचीच उपमा देण्यात आली आहे. ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांना सद्वर्तनी कृष्णरावांचे चित्रण करताना आठवतो तो पारिजात! नाटककार वसंत कानेटकर यांनी आपल्या भ्रष्टाचारविरोधी नाटकाला नाव दिले आहे– 'घरात फुलला पारिजात!'

मराठी साहित्यात विखुरलेली ही प्राजक्ताची फुले वेचावीत तितकी थोडीच!

असा हा स्वर्गीय देवतरु आजही आपल्याला पृथ्वीवर पाहायला मिळतो, यापरते भाग्य ते कोणते?

. . . . . . . . . . . . . . . . .

**प्रा. नीला कोर्डे**
दूरध्वनी : २५३९७९१२

**मराठीतील केवळ गीतांमध्येच नव्हे तर गद्यातही पारिजाताला स्थान आहे. विशेषतः सच्छील, सत्प्रवृत्तींच्या व्यक्तींचे वर्णन करताना त्यांना पारिजाताचीच उपमा देण्यात आली आहे. ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांना सद्वर्तनी कृष्णरावांचे चित्रण करताना आठवतो तो पारिजात! नाटककार वसंत कानेटकर यांनी आपल्या भ्रष्टाचारविरोधी नाटकाला नाव दिले आहे– 'घरात फुलला पारिजात!' मराठी साहित्यात विखुरलेली ही प्राजक्ताची फुले वेचावीत तितकी थोडीच!**

## मम म्हणा फक्त

वीरधवल परब

खाजगी आणि सार्वजनिक आयुष्य यांतली भेदरेषा पूर्णत: मिटवून त्यातून एकरस वर्तमान निर्माण होण्याची अद्‌भुत किमया या कवितेत घडली आहे. वाद-प्रतिवाद आणि अंतत: संवादाला सामोरी होणारी ही कविता या काळात खूप गरजेची आणि महत्त्वपूर्ण आहे.

**- सतीश काळसेकर**

पाने : ११२ / किंमत : ₹ १५०



## मधल्या मध्ये

गणेश आत्माराम वसईकर

या कवितांत शहराचे असंख्य आवाज ऐकायला मिळतात. त्यातली उदासी, तुच्छता, माशासारखी तडफड, विद्रोह आणि चिरडल्या जाणाऱ्या आत्म्याच्या वेदना ऐकायला मिळतात. कोणताही आकांत ऐकायला या शहरापाशी वेळ नाही, याची नग्न जाणीव या कवितेतल्या शब्दांतून पाझरते.

**- जयंत पवार**

पाने : ८८ / किंमत : ₹ १२०

# लोकवाङ्‌मय गृह

## नवी पुस्तके

## गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर



रसिकमान्य, विद्वज्जनांनी वाखाणलेले, सिनेमावरील सर्वोत्कृष्ट लेखनाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळालेले पहिले मराठी पुस्तक. हिंदी, इंग्रजी, इटालिअन आणि फ्रेंच भाषांत अनुवादित. नवे लेखन व नवी छायाचित्रे यांसहित. शब्दार्थ आणि चित्रार्थ यांना नव्या लयीत बांधलेल्या देखण्या ग्रंथरूपातली नवी आवृत्ती.

पाने : २७८ / किंमत : ₹ ४५०

पुठ्ठाबांधणी

पिपल्स बुक हाऊस :
१५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
✆ २२८७ ३७६८
लोकवाङ्‌मय गृह :
भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
✆ २४३६ २४७४ / फॅक्स : २४३१ ३२२०.
E-mail : lokvangmayagriha@gmail.com

आमची निवडक पुस्तके
**BookGanga.com/newshunt.com**
वर उपलब्ध आहेत.

## मराठीतील स्त्रियांची कविता

प्रभा गणोरकर

कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात स्त्रिया लिहीत आहेत, त्यांच्या कवितेच्या आशयात, काव्यविषयक दृष्टिकोनात, शैलीत कसकसे बदल होत आले आहेत आणि मराठीच्या प्रदीर्घ काव्यपरंपरेत स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण करणारी स्त्रियांची कविता आज कोणत्या टप्प्यावर उभी आहे याची चिकित्सा करणारा ग्रंथ.

पाने : २६८ / किंमत : ₹ ३२०




## पायपीट

सतीश काळसेकर

'वाचणाऱ्याची रोजनिशी' या वाचकप्रिय ठरलेल्या गद्यलेखनानंतरचे, कवी सतीश काळसेकर यांनी गेली पन्नासहून अधिक वर्षे देशात केलेल्या भ्रमंतीच्या अनुभवावर आधारित असलेले नवे पुस्तक. मराठी साहित्यात प्रचलित असलेल्या प्रवासवर्णनांपेक्षा काहीसे निराळे प्रवासवर्णन.

पाने : २३६ / किंमत : ₹ २५०


# वाडीचं कूळ आणि वस्तीचं मूळ

## मुकुंद कुळे

गावाकडे खूप उपचार झाले पण गुण येईना. शेवटी गावाकडे काढलेल्या उण्यापुऱ्या चाळिसेक वर्षांचं संचित आईने गाठोडीला बांधलं आणि मला घेऊन ती मुंबईला आली. गिरगावातल्या खोलीत तिने तिचा संसार मांडला खरा... पण आपलं गाव आणि गावच्या घराचा तिला कधीच विसर पडला नाही.
... किंबहुना इथे राहतानाही मनात ती तिचं गावचंच आयुष्य जगत राहिली, जपत राहिली आणि माझ्यातही रुजवत राहिली. मी वाढत होतो मुंबईत, पण माझ्या रक्तात रुजत मात्र होतं माझं गाव.

अवघा सहा महिन्यांचा होतो. आई मला घेऊन मुंबईला आली. खरंतर तिला यायचंच नव्हतं. मरेस्तोवर खपून बांधलेल्या गावच्या घरात तिचा जीव अडकला होता. ती लग्न होऊन इळणे गावातल्या कुळ्यांच्या घरी आली, तेव्हा एक साधं गवतारू घर होतं. या गवतारू घरातच तिला तीन मुलं झाली. सर्व भावंडांत धाकटा आणि चौथा असलेल्या माझा जन्म मात्र नव्या पक्क्या घरात झालेला. हे घर बांधताना बाबांची कमाई बऱ्यापैकी खर्ची पडलेली आणि आईचे श्रमही. त्यामुळेच गावचं घर सोडून मुंबईला जाणं तिला मान्यच नव्हतं. पण परिस्थितीच तशी ओढवली होती. घर बांधून पूर्ण झालं आणि एकएकी तिला दमा सुरू झाला. तोही असा तसा नव्हे, दम्याची उबळ आली की जगतेय की मरतेय, असा प्रसंग ओढवायचा. गावाकडे खूप उपचार झाले पण गुण येईना. शेवटी गावाकडे काढलेल्या उण्यापुऱ्या चाळिसेक वर्षांचं संचित आईने गाठोडीला बांधलं आणि मला घेऊन ती मुंबईला आली. मुंबईत गिरगावातल्या मोहन बिल्डिंगमध्ये आमची एक छोटी खोली होती, सहा बाय सहाची. जिन्यालगत असलेली. या खोलीत तिने तिचा संसार मांडला खरा... पण आपलं गाव आणि गावच्या घराचा तिला कधीच विसर पडला नाही.

... किंबहुना इथे राहतानाही मनात ती तिचं गावचंच आयुष्य जगत राहिली, जपत राहिली आणि माझ्यातही रुजवत राहिली. मी वाढत होतो मुंबईत, पण माझ्या रक्तात रुजत



मात्र होतं माझं गाव. केवळ घर आणि घरातली माणसं नाहीत. नीट समजू उमजू लागण्याधीच अख्खा गावपरिसर माझ्या माहितीचा झाला होता. गावची नदी, नदीतला गिऱ्ह्याचा डोह, म्हैसधाड, सतीचा वड, गांगेऱ्याची गोठण... असं बरंच काही. प्रत्येक ठिकाणाची काहीतरी गूढरम्य कथा ती सांगायची. गिर्ह्याचा डोह आणि म्हैसधाडातील काळंभोर पाणी माझ्या स्वप्नातही यायचं. त्या पाण्यात खोलवर बुडत असताना, श्वास छातीत दाटून यायचा. ओरडायचं असतानाही तोंडातून किंकाळीही फुटायची नाही. जीव घाबराघुबरा होऊन जाग यायची, तेव्हा मात्र मी आईच्या कुशीत झोपलेलो असायचो. मग जीव थंड होऊन मी अधिकच तिच्या कुशीत शिरायचो. कधीकधी गांगेऱ्याची गुरांची गोठणही स्वप्नात यायची. तेव्हा मात्र छान वाटायचं. एका अद्भुतरम्य दुनियेतच शिरल्यासारखं वाटायचं. ही गुरांची गोठण म्हणजे गुरांना चरण्यासाठी राखलेली खास जागा. निबीड रान असलेल्या या गोठणीवर गावातली सगळी गुरं चरायला जायची. त्या गोठणीवर एक मोठी धोंड होती. गावात लग्न असलं की या धोंडीसमोर उभं राहून मागणं मागायचं की जेवणासाठी लागणारी तपेली-पातेली अशी सगळी भांडी त्या धोंडीवर हजर व्हायची. अख्ख्या गावाचं जेवण या तपेल्या-पातेल्यांत व्हायचं. काम झालं की भांडी पुन्हा त्या धोंडीवर नेऊन ठेवायची. असं

**तिने तेव्हा सांगितलेलं मी काहीच विसरलो नाही. आता वाटतं तिचं रक्त तर माझ्यात होतंच, पण तिने त्या रक्तातून ग्रामसंस्कृतीच्या वेदना-संवेदनाही माझ्यात संक्रमित केल्या होत्या की काय....!**



कित्येक वर्षं सुरू होतं. एक दिवस मात्र एकाने नेलेली भांडी परत दिलीच नाहीत. मग ती नेलेली भांडीही गायब झाली आणि धोंडीचा चमत्कारही. स्वप्नात मी कितीदा तरी गोठणीवरच्या धोंडीकडे भांडी मागायचो आणि ती द्यायची पण! मात्र जेव्हा मी त्या भांड्यांना हात लावायला जायचो, तेव्हा नेमकी जाग यायची.

गावरहाटीतल्या अशा किती गोष्टी-गाणी तिने मला लहानपणी सांगितली असतील, याला गणती नाही. मला कळो न कळो, ती बोलत राहायची. त्यातलं सगळंच तेव्हा मला कळत नसे. पण तिची सांगण्याची हातोटी विलक्षण होती. एखादं गुपित सांगितल्यासारखी सगळं एवढ्या विश्वासाने सांगायची की ऐकता ऐकता मी हुंकार कधी भरायला लागायचो, तेच कळायचं नाही. त्या सगळ्या सांगण्याला एक सुरेख लय असायची-

*उंदुर्ल्याची उंदुर्ली, ती पडली खिरीत*
*वड-पान झडो, तळापाणी आटो*
*गायचं शिंग मोडो, कुऱ्हाडीचा दांडा*
*नि गावचा पाटील भुंडा...*

गोष्ट किंवा गाणं कुठलंही असलं, तरी त्यातले संदर्भ गावाकडचेच असायचे. तिने सांगितलेलं हे सारं मी नकळत्या अजाण वयात ऐकलं. समजण्याचं ते वयच नव्हतं. पण तिने तेव्हा सांगितलेलं मी काहीच विसरलो नाही. आता वाटतं तिचं रक्त तर माझ्यात होतंच, पण तिने त्या रक्तातून ग्रामसंस्कृतीच्या वेदना-संवेदनाही माझ्यात संक्रमित केल्या होत्या की काय....!

अन्यथा गावाला फार न राहताही माझं गावचं घर, त्यातली माणसं आणि गावपरिसर माझ्यात कसा रुजला असता? उन्हाळी सुट्टीतलं फक्त महिनाभराचं वास्तव्य, तेही सातवीपर्यंतच...त्यानंतर कधीही गावाकडे फार काळ वास्तव्य केलेलं नाही. तरीही गावचं घर, गावची माती अजून कशी भुरळ घालत आलीय? गावच्या घरातली, पुढील दारच्या अंगणातली आणि मंगीलदारच्या आवाडातली लहानपणी अनुभवलेली प्रत्येक गोष्ट अजून कशी स्मरणात आहे? लहानपणी अनुभवलेलं सगळं अजूनही लख्ख आठवतं... कालपरवा घडल्यासारखं. चित्रांची पानं उलटावीत तसं...

पहिलं स्मृतिचित्र अर्थातच घराचं आणि भोवतीच्या आवाराचं. हे घर बाबांनी बांधलेलं असलं, तरी ते फक्त आमचं नव्हतं. वडील धरुन चार भाऊ. त्यामुळे चार जणांसाठी चार खण, असं ते घर होतं. एकाच छताखाली चार चुली पेटायच्या. पण प्रत्येक घर आतून एकमेकांना दरवाजांनी जोडलेलं होतं. त्यामुळे कुणालाही कुठूनही इकडेतिकडे जाता यायचं. सर्वत्र संचार करता यायचा. पण सगळ्यात महत्त्वाचा होता, तो या घराभोवतीचा आवार. पुढच्या बाजूने अंगण-पडवी-ओटी होतीच. पण घराच्या मागच्या बाजूला मोठं अंगण आणि आवाड (आवार) होतं.

मंगीलदारच्या या आवाडात जणू काही माझं विश्व सामावलेलं होतं आणि आहे. गावाला गेलो की माझी पहिली धाव घरामागच्या आवाडात असायची. तेव्हा आमचं हे आवाड म्हणजे देवराईच होती. आंबा, रामफळ, पेरू, शेकट, रिंगी अशा झाडांची एवढी दाटी असायची होती की, उन्हं जमिनीवर उतरायचीच नाहीत. दिवसभर या आवाडात थंड आणि गूढ वातावरण असायचं. तिथे एकटाच खेळणं ही माझ्या आनंदाची परिसीमा असायची. आल्याआल्या प्रत्येक झाडाभोवती मी फेर धरायचो आणि कानात सांगितल्यासारखं सांगायचो- मी आलोय. आता महिनाभर दे धम्माल करायची. केळीपासून आंब्यापर्यंत सगळ्या झाडांचे मुके घेत सुटायचो. वारंच भरायचं जणू माझ्या अंगात! हे वारं बहुधा आईनेच माझ्यात भरलेलं होतं.

एरवीही आमच्या गावचाच नाही, घराचा परिसर म्हणजेही दंतकथांचं आगरच होतं. त्या गोष्टींचा खरेखोटेपणा माहीत नाही. पण आईच्या सांगण्यात मात्र प्रचंड आश्वासकता असायची. गावी गेलो की या कथांची पुनःपुन्हा पारायणं व्हायची. मग सुट्टीतल्या गावच्या मुक्कामात त्या कथांतच जणू दिवस सरायचे. आईने सांगितलेल्या कथा खऱ्या मानून मी घर अन् परिसर पिंजून काढायचो. त्यातलं एक हमखास पात्र म्हणजे घराच्या मंगीलदारी आवाडात असलेलं पपनसाचं झाड. त्या झाडाभोवती बांधलेल्या पारात एक गोलाकार दगड होता. तो दगड म्हणजे म्हणे एका अद्भुत शक्तीचा रहिवास होता. आई लग्न होऊन या घरी आली असताना एकदा तिला एक बाई पुढच्या दारुन शिरून मागच्या दारानं बाहेर पडताना दिसली. आई तिच्या मागावर गेली, तर ती पपनसाच्या झाडाजवळ अंतर्धान पावली. सकाळी उठून बघितलं, तर पपनसाच्या पायथ्याशी दगड होता. गवतारू घर जाऊन नंतर त्याच्या जागी पक्क कौलारु घर बांधलं गेलं. परंतु, पपनस आणि तो दगड कायम राहिला. कारण अद्भुत शक्तीचा अधिवास. आज मात्र ते पपनसाचं झाड नाही, परंतु त्याच्या पायथ्याशी असलेल्या दगडाला अद्याप कुणीही हात लावलेला नाही.

आमचं जुनं गवतारू असताना, आजोबांनी त्यांच्यासाठी एक छोटी खोपटी मागच्याच आवाडात बांधलेली म्हणे. एकदा कुठल्याशा मुद्द्यावरुन गाव आणि त्यांच्यात तंटा निर्माण झाला. एके दिवशी सगळा गाव त्यांच्यावर चाल करुन आला. आजोबा एकटेच खोपटीत बसलेले. गावातली दहा-पंधरा भरभक्कम माणसं काठ्या घेऊन आजोबांना मारायला आत शिरणार, तर अचानक त्यांच्याभोवती भुंग्यांची भुणभुण सुरू झाली. असंख्य भुंग्यांनी त्या खोपटीला वेढा घातला. भुंग्यांचा हा फेरा एवढा तीव्र होता की, एकालाही खोपटीत पाऊल टाकता येईना. आल्या पावली सगळे माघारी फिरले. हा पपनसाजवळच्या त्या दैवी शक्तीचाच चमत्कार होता, असं आई सांगायची.

आजोबांशी आणि घराशी संबंधित आणखी एक गोष्ट आई कायम सांगायची. एकदा आजोबांना स्वप्न पडलं होतं

म्हणे! स्वप्नात त्यांना कुणीतरी म्हणालं- म्हादेवा (आजोबांचं नाव) उद्या तू आगरात जाणार आहेस, तिथून येताना काही लाकूडफाटा घरी घेऊन आलास, तर त्यातून जे काही निघेल, ते टोपलीखाली झाकून ठेव. तुला तेवढंच सोनं मिळेल.' आजोबा ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी पहाटे झाडांना पाणी लावायला आगरात गेले. तिथून दुपारी परत येताना त्यांनी काही सुकलेली फाटी खांद्यावरुन आणली. त्यात एक मोठासा लाकडी ओंडकाही होता. आजोबा आले आणि त्यांनी नेहमीप्रमाणे सगळी फाटी अंगणात टाकली. ते निवांत मागे वळणार इतक्यात त्या सुक्या ओंडक्यातून चक्क नाग बाहेर पडला. नाग बघून तिथेच असलेली आजी किंचाळायला लागली. त्यासरशी आजोबा पुन्हा फाट्यांकडे वळले. तिथे त्यांना नाग दिसला आणि हातातल्या काठीच्या एका दणक्याने त्यांनी नागाला भुईसपाट केलं. त्याक्षणी जिवाच्या भीतीने त्यांनी नागाला मारलं. पण नंतर जिवाचा थरकाप कमी झाल्यावर, त्यांना रात्रीचं स्वप्न आठवलं. आता हळहळण्यात काही अर्थ नव्हता. पण नंतरही त्यांना कधी या गोष्टीचं वाईट वाटलं नाही म्हणे!

आजोबांची ही गोष्ट ऐकल्यावर माझ्या मात्र मनात अनेकदा यायचं, की जर आजोबांनी नागाला झाकून ठेवलं असतं, तर खरंच सोनं मिळालं असतं का?

जशी ही आजोबांची गोष्ट, तशीच आईच्या खानदानातलीही एक गोष्ट होती. तिच्या घराण्यात म्हणे कुणाला तरी एकदा जमिन नांगरताना सोन्याच्या दागिन्यांनी भरलेला हंडा सापडला होता. पण ते दागिने स्वतःकडे न ठेवता, त्यांनी सगळ्यांना वाटून टाकले होते. त्याच दागिन्यांतला एक ताविजासारखा दागिना माझ्या आईच्या गळ्यात मंगळसूत्राच्या बाजूला ओवलेला होता. आईच्या गळ्यातील तो तावीज मी कधीच विसरू शकणार नाही. कारण आधीच माझ्या जन्माच्या आधी आईची एक बोरमाळ गणपतीत नाचायला गेलेली असताना कुठेतरी हरवली होती. त्यात परंपरेने आलेला तावीजही एकदा गेला.

एरवी मी तिच्याकडून गोष्टी ऐकायचो. एकेक गोष्टी अफाट आणि अचाट. त्याच्या खरेपणावर मोठेपणी मी कायमच संशयाची मुद्रा उमटवलेली. पण ताविजाची गोष्ट माझ्यासमोरच घडलेली. मी बारा-तेरा वर्षांचा होतो. उन्हाळ्याच्या सुट्टीत नेहमीप्रमाणे गावी गेलो होतो. एके संध्याकाळी आई नदीवर पाणी भरायला निघाली. तिच्या मागे लागून मीही तिच्याबरोबर गेलो. तिने हंडा-कळशी घेतली होती आणि गंमत म्हणून माझ्याकडे तिला लग्नात आंदण मिळालेला छोटा तांब्या दिला होता. आम्ही दोघंही गप्पा मारत नदीवर पोचलो. ती नेहमीप्रमाणे नदीच्या आसपासचं काही सांगत होती. कुठे कुणाचं स्थान आहे, कुठे कुणाचा निवास आहे, असंच काही तरी. आम्ही नदीवर पोचलो तेव्हा सूर्य मावळतीकडे झुकला होता. सगळीकडे छान संधिप्रकाश पसरलेला होता. आईने हंडा-कळशी घासून वाहत्या पाण्यात धुतली. नंतर पाण्यात थोडं पुढे जाऊन तिने नितळ पाण्यात हंडा बुडवलाआणि त्याच क्षणी तंगुसात ओवळेला तिचा मंगळसुत्राचा सर तुटला. सगले काळे मणी टपटपत पाण्यात पडले. त्याचबरोबर मंगळसुत्राची वाटी आणि तिच्या जोडीला असलेला तावीजही पाण्यात पडला. आईने मंगळसुत्राची वाटी पकडली. पण तावीज हातातून घरंगळला आणि पाण्यात पडतोय न पडतोय, तोच सळसळत आलेल्या एका माशाने तो गिळलादेखील! आमच्या दोघांच्या देखत तो मासा तिथून सळसळत गेला. आम्ही काहीही करू शखलो नाही. दोघेही अवाक् झाल्यासारखं ते पाहत राहिलो. पण त्यातही सर्वप्रथम मी भानावर आलो आणि भांबावलेल्या आईला पाहून मला शकुंतलेची आठवण झाली. नुकतीच मी दुष्यंत-शकुंतलेची गोष्ट वाचली होती. त्यात दुष्यंताने दिलेली मुद्रिका शकुंतलेच्या बोटातून निखळून पडते आणि एक मासा ती गिळतो, असा उल्लेख होता. आता माझ्यासमोर घडलेलं ते दृश्य त्यापेक्षा वेगळं नव्हतं. क्षणभर मनात आलं- कुणाला सापडेल हा मासा आणि गवसेल तो तावीज. तो सापडल्यावर कुणालाही कशाचं स्मरण होईल का? एरव्ही आईने सांगितलेल्या गोष्टींनी मी स्तिमित होऊन जात असे. मात्र त्यावेळी मीच एक अद्भुत घटनेचा साक्षीदार झालो होतो. आईने सांगितलेल्या गोष्टींच्या खजिन्यात भर टाकणारी अशीच ही गोष्ट होती.

सुट्टीत गावाला गेल्यावर तिच्याबरोबर चालायला लागलं की, वळणावळणावरच्या दगडधोंड्यांच्या, भुताखेतांच्या गोष्टी सांगत राह्यची. तिची कल्पनाशक्ती जबरदस्त होती. तिने सांगितलेल्या काही गोष्टी या लोकपरंपरेने चालत आलेल्या होत्या. तर काही गोष्टींना तिच्या अनुभवांचा पातळसा का होईना, पण एक नाजुक स्तर होता. त्या पूर्ण खोट्या नव्हत्या. त्यात श्रद्धेचा भाग थोडा अधिक होता, एवढंच! त्या तिने अनुभवलेल्या गावच्या वाडी-वस्तीच्या आणि त्या वस्तीवरच्या माणसांच्या होत्या. एकदा मला सोबत घेऊन ती माहेरी निघाली होती. तिच्या माहेरच्या वाटेवर एक विहीर लागली. मी तिचा हात सोडून लगेच नेहमीप्रमाणे कुतूहलाने त्या विहिरीत डोकावायला गेलो. त्याबरोबर तिने मल पटकन मागे ओढलं. म्हणाली, त्या विहिरीत पाहू नकोस. त्या विहिरीत एक मासा आहे. त्या माशाच्या नाकात मोती आहे. तो मोतीवाला मासा कुणाला दिसला की, त्याला विहिरीची ओढ लागते. आजवर अनेकांनी उड्या घेतल्यात त्या विहिरीत.' ही गोष्ट ऐकून मी अवाकच झालो आणि तिच्या हाताला धरूनच हळू विहिरीत डोकावून पाहिलं. दुपारची वेळ असल्यामुळे उन्हात विहिरीतले सगळेच मासे चमचमत होते. मी तिला म्हटलं, अगं सगळ्यांच्याच नाकात मोती दिसतायत. तशी ती खेकसली आणि मला ओढत दूर घेऊन गेली.

अशा कितीतरी गोष्टी आणि किती गाणी. कधीकधी तर प्रश्न पडायचा की एवढ्या कशा गोष्टी-गाणी हिला ठाऊक? पण

त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे, यातल्या कुठल्याच गोष्टी तिने कधीच माझ्या इतर भावंडांना सांगितलेल्या नाहीत. मी या गोष्टींविषयी सांगायला लागलो की, ते सारे अवाक् होऊन पाहत राहतात. म्हणतात- हे तुला तिने कधी आणि केव्हा सांगितलं? आणि तुलाच का सांगितलं?

या प्रश्नाचं मग माझ्याकडे उत्तर नसतं. कदाचित इतर भावंडं जन्माला आली, तेव्हा आई गावालाच होती. गावात साजऱ्या होणाऱ्या सगळ्या सणा-उत्सवांत ती नाचायला, गाणी म्हणायला आघाडीवर असायची. ग्रामीण संस्कृतीवर पोसलेल्या तिच्या भावनांना - ऊर्जेला या नाचगाण्यातून मोकळीक मिळायची. त्यांचा निचरा व्हायचा. पण दम्यापायी मला घेऊन मुंबईला आली आणि तिचं नाच-गाणं थांबलं ते कायमचंच. पण बहुधा ती आतल्या आत घुमत असावी. नाच-गात असावी. मला ती जे सगळं सांगायची, तो एकप्रकारे तिच्या मोकळं होण्याचाच भाग असावा. मला गाणी सांगताना ती मनातल्या मनात नाचत असणार. घरादाराच्या, रानशिवाराच्या गोष्टी सांगताना ती पुन्हा एकदा मनातल्या मनात गावाकडे फिरुन येत असणार. आपलं गाव सुटलंय, हे तिच्या खोल जिव्हारी लागलं होतं बहुधा. म्हणूनच मला गाणी-गोष्टी सांगण्याच्या निमित्ताने ती पुन्हा सगळं कल्पनेने जगून घ्यायची.

आपल्या भावनांच्या निचऱ्यासाठी तिने माझा आसरा शोधला. मात्र तिने माझ्यात शोधलेला हा आसरा, मला संपन्न करुन गेला. लोकवाङ्मयाच्या अभ्यासासाठी आवश्यक असलेली गाणी आणि गोष्टीही मला तिच्याकडेच मिळाल्या. महत्त्वाचं म्हणजे गावाला फार न राहताही, एक संपन्न ग्रामसंस्कृती माझ्यात रुजली. ही ग्रामसंस्कृती कदाचित भाबडी असेल. पण जीवनाकडे सकारात्मक पद्धतीने बघायला शिकवणारी होती. त्यामुळेच समजायला लागल्यावर जेव्हा जेव्हा गावी गेलो, किंवा अजूनही जातो, तेव्हा आईने सांगितलेली ग्रांमसंस्कृतीच गावात, गावच्या घरात शोधतो. म्हणूनच मला तेव्हाही आवाडातली झाडं कधी निर्जीव वाटली नव्हती. तिने मला निसर्गाशीच बोलायला शिकवलं होतं. त्यामुळे मी घरी गेल्यावर आधी सगळ्यांशी संवाद साधायचोच. पण गावाकडून निघतानाही घराचा, झाडाझुडुपांचा, अगदी गायीगुरांचाही निरोप घ्यायचो. त्यांना सांगायचो- 'आता मी निघालो. आता वर्षभर आपली भेट नाही. छान राहा हं सांभाळून.' हे सगळं तिनेच मला आपसूक शिकवलं होतं. त्यामुळे मी तिच्यासारखाच गावच्या घरात, वातावरणात, तिथल्या मातीत आणि माणसांतही मी मिसळून गेलो. गावाकडे फार न जाताही त्याच्याशी जोडलेला राहिलो.

आईचा जीव तर शेवटपर्यंत गावच्या घरात गुंतलेला होता. मुंबईला आवडत नाही, म्हणून शेवटची दोनेक वर्षं ती गावाकडेच, पण माझ्या बहिणीच्या गावी होती. परंतु तिच्याकडे असतानाही तिला ओढ आपल्याच गावाची आणि घराची लागली होती. तिचा सारखा हेका सुरू असायचा-माझ्या गावी न्या म्हणून. पण तिथे तिला पाहणारं कुणीच नव्हतं. शेवटी नुकतीच तीन वर्षांपूर्वी वयाच्या ८१ व्या वर्षी ती गेली, तेव्हा तिला आमच्या गावी, तिच्या घरी नेण्यात आलं. पण तोपर्यंत तिने डोळे मिटले होते. मला कळल्यावर मुंबईवरुन निघून मी गावी पोचलो तेव्हा, ती आपल्या घरात शांतपणे झोपली होती. रात्र झालेली होती. मग लहानपणी तिच्या कुशीत झापायचो, तसा मी तिच्याजवळच झोपलो. तिच्या अंगावर हात टाकून. सकाळी उठलो तेव्हा आधी, तिचं पोटं खालीवर होतंय का ते पाहिलं. लहानपणी ती आपल्यापासून दूर जाईल या भीतीने, कधीही उठलो तरी आधी मी श्वासाबरोबर खाली-वर होणारं तिचं पोट पाहायचो. त्यादिवशीही मी सरावाने तिच्या पोटाकडे पाहिलं. मात्र ते हलत नव्हतं. शांत झालं होतं.

मनात आलं, शेवटचे काही दिवस या तिच्या हक्काच्या घरात तिला आणायला हवं होतं. हे घर बांधून झाल्यावर या घरात ती कधीच हक्काने राहिली नव्हती. सण-उत्सवांत खेळली-मिरवली नव्हती. उगाचंच उदास वाटायला लागलं. ती गेल्यावर, तर त्या गावाबद्दलची, घराबद्दलची माझी ओढ कमी झाली. कधीच जाऊ नये तिकडे असंही वाटायला लागलं. अगदी उदास उदास वाटायला लागलं


पण तिनेच माझ्यात रुजवलेली ग्रामसंस्कृती एवढी तकलादू नव्हती, कदाचित! काही दिवसांनी मला त्या गावाच्या-घराच्या हाका ऐकू येऊ लागल्या. त्यात आईचीही हाक होती मिसळलेली. जणू ती सांगत होती - मी आहे, या घरात, गावात, आणि आजूबाजूच्या परिसरांत. एवढंच नाही, तर तुला सांगितलेल्या गाण्यांत आणि गोष्टींतही. जोपर्यंत तुला ते सारं आठवतंय. तोपर्यंत तुला या वाडीवस्तीत यावंच लागेल. मला भेटायला, आपल्या घराला भेटायला.'

आणि खरोखरच मी पुन्हा निमित्तानिमित्ताने का होईना गावाकडे जायला लागलो. पुन्हा एकदा घरामागच्या आवाडात फिरायला लागलो. झाडाझुडुपांशी बोलायलो लागलो. एवढंच कशाला आता आई नसली, तरी गावच्या वाटेवरुन चालताना मला ऐकू येतात, तिने सांगितलेल्या दगडधोंड्यांच्या आणि भुताखेतांच्या गोष्टी...


**मुकुंद कुळे**

भ्रमणध्वनी : ९७६९९८२४२४

mukundkule@gmail.com

# आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके !




## नूरजहान

**लेखक : ऐजाझ गुल**

**अनुवाद : सविता दामले**

आपली गायकी व मादक रुपसौंदर्य या जोरावर भारत-पाकिस्तानातल्या करोडो सिनेरसिकांच्या हृदय सिंहासनावर आरूढ झालेल्या मदमस्त नूरजहानचं खिळवून ठेवेल असं चरित्र

**(पृष्ठे - १६०)**
**(₹-१७५)**


## सुवासिनी

**लेखिका : सीमा देव**

प्रख्यात अभिनेत्री सीमा देव यांच्या आत्मचरित्राची सुधारित आवृत्ती.



**(पृष्ठे - २००)**
**(₹-२२५)**



## देवदास ते भुवनशोम

**लेखक : विजय पाडळकर**

विसाव्या शतकातील हिंदी चित्रपटांचा इतिहास - खंड पहिला.

**(पृष्ठे - १६०)**
**(₹-४५०)**

## लोकशाहीची ऐशी तैशी

**लेखक : विभूती नारायण राय**

**अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ.**

भ्रष्ट राजकारणी आणि गुंड यांच्या अभद्र युतीमुळे राजकारणाचे होत असलेले गुन्हेगारीकरण आणि त्यामुळे दुर्मीळ होत चाललेले सचोटीचे राजकारण आणि प्रशासन, याचे भेदक वास्तव मांडणारी ही कादंबरी!



**(पृष्ठे - १५२)**
**(₹-१६०)**




**दोन दिवाळी अंक आणि नूरजहान पुस्तक हा ४५० रुपयांचा संच अवघ्या ३०० रुपयांत उपलब्ध**

## ५१ गाजलेली भाषणे

**संकलन : अशोक बेंडखळे**

महाराष्ट्रातल्या ५१ गाजलेल्या वक्त्यांच्या भाषणांचे संग्राह्य संकलन



**(पृष्ठे - २९७)**
**(₹-३००)**

मैत्रेय प्रकाशन

टोल फ्री क्र.: 1800 222 613

पारधी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.

फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८.

चेतन मोहकर (अमरावती) - ८३९०३३८६०८

E-mail : prakashanmkg@maitreyagroup.com

Website : www.maitreyaprakashan.com

**एम.ओ. करा / डी.डी. पाठवा.पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**

ऑन लाईन खरेदीसाठी:- www.granthdwar.com / www.majesticonthenet.com / www.infibeam.com

**मैत्रेय बुक क्लबचे सभासद व्हा आणि अक्षर खजिना मिळवा!!**

फक्त रु. ९९९/- भरा आणि लगेचच रु. १५००/- किंमतीची पुस्तके घरपोच मिळवा व नोव्हेंबर २०१५ मध्ये **'प्रिय मैत्रीण'** व **'मस्त भटकंती'** हे दिवाळी अंक मोफत मिळवा, तसेच वर्षभर **'मैत्रेय प्रकाशना'**च्या सगळ्या पुस्तकांवर घसघशीत **सूट.**

# लायसन्स

**मूळ कथा : सआदत हसन मंटो**

अब्बू कोचवान एकदम छैलछबिला होता. त्याचा टांगा-घोडा शहरात एक नंबर होता. साधं भाडं तो कधी घ्यायचाच नाही. त्याचे बांधलेले ठराविक ग्राहक होते, ज्यांच्याकडून रोज दहा-पंधरा रुपये भाडं मिळे, जे त्याला भरपूर होई. दुसऱ्या कोचवानांसारखी त्याला नशापाण्याची सवय नव्हती. फक्त स्वच्छ कपडे वापरण्याचा आणि नेहमी ऐटीत राहण्याचा त्याला खूप शौक होता. त्याचा टांगा जेव्हा रस्त्यावर घुंगरं वाजवत जाई, तेव्हा लोकांच्या नजरा आपोआप वळत. ''तो बघा ऐटदार अब्बू. बघा किती रुबाबात बसलाय. जरा पगडी बघा कशी तिरपी बांधलीय त्याने.''

लोकांच्या नजरेने उच्चारलेले शब्द ऐकून त्याच्या मानेत एक छान लय निर्माण होई आणि त्याच्या घोड्याची चाल आणिकच झोकदार होई. त्याच्या हातांनी घोड्याचा लगाम असा धरलेला असायचा, जसं लगाम धरण्याची गरजच नाहीय. वाटायचं की घोडा त्याच्या इशाऱ्याशिवायच चालतोय, मालकाच्या इशाऱ्याची त्याला गरजच नाही. कधीकधी तर वाटायचं की, अब्बू आणि त्याचा घोडा 'चन्नी' वेगळे नाहीतच. तो सगळा टांगा एकच आहे आणि जे आहे ते 'अब्बू'शिवाय आणखी काय असू शकतं? ज्यांना अब्बू नाकारायचा, असे प्रवासी मनातल्या मनात शिव्याशाप द्यायचे, ''देव करो, याचा आणि त्याच्या ओठांवर, मिशांच्या सावलीत, सूक्ष्म स्वाभिमानी हसू नाचत रहायचं. त्याला पाहताच खूप कोचवानांचा जळफळाट व्हायचा. त्याचं पाहून काही कोचवानांनी इथून तिथून कर्ज काढून आपापले टांगे नवे केले. टांग्यांना पितळेच्या कलाबुतांनी सजवलं होतं, तरीही त्यांच्या टांग्याला, ना अब्बूच्या टांग्याची सर आली, ना त्यांना त्या प्रवाश्यांची भाडी मिळाली, जे अब्बू आणि त्याच्या टांग्या-घोड्याचे वेडे होते.

एक दिवस दुपारच्या वेळेस अब्बू झाडाच्या सावलीत टांग्यावर बसून डुलकी घेत असताना एक आवाज त्याच्या कानात किणकिणला. डोळे उघडून पाहतो तर एक तरुणी टांग्याच्या बंबाजवळ उभी. तिच्याकडे पाहून एक क्षण झाला असेल, तिचं उफाड्याचं तारुण्य त्याच्या मनात उतरलं. ती एक तरुण मुलगी होती. सोळा सतरा वर्षांची, सडपातळ पण मजबूत. वर्ण सावळा पण चमकदार. कानात चांदीच्या छोट्या रिंगा,



केसांचा सरळ भांग आणि टोकदार नाक, नाकपुडीवर एक छोटासा चमकणारा तीळ, लांब कुर्ता, निळी ओढणी आणि डोक्यावर चादर.

मुलीने अस्पर्श कोवळ्या आवाजात विचारलं, ''वीरा, टेशनचे किती घेणार?''

त्याच्या ओठांवरल्या स्मितात गंमत झळकू लागली. तो म्हणाला, ''काही नाही.''

मुलीच्या सावळया चेहऱ्यावरची तकाकी लाल होत गेली. तिने पुन्हा विचारलं, ''काय घेणार टेशनचे?''

त्याने मुलीला नजरेत सामावून घेत म्हटलं, ''तुझ्याकडून काय घ्यायचं भाग्यदेवी, ये चल बस टांग्यात.''

मुलीने घाबरत हाताने आपली झाकलेली छाती पुन्हा झाकली. ''हे काय बोलता तुम्ही?''

तो हसला, ''चल गं. बस आता. तुला द्यावंसं वाटेल ते दे!''

मुलीने थोडा वेळ विचार केला. मग पायरीवर पाय ठेवून टांग्यात बसली. ''चल लवकर घेऊन चल टेशनला.''

त्याने मागे वळून पाहिलं, ''खूपच घाईत आहेस सोनिए!''

''हाय हाय तू तर...'' मुलगी काही बोलता बोलता थांबली. टांगा चालू लागला आणि चालत राहिला. खूप रस्ते घोड्यांच्या टापांखाली मागे गेले. त्याच्या ओठांवर एक गमतीदार स्मित झळकत होतं. मुलगी भेदरून बसली होती. खूप वेळ झाला तसं मुलीने भेदरलेल्या आवाजात विचारलं, ''टेशन नाही आलं अजून?''

''येईल, तुझं-माझं टेशन एकच तर आहे'' त्याने अर्थपूर्ण आवाजात उत्तर दिलं.

''म्हणजे?''

त्याने वळून मुलीकडे पाहिलं आणि म्हणाला, ''वेडे, तुझं-माझं टेशन एक आहे म्हणजे तुला कळत नाही? आपलं टेशन त्याच वेळेस एक झालं होतं जेव्हा अब्बूने तुझ्याकडे पाहिलं. तुझी शप्पथ, तुझा गुलाम खोटं नाही बोलणार.''

मुलीने डोक्यावरचा पदर ठीक केला. तिचे डोळे स्पष्ट सांगत होते की ती अब्बूच्या बोलण्याचा अर्थ समजलीय. तिच्या चेहऱ्यावरून हे सुद्धा कळतं होतं की, तिला अब्बूच्या बोलण्याचा राग नव्हता आला. ती संभ्रमात होती. दोघांचं टेशन एक असो नसो, अब्बू ऐटदार असो नसो, पण त्याच्या शब्दांचा पक्का आहे का? त्याच्यासाठी तिनं आपलं टेशन सोडावं का?

अब्बूच्या आवाजाने तिला भानावर आणलं. ''काय विचार करतेयस भाग्यदेवते?''

घोडा मस्त मस्तीत दुडक्या चालीत चालत होता. हवा चंचल वाहत होती. रस्त्याच्या दुतर्फा उभी झाडे पळत होती आणि त्यांच्या फांद्या झुलत होत्या. घुंगुरांच्या संतत किणकिणाटाशिवाय दुसरा कोणताच आवाज नव्हता.

तो मान वळवून मुलीच्या सगळ्या सौंदर्याचं नजरेनंच चुंबन घेत होता. काही वेळानंतर त्याने घोड्याचे लगाम जंगलातल्या झाडाला बांधले आणि उडी मारून मागच्या सीटवर मुलीच्या बाजूस येऊन बसला.

मुलगी गप्प राहिली.

त्याने तिचे दोन्ही हात धरले, ''तुझे लगाम माझ्या हातात देशील?''

मुलीने एवढंच म्हटलं, ''माझे हात तर सोड!!''

पण दुसऱ्याच क्षणी ती अब्बूच्या मिठीत होती आणि तिचं हृदय जोरजोरात धडधडत होतं.

अब्बूने हळुवार प्रेमळ आवाजात म्हटलं, ''हा टांगा-घोडा मला माझ्या जिवापेक्षा जास्त प्यारा आहे. शपथ अकराव्या पीराची, मी टांगा-घोडा विकेन आणि तुझ्यासाठी सोन्याचे कडे बनवेन. स्वत: फाटके जुने कपडे घालेन, पण तुला राणीसारखी ठेवेन. शपथ वहदहुला शरिकची, आयुष्यातलं हे माझं पहिलं प्रेम आहे. तू माझी झाली नाहीस तर मी तुझ्यासमोर माझा गळा कापून घेईन.'' म्हणतानाच भानावर येत त्याने मुलीला हळूच आपल्या मिठीतून विलग केलं, ''अरे!! हे काय झालं मला? चल तुला स्टेशनवर सोडतो.''

मुलीने हळूच म्हटलं, ''नाही. आता तू मला स्पर्श केलायस.''

त्याची मान खाली गेली, ''मला माफ कर चूक झाली माझ्याकडून.''

''मग ही चूक निभावून नेशील?'' मुलीच्या आवाजात आव्हान होतं. जसं कुणीतरी अब्बूला म्हणालंय, ''तुझा टांगा त्या टांग्यापुढे नेता येईल?''

त्याची झुकलेली मान वर झाली, डोळ्यांतली चमक परत आली, ''भाग्यभरते'' म्हणत त्याने आपल्या रुंद छातीवर हात ठेवला, ''अब्बू आपला जीव देईल.''

मुलीने आपला उजवा हात पुढे केला, ''मग हा घे माझा हात.''

त्याने मुलीचा हात घट्ट पकडला, ''शपथ तारुण्याची, अब्बू तुझा गुलाम राहील.''

दुसऱ्या दिवशी अब्बू आणि त्या मुलीचा निकाह झाला. नाव मुलीचं इनायत म्हणजे नीती होतं आणि ती गुजरात जिल्ह्यातील मोचीण होती. ती आपल्या नातेवाईकांसोबत इथे आली होती. तिचे नातेवाईक स्टेशनवर तिची वाट पाहत राहिले आणि ती प्रेमाची सगळी स्थानके ओलांडत गेली.

अब्बू आणि नीती दोघेही खूप खूष होते. ना नीतीने इच्छा दाखवली, ना अब्बूने टांगा घोडा विकला, ना नीतीसाठी सोन्याचे कडे बनले, पण अब्बूने आपल्या जमवलेल्या पैशांतून नीतीसाठी सोन्याचे कानातले आणि खूप रेशमी कपडे बनवले, हे कमी नव्हतं.

लश-लश करत रेशमी कपड्यात जेव्हा नीती, अब्बूसमोर येई तेव्हा अब्बूचं हृदय नाचू लागे. शपथ त्याची, दुनियेत

तुझ्यासारखं सुंदर कुणीच नाही. नीतीला तो आपल्या छातीशी घेई आणि म्हणे, 'नीती तू माझ्या हृदयाची राणी आहेस.'

दोघे तारुण्याच्या मस्तीत गर्क होते. दोघांना गात, हसत, फिरत, आणि एकमेकांच्या शपथा घेत, एक महिना झाला असेल, अचानक एक दिवस पोलिसांनी अब्बूला पकडलं, नीतीही पकडली गेली.

अब्बूवर फूस लावून मुलगी पळवण्याचा खटला झाला. नीती सज्ञान नव्हती. न्यायालयात नीतीने ठामपणे सांगूनही अब्बूला दोन वर्षाची सजा झाली.

न्यायालयाचा निकाल ऐकून नीती, अब्बूला मिठी मारत रडत फक्त एवढंच म्हणाली, ''मी माझ्या आई-वडिलांसोबत नाही जाणार, तुझ्या घरी बसून तुझी वाट पाहीन.''

अब्बू तिच्या पाठीवर थोपटत म्हणाला, ''माझं आयुष्य तुला लाभो. मी टांगा-घोडा दीनाच्या हवाली केलंय, त्याच्याकडून भाडं घेत रहा.''

नीतीच्या आईवडिलांनी खूप जोर लावला, पण ती त्यांच्या सोबत गेली नाही, कंटाळून त्यांनी नीतीला तिच्या नशिबाच्या हवाली सोडलं.

नीती आता एकटी अब्बूच्या घरी राहू लागली. रोज संध्याकाळी दीना तिला पाच रुपये देऊन जाई, जे तिच्या गरजा भागवण्याकरिता खूप असत. त्याशिवाय काही थोडे रुपये तिनेही साठवून ठेवले होते.

आठवड्यातून एकदा, कोठडीत अब्बूशी भेट होई, ही भेट खूपच छोटी असे.

तिच्याकडे जेवढी शिल्लक होती, ती तिने अब्बूला तुरुंगात सुखसुविधा पोहोचवण्यात खर्च केली. एका भेटीत अब्बूने तिच्या भुंड्या कानांकडे पाहिलं आणि विचारलं, ''तुझ्या कानातले कुठे गेले नीती?''

ती शिपायाकडे पाहत म्हणाली, ''हरवले कुठेतरी.''

अब्बू रागात म्हणाला, ''तू माझी एवढी काळजी करू नकोस. मी जसा आहे ठीक आहे.''

ती काही म्हणाली नाही आणि हसत निघून आली. कारण भेटीची वेळ संपली होती. घरी पोहोचल्यावर ती खूप रडली, तासन्‌तास अश्रू ढाळत राहिली. भेटीत खूपच सबुरीने घेत ती हसत राहिली होती. तिला जाणवलं होतं की, अब्बूची तब्येत खूपच ढासळलीय. ऐटबाज अब्बू झुरूनझुरून अर्धा झालाय. ती त्याला ओळखूही शकली नव्हती.

तिने विचार केला, अब्बूला माझी काळजी सतावतेय. माझ्यापासून दूर गेल्याने अब्बूची ही अवस्था झालीय. दुःख विरह, तुरुंग, त्यातील वाईट जेवण, अंगमोड मेहनत, एवढं सगळं तिला माहीत होतं, पण हे माहीत नव्हतं की, क्षयरोगाचा आजार अब्बूला वारशात मिळालाय.

अब्बूचा बाप अब्बूपेक्षा जास्त गिर्रेबाज होता. पण क्षयरोगाने त्यालाही काही आठवड्यातच कबरस्तानात पाठवलं होतं. अब्बूचा मोठा भाऊ दमदार जवान होता पण ऐन तारुण्यात या दुखण्याने त्यालाही दमेकरी बनवलं. अब्बू या सत्यापासून गाफिल होता.

तुरुंगातील हॉस्पिटलमध्ये शेवटचे श्वास घेताना, पश्चाताप आणि दुःखद आवाजात नीतीला तो म्हणाला, ''मला माहीत असतं की, मी एवढ्या लवकर मरणार आहे तर शपथ वहदहुला शरिकची, तुला कधी आपली बायको नसतं बनवलं. मी तुझ्यावर अन्याय केलाय, मला माफ कर. माझी एकच निशाणी आहे, माझा टांगा-घोडा. त्याची काळजी घे आणि चन्नीच्या डोक्यावर हात फिरव आणि त्याला सांग की, अब्बूने आठवण केलीय.''

अब्बू मेला, नीतीचं सगळंच मेलं, एवढ्या लवकर सगळं मेलं.

नीती खंबीर बाई होती, तिने धक्का पचवला. ती अख्खा दिवस घरात अगदी एकटीच पडून राही. संध्याकाळी दीना येई, पाच रुपये तिच्या हवाली करे, तिला धीर-दिलासा देई आणि म्हणे, ''वहिनी, अल्लामियॉपुढे कुणाच चालत नाही. अब्बू माझा मित्र नाही, भाऊही होता. माझ्याकडून जे होईल, खुदाच्या आदेशाप्रमाणे जरूर करेन.''

नीतीच्या इद्दतचे दिवस* पूर्ण झाल्यावर, एक दिवस दीनाने सरळ स्पष्ट शब्दात नीतीला सांगितलं की, तिने त्याच्याशी लग्न करावं. नीतीच्या मनात आलं की त्याला धक्के मारून बाहेर काढावं. पण ती फक्त एवढंच म्हणाली, ''भाऊ मला लग्न नाही करायचं.''

त्या दिवसापासून दीनाच्या वागण्यात बदल झाला. पूर्वी तो न चुकता, संध्याकाळी पाच रुपये देऊन जायचा. आता तो कधी चार रुपये देऊ लागला, कधी तीन. सांगू लागला की, खूप मंदी आहे. मग तो दोन-दोन, तीन-तीन दिवस गायब राहू लागला. कारण देई की, तो आजारी होता, म्हणून घोडा जुपलाच नाही टांग्याला. टांग्याचा एखादा भाग खराब झाला होता आणि त्याच्या दुरुस्तीमध्ये सगळा दिवस खराब झाला.

पाणी डोक्यावरून वाहू लागल्यावर नीतीने दिनाला म्हटलं, भाऊ दीने, आता तू त्रास घेऊ नकोस, टांगा-घोडा माझ्या हवाली कर.''

खूप टाळाटाळीनंतर शेवटी दीनाने मनात नसताना टांगा-घोडा नीतीच्या हवाली केला.

खूप दिवस विचार केल्यानंतर नीतीने टांगा-घोडा अब्बूचा आणखी एक जवळचा मित्र माँझेकडे दिला. काही दिवसानंतर माँझेने सुद्धा लग्नाची विनंती केली. नीतीने नकार दिला तसं माँझेची नजर सुद्धा बदलली. थकून नीतीने टांगा-घोडा एका अनोळखी कोचवानाच्या हवाली केला. एका संध्याकाळी तो अनोळखी कोचवान पैसे द्यायला आलां तेव्हा नशेत होता. त्याने उंबऱ्यावर पाय ठेवताच नीतीवर हात टाकण्याचा प्रयत्न केला, नीतीने त्याला झापलं आणि घराबाहेर काढलं.

नीती अडचणीत सापडली होती. आठ-दहा दिवसांपासून टांगा-घोडा तबेल्यात बिनधंद्याचा पडून होता. चारापाण्याचा खर्च एकीकडे आणि तबेल्याचं भाडं दुसरीकडे. कोचवानही असे की, काही लग्नाची मागणी करत, काही अब्बूवर हात टाकण्याचा प्रयत्न करत, तर काही पैसे चोरत.

नीती विचार करून वेडी झाली. एक दिवस बसल्याबसल्याच तिच्या मनात विचार आला, 'आपणचं घोडा टांग्याला का जुंपू नये? आपणच का चालवू नये?' जेव्हा ती अब्बूसोबत फिरायला निघायची, तेव्हा टांगा स्वत:च चालवायची. शहरातले रस्तेही तिच्या ओळखीचे होते. तिने विचार केला, लोक काय म्हणतील?

मग, तिने स्वत:च आपल्या प्रश्नाचं उत्तर दिलं, बायका काय मेहनत-मजुरी करीत नाहीत? कामावर जाणाऱ्या, कोळसे निवडणाऱ्या, घरात राहूनही हजारो बाया काम करतात, हरकत काय? आणि पोट तर कसंतरी भरावं लागणारच आहे.

तिने काही दिवस विचार केला आणि शेवटी निर्णय घेतला की टांगा ती स्वत: चालवेल. तिला स्वत:वर पूर्ण विश्वास होता.

एक दिवस अल्लाचं नावं घेऊन ती तबेल्यात पोहोचली.

तिने पितळेची सजावट आणि सामान चमकवलं. घोड्याला न्हाऊमाखू घातलं. खूप लाड केले. ती टांगा जुंपू लागताच सगळे कोचवान दचकून बघत राहिले. कोचवान आश्चर्यचकित असतानाच, अब्बूसोबत मनातच प्रेमालाप करत ती तबेल्याबाहेर पडली. तिचे हात टांगा चालवण्याच्या कलेत पारंगत असल्यासारखे चालत होते.

शहरात गदारोळ पसरत गेला की, एक सुंदर बाई टांगा चालवत आहे. सगळीकडे याच गोष्टीची चर्चा होती. लोक ऐकत आणि नीती व तिचा टांगा, त्यांच्या रस्त्यावरून जाण्याची वाट पाहत.

सुरुवातीला प्रवासी टांग्यात बसायला संकोच करायचे. पण काही दिवसांनी त्यांचा संकोच दूर झाला. आता एक मिनिटसुद्धा नीतीचा टांगा रिकामा राहत नव्हता. एक भाडे इथून उतरत असताना, तिथून दुसरे भाडे बसत असे. कधीकधी तर त्यांच्यात भांडणेही होत की, कुणी नीतीला आधी बोलवलं होतं. नीतीची कमाई चांगली होत होती.

तिला जाणवलं की, टांगा आता दिवसभर चालत असतो. ना तिला, ना अब्बूच्या चन्नीला सुस्तावायला वेळ मिळतो. तिने विचार करून टांगा जुंपण्याची वेळ ठरविली. सकाळी सात ते बारा वाजेपर्यंत आणि दुपारी दोन ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत, ती टांगा चालवू लागली. आता आरामही मिळू लागला. कमाई तर होतीच.

तिला माहित होतं की, खूप लोक फक्त तिला पाहण्यासाठी तिच्या टांग्यात बसतात. ते उगाच, निरुद्देश, कामाशिवाय तिला टांगा इथेतिथे फिरवायला सांगतात. टांग्यात बसून आपसात घाणेरडे विनोद करतात, तिने ऐकाव्यात म्हणून चित्रविचित्र गोष्टी करतात.

तिला नेहमी जाणवायचं की, ती स्वत:ला विकत नसली तरी लोक चोरून चोरून तिला खरेदी करतात. तिला हेही माहीत होतं की, शहरातले सगळे कोचवान तिला वाईट समजतात. या सगळ्याची जाणीव असूनही ती अस्वस्थ नव्हती. उलट स्वत:वरल्या विश्वासामुळे शांत आणि निश्चल होती.

एक दिवस शहराच्या कमिटीने तिला बोलावलं आणि सांगितलं, ''तू टांगा चालवू शकत नाहीस.''

तिनं विचारलं, ''पण जनाब, मी टांगा का चालवू शकत नाही?''

''लायसन्सशिवाय तू टांगा चालवू शकत नाहीस. जर तू लायसन्सशिवाय टांगा चालवलास तर तुझा टांगा-घोडा जप्त करण्यात येईल. आणि बाईला टांगा चालवण्याचं लायसन्स मिळू शकत नाही.'' शहराच्या कमिटीने उत्तर दिलं.

तिनं म्हटलं, ''हुजूर माझा टांगा-घोडा जप्त करा, पण मला हे कळू द्या की, बाई टांगा का नाही चालवू शकत? बाई चरखा चालवून पोट भरू शकते, बाई ओझं वाहून रोजगार मिळवू शकते. बाया कोळसे निवडून भाकरी मिळवू शकतात. मग मी टांगा चालवून पोट का भरू शकत नाही? मला इतर कुठलंही काम करता येत नाही. माझ्या नवऱ्याचा टांगा-घोडा मी का नाही चालवू शकत? हुजूर, माझ्यावर दया करा. तुम्ही मला मेहनत मजुरीपासून का थांबवता? टांगा घोडा चालवू नको तर मग मी काय करू, सांगा? माझं घर मी कसं चालवू?''

शहराच्या कमिटीने उत्तर दिलं, ''बाजारात बसून. जा जाऊन बाजारात बस, तिथे जास्त कमाई आहे.''

नीतीच्या आत जी निती होती, ती जळून राख झाली. तिनं हळू आवाजात बरं म्हटलं आणि निघून आली. तिनं येईल त्या अर्ध्यापाव किंमतीत टांगा घोडा विकला आणि सरळ अब्बूच्या कबरीजवळ गेली.

एक क्षण शांत उभी राहिली. डोळे बिलकुल कोरडे होते, जसं पावसानंतर येणाऱ्या उन्हाने सगळी ओलं शोषून घेतली असावी.

मग तिनं दाबून धरलेले ओठ विलग झाले आणि ती अब्बूसमोर आली. म्हणाली, ''अब्बू आज तुझी नीती कमिटीच्या ऑफिसात मेली.''

दुसऱ्या दिवशी तिने शहराच्या कमिटीच्या कार्यालयात अर्ज केला.

आणि तिला आपला देह विकण्याचं लायसन्स मिळालं.

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

मूळ कथा : सआदत हसन मंटो
**अनुवाद : किरण येले**
भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०
kiran.yele@gmail.com

# प्रेमा तुझा रंग कसा?

**स्मिता भागवत**

अतीव प्रेम, कधी कधी प्रेमाच्या व्यक्तीसाठी समस्या ठरते, हे सूचित करणारी ही अनुभवकथा! रिकाम्या वेळात प्रेमाचा संचार  सैतानास निमंत्रण धाडतो, हे सूचित करणारी! कथानक सत्य असले तरी खाजगीपणाचे पावित्र्य जपण्यासाठी नावे बदललेली, इतकेच!

एका डॉक्टरमित्राच्या माध्यमातून ही समस्या मला कळली. माझ्या क्लायंटच्या समस्येत वैद्यकिय समस्या गुंतलेली असल्यास मी या मित्राची मदत घेते. तोही मेडिकल समस्येत समुपदेशिकेच्या सल्ल्याची गरज जाणवल्यास माझा सल्ला घेतो. या संदर्भातही तेच घडले. मी त्याच्याकडे गेले असताना तो एका पेशंटच्या समस्येत बेचैन होता. वास्तविक असे हैराण होण्याची त्याला सवय नाही. तटस्थपणा आणि आत्मीयता दोन्हीचा सुमेळ साधून समस्या सोडवण्यात तो पटाईत! म्हणून माझी मुद्रा प्रश्नार्थक बनली. भरल्या घड्यास थेंबाचे ओझे वाटत असल्यागत तो म्हणाला, कधी न कल्पलेल्या समस्येत चाचपडतोय गं!

शेंडा-बुडखा नसलेले बोल, समस्या उलगडण्यास समर्थ नव्हते. म्हणून मनात सुप्तावस्थेत पहुडलेला काउन्सेलर खडबडून जागा झाला. कोंडल्या भावनांना वाचा फोडणे उत्तम असते, हे माझे अनुभवसिद्ध मत! म्हणून मी हिरीरीने बोलू लागले...

''तुझ्या समस्येचं निराकरण माझ्यापाशी आहे, अशी बढाई मी मारत नाही. पण मोकळ्या मनानं बोलल्यानं मनावरचा बोजा उतरेल. मग मन पूर्ण शक्तिनिशी समस्येस भिडू शकेल. सविस्तर कथनात नकळत निसटलेला कळीचा मुद्दा अधोरेखित होऊ शकतो. प्रसंगी तो संपूर्ण गुंता सोडवण्यास समर्थ असतो. म्हणून महत्वाचं काय, हा विचार टाळून सगळं सांग बरं! कदाचित फालतू वाटणाऱ्या कथनातही कळीचा मुद्दा दडलेला असेल.'' त्यालाही मनावरचा असह्य बोजा उतरवण्याची गरज जाणवत असावी. तो धो धो बोलत सुटला. त्या कथनाचा हा सारांश...

अभिजित-अनिता! प्रेमविवाहानंतरही प्रेम टिकवलेले दांपत्य! एका कचेरीत काम करताना, त्यांचे सूर जुळले. उभय घरांच्या संमतीने लग्न झाले. अभिजितला नोकरीपेक्षा स्वतंत्र



व्यवसायाची ओढ असल्याचे घरातील सर्व नि अनिताही जाणून होती. घरात कोणत्याही प्रश्नावर चर्चा करून निर्णय घेण्याची रीत! लग्नावेळी आई-वडील निवृत्त झाले नव्हते. आदल्या वर्षी अभिजितच्या बहिणीचे बाळंतपण झाले होते. मुलाचे लग्न झाल्याने त्यांची प्रापंचिक जबाबदारी संपल्यात जमा होती. म्हणून दैनंदिन जीवन मार्गी लागताच अनिताने हा विषय काढला. सक्षम सुशिक्षितांना व्यवसायासाठी बँक लोन देते, इकडे तिने लक्ष वेधले.

अनिताच्या मते ईप्सित पूर्ण करण्यास ही वेळ अत्यंत योग्य होती. लठ्ठ पगाराची नोकरी सोडली नि व्यवसाय जमला नाही तर, हा प्रश्न मराठी मनास भेडसावतो. अभिजित त्याला अपवाद नव्हता. पण अनिताने नेटाने सविस्तर विचार मांडला. घरात चार माणसे! वडील माणसांच्या नोकरीची अनुक्रमे तीन नि पाच वर्षे शिल्लक! लग्नाआधी घरातील तीन माणसे नोकरी करत होती. आता अभिजितने नोकरी सोडली तरी घरात तीन माणसे नोकरी करणारच होती. अनिताचा पगार अभिजितहून कमी असला तरी बाऊ करण्याजोगा कमी नसल्याचे तिने सर्वांना पटवले. बँकेचे कर्ज मिळून काम मार्गी लागेतो अभिजित नोकरी करू शकेल, हेही! सुदैवाने सुरुवातीस गुंतवण्याच्या रकमेची सोय बचतीत होणार होती. व्यवसाय न जमला तर, या नकारात्मक विचारास अनिताचा विरोध होता. तुकारामाचा 'निश्चयाचे ऐसे बळ, तुका म्हणे तेची फळ' हा विचार ओठी आणून तिने त्यात समर्थांच्या 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे,' उक्तीची भर घातली. संवादक्षमता पणास लावून तिने रास्त विचार सुजाण कुटुंबास पटवला.

लगेच विचार अंमलात आणणे सुरू झाले. अभिजितला छोट्या दैनंदिन वस्तूंची निर्मिती करायची होती. त्या मूलभूत तयारीत अनिता सहभागी झाली. सहा महिन्याच्या जय्यत तयारीनंतर अभिजितने स्वतंत्र व्यवसायात पदार्पण केले. वर्षभर नोकरी नि व्यवसायाची तारेवरची कसरत केली. कष्ट, हुशारी आणि प्रामाणिकतेच्या तिपाईवर तो यशाची इमारत रचू लागला. पाहतापाहता स्वतंत्र कामात जम बसवून त्याने नोकरी सोडली.

आई निवृत्त झाली त्या वर्षी संसारवेलीवर गोंडस कळी उमलली. व्यवसायात जम बसल्यानंतर जन्मलेल्या लेकीस त्यांनी कौतुकाने ऐश्वर्या नाव दिले. वडील आधीच निवृत्त झाले होते. प्रेमळ आजी-आजोबांच्या सहवासाचेही ऐश्वर्य लेकीला लाभले आहे, ही खात्री बाळगून अनिता नोकरी करत राहिली. महत्वाकांक्षेच्या घोड्यावर अभिजिची मांड बळकट होती. तो प्रगतीपथावर यशस्वी वाटचाल करत होता. देशात जम बसताच, त्याने परदेशात माल पाठवण्याची खटपट आरंभली. नेटका हिशेब, प्रामाणिक कार्यशैली आणि मेहनतीच्या बळावर तो एक्सपोर्ट-इंपोर्ट क्षेत्रात उतरला, तेव्हा अनिताने त्याला राजकुमार - वैभवची भेट दिली.

अभिजितला या मार्गावर जाण्याचा आग्रह धरणाऱ्या सुनेचे घरात खूप कौतुक! ज्येष्ठांना चांगले निवृत्तीवेतन - पेन्शन मिळे. अनिताच्या पगाराची गरज उरली नव्हती. अभिजितला आई-बाबांचे वय वाढल्याचे नि शक्ती घटल्याचे जाणवले. दोन नातवंडांची जबाबदारी त्यांच्यावर नको, हे अनितालाही पटल्याने, वैभवच्या जन्मावेळची रजा संपताच तिने नोकरी सोडली.

ऐश्वर्या सेकंडरी स्कूलमध्ये जाईतो सारे दृष्ट लागण्याजोगे साजरे होते. अभिजितचे नाव स्थापित उद्योजकांच्या मांदियाळीत तळपत होते. वर्षातून तीन-चारदा त्याची परदेशवारी असे. अनिताच नव्हे तर ज्येष्ठांनाही त्याने अमेरिका, कॅनडा आणि युरोपचे दर्शन घडवले होते. घरात समृद्धी नि सुसंस्कार गुण्यागोविंदाने नांदत असताना अचानक अनिता आजारी पडली.

विशिष्ट आजार नसला तरी वजन वेगाने कमी होत होते. स्वाभाविकच प्रेमळ कुटुंब काळजीत पडले. डॉक्टरांनी संपूर्ण चेकअप करायला सांगितले. अभिजितला काम कमी करून अनिताची काळजी घेण्यास त्यांनी कानपिचक्याही दिल्या. त्याने तत्परतेने परदेशवारी पुढे ढकलली. कामाच्या वेळातही घट केली. दोघे जोडीने डॉक्टरकडे खेटे घालू लागले. अनिता खुलत होती. टवटवीत दिसू लागली. प्राथमिक चाचण्यात काळजीचे कारण निघाले नाही. म्हणून अभिजित निश्चिंत मनाने पुन्हा कामास भिडला. पण...

अनिताच्या मुखावरील तजेला वेगाने लुप्त झाला. खंगणे मागच्या पानावरून पुढे चालू राहिले. पुन्हा अभिजितने तिला डॉक्टरकडे नेले. प्राथमिक चाचण्यात निदान न झाल्याने डॉक्टरांनी सर्वंकष चाचण्यांची भलावण केली. अशा चाचण्या गंभीर आजार सूचित करत असल्याने, कुटुंबीजन - शाळकरी मुलेही हबकली. पॅथॉलॉजिकल कसोट्यांच्या परिणामात युरिनमध्ये रक्ताच्या गुठळ्या (ब्लड क्लॉट्स) आढळल्याची नोंद आली. आधीच्या टेस्ट फारशा जुन्या झाल्या नव्हत्या नि तेव्हा युरीनमध्ये रक्त नव्हते. म्हणून डॉक्टर चक्रावले. तरी त्यांनी साधे (माईल्ड) उपचार सुरू केले. अनिताच्या प्रकृतीत सुधारणा दिसू लागताच उपचाराचा परिणाम अजमावण्यासाठी डॉक्टरांनी पुन्हा मूत्रचिकित्सा सुचवली. पण नवा रिपोर्ट जुन्यासारखाच!डॉक्टरांनी तोच उपचार चालू ठेवला.

पाहणाऱ्यास अनिता बरी दिसे. उपचाराचा उपयोग गृहित धरून पुन्हा चाचणी झाली. पण परिस्थिती जैसे थे! डॉक्टर गोंधळले. चाचणीत चूक झाली असेल, असे वाटून त्यांनी पुन्हा टेस्टची भलावण केली. पण रिपोर्ट तोच राहिला. इतर चाचण्यात सारे आलबेल असताना युरिनमध्ये गोठलेले रक्त जाण्याचे कारणच नव्हते. हुशार डॉक्टर बुचकळ्यात पडले. तरी त्यांनी ट्रायल-एरर मेथडने उपचार नि उपचाराचा परिणाम अजमावण्यासाठी मूत्रपरीक्षा हे रहाट-गाडगे चालू ठेवले. सामान्य नजरेस प्रकृती सुधारल्याचे जाणवत असले तरी पॅथॉलॉजिकल रिपोर्ट बदलत नव्हता. डॉक्टरांच्या आश्चर्याची मात्रा वेगाने वाढत होती.

निदान जमले नाही की बरेच डॉक्टर्स वायरल इन्फेक्शन वा मानसिक कारण देण्याची पळवाट शोधतात. हा डॉक्टर पळवाट नव्हे तर राजमार्ग शोधणारा! त्याला नव्हती जाणवत इन्फेक्शनची शक्यता की मानसिक तणावाची! शिवाय अनिताचे खंगणे संपले होते. मुखावर नजरेत भरण्याजोगी प्रसन्नता! डॉक्टर नि इतरांच्या मनात गोंधळ वाढवणारी! प्रिय पत्नीच्या काळजीत अभिजित मात्र ढेपाळत होता. डॉक्टरच्या वाऱ्या, आडनीड वयातील मुले, वयस्कर जन्मदाते नि वाढता व्यवसाय... सारे पेलण्यात त्याची दमछाक होत होती. त्याने अनिताचे आनंदी दिसणे लटके ठरवले. इतरांना काळजी वाटू नये, यासाठी ती प्रसन्नतेचे नाटक करतेय, असे तो डॉक्टरांना म्हणाला. इथे निदान होत नसेल तर तिला अमेरिकेस नेण्याचा विचार ओठी आणून त्याने डॉक्टरांचे स्पष्ट मत विचारले. डॉक्टरांना निदान न होण्याचा ताण सहन होत नसला तरी हार पत्करणेही पसंत नव्हते. म्हणून त्यांनी शेवटच्या प्रयत्नाची भलावण केली. यावेळी अनिताने लॅबमध्ये जाऊन ताजे मूत्र परीक्षणास देण्याची त्यांनी विनंती केली. यावेळी रिपोर्ट बदलला नाही तर तिला अमेरिकेस नेणे स्वीकारण्याचे वचनही दिले.

डॉक्टरांच्या सूचनेनुसार अभिजित अनितासह नेहमीच्या लॅबमध्ये गेला. सणाचे दिवस होते. काम करणाऱ्यांची संख्या खूप कमी होती. अनिताची चाचणी घ्यायला आलेला तर अभिजितला अगदी बच्चा वाटला. तरी त्याने या देशातील ही शेवटची कसोटी, असे आश्वासन घेतले. फोन करून त्याने टेस्ट घेणारा नवशिका होता, हे सांगून डॉक्टरांना ती अमेरिकेत बरी होईल, हेही ऐकवले.

या वेळी मात्र रिपोर्ट थोडा बदलला. बदल आश्वासक नव्हे तर चक्करभेंड करणारा! समग्र परिस्थितीचे वर्णन संपवून मित्र सांगू लागला, वास्तविक मी अमेरिकेत शिकून आलो आहे. तरी या टेस्टचा अहवाल हाती येण्यापूर्वी मी तिला अमेरिकेस नेण्यास होकार देण्याचे ठरवले होते. पण काही क्षणांपूर्वी रिपोर्ट आला. तो पाहून मी हादरलो. कारण त्यात युरिनमधील  ब्लडक्लॉट मानवी रक्ताचे नाहीत, असे नमूद केले आहे. टेस्ट घेणारा पोऱ्या नवशिका वाटल्याचं अभिजित बोलला होता. म्हणून पूर्ण रिपोर्ट वाचण्याचं मला भान उरलं नाही. फैलावर घेतात तशा वैतागल्या स्वरात मी त्यास कोणत्या निकषावर रक्तकण मानवी नाहीत, हे ठरवलंस, असं विचारलं. त्याला माझा वैताग कळला नसावा. सहजस्वरात त्यानं रक्तकोशात केंद्र (इन्यूक्लिएटेड ब्लड सेल्स) नसल्याची माहिती दिली.

मीही चक्रावले. औपचारिक शिक्षण संपल्यावरही माझा विज्ञानाशी सतत संबंध असतो. केवळ मानवी रक्तकोश केंद्रविहिन असतात, हे डॉक्टर नसलेल्या मला ठाऊक आहे. नवे उमेदवार स्थापित व्यक्तीहून अधिक सजगतेने कार्य करताना मी खूपदा बघते. नवी व्यक्ती सरावताच कॅज्युअली वागू लागल्याचेही! या संदर्भात तसे झाले असावे, असा माझा तर्क!मनात – अनिता फ्रेश दिसत असूनही युरिनमध्ये रक्त जाणे अनाकलनीय आहे, हे मित्रबोल रुंजी घालत होते. म्हणून मी म्हणाले, ''मला वाटतंय, या विचित्र समस्येचं उत्तर तुला विचित्र मार्गावरच सापडेल. म्हणजे काय, ते आत्ता नीट सांगता येत नाहीय मला! पण मला वाटतं, तू लगेच अनिता-अभिजितला काही सांगू नये. यावेळी रिपोर्ट थोडा वेगळा असल्याचं तेवढं सांग. अधिक छाननीसाठी वेळ मागून घेतेय, हेच सांगायचं. नीट विचार करून एक-दोन दिवसात मी तुला फोन करते. तोवर अधिक बोलू नकोस.''

अनिताचा तजेला नि वाढलेले वजन मला सतत खुणावत होते. विचारचक्राची सुई, वारंवार नव्या व्यक्तीची सतर्कता अधिक असण्यावर स्थिरावत होती. अचानक मनात एक किडा वळवळला. मन सुतावरून स्वर्गात गेले नि मी मित्रास फोन जोडला. माझ्या सांगण्यास तो लगेच होकार देण्याची सुतराम शक्यता नव्हती. कारण मनसुबा शिष्टसंमत नाही, हे मी जाणून होते. मी नैतिकतेस प्राधान्य देणारी व्यक्ती असल्याचे तो जाणून होता. म्हणून मी समजावण्याचे साहस केले. समाजहितासाठी नीतीनियम असतात. सामान्य परिस्थितीत ते पाळणं योग्यच! तरी अशा विचित्र परिस्थितीत आडवाट शोधणं चूक नसतं. अपवादाने शिष्टसंमत मार्गास किंचित मुरड घालणंही गैर नसतं.

'गरज असेल तेव्हा डॉक्टर्स गुप्तांगाचं निरीक्षण करतात. मला तिचा कोणताही अवयव बघण्याची इच्छा नाही, हे तू जाणतोस. मग प्रसंगी स्त्रीची विचित्र समस्या सोडवण्याच्या उद्देशानं मी – एका स्त्रीनं संपूर्ण वस्त्रांकित स्त्रीच्या संदर्भात किंचित अशिष्ट मार्ग पत्करण्यास हरकत नाही, असं मला वाटतं. तुला हे पाप वाटत असेल तर ते माथी घेण्यास मी तयार आहे. धोपटमार्ग ही समस्या सोडवण्यास समर्थ नाही, असं मला खात्रीपूर्वक वाटतं. विचित्र समस्या सोडवताना विचित्र मार्गाचीच मदत होईल.हा प्रयोग यशस्वी होईल अशी माझं मन ग्वाही देतंय. तू फक्त हो म्हण!' असं मी सांगितलं

तरी त्याचा होकार मिळेना. म्हणून मी प्रयोगाचे समग्र रूप विषद केले. प्रयोग फसला तर हा प्रयोग केल्याचे जाहिर करण्याची गरज नाही, हे सांगून मी त्यास आश्वस्त करत भरतवाक्य उच्चारले, 'प्रयोग यशस्वी झाला तर भारतीयांचं अज्ञान अमेरिकेकडे ज्ञानाची भीक मागायला गेलं, हे किटाळ टळेल.' हे आवडल्याने त्याने नकार गिळला. मला हवी होती ती सोय देण्याचे त्याने वचनही दिले. दोन दिवसांनंतर करायच्या प्रयोगाची आम्ही नीट आखणी केली.

आमच्या योजनेनुसार डॉक्टरने सकाळचे रुग्ण संपवून या दांपत्यास भेटायचे होते. त्याप्रमाणे निरोप गेला. रिपोर्टमध्ये गुंतागुंत सुटण्याची चिन्हे आहेत. तरी पूर्ण गुंता सोडवण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या युरिन टेस्टची नितांत गरज आहे, असे त्यांना सांगण्यात आले. पुन्हा मूत्र अगदी ताजे हवे असल्याचेही! अजून एका टेस्टला सामोरे जाण्यास अभिजितचा विरोध होता. तरी

डॉक्टरने रिपोर्ट वेगळा असल्याचे नि गुंतागुंतीचे कारण पुढे करून होकार मिळवला. मी थोडी लवकर तिथे पोहोचले नि रुग्णांच्या प्रतीक्षाकक्षात काही वाचत बसले. मार्ग खरोखर विचित्र होता. शिष्टसंमत नव्हता. म्हणून दोलायमान मन वाचनात एकाग्र होईना.

एका रुग्णाची तपासणी बाकी असताना हे दांपत्य आले. मी निरीक्षण करू लागले. अभिजितच्या मुखावर तीव्र कंटाळा दिसला तरी अनिताची प्रसन्न तरतरीत मुद्रा बेगडी वाटली नाही. ती पेशंट आहे, असे अजिबात वाटत नसल्याने माझा विचार वाजवी ठरण्याची शक्यता दुणावली. मला बरे वाटले. काम संपवून डॉक्टरमित्र प्रतीक्षाकक्षात आला. रिसेप्शनिस्ट नि इतर स्टाफला निरोप देऊन तो आमच्याकडे वळला. त्याने माझी या दांपत्याशी ओळख करून दिली नि अनिताच्या केसमध्ये आता माझाही सहभाग असण्याची माहिती दिली. आवश्यक कार्यवाही संपवून मी बेल वाजवली की तू आत ये, असे त्याने मला सांगितले नि या दांपत्यासह तो कन्सल्टिंग रुममध्ये निघून गेला. लगेच मी माझ्या स्थानाकडे वळले.

अभिजितच्या चेहऱ्यावर कंटाळा पाहून डॉक्टरने त्यास थोडी कळ काढण्याची विनंती केली. या टेस्टचे वेगळेपण सूचित करायला त्याने टेस्टपूर्वी कॉफी घ्यावी लागेल, हे सांगून दोघांसाठी कॉफी मागवली. तोवर मी योग्य जागी स्थानापन्न झाले होते. कॉफी संपताच डॉक्टरने अनितास बाटली दिली. अनिता बाटलीसह बाथरुममध्ये शिरली. बाथरुमच्या भिंतीच्या वरच्या भागात व्हेंटिलेशनसाठी खिडकीसदृश रचनेत चार काचेच्या पट्ट्या बसवल्या होत्या. सफाईचे कारण सांगून मित्राने त्या पट्ट्या दूर करवल्या होत्या. बाहेर स्टूलवर मी उभी होते. माझे संपूर्ण चेतातंत्र अनिताच्या हालचालीवर केंद्रित होते. तिच्या हातात पर्स होती. सामान्यतः अशा टेस्टसाठी बाथरुममध्ये जाताना, स्त्रिया पर्स नवऱ्याकडे सोपवतात. अनिताची पर्स पाहून माझे ओठ हसले. तिच्या हालचालीत कमालीचे चापल्य होते. बाटलीत युरीन भरून तिने पर्समधून छोटी बाटली काढली. तीत लाल रंगाचे घट्ट द्रावण होते. तिने ते युरिनमध्ये ओतले. घट्ट बंद करून तिने द्रावण मूत्रात नीट मिसळण्यासाठी बाटली जोरजोरात हलवली. हात धुवून ती बाथरुमच्या आरशात डोकावली. अनायासे तिच्या ओठी स्मित फुलले. माझ्याही!

अनिताच्या कृतीची कारणमीमांसा जाणण्याची गरज होती. तिला डॉक्टरी उपचाराची नव्हे तर समुपदेशनाची गरज आहे, हे स्पष्ट झाले. अशिष्ट कृतीचा दोष माथी घेतला, त्याचे सार्थक झाल्याचे समाधानही! जामानिमा करून अनिता बाथरुमबाहेर पडली. मीही स्टुलावरून उतरून कन्सल्टिंग रुमकडे वळले. तिला अभिजितसमक्ष गुन्हेगार म्हणून उभी करायचे नाही, असे माझे मन म्हणत होते. कारण माझा कल सदैव मनाची पडझड टाळण्याकडे असतो.

अनिता बाथरुममध्ये नि कन्सल्टिंग रुमध्ये मौनात हरवलेले डॉक्टर आणि अभिजित! बाथरुमबाहेर आलेल्या अनिताच्या मुद्रेवर छद्मी स्मित असल्याचा डॉक्टर मित्रास संशय आला. तरी शांतपणे तिला खुर्चीवर बसण्याची विनंती करून त्याने बेल दाबली. लगेच मी आत गेले. तिथे अस्वस्थतेचे साम्राज्य होते. नजरेच्या इशाऱ्याने मी मित्रास काम फत्ते झाल्याची खबर दिली. क्षणभर त्याच्या नजरेत आश्चर्य उफाळले. तरी तटस्थ स्वरात तो अभिजितला म्हणाला, ओव्हर टू माय को–वर्कर!

प्रथम मी अभिजितला मेडिकल समस्या संपल्याची चांगली बातमी दिली. मग आताच्या ट्रिटमेंटवेळी समुपदेशिकेशिवाय पेशंट आणि डॉक्टरच उपस्थित राहू शकतील असे सांगितले. काम संपायला दीड–दोन तास लागण्याची शक्यता व्यक्त करून त्याने अनिताला घ्यायला दोन तासांनी यावे अशी मी विनंती केली. अभिजित जाताच बंद दाराआड काम सुरू झाले. दैहिक समस्या नाही – कधीच नसावी. पण अनिताचे कृत्य तिला मनोरुग्ण ठरवू शकत होते. दैहिक उपचारात कणखर पावले उचलण्यास हरकत नसते. मानसिक समस्येत मात्र सामंजस्याची नितांत गरज असते. मनोरुग्ण चिकित्सकास तसेच समुपदेशकास गाठी नाजूक हाताने सोडवाव्या लागतात. या मंथनप्रक्रियेत हाती आलेले नवनीत नवलप्रद, सुखद तरी खेदजनक वाटले. काहीसे असे...

नोकरी सोडल्यावर प्रेमळ अनिता संसारात रमली. तिला सुमाता, सुपत्नी नि सुगृहिणीची भूमिका खूप भावली. पुढे मुले मोठी झाली. शिक्षणात रमली. पुरोगामी घरात विविध यंत्रांची रेलचेल असते. आताच्या संयुक्त कुटुंबातही नसतो पोरवडा की अनेक नि असमंजस ज्येष्ठ! स्वाभाविकच गृहिणीचे काम दिवसभर न पुरता लवकर संपते. तेच अनिताचे झाले. तिला जीवन हेतूशून्य वाटू लागले. रिकामपण जाचक बनले नि सुखी जीवन अळणी! नवरा नि कुटुंबावर तिचे नितांत प्रेम! पण प्रेमाचा वर्षाव करावा असे कुणी तिच्यासाठी उपलब्ध नव्हते. मुलांना अभ्यास नि नवऱ्यास व्यवसाय! दोन्ही समंजस ज्येष्ठ संसारातून मन काढून आध्यात्मात रमण्याचा प्रयास करणारे! अनिता एकटी पडली. ती समंजस! प्रत्येकाची बाजू समजून घेणारी! तक्रार टाळणारी! ती मौनात कुढत राहिली. लवकरच याचा परिणाम देहावर उमटला.

देहावरील परिणाम सर्वांना दिसतो पण मनाची घालमेल अदृश्य असल्याने दिसत नाही. म्हणून दैहिक उपचारच होतात. अनिताची काळजी घेण्याच्या प्रयत्नात सारे तिच्याभोवती भिरभिरू लागले. कानपिचक्या मिळालेला अभिजितही! ती सुखावली. दैहिक समस्या नसल्याचे कसोट्यांनी सिद्ध केले नि मानसिक समस्या अंधारात राहिली. ती टवटवीत दिसू लागल्याने ती बरी आहे, हे गृहित धरून अभिजित कामात गुंतला. परत अनिता एकाकी! तजेला वेगाने अदृश्य झाला. अशक्त देहातील रिकाम्या मनात ‘आजारपणात महत्त्व मिळते. म्हणून आजारी

पडावे,' या आग्रहाच्या रुपात सैतानाने प्रवेश केला.

नेमक्या वेळी एका महत्वाच्या कामासाठी कसाईवाड्यातून जाणे झाले. सामान्यतः तिथून जाताना बोकडांची मुंडकी पाहून तिला उमासे येत. मांसाचा विचित्र वास सहन न होऊन ती नाकाला पदर लावत असे. पण मनात घुसलेला सैतान कसाईवाड्यात चुळबुळला. लगेच तिने कसायाशी संपर्क साधला. ती मागेल तेव्हा छोट्या बाटलीत बोकड, गाय वा कोणत्याही उपलब्ध प्राण्याचे रक्त देण्याची तिने विनंती केली. कसाई गोंधळला. पण प्राण्याचे तुकडे करताना वाया जाणाऱ्या रक्ताची किंमत मिळते आहे, हे त्याला आवडले. तो आनंदाने तयार झाला. प्राण्यांचे रक्त लाल असल्याने ते आपल्या रक्तासारखे असते, असे अनिताला वाटले. म्हणून तिला ही युक्ती पसंत पडली.

तिचे घटणारे वजन पाहून वेळीच उपचार करण्यासाठी अभिजित पुन्हा डॉक्टरांना भेटला. त्यांनी सखोल तपासण्यांची भलावण केली. अनिता आनंदली. मग एक-दोन नव्हे तर पाच वेळा तिने नवी युक्ती यशस्वीपणे राबवली. स्वाभाविकच निर्ढावलेल्या अनिताचा आत्मविश्वास वाढला. सहाव्यावेळी पितळ उघडे पडल्याचे तिला ठाऊक नव्हते. म्हणून डॉक्टर-कडच्या बाथरुममध्येही तिने आत्मविश्वासाने काम संपवले. मग मात्र आम्हा दोघांसमक्ष तिला सत्य सादर करणे भाग होते.

वास्तवाचा चितार देऊन अनिता रडू लागली. 'वाचवा मला' असे साकडे घालत! गयावया करत! आपल्याला एकाकीपण झेपत नाही, हे करूण स्वरात सांगत! हा परिस्थितीजन्य गुन्हा आहे, याची मला नि डॉक्टरमित्रास जाणीव होतीच. त्यामुळे आम्ही सारे अत्यंत कौशल्याने हाताळले. प्रश्न सुटल्यात जमा असल्याचे अभिजितला सांगितलेच होते. पुढे औषधाने आजार संपवला असला तरी रिकामपणा पुन्हा आजारास निमंत्रित करतोय नि करत राहील, अशी त्याला नि त्याच्या कुटुंबास समज देण्यात आली. अभिजितने तिला आपल्या व्यवसायात तिच्यायोग्य काम देऊन सामावून घेतले तर आजारपण कायमचे दूर ठेवता येईल, हेही सांगण्यात आले. घरी सारे समंजस असल्याने अनिता विधायक कामात गुंतताच सैतानाने काढता पाय घेतला. अशिष्ट ठरणाऱ्या मार्गाने वेळीच यशस्वी तोड काढून अनिताची कहाणी सुखांताने संपवली. पण या कहाणीने आरोग्यक्षेत्राच्या नि सामाजिकक्षेत्राच्या संदर्भात काही दाहक प्रश्न निर्माण केले...

मेडिकल प्रोफेशन - अर्थात वैद्यकिय क्षेत्रास नोबल प्रोफेशन म्हणतात कारण हा व्यवसाय समाजाच्या आरोग्याचे रक्षण करतो. पण हल्ली तसे होत नाही. म्हणून सेकंड ओपिनियनची प्रथा सुरू झाली का? आजही रुग्ण विश्वासाने पॅथॉलॉजिस्टकडे जातात. विनाविरोध मागितलेली रक्कम भरतात. परवडत नसणारे लोक उधारी करून पैसे देतात. मग लॅबचे कर्मचारी प्रामाणिकपणे काम का करत नाहीत? नवे कर्मचारी जुने होताच कामचुकारपणा का करतात? अनुभवाने माणूस शहाणा व्हावा. पण अनुभवी कर्मचाऱ्यात बेदरकारी नि निर्ढावलेपण का दिसू लागते? भारतीय शिक्षित समाज संवेदनशीलता का गमावून बसला आहे? एकदा नव्हे तर पाचवेळा अनिताने कसाईवाड्यातून मिळवलेले रक्त युरिनमध्ये भरले. त्याचे प्रामाणिकपणे परीक्षण झाले असते तर हे मानवी रक्त नसल्याचे पहिल्याच वेळी कळले असते. पण बेदरकापणे नुसता युरिनचा रंग पाहून रिपोर्ट पाठवण्यात आले. वारंवार! शेवटच्या वेळी नवशिका कर्मचारी नसता तर तेव्हाही तेच घडले असते. जुन्या कर्मचाऱ्यांना अनुभवसमृद्ध करण्याऐवजी बेदरकार करणे समाजाच्या आरोग्यास घातक आहे हे का नाही कुणाला कळत? आपल्याकडे वैद्यकीय क्षेत्रावर ग्राहक मंचाचा अधिकार नसल्याने काही पावले उचलली तरी ती पुरेशी ठरलेली नाहीत.

डॉक्टरमित्राने अनैतिकतेचा बाऊ करून नीतीबाह्य मार्ग अवलंबण्यास नकार दिला असता तर? अभिजित अमेरिकेस गेला असता. तिथे अनिता प्राण्याचे रक्त मिळवू शकली नसती नि रोग (?) बरा करण्याचे श्रेय लाटून अमेरिकेने भारतीयांना अज्ञानी ठरवले असते. यापाठी भारतीयांचे अज्ञान नव्हे तर कर्मचाऱ्यांचे बेदरकार वर्तन नि कामचोरी जबाबदार आहे, हे वास्तव उघड झाले नसते. अशा बेदरकार लोकांमुळे हुशार नि प्रामाणिक भारतीय कर्मचारी बदनामीचा भोग बनणे योग्य आहे का?

आता कुटुंबे मोठी नसतात. संयुक्त कुटुंबातही नसतो पोरवडा की अनेक ज्येष्ठ! घरात यंत्रांची रेलचेल! मुले शाळेत जाऊ लागली की गृहिणी सुटवंग होते. घरकाम वेगाने संपते. तिला रिकामा वेळ खायला उठला तर त्यात सैतानाचा प्रवेश होऊ शकतो. मग स्त्रीशक्ती विधायक कामात वापरली न जाता विकृत मार्गाकडे खेचली जाते. ती विधायक कामात गुंतवली पाहिजे. अनिताच्या घरचा व्यवसाय असल्याने ते सहज जमले. पण माता, सुपत्नी नि सुगृहिणी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यात काही वर्षे खर्च केलेल्या, आदर्शत्व जपणाऱ्या स्त्रियांसाठी समाजाने प्रौढ वयात त्यांना देण्यायोग्य विधायक कामे निर्माण केली पाहिजेत. अर्थसंपन्न महिलांना समाजकार्य करावेसे वाटले तरी काय करावे, ते सुचत नाही. ती व्यवस्थाही करायला हवी.

सारे योग्य रीतीने होत असले तर अशिष्ट अपवादात्मक रस्ते चोखाळण्याची गरजच पडणार नाही. काळ परिवर्तनशील आहे, तर जनजीवनातही परिवर्तन हवे ना? सशक्त आणि संस्कारसंपन्न जीवनासाठी योग्य मार्ग शोधणे हे समाजाचे काम आहे. पण समाज म्हणजे कोण? तुम्ही आणि मी - आपण! मग सर्वांनी मिळून कामचोरीवर अंकुश ठेवला पाहिजे. रिकाम्या पडलेल्या स्त्रियांसाठी विधायक कामे शोधली पाहिजेत. तुम्हाला नाही असे वाटत?

**स्मिता भागवत**
smitacap@gmail.com /bhagwats@rogers.com

**माझे गाव माझे जगणे विशेषांक**

वर्ष : तेविसावे । दिवाळी : २०१५

**संपादक : अरुण शेवते**

'ऋतुरंग' दिवाळी अंकाचे हे तेविसावे वर्ष आहे. कर्तृत्ववान माणसांची, कलावंतांची शताब्दी आपण साजरी करत असतो. तसेच अभिजात पुस्तकांचीही शताब्दी साजरी करायला हवी. पहिल्यापासून 'ऋतुरंग'ची ही भूमिका आहे. १९१५ साली त्रिंबक नारायण आत्रे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे 'गावगाडा' हे समाजशास्त्राचे अभिजात पुस्तक लिहिले. २०१५ हे गावगाड्याचे शताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने गावगाड्याला अभिवादन करण्यासाठी 'ऋतुरंग'चा 'माझे गाव माझे जगणे' हा विशेषांक आहे.

गुलज़ार, गिरीश कुबेर, विश्वास पाटील, अमृता सुभाष, सुशीलकुमार शिंदे, मकरंद अनासपुरे, अरुण साधू, यशवंतराव गडाख, सयाजी शिंदे, डॉ. पी. डी. पाटील, ना. धों. महानोर, रंगनाथ पठारे, सदा डुम्बरे, नागनाथ कोत्तापल्ले, अरुण शेवते, फा. फ्रान्सिस दिब्रिटो, श्रीकांत बोजेवार, डॉ. सु. प्र. कुलकर्णी, दत्तप्रसाद दाभोळकर, शिरीष पै, मधुकर भावे, इंद्रजित भालेराव, सुमती लांडे, डॉ. सुभाष देवढे पाटील, उर्मिला पवार, अरुण जाखडे, प्रभा गणोरकर, सी. आर. शेलारे, श्रीकांत देशमुख, डॉ. सदानंद मोरे, किशोर मेढे, सुहास बहुळकर, टी. एन. परदेशी, दीपक करंजीकर, अंजली अंबेकर, नितीन चव्हाण, सविता दामले.
या सर्व लेखकांनी आपल्या मनातले जपलेले गाव उलगडून दाखवले आहे.

**मूल्य : रु. २००/- । पृष्ठे : २५२**

ऋतुरंग
प्रकाशन

अरुण शेवते
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४
shevatearun@gmail.com

# अघटित

**प्रा. प्रतिभा सराफ**

''भावेश, काय झालं रे?'' त्याचा उतरलेला चेहरा पाहून मी त्याला विचारलं.

''म्हटलं तर खूप काही आणि म्हटलं तर काहीच नाही.'' भावेश उदासपणे म्हणाला.

''आज तू डबा खायला येणार नाहीस तर...''

भावेशला मी दहा वर्षांपासून ओळखतेय. त्यामुळे माझ्या या वाक्यावर त्याने नजर उचलून न पाहता फक्त मान डोलावून 'नाही' असं सांगितलं. मी बॅगेतून डबा काढला आणि कॅण्टीनकडे गेले. भावेश उदास असला की अन्नावर राग काढतो. आख्खा दिवस चक्क उपास करतो. त्याच्या या अवस्थेत त्याला एकटं सोडणं हेच योग्य असतं, हे मलाच काय ऑफिसमध्ये सगळ्यांनाच माहीत आहे.

''राधा, काय करतोय भावेश?'' ज्योतीने विचारले.

''तुला तर माहीत आहे की आज त्याचा...''

मला मध्येच तोडत ज्योती म्हणाली, ''मलाच काय सगळ्यांनाच माहीत आहे. पण खरंच त्याच्यासाठी मन तुटतं गं...''

''माझंही!''

मी पटकन बोलून गेले अन् त्याच क्षणी मनोहर तिथे पोहोचला आणि म्हणाला,

''एक झाली, दुसरी झाली, अशा माणसाला तिसरीही सहज चालेल!''


त्याच्या या वाक्याने सर्व पुरुषमंडळी हसू लागली आणि मी आणि ज्योती जरा गंभीरच झालो.

''चला, उघडा डबे पटापटा नाहीतर लंचब्रेक संपायचा. आपल्याला तर उपवास सहन होत नाही बाबा.''

असे म्हणत मनोहर चमच्याने डब्यातील भात हलवत राहिला. मला आणि ज्योतीला भावेशविषयी जरा जास्तच कणव आहे, हेही सगळे जाणून आहेत. हास्यविनोदात बुडून सगळ्यांनी डबे संपवले तरी माझी जेमतेम अर्धीच पोळी खाऊन झाली. मी तसाच डबा बंद केला. भावेश कॉम्प्युटरपुढे डोके टेकून शांतपणे निजला होता. त्याचे सिल्की दाट केस उन्हाच्या तिरपीने मस्त चमकत होते. एखाद्या निरागस बालकासारखा तो भासत होता. न राहवून मी त्याच्या केसांवरून अलगद हात फिरवला तसा तो झटकन उठून बसला. मग मी त्याला विचारलं,

''अरे ठीक आहेस ना?''

''ठीक आहे.''



''काय झालं आज?''

''तसं काहीच नाही. कदाचित माझं चुकत असेलही की मी तिला पुरेसा वेळ देऊ शकत नाही म्हणून... कदाचित ती त्रागा करत असेल...''

''भावेश... मला प्लीज सांग ना, काय झालं ते... तुला बरं वाटेल बोलल्यावर...''

''राधा... मला घरी जावंसंच वाटत नाही... काय करू?''

''असं बोलून कसं चालेल? विजया काही बोलली का?''

''ती काहीच बोलत नाही मला पण वेदांतवर चिडचिड करते. कारण नसताना त्याला मारते जे मला सहन होत नाही.''

''कोणतीही आई आपल्या मुलाला उगाच मारत नाही. तो काहीतरी खोड्या नक्की करत असणार. तसाही मी त्याला पाहिलंय. फारच मस्तीखोर आहे तो!''

''बघ... म्हणून मी तुला म्हटलं की काहीच नाही म्हणून.''

भावेश चिडून म्हणाला. इतक्यात समोरून मोहन आला आणि आम्ही बोलणं थांबवलं. मागून एकजण येऊन आपापल्या टेबलावर बसले. भावेशनेही त्याचा कॉम्प्युटर चालू केला आणि मला आमचं बोलणं अर्धवट टाकून तेथून जावं लागलं.

अधूनमधून असंच काही घडायचं. आम्ही सर्वच त्याला समजून घ्यायचो. त्यामुळे तो या ऑफिसमध्ये टिकून राहिला.

भावेशचं लग्न एका प्राध्यापिकेबरोबर ठरलं तेव्हा आम्ही त्याला उगाचच ''सर... सर'' म्हणून चिडवायचो. ''सर... मॅडम कुठे आहेत? मॅडम कशा दिसतात?'' मॅडम मॅडम... करत त्याला त्रास द्यायचो. तोही उत्साहाने आमच्यात सामील व्हायचा आणि जेव्हा कु. निशा राणे या श्रीमती निशा भावेश देसाई झाल्या त्या क्षणाचे आम्ही साक्षी झालो. भावेश माझ्याहून सात-आठ वर्षांनी लहान. त्यामुळे त्याच्या लग्नात मी सहपरिवार गेले होते. त्या फोटोची एक प्रतसुद्धा भावेशने आम्हाला भेट दिली होती. अत्यंत मृदू स्वभावाची निशा आणि भावेश यांचा संसार आम्ही सर्व जवळून पाहत होतो. निशाने बनवलेला डबा, तो पॅक करायची तिची पद्धत, आमच्यासाठी काही गोडधोड आवर्जून पाठवायची तिची सवय, शिवाय अधूनमधून ऑफिसच्या नंबरवर फोन करून भावेशबद्दलची चौकशी- म्हणजे रोज नाही पण कधी मुंबईत काही घटना घडलेली असेल- जसं बॉम्बस्फेट, ट्रॅफिकजॅम, पाऊस वगैरे, तर त्या वेळेस वा त्याला बरं वगैरे नसेल तेव्हा. पण तिची बायको म्हणून जबाबदारी असो वा त्याच्या प्रेमाखातर असो, तिच्या अशा वागण्याचा, काळजी करण्याचा स्वभाव यावर ऑफिसमध्ये खूप चर्चा व्हायची. डबा खाताना भावेशला टार्गेट केलं जायचं, पण तो कधी चिडायचा नाही. उलट आमच्या हास्यविनोदात सामील व्हायचा.

गोरापान तरतरीत नाकाचा भावेश मध्यम उंचीचा असूनही खरोखरच आकर्षक दिसायचा. शाळा-कॉलेजपासून अनेक मुली त्याच्या मागेपुढे असायच्या, असं तो सांगायचा, त्यात तथ्य असणारच; कारण इथे येणारे क्लायंटसुद्धा मुली असतील तर त्या भावेशकडेच कामासाठी जायच्या, हे आम्ही सर्व पाहायचो. वयाच्या पंचविसाव्या वर्षीच भावेशने लग्न केलं. हे बाकी बरं झालं असं आम्ही आपसात बोलायचो. भावेशच्या लग्नाला सहा महिनेही झाले नव्हते आणि एक दिवस भावेश ऑफिसला आला नाही म्हणून ज्योतीने सहज घरी फोन केला. तेव्हा भावेशच्या बहिणीने फोन उचलला आणि जे काही सांगितलं ते ऐकून आम्ही सारे हादरूनच गेलो.

मध्यरात्री साधारण साडेतीन-चारच्या सुमारास निशा पायऱ्यांवरून खाली पडली आणि तिच्या शरीरातली जवळजवळ सगळीच हाडं मोडली. त्यामुळे ती चावला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. भावेश, त्याचे आईवडील, निशाचे आईवडील आणि खूप सारे नातेवाईक हॉस्पिटलमध्ये आहेत. त्या दिवशी विषण्णतेने आम्ही दिवस रेटला आणि संध्याकाळी चावला हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. निशा आयसीयूमध्ये होती, त्यामुळे तिला भेटता आलं नाही. म्हणून भावेशला इथेतिथे शोधत होतो तेव्हा त्यांच्या नातेवाईकांकडून कळले की तो जेलमध्ये आहे.

''बापरे...!''

ज्योती किंचाळली. माझी तर बोबडीच वळली. तोंडातून कोणताही हुंकार येण्यापलीकडे मी गेले. ऑफिसमधले सर्व जेव्हा तिथून घरी परतले तेव्हा आम्ही दोघी मात्र बराच काळ तिथेच रेंगाळलो. रात्रीचे आठ वाजले होते. इतक्या रात्री भावेशला जेलमध्ये भेटता येणार नाही असं तिथे असलेल्या माणसांचं ऐकून आम्ही घरी परतलो. त्या रात्री मला झोप आली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळचा पेपर हातात घेतला आणि पहिल्याच पानावर बातमी- सुशिक्षित भावेश देसाई यांनी आपल्या सुविद्य प्राध्यापक पत्नीला पायऱ्यांवरून ढकलून जिवे मारण्याचा प्रयत्न केला...

पुढची बातमी मला वाचवेना. मग एकामागून एक सर्व ऑफिसमधल्या सहकाऱ्यांचे फोन धडाधड येऊ लागले. तीच वाक्ये कानावर पडू लागली. भावेश असं कसं करू शकतो? असा प्रश्न मनात आला. बरं घटना मध्यरात्रीची म्हणजे अगदी जाणूनबुजून केल्यासारखी! दोघांमध्ये काही वाद असते तर आम्हाला नक्कीच जाणवलं असतं. मग नेमकं काय घडलं...?

दोन दिवसांनी भावेशची जामिनावर मुक्तता झाली. दरम्यान निशाची चार ऑपरेशन्सही झाली. वर्तमानपत्रातील बातम्यांमधून काहीबाही कळत राहिले. भावेशच्या घरचा फोन कोणीच उचलेना. काही कळायला मार्गच नव्हता. आठ-दहा दिवसांनी मी आणि ज्योती ऑफिस सुटल्यावर हॉस्पिटलमध्ये गेलो तर निशा अजूनही आयसीयूत असल्याचे कळले. भावेश

तिथे नव्हता. त्यामुळे आम्हाला काहीच अधिक माहिती मिळाली नाही. महिन्याभराने भावेश ऑफिसमध्ये आला. तेव्हा त्याच्यावर खिळलेल्या नजरा विचित्र होत्या. कोणाला तो खुनी वाटत होता तर कोणाला दयनीय गरीब बिच्चारा! तो कोणाशीच जास्त बोलायचा नाही. डबा खातानाही शांतच असायचा. त्याचा डबा पाहिल्यावर लक्षात यायचं की, या पुरुषाने केलेल्या पोळ्या नि भाजी आहे ते. पण आम्ही त्यावर काहीच बोलायचो नाही. वर्तमानपत्रातील बातम्यांमधून आम्ही जे काही समजून घेतलं ते घेतलं. त्यावर भावेशला कुणी काहीच विचारलं नाही. मी मात्र त्याला एकदा हळूच विचारलं,

''निशा कशी आहे?''

''निशा... तिच्या आईवडिलांकडे आहे. अगदी झोपून!''

''म्हणजे...?''

''तिला उठून काहीही करता येत नाही. लिक्विड फूड देतात आणि बेडपॅन!''

''अरे देवा...!''

''भावेश... तू... तिच्याकडे...''

मला अर्धवट तोडत, तुटकपणे भावेश म्हणाला,

''नाही, मी तिच्याकडे जात नाही. मला तिच्याकडे जाण्याची परवानगी नाही!''

''काय सांगतोस?''

''तिच्या आईवडिलांनी मला तिला पाहायलाही यायचं नाही असं बजावलं.''

''पण...''

''जाऊ दे... मला या विषयावर बोलायचं नाही. प्लीज.''

''ओ.के...''

म्हणत मी माझ्या टेबलाकडे गेले. भावेशनेही आपल्या कामात डोके खुपसले.

साधारण दोन वर्षे झाली असतील या घटनेला आणि एक दिवस ज्योती मला खेचून सकाळी सकाळी ऑफिसबाहेर घेऊन गेली.

''राधा... राधा...''

''अगं बोल ना काय झालं ते!'' मी आतुरतेनं विचारलं.

''भावेश...''

''काय भावेश... काय सांग ना...''

''भावेश एका बाईबरोबर राहतो!''

''ज्योती... तू खरं सांगते आहेस?''

''अगदी खरं... इतकंच नाही तर ती बाई गरोदर आहे.''

''काय सांगतेस काय?''

''होय... बातमी शंभर टक्के खरी आहे.''

''पण... हे तू कोणाला सांगू नकोस हं प्लीज... ज्योती... प्लीज.''

''हो गं बाई, नाही सांगत... बस्स, तुझ्याइतकीच माझ्याही मनात भावेशसाठी खास जागा आहे हं.''

''ठीक... ठीक आहे. चल आता. आत जाऊ.''

असे म्हणत आम्ही आत गेलो. एखाद्या निरागस बालकासारखा दिसणारा भावेशचा चेहरा मला उगाचच वयस्कर माणसासारखा गंभीर दिसू लागला.

आणि एक दिवस भावेशला घटस्फोट मिळाल्याचं कळलं. आमच्या ऑफिसच्या अकाउंट डिपार्टमेंटमध्ये काळेसर यांनी तसं आडूनआडून आम्हाला सांगितलं. कोर्टाकडून भावेशच्या पगारातील काही रक्कम कापून निशाच्या अकाउंटवर जमा करण्यासंबंधीचे पेपर त्यांच्याकडे आलेले होते. घटस्फोट झाल्यावरच पोटगी दिले जाते. त्यामुळे त्याने न सांगताही पूर्ण ऑफिसला ही गोष्ट कळली. पण कोणी त्याबद्दल त्याच्याशी काहीच बोलले नाही.

साधारण महिना झाला असेल, तेव्हा अचानक मला ऑफिसमध्ये चक्कर आली. सगळे धावून आले. मला जवळच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्याची जबाबदारी भावेश आणि ज्योतीला देण्यात आली. दोघेही मला घेऊन बाहेर पडले. पण अचानक ज्योतीला तिच्या मुलाची प्रकृती बरी नसल्यामुळे घरी परतावे लागले. भावेश मात्र तीन-चार तास माझ्यासोबत होता. मला ग्लुकोज, सलाईन लावले, ते संपेपर्यंत तो थांबला. आम्ही मुद्दामच माझ्या घरी काही कळवलं नाही. कारण माझा नवरा सतीश एका महत्त्वाच्या कामानिमित्त दिल्लीला गेलेला होता. आणि मुलं आजीकडे! त्या चार तासात भावेशशी मनसोक्त गप्पा झाल्या. हळूहळू त्याने गेल्या चार वर्षातला त्याचा जीवनपटच उलगडून दाखवला-

''निशाच्या अपघातानंतर महिना-दीड महिना हॉस्पिटल-घर-पोलिस ठाणे अशी धावपळ होती. पण त्यानंतर निशाचे आईवडील तिला घेऊन गेले. माझे आईवडील सोलापूरला गावी निघून गेले आणि मी एकटा पडलो. घरात खूप भीती वाटायची. भयानक विचार मनात यायचे. अगदी आत्महत्येचेही विचार मनात डोकावले. सैरभैर झालो. फक्त वेड लागायचं बाकी होतं. तुला तर माहीत आहेच की मी किती सुट्ट्या घेतल्या. सतत आजारी असायचो. मग आईवडिलांनी कुठून की माझ्यासाठी एक मुलगी शोधली. गावात नेऊन मंदिरात तिचं माझ्याशी लग्न लावलं. कारण घटस्फोट झाल्याशिवाय दुसरं लग्न करता येत नाही म्हणून. ही मुलगी फक्त वीस वर्षांची. गीता तिचं नाव. मी वेगळ्याच मन:स्थितीतून जात होतो. नेमकं काय बोलणं झालं ह्या मुलीच्या आईवडिलांशी, माझ्या आईवडिलांचे, मला माहीत नाही. एक माणूस- ज्याच्यावर पोलिसांना संशय आहे, बायकोच्या खुनाच्या संशयावरून ज्याची कोर्टकेस चालू आहे, ज्याची पहिली बायको कायमची अपंग झाली आहे, जिवंत आहे, अशा माणसाबरोबर ही मुलगी कशी काय लग्नाला तयार झाली, माहीत नाही. पण हळूहळू तिच्यामुळे मी माणसांत आलो. जबाबदारीने वागू लागलो. संसार करू लागलो. ही माझी बायको गीता प्रचंड भांडखोर आहे. पण मी काहीच

बोलत नाही. त्यामुळे तिची पंचाईत होते. दरम्यान आम्हाला मुलगा झाला, वेदांत. हे तुला माहीत आहे ना? मी जेव्हा आमच्या संसाराचा विचार करतो तेव्हा ऐन तिशीत मला संन्यास घेऊन हिमालयात जावंसं वाटतं. मी हिच्याबरोबर संसार करू इच्छित नाही. खरं सांगू मला ही आवडत नाही. केवळ वेदांतमुळे मी तिच्यासोबत राहतो, इतकेच! ऑफिस सुटल्यावर भटकत राहतो. समुद्रकिनारी, रस्त्यावर कुठल्याही देवळात वा कुठेही. झोप आल्यावर घरी जातो. राधा... फार वाईट वाटते मला याचे.''

त्याची कथा ऐकून माझा जीव खूप खालीवर झाला तरी माझ्या मनात अनेक वर्षे खदखदत असलेला एक प्रश्न विचारायची हीच संधी आहे ह्या विचाराने त्याला विचारलं,

''भावेश... तुला एक प्रश्न विचारलं तर राग येणार नाही?''

''कसला राग...? विचार...''

''अरे ज्या रात्री निशाला अपघात झाला त्या रात्री नेमकं काय घडलं?''

''त्या रात्री आम्ही झोपायला गेलो तेव्हा आमच्यात वाद झाला. मला मूल हवे होते आणि निशाला अजून दोन-चार वर्षे तरी मूल नको होते. आमच्यातील वाद वाढत गेला. रात्रभर आम्ही भांडत होतो. अचानक निशा घराचं दार उघडून बाहेर पडली. मी तिच्या मागोमाग बाहेर गेलो तर ती ओरडून म्हणाली की, ती घर सोडून जात आहे. मी रागात होतो मी तिला 'जा मग...' म्हणत ढकललं तर ती तोल जाऊन जिन्याच्या पायरीवर पडली आणि चक्क घरंगळत खाली गेली. तिला असं पाडणं वा मारून टाकणं असा माझा कधीच विचार नव्हता. पण हेही खरं की, माझ्या धक्क्यामुळे ती पडली. म्हणूनच माझ्यावर खुनाचा आरोप लादला गेला. पण काही दिवस निशा बोलू शकत नव्हती, म्हणून मी सुटलो.''

''काय सांगतोस...? हे सगळं भयानक आहे.''

''हो नक्कीच भयानक आहे. पण राधा, हेही खरंय की, जेव्हा ह्या अपघाताच्या संदर्भात कोर्टकचेरी चालू होती तेव्हा निशाने स्वत:च जबानी दिलं की, ती आपोआप पडली, आणि त्या एका वाक्यामुळे मी सुटलो. नाहीतर मला जन्मठेप वा फाशी झाली असती!''

''बाप रे... काय सांगतोस?''

''हो.''

''पण मला एक सांग. तिनं असा जवाब का दिला?''

''तिचं माझ्यावर खरंच प्रेम होतं आणि आज मलाही प्रकर्षाने जाणवतंय की माझं फक्त आणि फक्त तिच्यावरच प्रेम होतं... नाही, आजही आहे.''

त्याच्या ह्या वाक्यानं मनात खूप कालवाकालव झाली. कशा परिस्थितीतून हा गेलाय, हे जाणवलं. कशा वेगळ्याच वळणावर माणूस जातो हेही जाणवलं. काय करू शकत होते मी किंवा कोणीही त्याच्यासाठी?

''तुला निशाबद्दल नेमकं काय वाटतंय रे?'' मी गलबलून विचारलं.

''ती माझ्यासोबत राहायला हवी होती. जन्मभर मी त्या अपंगावस्थेत तिची सेवा केली असती. तिने फक्त माझ्या बेडवर माझ्याशी गप्पागोष्टी केल्या असत्या तरी मला चाललं असतं. मला आयुष्यात कोणतंही सुख मिळालं नसतं तरी चाललं असतं. फक्त ती माझ्याबरोबर असायला हवी होती, राधा... फक्त...''

आणि पुरुषासारखा पुरुष असून भावेश धाय मोकलून रडू लागला.

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**प्रा. प्रतिभा सराफ**
भ्रमणध्वनी : ९८३३०५६७९५, ९८९२५३२७९५
pratibha.saraph@yahoo.co.in

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*



हॉटेल
# साईकृपा
शुद्ध शाकाहारी फॅमिली गार्डन रेस्टॉरंट

**प्रोपा. शिंदे ब्रदर्स**
9923678910 / 9823443728

कसारा बायपास-मोखावणे, ता. शहापूर,
जि. ठाणे - ४२१ ६०२

भारत-चीन युद्धाला पन्नास वर्षे होत असल्याच्या निमित्ताने ईशान्य भारतातील, वालाँग आणि सीमेवरील काही गावांना भेट द्यायचे मनात होते. अरुणाचल प्रदेशातील धोला, सेला, लोङ्ग्जु, वालाँग येथील लढायांची वर्णने वाचून भागले नव्हते. इतिहास नुसता कल्पनेने अनुभवण्यापेक्षा त्या-त्या स्थळांना प्रत्यक्ष भेटी द्याव्यात. म्हणजेच त्या-त्या लढायांची खरी महती ध्यानात येते. भूतान-तिबेट-भारत सीमेच्या तिठ्यावरील तवांगला जाताना वाटेत न्युक्माडोंग, जसवंतगढ ही गाजलेल्या लढायांची ठिकाणे लागतात. येथील युद्धस्मारके पाहताना १९६२ च्या युद्धाचा इतिहास आठवून घशात आवंढा दाटून आला होता. तसाच त्रास वालाँगला भेट देताना होईल, याची कल्पना होती. तरीही २०१२ मध्ये, तेही २० ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर याच काळात तिथे जाऊन येण्याची ऊर्मी मनात होती. याला एक कारण होते. खिन्जेमान खिंडीजवळील धोला घालण्यामागचे कारण हे होते. मात्र त्याच सुमारास आलेल्या अभूतपूर्व पुराने सुमारे दोन-अडीचशे किलोमीटर लांबीच्या लोहित नदीच्या खोऱ्याचा जगाशी संपर्कच तुटला होता. चार-दोन दिवस नव्हे, तब्बल महिनाभरात एकही वाहन या रस्त्यावर उतरू शकले नव्हते. निसर्गानं अशी वाट अडवल्यावर घालमेल अधिक वाढत गेली. पण अजा -बिजा अशी दोनदा तिकिटे रद्द करावी लागल्यावर 'तिजा' म्हणून नियतीला डाव जिंकू द्यायचा नाही, असा निर्धार केला. त्याची तयारी करण्यासाठी पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीत - विवेक पोंक्षे सरांना भेटलो - तेव्हा हायुलिआङ्गला राहणारा त्यांचा विद्यार्थी कोपे थलाय आणि तेजूचा रुझिंग बेल्लाई यांचे संदर्भ त्यांनी दिले.

वालाँगचा प्रवास अतिशय अनिश्चित, बेभरवशाचा होता. ठिकठिकाणी दरडी कोसळल्यामुळे कडे-कपाऱ्या ओलांडून, दोन-दोन मैल जंगल तुडवून वाट काढण्याचे, नाले

# मुखपृष्ठास कारण की...

ठाणे आणि तवांग गमावल्यानंतर सेला-बोमदिला-दिरांग येथे आपल्याला दारुण पराभव पचवावे लागले होते. आसाममधील तेजपूरमधून सर्व रहिवाशांनाही हलवून ब्रह्मपुत्रेच्या अलिकडे आणले होते. चिनी फौजांना तत्कालिन 'नेफा'मध्ये कुठेच अटकाव करता न आल्याने आता अरुणाचल प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ८४,००० चौरस किलोमीटर भूभागावर आपण पाणी सोडले होते. चिनी फौजांनी जिंकलेला कोणताही टापू आपल्याला या महिनाभराच्या युद्धात परत जिंकून घेता आला नव्हता. अपवाद होता फक्त वालाँगचा.

वालाँगच्या पश्चिमेला ट्राय जंक्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिमशिखरांलगत ग्रीन पिंपल, यलो पिंपल असे दोन टापू आहेत. १४ नोव्हेंबरच्या लढाईत आपल्या जवानांनी चिनी सैनिकांना निकराची झुंज देऊन हा भाग पुन्हा जिंकला होता.

लिहिणेसुद्धा क्लेशदायक वाटते, पण वास्तव हेच आहे की, चीनच्या 'घोडदौडी'ला बसलेला हा एकमेव लगाम होता!

नेफामधील युद्धाच्या इतिहासात भारतीयांनी अभिमानाने सांगावी अशी ही लढाई मानावी लागेल. किमान चार हजार जवानांनी कुर्बानी देऊनही चीनविरुद्धच्या या युद्धात आपल्याला नामुष्कीचा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे असेल कदाचित, पण या बलिदानाची आठवण ठेवण्याचे भानही आपल्याला तब्बल पन्नास वर्षे राहिले नाही. सुदैवाने २०१२ मध्ये मात्र तत्कालिन संरक्षणमंत्री ए. के. अँटनी यांनी इंडिया गेट येथील स्मारकावर पुष्पचक्र वाहून ही उपेक्षा अखेर थांबविली.

तेजूपासून काहोपर्यंतच्या - लोहित नदीकाठच्या - वालाँग परिसराला ऑक्टोबर २०१२ मध्येच भेट देण्याचा घाट ओलांडण्याचे, निर्मनुष्य रस्त्याने भटकण्याचे आणि अस्सल शिकारी असणाऱ्या मिश्मी आदिवासींच्या झोपडीवजा घरांत मुक्काम करण्याचे प्रसंग आले. एवढा आटापिटा करून वालाँगच्या युद्धस्मारकापर्यंत पोचलो, तेव्हा जवानांच्या कुर्बानीची आठवण होऊन डोळे ओलावले. पण या धडपडीचे सार्थक झाल्याचे समाधानही लाभले.

असा हा प्रवास चित्तथरारक असूनही संस्मरणीय होऊ शकला, याचे श्रेय रुझिंग आणि कोपेएवढेच राखीलाही द्यायला हवे, हे तिथे जाऊन आल्यावर लक्षात आले. आधी शिकण्यासाठी पुण्यात आलेली आणि पुढे ज्ञानप्रबोधिनीच्या कुटुंबातीलच एक बनलेली, राखी नावाची, रुझिंगची मेहुणी त्यावेळी पुण्यात होती. पोंक्षे सरांनी तिच्यामार्फत रुझिंगला माझा बेत कळवल्यामुळे बऱ्याच अडचणी दूर होऊन मला माझे स्वप्न साकारता आले होते.

लहान वयात चारहजार मैलावरच्या तेजूहून पुण्यात आलेल्या, पत्रकारितेची ओढ असलेल्या, पण विलक्षण हुशारीमुळे असेल कदाचित, 'आयटी'त स्थिरावू पाहणाऱ्या राखीबद्दल पुढे आणखी माहिती मिळत गेली आणि तिला भेटण्याची उत्सुकता वाढत गेली. पण ती कधी बंगलोरला तर कधी सुटीवर तेजूला गेल्याने भेट हुकत गेली. पुढच्या वर्षी आठजणांची चीन तसेच म्यानमारच्या सीमेपर्यंत सायकल-मोहीम नेली, तेव्हा तेजूमार्गे वालाँगला जाऊनही राखीची भेट झाली नाहीच.

स्थलांतर हा माझ्या आवडीचा, कुतूहलाचा विषय. आपले घर, आपली माणसे, आपला गाव सोडून लांब कुठेतरी

रुजताना मनाची काय घालमेल होत असेल? कोणती प्रेरणा माणसाला असे दूरवरच्या प्रदेशात, अज्ञात भवितव्याच्या वाटेवर आणून सोडत असेल? आज सिरीयातून हजारो माणसे जर्मनीकडे स्थलांतर करताना पाहतो, तेव्हाही अशाच प्रश्नांचा भुंगा डोक्यात फिरतो. अरुणाचलची, मिश्मी जमातीतली मुलगी केवळ करियरसाठी पुण्याला येत असेल? अशा प्रश्नांची उत्तरे त्या-त्या व्यक्तीकडूनच मिळवावीत. देशाच्या एका कोपऱ्यातून, दुर्गम प्रदेशातून महाराष्ट्रात आलेल्या राखीला भेटण्याची उत्सुकता वाढण्याचे हेही एक कारण होतेच.


...आणि अचानक फेसबुकवर राखी सापडली. पण त्यात महिनोन्महिने काहीच नोंद नसल्याचे लक्षात आले. मोजक्याच चार-दोन पोस्ट्स. पण अनेकांचे त्यावर जिव्हाळ्याने विचारलेले प्रश्न. त्यावर हसत-हसतच दिलेली उत्तरे, खेळकर कमेंट्स. पुन्हा अनेक महिने अज्ञातवास! ती तेजूत असेल, तिथे फोन लागणे मुश्किल, इंटरनेट कुठून असणार, असा विचार करून सोडून दिले. मग पोंक्षे सरांकडून कळले की, ती पुण्यातच असते, पण सध्या उपचारासाठी बंगलोरला गेलीय. कसले दुखणे या प्रश्नावर 'ब्रेन ट्युमर' हे उत्तर ऐकल्यावर अंगावर काटाच आला. जगणे उत्सवासारखे आनंदाने उपभोगण्याच्या या वयात या मुलीला असली व्याधी नियती कशी काय देऊ शकते?

मागच्या महिन्यात राखीच्या अकौंटवर एक छान पोस्ट दिसली. कुणीतरी आर्टिस्ट असावा. त्याच्या डाव्या हातात एक फोटो आहे, त्यावर काही प्रोसेसिंग केलेले एक चित्रही समोर टेबलावर आहे. शेजारी पेन्सिली, ब्रश वगैरे. चित्र छानच आहे. एखाद्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर छापण्यासारखे.

कुतूहलापोटी याच पोस्टवरच्या कमेंट्स वाचताना कळते की, अरे, हे याच मुलीचे चित्र आहे तर !

मनात येते, आता मात्र पुण्याला गेल्यावर सरांना भेटून राखीकडून मूळ चित्रच मागून घ्यायचे.

मागच्या महिन्यात गेलो, तेव्हा आठवणीने ज्ञानप्रबोधिनीत गेलो. पोंक्षेसर भेटले. थोडे इकडचे-तिकडचे बोलणे झाले आणि सर म्हणाले, ''मध्ये एक वाईट घटना घडली.



*तुम इतना जो मुस्कुरा रहे हो...*

आपल्याकडे ती राखी होती ना...''

मनात चर्रर्र झाले, तरीही उगाचच बगल देत मधेच म्हणालो, ''अरे हो, कशी आहे तिची तब्येत आता ?''

''गेली ती '' पोंक्षे सर म्हणाले.

''मी ऑगस्टमध्ये अरुणाचल प्रदेशात गेलो होतो. तेव्हा निघायच्या आदल्या दिवशी फोन आला तिचा. तेजूमध्ये होती ती तेव्हा. तब्येत बिघडल्यामुळे पुण्याला यायचंय म्हणाली. दुर्दैवाने माझ्या फ्लाईटचं तिकीट मिळालं नाही तिला आयत्या वेळेला. पुढच्या आठवड्यात आली, तेव्हा तिला घेण्यासाठी विमानतळावर गेलेल्या सहकाऱ्यांनी फोनवरच सांगितलं की, तिच्या अंगात चालण्याचे सुद्धा त्राण नाहीत. म्हणून विमानतळावरून दिनानाथलाच नेलं तिला थेट 'आयसीयू'त. आणि दुसऱ्याच दिवशी गेली ती. जणू आपला निरोप घ्यायलाच आली होती इथे.''

सर बोलत होते, तेच शब्द कानांत शिरताहेत की कुठलं दुःस्वप्न आहे हे? समजत नव्हतं.

राखी गेली. तिच्या चित्राच्या आठवणीने मनात कालवाकालव झाली. आता कुणाला मागायची परवानगी? आणि कुठे?

राखीचा पार्थिव देह सर्व सोपस्कार करून बागेश्रीताईंनी तेजूला कसा नेला, तेही सरांनी सांगितले.

सर सांगत होते, माणूस गेला तरी त्याचा आत्मा पुढे महिना-दीड महिना पृथ्वीवर त्याच परिसरात असतो, असे मिश्मी जमातीत मानले जाते आणि नंतर त्याला धार्मिक विधीपूर्वक निरोप देण्याची प्रथा असते म्हणे. त्यानुसार राखीचा आत्मा नुकताच रेल्वेने 'रिझर्वेशन' वगैरे करून पुण्याहून तेजूला नेण्यात आला, तिथे तो विधीपूर्वक अंतराळात सोडला जाईल, वगैरे.

माझ्या डोळ्यांसमोरून भेटीची हुलकावणी दिलेल्या राखीचा हसरा चेहरा तरळला आणि बहुधा तिनेच संगणकावर केलेली, मृत्यूची चाहूल ओळखून धूसर होत गेलेली, तिची प्रतिमा आणखी अंधुक होत गेली.

**– आल्हाद गोडबोले**

## ऋतुरंग प्रकाशनाची एक अनोखी भेट!



# मिर्झा ग़ालिब : गुलज़ार

अनुवाद : अंबरीश मिश्र

मूल्य : रु. २००/-

# देवडी

अनुवाद : अंबरीश मिश्र

मूल्य : रु. २००/-

ऋतुरंग प्रकाशन

अरुण शेवते
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४
shevatearun@gmail.com

# कवितेचं व्यासपीठ

## माझ्या लक्षात आलंय

माझ्या लक्षात आलंय
की प्रत्येक पक्ष्याचे पंख कितीही रंगीत असले
तरी पोट असते धुरकटच
माझ्या लक्षात आलंय की
हल्ली खूप आकर्षक गंधहीन फुले आलीत बाजारात
आणि पुष्पगुच्छात तीच वापरली जातात
आदर व प्रेमाचे प्रतीक म्हणून
माझ्या लक्षात आलंय
की देवळातल्या देवांची झीज होतेय रोजच्या अभिषेकाने.
भक्तांची ओहोटी लागलीय देवळात
आणि सत्संग गुरूआश्रम वाढत चाललेत बाहेर
माझ्या लक्षात आलंय
की रंगीत आयडेंटिटी साईज फोटो
स्वस्त होताहेत रोज दररोज
आणि सगळ्यांना कळून चुकलंय की
ब्लॅक अँड व्हाईट फोटोतली नजाकत
नाहीय रंगीत व्यक्तीचित्रात
माझ्या लक्षात आलंय
की हल्ली तरुण शोधत असतात
व्हायग्राच्या गोळ्या आणि
पोलादी माणसे जन्मणे बंदच झालेय अगदी
माझ्या लक्षात आलंय
की गर्भपाताच्या प्रमाणात झालीय प्रचंड वाढ
आणि सोपा झालाय गर्भपात १०० रुपयात
माझ्या लक्षात आलंय
की आता जिव्हाळयाची पत्रे येत नाहीत सहसा कुणाला
अनोळखी लोकं मात्र चिकटवत राहतात
हातावर जाहिरात पत्रके
आणि कमजोरी दूर करणाऱ्या दवाखान्यांचे पत्ते


असं खूप कितीतरी लक्षात आलंय माझ्या आणि हेही
की या सगळ्याबाबत काहीच करू शकत नाही आपण.
म्हणजे आपण नाही देऊ शकत कुणाच्याही पोटाला रंग
आपण नाही देऊ शकत आकर्षक फुलांना गंध
आपण नाही थांबवू शकत देवाची झीज
आपण नाही आणू शकत परत जुना ब्लॅक ॲंड व्हाईट जमाना
आपण नाही थांबवू शकत गर्भहत्या
की रोखूही नाही शकत कुणाचे अनैतिक संबंध
आपण नाही पाठवू शकत स्वतःलाच पत्रे
आपण नाही दूर करू शकत कुणाचीच कमजोरी

आणि
आपण थांबवूही शकत नाही
आपलेच नंपुसक होणे.
आपल्या हाती एकच उरलेय आता
आणि तीच आहे शेवटची आशा
आपण क विता लिहू शकतो
आणि अजुनही काही लोक वाचतात कविता
गांभीर्याने.

**– किरण येले**
भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०
kiran.yele@gmail.com

## बुद्ध !

बुद्धाने शिकविली अंधार वाचण्याची विद्या
कारणेही वाटली त्याने उजेडाची
आणि कारणे वाचण्याची साक्षरताही वाटली.
शोषण समजावून घेण्याचे तर्कशास्त्र
त्याने वाटले
आणि वाटले अत्तदीपत्वाचे उषःकालही.
वाटले त्याने सतत प्रवाही राहण्याचे
पद्धतीशास्त्र.
त्याने तयार केला क्रांतीचा अभ्यासक्रम
नव्या माणसांच्या उगवण्यासाठी
तयार केली नवी क्षितिजे.
उलंगवाडीच्या ओंजळीत
त्याने रुजवली लढाऊ स्वप्ने
वाटल्या जिद्दी सूर्य होऊ शकणाऱ्या.
त्याने माणूस तयार करून ठेवला नाही
माणसाच्या हातात,
त्याने माणसाच्या मेंदूत निर्माण केली
माणूस निर्माण करणारी विचक्षण
प्रयोगशाळा.
आणि ही प्रयोगशाळा मस्तकाला बांधून
पंचेचाळीस वर्षे पायपीट केली त्याने
बंद दारे उघडत वस्त्यांची.
कृतार्थ मनाने पृथ्वी पाहत होती प्रथमच
एक चालणारा सूर्य.
उजेडाचे उद्घाटन करणाऱ्या या क्रांतीला
दुनिया आता बुद्ध म्हणते.
•
प्रज्ञानाचे जगातले पहिले महाकाव्य
म्हणजे बुद्ध!
हा करुणेचा सूर्य पृथ्वीच्या पोटातून उगवला
आणि मावळला नाही कधीच
हे उगवणेच असे उगवणे की
दुनियेने या उगवण्याचे आजवर
पाहिले फक्त उगवणे.
आणि मावळणे पाहताच आले नाही तिला
त्याचे.
मावळणे नसलेल्या या उगवण्याला
दुनिया आता बुद्ध म्हणते.
••
निवडुंगांच्या बनातून
फिरत होते एक किनारा नसलेले काळीज
होत होते रक्तबंबाळ



त्याचे सांडणारे रक्तही
त्याला शिकवित होते माणूसच.
जखमांच्या घनदाट जंगलातून
फिरत होता एक अवकाशपक्षी.
वेदनांच्या आकांतातून फिरत होते
एक अजिंक्य चांदणे गदगदलेले
आणि जात होते दुःखाच्या उगमापाशी
पोचत होते जखमांच्या कारणांपाशी.
कार्याचे पुरावे मस्तकाला बांधून
कारणांच्या अंधाऱ्या धुमश्चक्रीत
ते फिरत होते.
कुठून येतात ही कारणे?
कोणत्या विनाशाच्या कारखान्यात
पैदा केली जाते ही हिंस्रता?
ही कारणे जीवनात तयार नसतात कुठेच
ती उगवतात अमानुषतेच्या आगीतून
मनामनात उच्छाद घालणाऱ्या तृष्णेतून.
विनाशक लोभापाशी पोचला बुद्ध.
दुःखाच्या गर्भाशयात पोचला बुद्ध
सिंधूसंस्कृतीचे ग्लासनॉस्त आणि पेरिस्त्रोयका
नावाचे चंद्रसूर्य बेचिराख करणाऱ्या
धगधगत्या लोभापाशी पोचला बुद्ध.
सौहार्दाचे खांडववन करणाऱ्या
लालसेपाशी पोचला बुद्ध
आणि त्या बिंदूपासून विणत आणले त्याने
तृष्णामुक्तीचे सणंग.
दुःख हे कारण नव्हे
दुःख हे आहे कार्य
आणि या दुष्ट कार्याचा निर्मिक माणूसच आहे.
तो खपत गेला,
पिंजून काढीत गेला
माणसाच्या मनाचे सामाजिक रचित
आणि त्याला दिसले की
माणूसच आहे दुःखाचा जनक
तोच आहे जीवन जाळणाऱ्या आगीचा जनक
आणि बुद्ध भिडला
माणसाच्या मनाच्या पुनर्रचनेला.
तेव्हा लकाकले त्याच्यापुढे
तृष्णातीत मनांचे संविधान.
तृष्णानिर्मूलनाच्या या महाप्रकल्पाला,
सौहार्दाच्या या अथांग पर्यायीविश्वाला
या सिधेपणाच्या प्रज्ञानी सौंदर्याला
दुनिया आता बुद्ध म्हणते.

**– यशवंत मनोहर**

भ्रमणध्वनी : ९४२२१०२३९६, ८००७१५५५७७



## कधीतरी रे...

कधीतरी रे–
मशिदीतुनी घंटारवही व्हावा
आणि पहाटे,
मंदिरातुनी 'अजान'चा स्वर यावा!

कधी इसाई प्रार्थनेतही
उपनिषदाचा मंत्र घुमावा
शांता दुर्गे समोर तेव्हा
'आमेन्' ऐसा गजर असावा!

गुरुद्वारातून ग्रंथासोबत
प्रतिभेचेही पूजन व्हावे
शिवालयातून, कधीतरी रे–
प्रतिमेजागी ग्रंथ असावे!

जातपात अन्
आपसातले वैर मिटावे
निखळ होऊनी आम्ही आता
धर्मांच्याही पल्याड जावे!

कधीतरी रे–
'माझे' गाणे, देवा तुझिया ओठी यावे
गगनगहनसे, तुझे मौन अन्
माझ्या हृदयातुन उमलावे!

**– सदानंद डबीर**
भ्रमणध्वनी : ९८१९१७८४२०

**मुंगीस कान आहे**

संगात दंग
रंग
पंख
पाखराचे

कळ्या–फुलांवर
हे
तंतूवाद्य
वाजे

भवताल
ऐकण्याचा
मुंगीस
कान आहे

माणूस
ठार बहिरा
झाला
खुशाल आहे

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com





## प्रचंड प्रचंड जाळ्यात

अचानक नजरेला पडतं कावळ्याचं अर्धमुर्धं कलेवर
किंवा टायरखाली चिरडलं गेलेलं मांजराचं पिलू
कधी दिसते कोळ्याच्या जाळ्यात तडफडणारी माशी
मुंग्यांनी काढलेली झुरळाची अंत्ययात्रा, नेहमीचीच
सारं नजरेआड टाकतो आपण,
चालायचंच म्हणत, गुरफटून जातो दैनंदिन व्यवहारात

रेल्वे अपघातात मरणाऱ्यांची रोजची सरासरी नऊ
स्फोटांमध्ये चिरफाळलेली माणसं न मोजता येण्याजोगी
शिवाय,
काहींना ठेचून मारलं जातं,
काहींना जाळून टाकलं जातं,
काहींना कापून काढतात,
काहींवर बलात्कार करून मारून टाकतात,
काहींवर झाडतात गोळ्या भ्याडपणानं,
राष्ट्रपित्यावर रंगमंचावरून पुन्हापुन्हा गोळ्या झाडून
हिंसेचं समर्थन करतात तथाकथित शूर देशभक्त!
ठसठसत राहतं हे सारं मनात

आणि आता हा आलेंन...
बोरडमच्या तटावर मरून पडलेला,
अवघ्या जगाची हताशा त्याच्या चिमुकल्या देहात
तडफडताहेत असंख्य माशा प्रचंड प्रचंड जाळ्यात

**– उषा मेहता**
भ्रमणध्वनी : ९८३३०८४२८३
ushasmehta@gmail.com

## भोग

कुठे कुठे घडणाऱ्या घटनांनी
खाल्ल्याहेत तोडून माझ्या असंख्य रात्री.
धावून येतात त्या हिंस्त्र श्वापदांसारख्या अंगावर
अन् घेऊ पाहतात घास माझा.

खुणा अंगावर असंख्य ओरबाडल्याच्या
मी कशीबशी करतो सुटका त्यातूनही माझी
असं काय आहे माझ्या आत
की मी अनेकांचं सावज होत आलोय?

भिडतो कुणाचा आक्रोश गगनाला
अन् आटत जातं पाणी कुणाच्या डोळ्यांतलं
तिथं पंख फुटून झेपावतात माझे हात
पण हाय! पुढे अंधार होतो अन् उजेड माझ्या मागे
मग उरतो असा विलाप
की थोडं हललं तरी सुटे होतील अवयव

प्रश्न करीत राहणं
हा मी माझा गुन्हा समजत नाही!
पण हा असा भोग आहे
जो सरतही नाही अन् उरतही नाही.

**– अशोक कोतवाल**
भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९
kotwal.ashok@gmail.com



INKING INNOVATIONS

# शब्द रुची अंकाच्या वाचकांसाठी खास सवलतीच्या दरात
# इंकिंग इनोव्हेशन्सतर्फे प्रकाशित केलेली पुस्तके

| S.NO | TITAL OF BOOK | AUTHOR | ABOUT THE BOOK | LANGUAGE |
|---|---|---|---|---|
| 1 | Yanni Itihas Ghadavila | Dhananjay Keer | Biographical sketches of some great national leaders | Marathi |
| 2 | PS Ramani - A Legend | PS Ramani | A photo-biography of the world-renowned neurospinal surgeon | English |
| 3 | Tuzyashich Boltyey Mee..... | Smt. Shambhavi Hardikar | Conversations of the author with her late actor husband Jayram Hardikar | Marathi |
| 4 | Junction | Shri. Vinayak Ratnaparkhi | Account of the interesting experiences of an engine driver, transporting you into the world of Indian Railways | Marathi |
| 5 | California Te Kailas | Shri. Vishwas Barve | The author's experiences of his stay abroad and here | Marathi |
| 6 | Collaborators or Conformists ? | Dr. Aroon Tikekar | Lectures based on Dr Tikekar's comprehensive study of the editors of the past with rare information and photographs | English |
| 7 | High Tech Life Line | Dr. Anil Gandhi | An easy-to-understand book on the latest developments in medicine | English |
| 8 | Trailing The Tiger | Atul Dhamankar | From tiger traits to close encounters, and plenty of colour photographs, an exciting and interesting book for wildlife lovers | English |
| 9 | Deer Tales | Atul Dhamankar | All about deer, their appearance, eating and mating habits, a very informative book with lots of colour photographs and personal experiences | English |
| 10 | How To Be Effective In Life | Dr. PS Ramani | A handy guide that will help the young generation onto the path of stress-free success | English |
| 11 | Kishor Kumare | Shri. Shashikant Kinikar | An interesting biography of A Versatile Genius | English |
| 12 | Aushadhi Vishwkosh | Dr. Mandar Joshi | An encyclopaedic volume elaborating the attributes of 150 naturally occurring substances, and their use in allopathy, ayurveda, homeopathy and so on. | Marathi |
| 13 | Touch of The Healing Knife | Dr. Anil Gandhi | In his autobiography Dr. Anil Gandhi has expressed valuable views on investment planning, evolution of earth and life and professional ethics. It is full of ideals and inspiring to the common man. | English |
| 14 | Jagavegali Manas Jagavegalya Goshti | Dr. Sushama Deshmukh | A vivid depiction of doctor-patient relationships, narrating tables of extraordinary people who successfully overcame adverse circumstances and illnesses | Marathi |
| 15 | Mi Sarathi Agnirathach | Shri. H, N. Sapre | A collection of the thrilling experiences of railway engine drivers | Marathi |
| 16 | Hirvya Vata | Dr. Vinita Apate | | Marathi |
| 17 | Walk Jog Run | Dr. PS Ramani | For good physical and mental health and happy longevity | English |
| 18 | Maza Mrutunjay | Prakash Nikhumbh | An honest narration of a brave fight against death and a committed effort to prolong life | Marathi |
| 19 | Zep Ghetali Aakashi | Dr. Raju Wanare | | Marathi |
| 20 | John Marshal | Shri. Jayant Kher | | Marathi |
| 21 | Primer of Health | Dr. H. V. Sardesai | In this book we bring you the basic principles of health, as narrated by Dr. H. V. Sardesai. His narrations virtually stand as 'The Grammar of Healthy Constitution'. Easy to understand simple language is the salient feature of all his discourses. | English |
| 22 | The Key To Good Health | Dr. H. V. Sardesai | This book provides a 'Master Key' to good health for everyone irrespective of their profession or undertaking. Simple solutions to seemingly colossal problems provide you an insight and opportunity to alter your way of living to maintain a healthy constitution all the time. A real 'Master key' that opens the doors to sustained 'Good Health' | English |
| 23 | SOME HEALTH Problems and Their Treatment | Dr. H. V. Sardesai | This book is to bring you information on healthy diet, common health problems that may flare in to major ailments, fatal diseases and general misconceptions regarding health, as narrated by Dr. H. V. Sardesai. His narrations virtually stand as 'The Grammar of Healthy Constitution'. Easy to understand simple language is the salient feature of all his discourses. | English |
| 24 | Life Style | Dr. H. V. Sardesai | The stress building hectic pace of modern life leaves little room for contemplation and corrective actions. Imbalanced food regimen, harmful habits and lack of exercise are the real causes of physical disorders and diseases. This book helps you get an insight in to a healthy lifestyle while suggesting simple and easy to implement measures that can go a long way in restoring your physical and mental health. | English |
| 25 | Until Medical Help Arrives | Dr. H. V. Sardesai | In a medical emergency, every second is vital and it is important to either provide treatment to those in need of urgent medical care, with the goal of satisfactorily treating the patient or arranging for timely removal of the patient for appropriate medical care. Usually, in a medical emergency, people do not know the measures to be adopted till the medical help arrives. Prompt action can and has saved many lives. This book relates simple and effective actions to be taken in such situations. This book is a must for every household as it describes the actions to be taken in different kinds of medical emergencies. | English |
| 26 | Mediums, Magicians & The Metaphor | Ruzbeh Keki Mowdawala | | English |

**India Printing House. Gr. floor, 42, G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031**
**Tel: +91 22 2418 6233, Email : info@iipublishers.com, Website : www.iipublishers.com**

## लोकवाङ्मय प्रकाशन

# ग्रंथपान

रावसाहेब कसबे यांचा ‘धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह’ हा ग्रंथ माणसाचा जन्म कसा झाला या विवेचनाने सुरू होतो. त्यात मध्ययुगाच्या शेवटी वैज्ञानिक जगात जे संशोधन सुरू झाले, त्याने धर्माला विविध पातळ्यांवर कसे आव्हान दिले याचा तपशील आहे. आपण ज्या पृथ्वीतलावर राहतो, ती पृथ्वी म्हणजेच काही संपूर्ण विश्व नाही, तर विश्वाचे रूप अनंत असून, पृथ्वी त्याचा एक छोटासा अंश आहे, असे सांगणारा गिओर्दानो ब्रुनो पुढे आला. या विश्वात जे जे म्हणून काही आहे, ते एकाच मूलद्रव्याचे बनलेले आहे असा सिद्धान्त मांडून आणि स्वत:चे बलिदान देऊन त्याने विज्ञानाला थेट धर्मांच्या संघर्षात उतरविले. त्यानंतर आलेला जॉन तिंदाल याने या विश्वात आपण जे जड आणि चेतन पाहतो त्यात कोणताही मूलभूत फरक नसतो, असे सांगितल्याने हा संघर्ष अधिक तीव्र बनला. त्याच्या या विचारांना ईश्वरनिंदा (ें्ज्पस्ड) मानले गेले. त्यालाही धर्मगुरूंनी भरपूर छळले. परंतु, चार्ल्स डार्विनने जेव्हा माणसाला कोणीही निर्माण केले नसून, तो निसर्गातून उत्क्रांत झाला आहे, तो स्वत:च स्वत:चा निर्माता असल्याने त्यानेच स्वत:ची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, हे पटवून देणारा उत्क्रांतीचा सिद्धान्त मांडला, तेव्हा मात्र धर्म आणि विज्ञान यांच्यातील संघर्षाने टोक गाठले. आज विज्ञानाने केलेली नेत्रदीपक प्रगती आणि तंत्रज्ञानाने केलेले त्याचे उपयोजन यामुळे मनुष्यजातीवर त्याचे झालेले चांगले वाईट परिणाम आपण भोगत आहोत.




या ग्रंथाच्या स्वयंप्रयत्नांनी घडलेला प्राणी ‘माणूस’ या पहिल्या विभागात माणसाच्या जन्मासंबंधीचे उत्क्रांतवादी विचारवंतांनी मांडलेले सिद्धान्त आणि त्यांचा केलेला विकास याचा तपशील नोंदविलेला आहे. त्याचप्रमाणे विविध विचारवंत आणि शास्त्रज्ञांनी माणसाच्या केलेल्या व्याख्यांचाही परामर्श घेण्यात आलेला आहे. त्यात बेंजामिन फ्रँकलिन यांच्यापासून ते कार्ल मार्क्स यांच्यापर्यंतच्या विचारवंतांचा समावेश आहे.

माणूस त्याच्या विकासक्रमात केवळ जगत नव्हता. या प्रक्रियेत तो अनेक कल्पना आणि प्रयोग करीत होता. तो अधिक ‘माणूस’ बनण्यासाठी सतत प्रयत्नशील होता. त्याने त्याचे माणूसपण प्राप्त करण्यासाठी आणि त्याचे जतन करण्यासाठी अनेक असाधारण अशी वैशिष्ट्ये कालौघात कमावली. त्याचे संपूर्ण माणूसपण हे त्याच्या स्वत:चे प्राण पणाला लावण्याच्या क्षमतेत सामावलेले होते. तो इतरांकडून त्याच्या माणूसपणाची मान्यता मागत होता. त्यासाठीही तो प्राणाची बाजी लावण्यास तयार होता. प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ते हेगेल यांनी या दृष्टीने केलेले चिंतन महत्त्वाचे आहे. माणसातील आत्मपीडन आणि परपीडन या प्रवृत्तीची सिग्मंड फ्रॉईड यांच्या संशोधनाच्या आधारे केलेली चर्चा आणि स्वत: फ्रॉईड यांच्या विचारांचा इ.स. १९२० नंतर झालेला विकास याचाही तपशील या ग्रंथात समाविष्ट केलेला आहे.

माणूस स्वप्रयत्नांनी घडलेला आहे. तो अनेक संकटांवर मात करीत सतत अधिक मानवी बनण्याच्या प्रयत्नात आहे. त्याला त्याच्यातील सर्व सुप्त शक्तींचे प्रकटीकरण करून स्वत:च्या जगण्याला अर्थ द्यायचा आहे. असा हा माणूस त्याच्या बाहेरच्या कोणत्याही अद्‌भुत शक्तीच्या साहाय्याशिवाय माणूस बनला, तो स्वत:च स्वत:चा शिल्पकार झाला, असे वैज्ञानिक आणि संशोधक सांगत असले, तरी माणसाने त्याच्या विकासक्रमात स्वत:च्या बाहेरील अद्‌भुत शक्तीचे अस्तित्व कल्पून तो तिला शरण का गेला, हा प्रश्न शिल्लक राहतोच. या प्रश्नाचा विचार या ग्रंथाच्या मामेकं शरणं व्रज या दुसऱ्या विभागात भगवद्‌गीतेची समीक्षा करून आणि जिहाद या तिसऱ्या विभागात कुराणाचे निरूपण करून गेला आहे.

भगवद्‌गीतेत काय जुने आहे आणि नवीन काय आहे, याची चर्चा या ग्रंथात केलेली आहे. त्याचप्रमाणे कुराणाच्या स्वरूपाची मांडणी अरबस्थानातील त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर करून, आजचे मूलतत्त्ववादी त्यांच्या हिंसक कारवायांना कुराणातील काही आयतींचे पाठबळ कसे मिळवीत आहेत, हेही स्पष्ट केले आहे.

एकुणातच आजच्या वाढत्या धार्मिक दहशतवादाच्या काळात आवर्जून वाचायला हवा असा हा ग्रंथ आहे.

– प्रतिनिधी

**पृष्ठे ५००, मूल्य ५०० रु. ‘ग्रंथाली’ येथे सवलतीत ४०० रु.**

मैत्रेय प्रकाशन

# ग्रंथपान

## 'देवदास ते भुवनशोम' एक संग्राह्य चित्रपट कोश!

**जयश्री पाटील**

**चित्रपट** ही विसाव्या शतकातली सर्वश्रेष्ठ कला आहे असं म्हटलं तरी ते वावगं ठरू नये इतकं त्या कलेने जाती-धर्म-वर्ग-पंथ विरहीत, आबालवृद्ध अशा सर्वांनाच भारून टाकलं आहे. त्यांचा प्रेक्षक वर्ग निरंतर वाढत आहे. त्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नवनवीन प्रयोगही केले जात आहेत. आज अक्षरशः शेकड्यांनी चित्रपट निघतही आहेत. मात्र तरीही दुर्दैवाने सिनेमाकडे बघण्याची जी डोळस दृष्टी असावी लागते तिचा अभाव मात्र सर्वत्र जाणवतो. त्यामुळेच हे कोणत्याही बदलासाठीचं प्रभावी माध्यम असलं तरी त्याकडे केवळ रंजनाचं माध्यम म्हणूनच बघितलं जातं; आणि त्यातूनच मग अत्यंत प्रभावी कलाकृती असलेल्या अनेक चित्रपटांची दखल म्हणावी तशी घेतलीच जात नाही. पण प्रख्यात लेखक श्री. विजय पाडळकर यांनी लिहिलेल्या आणि मैत्रेय प्रकाशनाने अत्यंत देखण्या स्वरूपात प्रकाशित केलेल्या 'देवदास ते भुवनशोम' या चित्रपट कोशाच्या पहिल्या खंडाने ती उणीव बऱ्याच प्रमाणात भरून काढली आहे. 'देवदास ते भुवनशोम' हा श्री. पाडळकर यांनी हाती घेतलेल्या चित्रपट कोशाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा पहिला खंड असून दुसरा खंडही लवकरच बाजारात येईल असे प्रकाशकांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

या पहिल्या खंडात १९३१ ते १९६९ या कालावधीतील लक्षणीय हिंदी चित्रपटांची 'सुहानी सफर' श्री. पाडळकर यांनी अत्यंत ओघवत्या भाषेत आपल्यापर्यंत पोहोचविली आहे. '१९३१ का?' तर तेव्हा हिंदी सिनेमा बोलू लागला आणि 'भुवनशोम' पर्यंतच का? तर पाडळकरांच्याच भाषेत सांगायचं तर 'भुवनशोम' नंतर हिंदी चित्रपटांत फार मोठं परिवर्तन घडलं. 'भुवनशोम' पूर्वीचा सिनेमा आणि 'भुवनशोम' नंतरचा सिनेमा असे हिंदी चित्रपटांचे दोन भाग स्पष्ट पडलेले दिसतात.




हा प्रवास या पुस्तकात कशा तऱ्हेने मांडला आहे याबाबत श्री. पाडळकर प्रास्ताविकात लिहितात, 'या काळातील लक्षवेधी सिनेमे घेऊन त्यांची वैशिष्ट्ये दाखविण्याचा आणि त्याचे मूल्यमापन करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. (१९७० ते २००० या काळातील ४० चित्रपटांचा अंतर्भाव दुसऱ्या खंडात केला जाईल.) अर्थात केवळ श्रेष्ठ कलाकृतीद्वारेच इतिहास घडतो असे नव्हे. इतिहासात जसे सम्राटांना स्थान असते तसेच मांडलिकांनाही असते. त्यामुळे सामान्य, मध्यम, उत्तम अशा विविध कलाकृतींची दखल अभ्यासकाला घ्यावी लागते. तशी दखलही थोडक्यात घेण्याचा प्रयत्न मी केला आहे. काही चित्रपट असे होते की ज्यांच्यावर दीर्घ लेखन करता येत नव्हते, पण त्यांना डावलूनही चालणार नव्हते. निवडलेल्या दोन सिनेमांच्या मधल्या काळात जे असे दखल घेण्याजोगे चित्रपट आले त्यांचा मी थोडक्यात परामर्श घेतला आहे. दुसरे म्हणजे हिंदी सिनेमात ज्या कलावंतांनी भरीव योगदान दिले त्यांचाही उल्लेख त्या त्या संदर्भात आवर्जून केला आहे. हिंदी सिनेमाने केलेले प्रयोग, तांत्रिक प्रगती यांचे दर्शन तर या लेखनातून घडेलच पण सिनेमा व समाज यांच्या परस्पर संबंधाचा लेखाजोखाही तपासला जाईल.'

श्री. पाडळकर यांनी प्रास्ताविकातच दिलेल्या माहितीनुसार १९६९ साली 'भुवनशोम'च्याच बरोबरीने प्रकाशित झालेल्या 'सारा आकाश' या चित्रपटाने दुसऱ्या खंडाची सुरुवात होईल आणि इ.स. २००० पर्यंतच्या चित्रपटांचा आढावा त्यात घेतला जाईल.

या पहिल्या खंडात 'देवदास', 'आदमी', 'बरसात', 'अंदाज', 'महल', 'आवारा', 'दो बिघा जमीन', 'देवदास', 'श्री ४२०', 'सीमा', 'जागते रहो', 'दो आँखे बारह हाथ', 'प्यासा', 'नया दौर', 'मदर इंडिया', 'चलती का नाम गाड़ी', 'मधुमती', 'कागज़ के फूल', 'परख', 'कानून', 'अनुराधा', 'मुगल-ए-आझम', 'काबुलीवाला', 'साहब, बीवी और गुलाम', 'गुमराह', 'बंदिनी', 'हकीकत', 'यादें', 'गाईड', 'अनुपमा', 'तीसरी कसम', 'ज्वेल थीफ', 'सत्यकाम' व 'भुवनशोम' या तब्बल ३४ चित्रपटांवर श्री. पाडळकर यांनी विस्ताराने लिहीलं आहे. पण ते वाचताना कुठेही आपण सरधोपट चित्रपट समीक्षा वाचत आहोत असं वाचकाला वाटत नाही तर त्या-त्या चित्रपटांतली अनेक सौंदर्यस्थळं, दिग्दर्शकाचा त्या मागील विचार, त्या-त्या चित्रपट निर्मितीच्या काळातील अनेक अप्रकाशित बाबी असं सगळंच पाडळकर अत्यंत लालित्यपूर्ण शैलीत वाचकांपुढे मांडतात. त्यामुळे त्या-त्या चित्रपटाच्या आस्वादासंबंधीची एक अतिशय नवी दृष्टी वाचकाला लाभते व निखळ आनंद देऊन जाते.


या व्यतिरिक्त या दरम्यान आलेले, ज्यांची स्वतंत्रपणे दखल घेणं जरी जरूरीचं नसलं तरीही ज्यांनी काही वेगळ्या वाटा हिंदी चित्रपटांत रूढ केल्या त्या चित्रपटांचीही धावती दखल श्री. पाडळकर यांनी मधल्या प्रकरणांत घेतली आहे. 'स्वातंत्र्यपूर्व चित्रपट संगीत' व 'हिंदी सिनेसंगीत' ही प्रकरणं हिंदी चित्रपटांचा अविभाज्य भाग असलेल्या संगीताचीही आवर्जून दखल घेतात. पुस्तकातील छायाचित्रांनीही पुस्तकाचं देखणेपण वाढविलं आहे.

एकूणच प्रत्येक चित्रपट चाहत्याने संग्रही बाळगावं असं हे पुस्तक आहे.

**देवदास ते भुवनशोम**
(विसाव्या शतकातील हिंदी सिनेमाचा इतिहास)
खंड पहिला
लेखक - विजय पाडळकर
प्रकाशक - मैत्रेय प्रकाशन
पृष्ठे - ३४४, मूल्य - रु. ४५० **'ग्रंथाली' येथे सवलतीत ३६० रु.**

# ग्रंथपान

'वेगळ्या वळणाचा कथासंग्रह'




माणसाचं मन ही एक अनाकलनीय गोष्ट आहे. मळलेल्या वाटांवरून चालता चालता ते अचानक आपली वाट बदलतं आणि अव्यक्तातल्या गूढ वाटांवरून, जगण्याच्या व्यवहारातले वर्तमान-संदर्भ घेऊन धावायला लागतं. त्यावेळी लेखकाच्या मनात जे जे येत जातं, ह्या कथासंग्रहातल्या कथांतून उलगडत गेलं आहे.

लघुकथेची व्याख्या करताना इंग्रजी लघुकथाकार एच.जी. वेल्स ह्यांनी म्हटलं आहे, "The short story can be anything that the author decides it shall be." वेल्स ह्यांचं हे मत लक्षात घेतलं तर हेच स्पष्ट होतं की लघुकथेला कोणत्याही विषयाचं वावडं नसतं आणि मुख्य म्हणजे ती सर्वस्वी लेखकाच्या मर्जीच्या अधीन असते. म्हणूनच तो कथानकविरहितही असू शकतो अथवा एखादं विवक्षित वातावरण, मनाची भावस्थिती, सामाजिक परिस्थिती किंवा वेगवेगळ्या पातळ्यांवरून चाललेला चिंतनशील मनाचा प्रवाससुद्धा लघुकथेचा विषय होऊ शकतो. विलास केळसकरांची कथा ह्याच जातकुळीतली आहे. ह्या संग्रहात त्यांच्या पंधरा कथा समाविष्ट आहेत. ह्या कथांच्या शीर्षकांच्या वेगळेपणातूनच ह्या कथांचं वैशिष्ट्य स्पष्ट होतं. 'अक्षर','अनुष्टुभ','अधिष्ठान' इत्यादी मान्यवर दिवाळी अंकांतून ह्या कथा ह्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या आहेत. ह्या कथांमधली पात्रं आपल्याच अवतीभवती दैनंदिन जीवनात वावरणारी आहेत. आयुष्यातले चढउतार पार करत असताना, प्राप्त परिस्थितीशी टक्कर देताना ती कधीकधी हताश होतात, निराश होतात, काहीतरी आधार शोधायला लागतात आणि त्या प्रयत्नात भोंदूबाबा, मठाधिपती अथवा तथाकथित बुवांच्या कसे आहारी जातात, ही समूहाची मानसिकता लेखकानं नेमकेपणानं हेरली आहे. त्या सगळ्या गोंधळात सामान्य माणसाचं आयुष्य विदूषकासारखं हास्यास्पद होतं. 'दोन विदूषक' ह्या पहिल्या कथेत लेखकानं हेच सत्य अधोरेखित केलं आहे.

एखादा संवेदनशील विद्यार्थी जेव्हा बाळबोध पाठ्यपुस्तकातले संदर्भ; वास्तवातल्या व्यवहाराशी पडताळून पाहू लागतो, तेव्हा जे एक विदारक सत्य त्याला सामोरं येतं, त्याचं चित्रण 'आसुडाच्या गृहीतावर नांगरणी करणारा शेतकरी' आणि 'हुबेहूब प्रलयंकारी पाणी' ह्या कथांत येतं.

आयुष्यात सोसलेली मुस्कटदाबी झुगारून स्वतंत्र राहू पाहणारी, सुखानं जीवन जगणारी 'ती' समाजाला विकृत वाटते. पुरुषार्थ गाजवू पाहणारा तिचा अविवाहित उनाड भाऊ एक दिवस अचानक तिच्या घरी येऊन पालीच्या रूपानं जणू तिच्या स्वातंत्र्याचीच हत्या करतो. त्यावेळची तिची भावनिक आंदोलनं लेखकानं मार्मिकपणे टिपली आहेत.

ह्यातल्या काही कथांमधून कुठंतरी कळत नकळत एक अस्वस्थ सर्जनशील चित्रकार डोकावतो, तसंच चित्रकारांचे, कलाकृतींचे, त्यांच्या अवशेषांचेही संदर्भ येतात. एकसुरी, साचेबंद आयुष्य जगणाऱ्या, पोटाच्या मागं धावणाऱ्या, पण त्याचवेळी अज्ञाताची, आदिमानवाची ओढ असणाऱ्या व्यक्तीचं चित्रण 'कमळाचं चित्र' मध्ये येतं, परंतु तोही परिस्थितीपुढं हतबल ठरतो.


अत्यंत प्रवाही भाषा हे ह्या कथासंग्रहाचं वैशिष्ट्य! दहीहंडीसाठी रचतात, तसा माणसांचा मनोरा (पृष्ठ १३७), आपली मान कपडा पिळल्यासारखी गरागरा फिरवणारा उंट (पृष्ठ १२८), अपंगत्वासारखाच चिकटून बसलेला भूतकाळ इ. इ. अशा काही मोजक्या उदाहरणांवरूनसुद्धा उपमांचा चपखलपणे केलेला वापर लक्षात येतो. एखाददुसरा अपवाद वगळता निवेदनाचे सगळेच प्रकार लेखकानं कौशल्यानं हाताळले आहेत.

विशिष्ट प्रकारच्याच व्यक्तिरेखा किंवा सामाजिक, सांस्कृतिक, स्तरीय वातावरण ह्यांत न अडकता केळसकरांची कथा समग्र व्यक्तिरेखांचा अनेक पातळ्यांवर मनोवेध घेते आणि म्हणूनच वेगळ्या वळणाची ही कथा अतिशय प्रभावी ठरते.

मूल्य १७० रु.    ग्रंथाली येथे सवलतीत १४० रु.

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान




केवळ तेवीस वर्षं वय असलेल्या भगत सिंग यांना ब्रिटिश सरकारने फाशी दिली खरी, पण 'माणूस गेला तरी, त्याचा विचार मरत नाही' ही उक्ती भगत सिंगांच्या बाबतीत तंतोतंत खरी ठरली. एवढंच नव्हे, तर त्यांच्या बलिदानाने स्वातंत्र्य-चळवळीची ज्वाला अधिकच पेटून उठली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रकाशात आलेल्या भगत सिंग यांच्या साहित्याचा अभ्यास करून, आणि प्रकाशात न आलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊन, संशोधन करून ज्येष्ठ व विख्यात पत्रकार, लेखक कुलदीप नय्यर यांनी हे चरित्र लिहिलं आहे. यात भगत सिंग यांचे विचार, त्यांच्यावर मार्क्स, लेनिन आदी क्रांतिकारक विचारवंतांचा असलेला प्रभाव, त्याबद्दलची त्यांची मतं, आणि त्यांनी पाहिलेलं 'समाजवादी, धर्मनिरपेक्ष भारता'चं स्वप्न आदी गोष्टींचं नय्यर यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केलं आहे. भगत सिंग यांच्यावर चालवण्यात आलेल्या खटल्याचं यात तपशीलवार वर्णन असून हंस राज व्होरा यांच्या माफीचे साक्षीदार होण्याबाबतचे तपशीलही प्रथमच प्रकाशात आले आहेत. तसंच यात महात्मा गांधींच्या अहिंसात्मक तत्त्वज्ञानाबद्दलचे भगत सिंग यांचे विचारही मांडण्यात आले आहेत. भगत सिंग यांची फाशी टाळण्यासाठी महात्मा गांधींनी कोणते प्रयत्न केले, हेही नय्यर यांनी यात स्पष्ट केलं आहे.

देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या एका स्वातंत्र्यसैनिकाची धगधगती क्रांतिगाथा – शहीद!

**पृष्ठ २४८, मूल्य २५० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रु.**

स्मार्टपणे वापरा... अष्टपैलू स्मार्टफोन । Smartpane Vapara... Ashtapailu Smartphone आपल्या अँड्रॉइड मोबाइलमधील सर्व सोयी-सुविधा व अँप्स आत्मविश्वासाने वापरण्यासाठी सचित्र मार्गदर्शन. सुश्रुत कुलकर्णी




श्री. व सौ. देशमुख यांनी मुलांच्या आग्रहाखातर स्मार्टफोन घेतला खरा, पण तो वापरताना काही चुकलं तर कुठेतरी गडबड होईल, या भीतीने ते अँड्रॉइड स्मार्टफोनचा पूर्ण वापर करताना बिचकत होते.

पण थोड्याच दिवसांत, श्री. व सौ. देशमुख स्मार्टफोनला केवळ सरावलेच नाहीत, तर आत्मविश्वासाने फोटो काढून ते वॉट्सअ‍ॅयप करू लागले, आणि हवे ते गेम्स, अॅ प्सही डाउनलोड करू लागले! ही किमया घडवली होती, अष्टपैलू स्मार्टफोन या पुस्तकरूपी मित्राने! या मित्राने त्यांना खालील गोष्टी सचित्र समजावून सांगितल्या :

- बॉक्समधून आलेला नवाकोरा स्मार्टफोन कसा जोडायचा?
- कॉन्टॅक्ट्स सेव्ह कसे करायचे, त्यांचे ग्रुप कसे करायचे?
- एसएमएस, ग्रुप एसएमएस कसे करायचे?
- कार्यक्रमाला जाताना फोन सायलेंट' कसा करायचा?
- वाय-फाय स्मार्टफोनला कसे जोडून घ्यायचे?
- ईमेल कसा करायचा? त्याला फाइल कशी जोडायची?
- फोटो किंवा व्हिडिओ कसा काढायचा, तो शेअर कसा करायचा?
- वॉट्सअ‍ॅकप, पैसबुक इ. अ‍ॅचप्स कशी वापरायची?
- वॉलपेपर, थीम्स कशा बदलायच्या?
- आणि अर्थात, ऑनलाइन शॉपिंग कसं करायचं... आणि अनेक!

या पुस्तकातल्या छोट्या-छोट्या, पण अत्यंत महत्त्वाच्या टिप्समुळे श्री. व सौ. देशमुख बिनधास्त स्मार्टफोनमधल्या उपलब्ध सोई-सुविधा वापरू लागले.

तेव्हा त्यांच्यासारखंच तुम्हीही या अष्टपैलू स्मार्टफोनचं बोट' धरा, स्मार्ट व्हा!

**पृष्ठे १३६, मूल्य १०० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत ८० रु.**



श्री. काशिनाथ मोरे
अध्यक्ष

'असमर्थास समर्थ करणे'

# दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मुख्य कार्यालय : 217, राजा राममोहन रॉय मार्ग, गिरगांव, मुंबई 400 004. ✆ 022-2386 8134/ 2385 4945



श्री. रमेश मेढेकर
उपाध्यक्ष

"99 वर्षे ग्राहकांची सेवा करीत पूर्णपणे संगणकीकृत तेरा शाखांसह आधुनिक प्रगतीची वाटचाल"

**मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजदर**

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| 15 दिवस ते 90 दिवस | 6.00 % |
| 91 दिवस ते 180 दिवस | 7.00 % |
| 181 दिवस ते 12 महिने | 8.50 % |
| 1 वर्षावरील ते 2 वर्षे | 9.00 % |
| 2 वर्षावरील ते 3 वर्षे | 9.25 % |
| 3 वर्षावरील ते 5 वर्षे | 9.00 % |
| 5 वर्षांपेक्षा अधिक | 8.50 % |

**योजना**

डेक्कन दामदुप्पट ठेव योजना
(99 महिन्यांत रक्कम दुप्पट)

डेक्कन लखपती योजना
(दरमहा ₹ 530/-
120 महिन्यानंतर ₹ 1,00,083/-)

डेक्कन करोडपती योजना
(दरमहा ₹ 53,000/-
120 महिन्यानंतर ₹ 1,00,08,310/-)

**विशेष योजना** दि. 01/08/2015 पासून बचत खात्यात ₹ 1 लाख किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम शिल्लक असलेल्या खातेदारांना 6 % व्याजदर.

वसुल भाग भांडवल 22.00 कोटी | ठेवी 574.13 कोटी | कर्ज 349.28 कोटी

## ❋ बँकेच्या सेवा व सुविधा ❋

✓ सर्व शाखांमधून आरटीजीएस/ एनईएफटी द्वारे फंड्स ट्रान्सफरची सुविधा
✓ कोअर बँकींग व एस.एम.एस. बँकींगची सेवा
✓ भायखळा, ठाणे व दादर या शाखांमधून फ्रँकींग सेवा
✓ डेक्कन "रुपे कार्ड" सुविधा

## संचालक मंडळ

श्री. काशिनाथ दिनकर मोरे (अध्यक्ष)
श्री. चंद्रकांत शिवराम शेवाळे
श्री. विनोदकुमार तख्तमल कच्छारा
श्री. विजय श्रीकृष्ण भोळे
श्री. ज्ञानेश्वर नारायण दाभोळे
श्री. दयानंद उध्दवराव फडतरे

श्री. रघुनाथ कृष्णाजी मसुरकर
श्री. चंद्रकांत मायाप्पा मासाळ
श्री. दिपक कल्याणराव सावंत
सौ. नम्रता काशिनाथ मोरे

श्री. रमेश देवू मेढेकर (उपाध्यक्ष)
श्री. शांतीलाल ताराचंद जैन
सौ. सुरेखा काशिनाथ राऊत
डॉ. गुरुनाथ वासुदेव पंडित
श्री. अभिजीत बाबाजी नागवडे
श्री. रविंद्रनाथ रामचंद्र पोटफोडे
(तज्ज्ञ संचालक)

श्री. शशिकांत लक्ष्मण अभंग (सरव्यवस्थापक)

ho@deccanbank.com | www.deccanbank.com | co@deccanbank.com

# ग्रंथपान

आत्मचरित्र वाचण्यात उत्सुकता असते ती चरित्रकारास समजून घेण्याची. तसे त्या काळाचे वास्तव, भवताल आणि सहचलांच्या उमलण्याफुलण्यात गुंतलेल्या धाग्यांची वीण, कर्तृत्वाची पाऊलवाट महामर्गाला कशी मिळाली याचे कुतूहल असते. थोडक्यात, आत्मचरित्र हा आरसा असतो, व्यक्तींचा, समाजाचा, गावाचा, काळाचा, इतिहासाचा, भूगोलाचा. अनेक छटा, आपण पाहू तशा. शोधू तशा. आत्मचरित्र म्हणजे केवळ जंत्री नसते व्यक्तिगत पातळीवरील कुटुंबातील व्यक्तींची, नात्यांची, प्रसंगांची, घटनांची. तो असतो ठेवा, काळाचा, भूतकाळाचा भविष्यासाठी. म्हणून त्याचे महत्त्व मोठे असते, कुठल्याही रुमालात बांधून ठेवलेल्या दप्तरासारखे, बखरीसारखे. 'लांबा उगवे आगरी' हे आत्मचरित्र या प्रकारातले. सर्व संदर्भांचे सार सामावलेले. ज्याची सुरुवात होते ती शीर्षकापासून. लांबा या शब्दापासून.




डॉ. म.सु.पाटील, यांचे हे आत्मचरित्र म्हणजे एक निर्मळ निरीक्षण आहे. त्यात स्वतःचेच आत्मपरीक्षण आहे. आपले गाव, पीकपाणी, आपला समाज, रीतिरिवाज, संस्कार याचे वर्णन करताना, घरच्या परिस्थितीचे, तिच्यावर मात करण्यासाठी चाललेल्या धडपडीचेही वर्णन करतात. परिस्थिती माणसाला कशी अकाली प्रौढ व्हायला भाग पाडते, आणि त्याचवेळी स्वतःच्या अस्तित्वाला जपण्यासाठी कसे बळ शोधावे लागते, याचेही वर्णन ते सजगपणे करतात. स्वतःच्या हरवलेल्या लहानपणापासून ते मुलींच्या जपलेल्या लहानपणापर्यंतचा कौटुंबिक प्रवास आंतरिक ओलाव्याने आणि तितक्याच तटस्थेने टिपलेला आहे. एक गिरणी कामगार, कारकून, शिक्षक, आणि नंतर प्राचार्य असा चढता आलेख या जगण्याने पाहिलेला आहे, त्यात जगणे आणि सोसणे किती, याचेही भान वेळेवेळी व्यक्त झाले आहे. या प्रवासात भेटलेल्या शैक्षणिक संस्था, गिरणी, शाळा, कॉलेज, संस्थाचालक, व्यवस्थापन यांचे अनुभव आलेले आहेत. आणि त्याचवेळी एक वाचक, लेखक, समीक्षक, व्याख्याता, संपादक आणि मार्गदर्शक यांचा झुलणारा आंतरिक हिंदोळा कधी आकाशाला गवसणी घालू पाहतो, तर कधी जमिनीची आस त्याला आपल्याशीच धरून ठेवते, याचेही वर्णन येते.

जीवनाला आकार देणारे रामजी मास्तर, सावंत मास्तर, निळूशेट, डॉ. केणी, आई-वडिलांची अगतिकता, सुजाण आणि सुस्वभावी पत्नी विभावरी, कन्या, यांच्याविषयीचा तपशील हा पाटलांच्या जिव्हाळ्याचा गाभा म्हणता येईल. स्वतः लेखक असूनही कवयित्री, लेखिका असलेल्या नीरजाचे लेखन अधिक सकस कसे आहे, याचे कौतुक करताना स्वतःच्या नात्याचा बंध आडवा येऊ दिलेला नाही. कवी कुसुमाग्रज, कवी ग्रेस, गंगाधर पाटील, पुरुषोत्तम पाटील, डॉ. यशवंत पाठक, किशोर पाठक, रमेश वरखेडे आणि साहित्यक्षेत्रातील अनेक मान्यवरांची भेट या आत्मचरित्रातून आपल्याला होते. त्यांचे आपसांतले नाते, संबंध, साहित्यप्रेम, यांचा चढउतार मनोरंजक आहे.

खारेपाटातले गाव ते मुंबई, मालेगाव, मनमाड, पुन्हा मुंबई असा जीवनप्रवास झाला; तसा लेखक म्हणून स्वतःचा प्रवास कसा झाला, साहित्यातला आशय, बंध, विश्व, सौंदर्य आणि समीक्षा यांच्याशी सख्य कसे जडले, याकडे लेखकाच्या तटस्थ वृत्तीने आणि तितक्याच आपुलकीने त्यांनी स्वतःकडे पाहिलेले आहे. 'अनुष्टुभ', 'कवितारती'ची जडणघडण, पत्नीच्या नावे सुरू केलेला विभावरी पाटील पुरस्कार, वाचन, लेखन आणि निवृत्तीच्या काळाला सार्थकी लावण्याची ओढ, यातून लेखकाचा जगण्याकडे पाहण्याचा, जगण्याला समृद्ध करण्याचा सकस दृष्टिकोन दिसून येतो. हे आत्मचरित्र वाचत असताना 'एक झाड आणि दोन पक्षी' या विश्राम बेडेकरांच्या आत्मचरित्राची आठवण होते.

रविमुकुल यांचे मुखपृष्ठ पाहताना वाटते ते शीर्षकाला साद घालत आहे.

**• मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.**

# ग्रंथपान

'प्रेम हे ध्येयासारखंच असतं! मृत्युदंडानंही न मरणारं!'

'आम्हा कुणासाठीच आयुष्य सोपं नाहीय; पण त्याचं काय एवढं? आपल्याला हवा चिवटपणा आणि आत्मविश्वास. आपल्याकडे काही देवदत्त गुणांची देणगी आहे हा विश्वास हवा; अन् त्या गुणांचा उत्कर्ष, काहीही किंमत द्यावी लागली तरी साधलाच पाहिजे.'

ध्येय आणि प्रेम यांची ही तुलना नाही, जगण्याला आशय देणाऱ्या सूत्राची गुंफण आहे. ध्येयाकडे जाणारा रस्ता खडतर असतो. अपयशाची कसोटी पाहणारे काटे तर पावलोपावली पसरलेले असतात. यश नावाचे शिखर तर इतके दूर असते की, नजर पुरू नये. तरीही सगळ्या संकटांवर मात करून शिखरावर पोचण्याचे ध्येय साकारणारे आहेतच. त्यात आहेत मादाम आणि पिएर क्युरी. रेडियमचा शोध लावणारे. संशोधनानंतर वाट्याला येतात अनेक सन्मान, अगदी डॉक्टरेट ऑफ सायन्सेस आणि नोबेल! पण त्यापूर्वी? त्यानंतर? मादाम होती तशीच राहिली. ध्येयाने झपाटलेली, ध्येयासाठी जगणारी. ध्येयातच बुडालेली. सगळ्या कसोट्या पार करीत. अगदी पिएर क्युरी काळाच्या पडद्याआड अचानक गेले, त्यानंतरही.




मादाम क्युरी कोण होती? पोलंडची राजधानी वॉर्सा येथील एका गरीब शाळा मास्तराची मुलगी, मारिया ऊर्फ मान्या. रशियन झारच्या जुलमी राजवटीत मातृभाषेलाही पारखी झालेल्या जनतेची एक प्रतिनिधी. बुद्धिमत्तेची दैवी देणगी असूनही गरिबीत भरडली गेलेली. ध्येय गाठायचेच या जिद्दीने ती फ्रान्स गाठते आणि आपल्याला काय करायचे आहे, या निश्चयाशी पोचते. त्याचीच कास धरते आणि ठरते फ्रान्सच्या सार्बोन विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवणारी पहिली महिला भौतिकशास्त्रात पदवी मिळवणारी पहिली, नोबेल मिळवणारी पहिली, नोबेलवर दोन वेळेस नाव कोरणारी पहिलीच महिला!

कुठल्याही सुविधा नाहीत, आर्थिक पाठबळ नाही तरी रेडियमचा शोध लागल्यानंतर 'पेटंट'ची मक्तेदारीही तिने उधळून दिली. आपले ज्ञान जगासाठी खुले केले. ज्यावेळी रेडियमच्या १ ग्रॅमची किंमत होती ७५०,००० सोन्याचे फ्रँक्स! तिने प्रसिद्ध केलेले खंडप्राय ग्रंथ म्हणजे, 'ट्रीटाइज् ऑन रेडियोॲक्टिव्हिटी' आणि 'वर्क्स ऑफ पिएर क्युरी'.

मादाम प्रेमळ होती. संस्कारात वाढलेली होती. घरच्या जबाबदारीचे भान ठेवणारी होती. प्रचंड बुद्धिमत्तेचे देणे लाभलेली होती. अखेरपर्यंत ती तशीच कुटुंबवत्सल राहिली. देश, आपले शोध, आपली माणसे, सहकारी सगळ्यांशी तिचे नाते होते आपलेपणाचे. ती एक मुलगी होती, तशी बहीण होती, प्रेमिका– पत्नी होती आणि संशोधिकाही होती. या सगळ्याच नात्यांचा, तिने केलेल्या संशोधन कार्याचा वेध घेतला आहे, ईव्ह क्युरीने, मादामच्या कन्येने. तसे काम अवघड होते. परंतु तिने परीश्रमपूर्वक नेटाने पूर्णत्वास नेले. त्या पुस्तकाचे नाव, 'मादाम क्युरी'.

चरित्रलेखन करताना अनेक तपशिलांची आवश्यकता असते. व्यक्तिरेखा उभी राहील, कर्तृत्व, गुणदोषासहित तिचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे अधोरेखित होईल, हे पाहावे लागते. यासाठी उपयुक्त ठरल्या त्या मादामने करून ठेवलेल्या नोंदी, केलेला पत्रव्यवहार, जवळच्या माणसांनी जतन करून ठेवलेल्या आठवणी. त्यांचा उपयोग करून चरित्रलेखन केले असले तरी, लेखिका त्याविषयी भूमिका स्पष्ट करते, की 'तिच्या जीवनकहाणीत माझ्या पदरची किंचितही वेलबुट्टीची किंवा नक्षीची भर घातली, तर तो गुन्हाच ठरेल. गरजेच्या एखाद्या वाक्याचीदेखील मी माझ्या मनानं मोडतोड केलेली नाही. सत्य तेवढंच कथन केलंय...'

यासाठी पुस्तकाची प्रस्तावनाच वाचायला हवी.

एक मात्र मान्य करावे लागेल, लेखनात आलेला तरलपणा हा मातृभक्तीपेक्षा व्यक्तिरेखा, कर्तृत्व आणि संशोधन यांच्या अजोडपणाशी जोडणारा आहे. जणू मादामने स्वतः लिहिल्यासारखा. तोच तरलपणा अश्विनी भिडे–देशपांडे यांच्या मराठी अनुवादातही तसाच उतरलेला आहे. वास्तविक संशोधनाचा विषय येतो तेथे तर निरसपणाची ओसाड जमीन लागण्याची शक्यता खूप असते. परंतु तसे झालेले नाही. लेखन करताना ते भान राखलेले आहे. त्यामुळे एक चांगले चरित्र वाचल्याचा आनंद हे चरित्र देते.

या चरित्राची तीन भागांत विभागणी केलेली आहे. आत मोजकेच फोटो दिलेले आहेत. परंतु मुखपृष्ठावरील मादामचा लक्षणीय फोटोच सर्व फोटोंची जागा घेत असल्याने त्यांची उणीव भासत नाही.

• **मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान




'आनंदनक्षत्र' या शीर्षकात आनंद आहे तसे नक्षत्र आहे. दोन्हीही मनाला उभारी देणारे, उल्हसित करणारे शब्द. त्यात भर पडली ती मुखपृष्ठावरील सजावटीची. मेघांच्या निळ्या छायेत फुलपाखराचे पंख लाभलेल्या व्यक्तीचे नक्षत्रांनाच साद घालीत उंचावलेले धवल हात. किती रम्य कल्पना! चटकन पुस्तक हातात घ्यावेसे वाटले तर नवल वाटायला नको, फुलपाखराच्या लोभस वृत्तीप्रमाणे. बरे , वरवरचा मामला म्हणावे, काय भुललासी वरलिया रंगा, तर तसेही नाही. हातात घेतलेले पुस्तक खाली ठेवण्याची वेळ येते ती त्याचे पारायण झाल्यानंतरच. बरे, वाचून झाल्यानंतर काय? आनंदाच्या हळुवार लाटा मस्तकाभोवती उसळत राहतात बराचवेळ, हिरव्यागार कोवळ्या तृणाच्या पात्यावरून झुळझुळणाऱ्या झुळुकीसारख्या. आनंद असतो एक चांगले पुस्तक वाचल्याचा. नवीन विचार समजल्याचा, जो आपल्यातच दडून बसलेला होता, अज्ञात नक्षत्रासारखा.

आनंदनक्षत्र हा आहे एक लेखसंग्रह. दीड ते दोन पानी लेखांचा. वाचकांच्या भाषेत म्हणायचे तर फुलपाखराच्या पंखासारखा. आकाराने इवलासा. तरी दीर्घकाळ नजरेसमोर रेंगाळत राहणारा. रंगाने, नक्षीने आणि मुलायम तरलतेने नटलेले पंख. तसा हा संग्रह. त्याचे लेखक आहेत प्रल्हाद जाधव. 'शेवंती जित्ती हाय' या नाटकाने त्यांच्यातल्या कसदार नाटककाराचा परिचय यापूर्वीच नाट्यस्पर्धांच्या रंगमंचावरून करून दिलेला आहे. 'हिरण्यगर्भ', 'यमक' ही नाटकेही आपल्या स्मरणात नक्कीच असतील. दमदार व्यक्तिरेखा, कथानकाची बहुपेडी गुंफण आणि संवादाचा तरलपणा ही त्यांच्या नाटकांची खासियत. तोच तरलपणा, नेमकेपणा, आणि कमीतकमी शब्दांत व्यक्त केलेला विचार, ही या लेखसंग्रहाची खासियत म्हणावी लागेल. खोटे बोलण्याविषयी आपण सारेच पटाईत असतो. पण त्यातले नेमके भान आपण विसरलेलो असतो. लेखक ते भान जागे करतात ते असे, 'खोटं बोलत गेलं की, सकारात्मक विचारांची शक्ती वाया जाऊ लागते. आतल्या आत खोट्या गोष्टींचं एक प्रचंड मोठं विश्व निर्माण होऊ लागतं.' शिव्या देण्यात तर बरीच अहमहमिका दडलेली असते. त्यातून आईवरून उद्धार करण्यात तर मोठाच पराक्रम गाजवल्याचा गर्व असतो. परंतु लेखक सांगतात, 'तुम्ही दिलेली शिवी ही पुन्हा तुमच्याकडेच परत येते. आईवरून दिलेली शिवी तर आपण आपल्यालाच दिलेली असते. कारण आई ही आईच असते. मग ती आपली असो की दुसऱ्याची.'

दूरदर्शनवरील आपण ॲनिमल प्लॅनेट, डिस्कव्हरी किंवा नॅशनल जिऑग्राफिक या चॅनेलवर बऱ्याचदा प्राणीजीवनावरील कार्यक्रम पाहतो. या प्राण्यांत आणि आपल्यात काय फरक आहे, याचे सुरेख वर्णन लेखक असे करतात, 'प्राण्यांना भूक लागते तेव्हा ते शिकार करतात. माणूस मात्र सतत सावजाच्या शोधात असतो. प्राणी स्वजातीयांना खात नाहीत, माणूस मात्र माणसाला खात असतो.'

बिल्टप आणि कार्पेट ही घराबाबतची संकल्पना स्पष्ट करताना लेखक मार्मिक निरीक्षण नोंदवतात, 'पूर्वी लोक काशीयात्रेला जाऊन यायचे, आई-वडिलांना यात्रा घडवून आणणाऱ्या मुलाचं जाहीर कौतुक व्हायचं. मुलंही ती बातमी अभिमानानं जगजाहीर करायची. आता विरारला वन-बीएचके घेतल्याची बातमी काशीयात्रेला जाऊन आल्याच्या थाटात सांगितली जाते.'

या लेखसंग्रहात आलेले लेख हे बोधकथा किंवा इसापनीतीच्या कथा, अशा स्वरूपाचे नाहीत. तर माणूस, त्याचे वागणे, त्यातली मानसिकता, त्यात सामावलेले तत्त्वज्ञान आणि हरवत चाललेले आत्मपरीक्षणाचे भान, या सगळ्यांचे फार बारकाईने केलेले निरीक्षण, चिंतन यांचे सार म्हणजे हे लेख होत. कुठलाही लेख केव्हाही वाचला तरी तो वाचनाचा आनंद देतो. अंतर्मनातले सुस्त भान जागे करण्यासाठी त्यावर ताज्या दवाचे निर्मळ थेंब शिंपडतो. वाचकाला आणखी काय हवे असते?

मुखपृष्ठ आणि रेखाटने निलेश जाधव यांनी केली.

• **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान




दहशतवाद हा शब्दच मुळी दहशत बसवणारा. वाचताना किंवा ऐकतानासुद्धा अंगावर काटा येतो. त्याचे स्वरूप आणि व्याप्ती आता मोजण्याची गरज राहिलेली नाही. जवळजवळ सारे जग त्याच्या विळख्यात सापडले आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. कुठे अख्खा रुपाया असेल तर कुठे काही आणे, इतकाच काय तो फरक असू शकतो. काही राष्ट्रे तर यात होरपळून जात आहेत. काही त्याच्या जखमा खोलवर कायम राहतील,यासाठी त्याला खतपाणी घालत आहेत. काही राष्ट्रे यातून स्वतःला वेगळे समजत असतीलही, परंतु त्यांच्याही वाट्याला याच्या झळा पोचलेल्या आहेतच. थोडक्यात, दहशतवाद हे हत्यार झाले आहे. त्याचा वापर का आणि कसा केला जातो, हे तर आता जग डोळे उघडे ठेवून निमूटपणे किंवा छद्मीपणाने पाहत आहे. आतापर्यंत यात पुरुषच मोठ्या प्रमाणात सहभागी आहेत, असा आपला समज. एखादा तरुण यात कसा ओढला गेला, किंवा स्वतःहून सहभागी झाला, याला अनेक समाजशास्त्रीय कारणे असू शकतात. परंतु त्यांच्या जोडीला स्त्रिया देखील आहेत! ही आश्चर्याची, तरी वास्तव असलेली गंभीर बाब म्हणावी लागेल. या अशा एका भयानक वास्तवाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे डॉ. अंजली रानडे यांनी. मराठीत या विषयावरील हे पहिलेच संशोधन असावे.

दहशतवाद म्हणजे नेमके काय? त्याची आधुनिक वैशिष्ट्ये कोणती? त्याचे प्रकार कोणते? स्त्रिया दहशतवादी का होतात? विषयाचे स्वरूप स्पष्ट करताना लेखिकेने या प्रश्नांचे स्पष्टीकरण प्रथम आपल्यासमोर ठेवले आहे. ज्या ज्या राष्ट्रात दहशतवादी संघटना कार्यरत आहेत, त्यात सक्रिय असलेल्या दहशतवादी स्त्रियांच्या कारवायांची माहिती दिलेली आहे. अशी माहिती स्वतंत्र प्रकरणनिहाय दिलेली आहे. श्रीलंका, पॅलेस्टाईन, चेचेन्या, इंडोनेशिया, उत्तर युगांडा व सिएरा लिऑन, आयर्लंड, एल साल्वादोर, नेपाळ, तुर्कस्तान, व्हिएतनाम यांचा यात समावेश आहे. आणि भारत? भारतही यातून सुटलेला नाही.

स्त्रिया दहशतवादी होतात, यामागे कोणती कारणे आहेत? त्या स्वेच्छेने येतात की इच्छेविरूद्ध? की परिस्थितीच्या बळी ठरलेल्या असतात? यात कोणती कारणे असतात, राजकीय, धार्मिक, की व्यक्तिगत? त्यांचा उपयोग कसा केला जातो? या सगळ्यांचा विचार सामाजिक आणि मानसिक पातळीवर होऊ शकतो. त्याचा शोध लेखिकेने इथे घेतलेला आहे. दहशतवादी स्त्री ही सूड उगवण्याच्या हेतूने प्रेरित झालेली असू शकते. भूतकाळातील पापापासून मुक्ती मिळवण्यासाठी शहिदा होणे, हा पर्याय रास्त वाटत असावा. जिहादी किंवा गनिमाशी असलेल्या नातेसंबंधामुळे सहभागी होत असावी. अशा कारवायांत भाग घेतल्यामुळे समाजाकडून मिळणाऱ्या आदराचेही आकर्षण असते. तर कधी कधी ती बलात्कारासारख्या अत्याचाराची बळी असू शकते. महत्त्वाचे म्हणजे, सामाजिक ठेवणीच्या मानसिक स्तरावर, पुरुषापेक्षा स्त्री दहशतवाद्यांच्या हातून काही कृत्ये करून घेणे सोपेही असते.

आपल्यापुरता विचार करायचा झाला तर, श्रीलंकेचा विषय घेता येईल. प्रभाकरन, राजीव गांधींची हत्या आणि एलटीटीई, यांचा तपशील पाहता, हा विषय किती गुंतागुंतीचा आहे, याची कल्पना यावी. तिथले राजकारण, भौगोलिक परिस्थिती, एलटीटीईचे प्रश्न, भारताचे धोरण आणि त्यात सहभागी झालेल्या स्त्रिया, सारेच थक्क करणारे आहे. आपण हे सर्व अनुभवलेले आहे, परंतु त्यातले बारकावे ठाऊक नसल्याने अधांतरी बोलणे व्हायचे. आता त्याला नेमकेपणा लाभला आहे तो या पुस्तकामुळे. भारतातील प्रश्नही समजून घेण्यासारखा आहे. तो या पुस्तकामुळे लक्षात यावा. लेखिकेने केलेले संशोधन समाजशास्त्रीय पातळीवरील आहे, तसे ते मानसशास्त्रीय पातळीवरीलदेखील आहे. ते वाचताना अंतर्मुख करते. एका वेगळ्याच विषयाला वाचकांच्या समोर ठेवले, त्यासाठी जे परिश्रम घेतले, त्यासाठी लेखिकेची प्रशंसा करायला हवी.

मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी केले.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# WISH YOU
# HAPPY DIWALI
# AND
# A
# PROSPEROUS
# NEW YEAR

## FROM A WELL WISHER

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.